**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**पृ.शी.**: जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) विधेयक

L.A. BILL NO. I OF 2011

(A BILL TO AMEND THE MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY ACT, 2005.)

AND MOTIONS FOR REFERRING THE BILL TO JOINT COMMITTEE

**उप सभापती** : आता माननीय जलसंपदा मंत्र्यांनी विधेयक मांडावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण विधेयक सन्माननीय जल संपदा मंत्र्यांना या विधानपरिषद सभागृहामध्ये मांडता येणार नाही यासाठी माझा हरकतीचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, माझ्या हातामध्ये विधानसभा कामकाज सल्लागार समितीचा अहवाल आहे. त्यामध्ये असे म्हटले आहे की, सोमवार, दिनांक 11 अर्थसंकल्पीय मागण्यांवर चर्चा व मतदान (पाचवा दिवस), मंगळवार, दिनांक 12 सुट्टी (रामनवमी), बुधवार, दिनांक 13 अर्थसंकल्पीय मागण्यांवर चर्चा व मतदान (सहावा व शेवटचा दिवस), आणि गुरुवार दिनांक 14 सुट्टी (डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती) अशाप्रकारचा विधानसभेच्या कामकाजाचा कार्यक्रम ठरविण्यात आला होता. या विधानमंडळाचे प्रधान सचिव डॉ. कळसे साहेबांना यासाठी मी धन्यवाद देतो की, ते सभागृहाच्या कार्यप्रणालीमध्ये अत्यंत प्रॉम्प्ट आहेत. मी याठिकाणी "प्रॉम्प्ट" हा शब्द मुद्दाम वापरला आहे याचे कारण त्या शब्दाचा फोर्स आपल्याला समजला पाहिजे. माझ्याकडे सोमवार, दिनांक 11 एप्रिल 2011 रोजी विधानसभेमध्ये झालेल्या कामकाजाची सर्व कागदपत्रे आहेत.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

त्यादिवशी रात्री सभागृहाचे कामकाज संपले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी रामनवमी निमित्त रजा होती. सभागृहाची बैठक 11 वाजून 59 मिनिटांनी म्हणजे 12 वाजण्यासाठी एक मिनिट शिल्लक असताना, सोमवार, दिनांक 11 एप्रिल 2011 रोजीची बैठक स्थगित करण्यात आली म्हणजेच दुसऱ्या दिवशी सुट्टी असल्यामुळे 11 वाजून 59 मिनिटांनी बैठक स्थगित झाली आणि रात्रीचे 12.00 वाजल्यानंतर रामनवमी सुरु झाली. हे बरोबर आहे, किंबहुना हीच पध्दत आहे.

अध्यक्ष महाराज, आपण सुट्टी कशी धरतो? मी महापौर असताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी होत असे त्यावेळी रात्री बरोबर 12 च्या ठोक्याला चेंबूर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला मुंबईच्या महापौरांकडून हार घातला जात असे आणि ही प्रथा आहे आणि त्याप्रमाणे मी रात्री बरोबर 12.00 वाजता डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला हार घातला. याबाबत मला विचारल्यावर सांगितले की, रात्री बरोबर 12.00 वाजता आमची डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती सुरु होते आणि त्यावेळी त्यांच्या पुतळयाला हार घालण्याची प्रथा आहे.मागील अनेक सुट्टीचे दिवस पाहिल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत रात्री 12.00 वाजेपर्यंत सभागृहाचे कामकाज बंद करणे आवश्यक आहे.13 तारखेला विधानसभेमध्ये अर्थसंकल्पाच्या बाबतीत मागण्यांवरील शेवटची चर्चा सुरु होती आणि दुसऱ्या दिवशी 14 तारखेला डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त रजा होती. रामनवमीचे सोडून द्या, पण रामाचे महत्व मान्य केल्याबद्दल आताच विधान मंडळाचे प्रधान सचिव डॉ.अनंत कळसे यांना मी धन्यवाद दिले. ज्या राज्यामध्ये उठता-बसता, झोपेतून उठले तरी, गुंगीतून उठले तरी, मग ती गुंगी कशाचीही असू दे, शाहू, फुले, आंबेडकर यांचे नाव घेऊन आम्ही राज्य चालवित आहोत असे सांगितले जाते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीचा सन्मान करणे ही राज्याची प्रतिष्ठा आहे, राज्य सरकारची प्रतिष्ठा आहे.माझ्या कडे 13 एप्रिलचे पत्रक भाग-2 आहे.यानंतर दुसऱ्या दिवशी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती होती. अशा वेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीचा सन्मान म्हणून 12 वाजण्यापूर्वी 1 मिनिट अगोदर सभागृहाचे कामकाज तहकूब होणे आवश्यक होते.रात्री 12 वाजल्यापासून डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती सुरु होते. आपण ज्यांच्या नावाने राज्य चालवित आहात, त्यांचा मान ठेवण्याकरता ते आवश्यक होते. परंतु आपला मतलब असेल तेव्हा कोणाचीही जयंती असो किंवा मयंती असो आपला मतलब महत्वाचा हे सूत्र आम्हाला काल येथे अनुभवास आले. यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा अवमान झाला ही माझी भूमिका आहेच.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

सभापती महोदय, सरकारने स्वत:च्या स्वार्था साठी विधानसभा सभागृहाची बैठक 12 वाजण्यास 01 मिनिट असताना स्थगित केली नाही. याबाबतीत विधान मंडळाच्या प्रधान सचिवांचा सल्ला घेतला असता तर त्यांनी नक्की सल्ला दिला असता. पण त्यांना विचारले गेले नाही, हे मी खात्रीपूर्वक सांगतो. त्यांना जर विचारले असते तर त्यांनी सांगितले असते किंवा कदाचित त्यांनी हळूच सांगितलेही असेल की,साहेब, आता 12.00 वाजावयास आले असल्याने सभागृहाचे कामकाज बंद करावयास पाहिजे. त्यावर "थांबा हो, थांबा हो, आमचे आम्ही बघतो."असे झाले असण्याची शक्यता आहे.पण विधान मंडळाच्या प्रधान सचिवांनी कुठपर्यंत बोलावयाचे आणि कुठपर्यंत थांबावयाचे याबाबतीत त्यांना मर्यादा आहेत. मग विधानसभेमध्ये रात्रीच्या अंधारात दरोडा घातला अशा प्रकारची वक्तव्ये सन्माननीय खासदार साहेबांनी केलेली आहेत, त्याचा आमच्या भाषणामध्ये नंतर उल्लेख होईलच. याठिकाणी माननीय मंत्री महोदय हे विधानसभेमध्ये जे विधेयक मंजूर झालेले आहे, ते याठिकाणी मांडू इच्छितात आणि आपणही त्याचा पुकारा केला. ते विधेयक रात्री 12.00 वाजल्यानंतर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीची सुट्टी सुरु झाल्यानंतर मंजूर करण्यात आले.कामकाज सल्लागार समितीच्या मान्यतेने अधिकृतरित्या विधिमंडळाला सुट्टी दिली होती, त्या दिवशी कामकाज करावयाचे नाही असे सांगितले होते. परंतु डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती सुरु झाल्यानंतर कामकाज सुरु राहिले. याठिकाणी म्हटलेले आहे की, "डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त" म्हणजे याबाबत जाणीव नाही असे मी म्हणणार नाही. याठिकाणी असे म्हटलेले आहे की, "महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) विधेयक" या चर्चेमध्ये खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला "श्री.देवेंद्र फडणवीस वगैरे.

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त श्री. शिशिर शिंदे, विधानसभा सदस्य यांनी उद्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती असून त्यांच्या जयंतीच्या निमित्त अनेक ठिकाणी विविध सामाजिक उपक्रम ठेवले आहेत असे सांगितले" त्यांनी शासनाला आठवण करुन दिली. माझी हरकत तीच आहे. उद्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीची सुट्टी असताना आणि सभागृहाच्या कामकाजाला सुट्टी दिली असताना, शासनाने हे विधेयक दडपून सादर केले. त्या करिता सुट्टी बाजूला ठेवण्यात आली. त्या दिवशी सभागृहाचे कामकाज करावयाचे नाही, असे कामकाज सल्लागार समितीने ठरविले असताना सुध्दा शासनाने हे विधेयक विधानसभेत मंजूर केले आणि सभागृहाची बैठक 1 वाजून 23 मिनिटांनी गुरुवार दिनांक 14 एप्रिल, 2011 रोजी स्थगित करण्यात आली. सभापती महोदय, हाच माझा हरकतीचा मुद्दा आहे. त्या दिवशी सुट्टी होती. दिनांक 14 एप्रिल, 2011 रोजी सुट्टी असताना विधानसभेत हे विधेयक मंजूर केल्याची नोंद आमच्याकडे आली आहे. विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांना त्या दिवशी सुट्टी होती. विधानपरिषदेला तर तो संपूर्ण आठवडा सुट्टी होती. सुट्टीच्या दिवशी हे विधेयक मंजूर झाल्याची नोंद या सदनात सादर झालेल्या विधेयकात आहे. माझा मुद्दा असा आहे की, हे अनैसर्गिक आहे. अनैतिक आहे. हे विधेयक अयोग्य पध्दतीने विधानसभेत मंजूर झाल्यामुळे ते विधानपरिषदेत चर्चेला घेणे योग्य नाही, अशा प्रकारचा माझा हरकतीचा मुद्दा असून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सन्मान ठेवण्याकरिता सभापती महोदय, आपण जो निर्णय द्याल तो आम्हाला मान्य असेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जी घटना लिहिलेली आहे त्या घटनेच्या अधीन राहून आपण या ठिकाणी काम करतो. म्हणून पीठासीन अधिकाऱ्यांची घटनेचे संरक्षण करण्याची फार मोठी जबाबदारी आहे. एक वेळ आमच्याकडून चूक झाली तर आम्हाला सांगण्यात येते की, तुम्हाला घटनाबाहय रीतीने काम करता येणार नाही. म्हणून घटनाबाहय रितीने विधानसभेत मंजूर झालेले हे विधेयक विधानपरिषदेमध्ये सादर करता येणार नाही, अशा प्रकारचा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

**उप सभापती** : त्या दिवशी सभागृहाचे कामकाज रात्री उशिरापर्यंत चालू होते, असे सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितले आहे. अर्थात सभागृहाचे कामकाज चालू असताना दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित होते. पीठासीन अधिकारी म्हणून विधानसभा अध्यक्ष हे स्वत: त्या ठिकाणी उपस्थित होते. त्यामुळे सर्व सभागृहाच्या संमतीने ते कामकाज झालेले आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील : त्यावेळी सभागृहात याला हरकत घेतली होती.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आपण निर्णय देण्यापूर्वी मला या ठिकाणी माझा मुद्दा मांडावयाचा आहे. विधान परिषदेसमोर जे विधेयक आलेले आहे त्यामध्ये स्पष्टपणे लिहिलेले आहे की, "महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, 2005 यात सुधारणा करण्या करिता विधेयक विधानसभेने दिनांक 14 एप्रिल, 2011 रोजी संमत केल्या प्रमाणे".

सभापती महोदय, हे विधेयक दिनांक 14 एप्रिलला संमत केल्याचे शासनाने म्हटले आहे तसे रेकॉर्डवर आलेले आहे. म्हणून सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित केलेला आहे की, सुट्टीच्या दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या दिवशी हे विधेयक मंजूर झाल्याचे दाखविण्यात आल्यामुळे हे विधेयक अनैसर्गिक आहे. या विधेयकाच्या संदर्भात दिनांक 14 एप्रिल, 2011 रोजी संमत केल्या प्रमाणे असा उल्लेख करण्यात आलेला आहे. याचा अर्थ असा की, दिनांक 14 एप्रिल, 2011 रोजी हे विधेयक मंजूर झाले. सुट्टीच्या दिवशी, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीच्या दिवशी मंजूर झाले त्यामुळे हे विधेयक अनैसर्गिक आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांनी या विधेयकाला जी हरकत घेतली आहे, त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. विधानसभेमध्ये किती सदस्य उपस्थित होते. विरोधी पक्षाचे किती सदस्य उपस्थित होते. ( अडथळा) सन्माननीय मंत्री महोदय श्री. बाळासाहेब थोरात यांच्यामध्ये मोठेपणा नाही, आपल्याकडून ही अपेक्षा नाही. कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीचा कार्यक्रम आम्हाला देण्यात येतो, त्याप्रमाणे आम्ही आमचा कार्यक्रम ठरवितो. कामकाज सल्लागार समिती कशासाठी आहे? कामकाज सल्लागार समितीने ठरविलेल्या कामकाजा व्यतिरिक्त सचिव आणि चार सदस्य बरोबर घेऊन सभागृहाचे कामकाज चालणार असेल तर या विधिमंडळाला काय अर्थ आहे. सभापती महोदय, ज्या पध्दतीने सभागृहाचे कामकाज होत आहे आणि रात्री उशिरा हे विधेयक मंजूर करण्यात आले आहे त्याबाबतीत सामान्य जनतेमध्ये तीव्र नाराजी उमटलेली आहे.

यानंतर श्री. बरवड...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील....

हे विधेयक साधे नाही. शेतकऱ्यांच्या जीवनाशी खेळणारे हे विधेयक आहे.

**उप सभापती** : आपण विधेयकावर चर्चा करणार आहोत त्यावेळी बोलावे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, आपण पीठासीन अधिकारी आहात. आपण निर्णय देत असताना आपल्याला सर्व ज्ञान आहे....

**उप सभापती** : मी आपल्याला समोर ठेऊनच निर्णय देईन.

श्री. दिवाकर रावते : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिष्ठा समोर ठेऊन आपण निर्णय द्यावा.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, आम्ही वर्तमानपत्रांमध्ये वाचले तसेच मीडियामध्ये सुध्दा असे येत आहे की, या विधेयकामध्ये दुरुस्ती होणार आहे. लोकशाही आघाडीतील एका घटक पक्षाने नाराजी व्यक्त केलेली आहे. म्हणून हे विधेयक परत विधानसभेत चर्चेला गेले पाहिजे आणि नंतर पुन्हा या सभागृहात आले पाहिजे, अशी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी जी हरकत घेतली आहे त्याला माझा पाठिंबा आहे.

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, विधानसभा आणि विधान परिषद ही दोन्ही सभागृहे सार्वभौम आहेत. विधानसभा सभागृहामध्ये कशा पध्दतीने चर्चा झाली, किती वाजता चर्चा झाली, ती योग्य होती की नाही याबद्दल त्या सभागृहातील सदस्य हरकत घेऊ शकतात. परंतु त्या सभागृहाच्या कामकाजाच्या संदर्भात हे सभागृह हरकत घेऊ शकत नाही.

**उप सभापती** : मी आता या संदर्भात निर्णय देतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले त्यामुळे मला दु:ख होते. सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी हे पीठासीन अधिकारी होते.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी उपस्थित केलेल्या हरकतीच्या मुद्यावर जोपर्यंत निर्णय दिला जात नाही तोपर्यंत दुसरा हरकतीचा मुद्दा उपस्थित करता येत नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आपण सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना बोलण्यासाठी परवानगी दिलेली आहे.

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

श्री. सुनील तटकरे : त्यांना परवानगी दिलेली नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी जे बोलले ते माझ्या हरकतीच्या मुद्यावर बोलले. ते पीठासीन अधिकारी होते, विधानसभेचे अध्यक्ष होते. कोणी कोणत्या वादामध्ये उतरावे हा या सदनाच्या गरिमेचा प्रश्न आहे. मी ज्यावेळी माझा हरकतीचा मुद्दा मांडला त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी, जे विधान सभेचे तत्कालीन अध्यक्ष होते, त्यांनी या ठिकाणी त्यांचे मत सांगितले. त्या सभागृहामध्ये कामकाज सल्लागार समितीचे जे इतिवृत्त वाचून दाखविले जाते ते माननीय अध्यक्षांच्या संमतीने वाचून दाखविले जाते आणि सार्वभौम सभागृह एकमताने ते मंजूर करते. सन्माननीय सदस्यांनी सार्वभौम सभागृहाचा उल्लेख केला. सार्वभौम सभागृहाने जी सुट्टी मंजूर केलेली आहे त्या सुट्टीच्या दिवशी विधेयक मंजूर केले. इतर कोणतीही सुट्टी असती तर समजू शकतो परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव घेतल्याशिवाय तुम्ही शिंकत सुध्दा नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीच्या सुट्टीच्या बाबतीत कामकाज सल्लागार समितीच्या इतिवृत्तामध्ये गुरुवार, दिनांक 14 एप्रिल, 2011 रोजी सुट्टी (डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती) असा उल्लेख केलेला आहे. कामकाज सल्लागार समितीचे इतिवृत्त सार्वभौम सभागृहाने मंजूर केलेले आहे.

मी आपल्या माहितीकरिता सांगतो की, रात्री पावणेबारा वाजता त्या सभागृहाचे जे काही चार-पाच सदस्य उपस्थित होते त्यांनी विरोध केला आणि सांगितले की, आता बारा वाजायला आलेले आहेत, वेळ संपायला आली आहे आपण हे विधेयक घेऊ नका. त्यानंतर जे वक्तव्य झाले ते मी सांगत नाही. त्या सभागृहात कोण काय बोलले त्या संदर्भात या ठिकाणी सांगणे बरोबर नाही. कामकाज सल्लागार समितीचे इतिवृत्त सार्वभौम सभागृहाने मान्य केल्यानंतर सुट्टीच्या दिवशी आपण त्या ठिकाणी विधेयक मंजूर करुन घेतले. आमच्याकडे जे विधेयक आले आहे ते विधानसभेने 14 तारखेला संमत केलेले आहे. 14 तारखेला सुट्टी होती. त्यामुळे आपण सभागृहाचे कामकाज थांबवून सचिवांचा सल्ला घ्यावा. 14 तारखेला सुट्टी जाहीर झालेली असताना सुट्टीच्या दिवशी कामकाज कसे झाले ? 14 तारखेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीची सुट्टी असताना, जी सुट्टी सार्वभौम सभागृहाने मान्य केली होती त्या सुट्टीच्या दिवशी विधेयक मंजूर करुन या सभागृहात कसे काय आले हा प्रश्न आहे. सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांना सांगू इच्छितो की, ते सार्वभौम सभागृह आहे हे आपण सांगू नका.

यानंतर श्री. शिगम...

अग्रधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : मी आता निर्णय देतो. या विधेयकाच्या संदर्भात सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी हरकतीच्या मुद्याद्वारे एक मुद्दा या ठिकाणी उपस्थित केला. सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी सांगितले ते योग्य आहे. विधानसभा ही सार्वभौम आहे. विधानसभेच्या तसेच विधानपरिषदेच्या कामकाजाच्या कक्षा वेगवेगळया आहेत. त्यामुळे विधानसभेमध्ये झालेल्या कामकाजाचा हवाला देऊन विधानपरिषदेतील कामकाज रोखता येणार नाही. तेव्हा मंत्री महोदयांनी विधेयकावरील चर्चेला सुरुवात करावी.

श्री. सुनील तटकरे (जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री) : सभापती महोदय, विधान सभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2011चे वि.स.वि.क्रमांक 1, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, 2005 यात सुधारणा करण्याकरिता विधेयक आपल्या अनुमतीने मांडतो

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 1 महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, 2005 यात सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घ्यावे असा प्रस्ताव मांडतो. ...(अडथळा)...

सभापती महोदय, आज जे सुधारणा विधेयक या ठिकाणी मांडलेले आहे ते विधानसभेमध्ये पारित झाल्यानंतर या विधेयकाच्या संदर्भात वेगवेगळया प्रकारची चर्चा वेगवेगळया ठिकाणाहून आपल्याला ऐकायला मिळाली. या विधेयकाच्या संदर्भात आज देखील वेगवेगळे मुद्दे उपस्थित करण्यात आलेले आहेत. या विधेयकाच्या संदर्भात गेले काही दिवस असे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला गेला की, राज्य सरकारने शेतक-यांच्या हिताच्या विरोधात निर्णय घेतलेला आहे. तशा प्रकारचे वक्तव्य करीत असताना किंवा तसा संदर्भ देत असताना काहीनी हेही सांगितले की, शासनाने शेतक-यांवर मध्यरात्री दरोडा घातला. सभापती महोदय, हे सुधारणा विधेयक आहे....(अडथळा) या विधेयकाच्या संदर्भात वक्तव्ये करताना सरकार पूर्वग्रहदूषित आहे असा समज निर्माण करण्याचा प्रयत्न झालेला आहे. मला या निमित्ताने सांगितले पाहिजे की, महाराष्ट्राने गेल्या 50 वर्षामध्ये सर्व स्तरावर नेत्रदीपक प्रगती केलेली आहे. महाराष्ट्राचा आणि देशाचा गाभा

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 10:20

श्री. सुनील तटकरे....

असलेल्या कृषी क्षेत्राला सर्वाधिक प्राध्यान्य शासनाने दिलेले आहे.

महाराष्ट्रामध्ये शेती आणि शेतीवरचे पूरक व्यवसाय वाढावेत, शेतक-यांच्या जीवनामध्ये कृषीक्रांती घडावी, शेतमालाला उत्तम प्रकारे भाव मिळावा यासाठी नियमन करण्याच्या दृष्टीने सुध्दा राज्य सरकारने गेल्या 50 वर्षामध्ये निश्चितपणे पावले उचलेली आहेत. एवढेच नव्हे तर शेतक-याने उत्पादित केलेल्या मालाला चांगली बाजारपेठ मिळावी म्हणून बाजार समित्या निर्माण करुन दलालाकडून शेतक-यांची होणारी पिळवणूक थांबविण्यासाठी या शासनाने गेल्या 50 वर्षात विविध स्वरुपाचे कायदे देखील केलेले आहेत. हे सर्व करीत असताना शेतक-यांच्या हिताची जपणूक करणे, महाराष्ट्रामध्ये सिंचनाचे लाभक्षेत्र वाढविणे, कृषी क्षेत्रामध्ये आमूलाग्र बदल करीत असताना सरकारी बियाण्याचा वापर करणे या दृष्टीकोनातूनही सरकारने काही क्रांतीकारक निर्णय गेल्या 50 वर्षामध्ये घेतलेले आहेत. वसंतराव नाईक साहेब असताना संकरित बियाण्याची कल्पना मांडली गेली. त्यावेळी देखील अशा प्रकारे अपप्रचार करण्याचा प्रयत्न झाला. जलविद्युत प्रकल्प केल्यानंतर त्यासाठी देण्यात येणारे पाणी हे डेड वॉटर आहे, त्याचा उपयोग शेतीच्या उत्पादनासाठी होणार नाही अशा प्रकारचा अपप्रचार महाराष्ट्रामध्ये फार मोठ्या प्रमाणात करण्यात आला. ..

श्री जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.या विधेयकामध्ये कोणत्या सुधारणा करण्यात आलेल्या आहेत याची माहिती मंत्री महोदयांनी सदनाला थोडक्यात सांगितली पाहिजे. सर्व सदस्यांची भाषणे झाल्यानंतर उत्तरासारखे भाषण मंत्री महोदय करीत आहेत. तसे भाषण करण्याची आवश्यकता नाही.

(दोन्ही बाजूचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : या विधेयकामध्ये सुधारणा काय करण्यात आल्या आहेत यासंबंधीची माहिती माननीय मंत्री महोदयांनी थोडक्यात आम्हाला सांगितली पाहिजे. ते जर उत्तराच्या भाषणाप्रमाणे माहिती देत असतील तर त्याचा काही उपयोग नाही. आम्हाला बोलू द्यावे.

श्री. विनायक मेटे (बसून) : सन्माननीय मंत्री महोदयांचे म्हणण् प्रथम ऐकून घ्यावे.

श्री. जयंत प्र.पाटील : मी सन्माननीय सदस्य श्री. मेटे यांना सांगू इच्छितो की, मी या सभागृहाचा गेल्या 12 वर्षापासून सदस्य आहे. आम्हाला माननीय मंत्री महोदयांकडून थोडक्यात माहिती हवी आहे.

**उप सभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांनी आपल्या जागेवर बसावे.

( गोंधळ )

श्री.विनायक मेटे (बसून) : माननीय मंत्री महोदय, हे थोडक्यातच बोलत आहेत. ते विधेयकाची पार्श्वभूमी सांगत आहेत.

श्री. जयंत प्र.पाटील : सभागृहात सत्ताधारी पक्षाकडून अशा प्रकारची दादागिरी होत असेल तर ती आम्ही सहन करुन घेणार नाही. सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली होती. त्याप्रमाणे मी बोलण्यास उभा होतो. परंतु सत्ताधारी पक्षातील सदस्य आपल्या जागेवर बसून माझ्या बोलण्यात अडथळा आणण्याचा प्रयत्न करीत आहेत.

(विरोधी पक्षाचे सदस्य वेलमध्ये येऊन एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**उप सभापती** : मी तुम्हाला बोलण्यासाठी थांबविलेले नाही.

( सत्ताधारी पक्षाचे सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात. )

**उप सभापती** : मी सर्व सन्माननीय सदस्यांना खाली बसण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांना सांगू इच्छितो की, आपण दोन मिनिटे शांत रहा.

श्री. जयंत प्र.पाटील : सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांकडून अशा प्रकारचे अडथळे निर्माण केले जात असतील तर सभागृहातील कामकाज करणे शक्य नाही.

**उप सभापती** : मी या विधेयकाच्या अनुषंगाने सर्व सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी उपलब्ध करुन देणार आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : सत्ताधारी पक्ष बहुमताच्या जोरावर दादागिरी करीत आहे असे माझे मत आहे.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : हे सर्वोच्च सभागृह आहे. हे ठिकाण कोणीही दादागिरी करण्याचे नाही. आपल्या सभागृहाचे कामकाज हे अत्यंत सुव्यवस्थित आणि चांगल्या पध्दतीने चालते असा या सभागृहाचा लौकिक आहे. हा लौकिक कायम ठेवण्याची जबाबदारी दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांची आहे. मी सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांना बोलण्याची परवानगी दिली होती. त्यांनी आपले म्हणणे थोडक्यात मांडावे.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, हे विधेयक महाराष्ट्राच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे आहे. शासनाने काय केले या बाबतची माहिती देण्यापेक्षा या विधेयकामध्ये काय सुधारणा केलेली आहे, ती माहिती माझ्या सारख्या अडाणी सदस्याला देण्यात यावी.

श्री. दिवाकर रावते : आम्हाला तुमच्या दादागिरीमध्ये बसावयाचे नाही. तुमच्यात हिंमत असेल तर सभागृहाच्या बाहेर दादागिरी करुन दाखवा. या शासनाला कसली मस्ती आलेली आहे. हे शासनाने आणलेले विधेयक आहे.

( गोंधळ )

श्री. जयंत प्र.पाटील : हे विधेयक विधानसभा सभागृहात रात्री 12.00 वाजता मंजूर करुन घेतले गेले. या विधेयकाच्या बाबतीत कोणती सुधारणा केली आहे याची आम्हाला स्पष्टपणे माहिती शासनाकडून कळली पाहिजे. या विधेयकात कोणती सुधारणा केली आहे, याबाबतची माहिती आम्हाला मीडियामधून कळते. शेतीसाठी पाण्यासाठी दुसरा क्रमांक दिला जाणार आहे. ही माहिती आम्हाला बाहेरुन मिळते. हे विधेयक म्हणजे सभागृहाची प्रॉपर्टी आहे. त्या विषयी माननीय मंत्री महोदय माहितीच देत नाही. त्या सुधारणेवर काही बोललेच जात नाही. माननीय मंत्री महोदय हे इतर गोष्टींचा या ठिकाणी उल्लेख करीत आहेत. त्या गोष्टी ऐकून ऐकून आम्ही कंटाळलो आहेत. या विधेयकावर आम्ही बोलणार आहोत, शासनाने या राज्यात सिंचनासाठी किती पाणी दिले, किती पाणी इतर क्षेत्रासाठी वापरले जात आहे या बाबतची माझ्याकडे पूर्णपणे आकडेवारी उपलब्ध आहे. संसदीय लोकशाहीमध्ये अतिशय घाईने आणलेले हे विधेयक आहे. या विधेयकामुळे देशामध्ये या राज्याची प्रतिमा वेगळीच झालेली आहे. रात्री 12.00 नंतर हे विधेयक शासनाने ठराविक लोकांच्या उपस्थितीत मंजूर करुन घेतले आहे. त्यामुळे आमच्या सारख्या लोकप्रतिनिधींकडे सर्व सामान्य माणसे वेगळया नजरेने पहावयास लागली आहेत. आम्हाला या विधेयकाचे उद्दिष्ट थोडक्यात कळले पाहिजे.

3...



ABG/ KGS/ KTG/ प्रथम श्री. शिगम 10:25

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील म्हणाले की, हे विधेयक रात्री 12.00 वाजल्यानंतर मंजूर करुन घेण्यात आले. मुल्याधारित करासंबंधीचे विधेयक पहाटे 4.00 वाजता या सभागृहाने मंजूर केले आहे. व्हॅटचे विधेयक ज्या दिवशी पास झाले, त्यानंतर दुसऱ्या दिवशी शासकीय सुटी नव्हती. माननीय जलसंपदा मंत्री या विधेयकाच्या संदर्भातील भूमिका या ठिकाणी मांडत आहेत. ती भूमिका त्यांना सविस्तरपणे मांडू द्यावी अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : मूल्याधारित कर विधेयक ज्या दिवशी सभागृहात मंजूर झाले...

श्री. दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर साहेब, मी मूल्याधारित कर विधेयकासंबंधी सभागृहाला माहिती सांगतो. त्या दिवशी....

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ KTG/ 10:30

श्री.दिवाकर रावते.....

विधानपरिषदेचे कामकाज संपले होते. फक्त राष्ट्रगीत व्हावयाचे होते. मूल्याधारित करासंबंधीचे विधेयक खालच्या सभागृहातून या सभागृहात मंजुरीसाठी यायचे असल्यामुळे आदरणीय सभापतींनी सभागृहाची बैठक एका तासासाठी तहकूब केली होती. आम्ही त्यावेळी सहकार्य केले होते.

श्री.सुनील तटकरे : माननीय सभापती महोदय, आज जे सुधारणा विधेयक आणले आहे त्याची पार्श्वभूमी सांगण्याचा मला अधिकार जरुर आहे. आपण मला संरक्षण द्यावे अशी मी विनंती करतो. या विधेयकामध्ये नेमक्या काय तरतुदी आहेत, विधेयक आणण्यामागचा हेतू काय आहे हे मी सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. गेल्या अनेक वर्षात राज्य सरकारने कशा पध्दतीचे धोरण राबविले हे बिलाची मांडणी करीत असताना सांगण्याचा मला अधिकार आहे. त्या प्रमाणे मी सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. गेल्या 40-50 वर्षात ही भूमिका घेत असताना मी त्या संबंधी बोलणार होतो. ज्या वेळेला अशा पध्दतीचा विचार करण्यासाठी श्री.स.गो.बर्वे यांच्या अध्यक्षतेखाली 1960 मध्ये पहिल्यांदा समिती स्थापन झाली, त्या वेळेला महाराष्ट्राच्या जल नीतीमध्ये अंतर्भूत असलेल्या पाण्याबाबत सिंचनाअगोदर पाण्याच्या औद्योगिक वापरावर दिलेला प्राधान्य क्रमांक मूळ अहवालाच्या शिफारशीमध्ये आहे. हे शिफारशीमध्ये जरी असले तरी त्यामध्ये एका गोष्टीचा उल्लेख केलेला आहे. ते सांगण्यासाठी मी पार्श्वभूमी सांगितली. ते सांगण्याचा मला पुन्हा पुन्हा अधिकार आहे. हे रेकॉर्डवर मी पुन्हा आणू इच्छितो.

सभापती महोदय, पाण्याच्या विविध उपभोगामध्ये कोणत्या वापराला प्राधान्य द्यायचे या बद्दल युक्तिवाद करीत असताना पाण्याच्या परिमाणातून औद्योगिक विकासासाठी वापरले जाणारे पाणी इतर कोणत्याही वापरापेक्षा अधिक उत्पन्न देते, रोजगार निर्मितीची क्षमता औद्योगिक पाण्याच्या वापरात अधिक असते. शासन निर्णय क्रमांक-एआयसी.1063/आय.5, दिनांक 30 जून, 1964 अन्वये बर्वे आयोगाच्या शिफारशी राज्य सरकारने स्वीकारल्या. तेव्हापासूनच राज्याच्या पाणी विषयक धोरणामध्ये औद्योगिक वापराच्या अग्रक्रमाचे धोरण स्थायी ठरविण्यात आले. माझा हे सांगण्यामागचा हेतू हाच आहे की, हे धोरण त्या कालावधीत स्वीकारले होते. तरी 50 वर्षात सिंचनाचे लाभक्षेत्र वाढविण्याच्या दृष्टीकोनातून प्रयत्न केले गेले आणि शेतक-यांच्या हिताच्या दृष्टीकोनातून वेगवेगळे निर्णय घेत असताना या निर्णयांच्या माध्यमातून, सहकार चळवळीच्या माध्यमातून सुध्दा शेतीमालाचे उत्पादन प्रचंड पध्दतीने कसे वाढेल याची एक वेगळी दृष्टी उभ्या

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे......

महाराष्ट्राने देशाला दिलेली आहे, हे गेल्या 50 वर्षात आपण सर्वांनी अनुभवले आहे. एका वेळेला कृषी विषयक धोरणाला चालना देत असताना रोजगारासाठी मागास भागामध्ये सुध्दा औद्योगिक क्षेत्र वाढले पाहिजे असा सुध्दा निर्णय त्या काळात घेण्यात आला. हे करीत असताना परस्पर पूरक रोजगाराची निर्मिती आणि शेती व शेतीमालाचे उत्पादन आणि कृषी क्षेत्र या दोन्ही गोष्टीची सांगड घालण्याचा प्रामाणिक प्रयत्न गेल्या 50 वर्षात झाला. मध्यंतरीच्या कालावधीत बिगर सिंचनाच्या पाण्याच्या वापराची गरज फार मोठया प्रमाणात निर्माण झाली. तो पर्यंत अशा पध्दतीचे सर्व अधिकार हे सरकारकडे होते. त्या काळात बिगर सिंचनासाठी पाणी देण्यासंबंधीचे प्रस्ताव आले की, सदर प्रस्ताव मंत्रीमंडळापुढे यायचे आणि त्या माध्यमातून तशा पध्दतीची भूमिका घेतली आहे. हे सर्व करीत असताना 1976 साली सुध्दा पाटबंधारे कायदा केला. पाटबंधारे कायदा करीत असताना त्यामध्ये कोणकोणत्या गोष्टी स्वीकारल्या आहेत हे या ठिकाणी बसलेल्या सर्व सन्माननीय सदस्यांना ज्ञात आहेत. त्यामध्ये राज्य सरकार, कंपनी किंवा जिल्हा परिषद यांच्याकडून नियंत्रण करण्यात आलेल्या कालव्याच्या संदर्भात संपुष्टीकरण वगैरे अनेक गोष्टीसाठी 1976 साली पाटबंधारे कायदा करुन त्या बद्दलचा अधिनियम तयार केला आहे. त्या आधारे पाणी आणि पाणी वाटप या बद्दलची पध्दत सुरु झाली.

सभापती महोदय, 1998 साली अशा पध्दतीची एकंदरीत मागणी वाढली. सन 2000 पर्यंत या धोरणामध्ये बदल केव्हा झाला आणि कोणत्या कारणामुळे झाला हे मी सभागृहाला सांगतो. दिनांक 23 फेब्रुवारी, 1998 रोजी राज्य शासनाने एक शासन निर्णय निर्गमित केला. त्याचा प्रस्ताव हा आहे की, इ.स.2000 मध्ये राज्यातील सर्व पाणी पुरवठ्याच्या योजना पूर्ण करण्याच्या संदर्भात प्रामुख्याने पाटबंधारे विभागाचे पूर्ण झालेले प्रकल्प किंवा बांधकामाधीन प्रकल्पाच्या जलाशयातून जीवन प्राधिकरणाकडून मोठया प्रमाणावर 2030 पर्यंत लोकसंख्या विचारात घेऊन पाणी पुरवठा आरक्षित करण्याची मागणी आली होती.

नंतर एच.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे .......

आणखी पाण्याच्या मागण्या येणे अपेक्षित आहे. राज्यातील पंचतारांकित औद्योगिक वसाहती आणि अन्य औद्योगिक वसाहतींसाठी अशा प्रकारच्या मागण्या पाटबंधारे विभागाकडे आलेल्या आहेत. त्यांचे संकलन केले असता असे लक्षात येते की, दीर्घकालीन पाण्याच्या आरक्षणाच्या मागण्या विचारात घेतल्यानंतर राज्यातील विविध भागातील पाणी साठ्याच्या सरासरीने सुमारे 35 टक्के पाणी बिगर सिंचनासाठी राखून ठेवावे लागते. त्यामुळे 6 लाख हेक्टर सिंचन अंतिमत: कमी होते, असे त्यात म्हटले आहे. पाणी नियोजनात आरक्षण नसताना बिगर आरक्षण करायचे झाल्यास यापूर्वी समिती किंवा मंत्रिमंडळापुढे जाण्याची प्रथा होती. त्याचे कारण असे की, ज्या सिंचन प्रकल्पाला शासनाने मान्यता दिल्या आहेत त्याच्या पाणी नियोजनात मोठ्या प्रमाणात बदल करायचा झाल्यास शासनाचीच मान्यता लागते. दुसरे असे की, मोठे प्रकल्प बांधून झाले असतील अथवा सुरु असलेल्या प्रकल्पांवर मोठ्या प्रमाणात पाण्याचे आरक्षण केले तर त्या भागाला सिंचनाचा लाभ देण्याचे अहवालात प्रस्तावित केले आहे. त्यापैकी काही क्षेत्र सिंचनापासून वंचित होते त्यामुळे कालवे, बिगर कालवे किंवा शेतकऱ्यांवर झालेला खर्च निष्फळ होतो. तथापि पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देण्याची शासनाची भूमिका असल्यामुळे हे अपरिहार्य ठरते. अशा प्रकारे होणारी सिंचनातील कपात किंवा निष्फळ खर्च मंत्रिमंडळाच्या निदर्शनास आणून त्याला मंत्रिमंडळाची मान्यता आवश्यक असते.

पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी शासनाने एक मोठा कालबध्द कार्यक्रम हाती घेतला असल्यामुळे आणि अशा प्रकारे जलाशयातील पाणी पिण्याच्या पाण्यासाठी आरक्षित करण्याची प्रकरणे मोठ्या प्रमाणात जीवन प्राधिकरण मंडळाकडून प्राप्त होत असल्यामुळे जलसंपदा प्राधिकरणाच्या चौथ्या बैठकीत त्यावर चर्चा होऊन ही प्रकरणे मंत्रिमंडळापुढे ठेवण्याऐवजी मंत्रिमंडळाचीच एक उच्चाधिकार समिती नेमून त्या समितीपुढे विचारार्थ ठेवण्यात यावीत. या अनुषंगाने शासन असा निर्णय घेत आहे की, पाटबंधारे विभागाकडे पिण्याच्या पाण्यासह सर्व प्रकारचे अधिकार, सिंचनासाठी पाणी आरक्षित करण्यासाठीचे प्रस्ताव प्राप्त होतात. त्या प्रस्तावाअंतर्गत जलाशयातील उपयुक्त पाणी साठ्याच्या 25 टक्केपेक्षा जास्त पाणी आरक्षित करण्याचे प्रस्ताव असतील तर अशा प्रस्तावांशी संबंधित खाली नमूद केलेल्या मंत्रिमंडळाची एक उच्चाधिकर समिती स्थापन करण्यात येत आहे. त्या समितीत माननीय पाटबंधारे मंत्री अध्यक्ष

....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे .......

असतील, मंत्री पाणीपुरवठा सदस्य, मंत्री उद्योग सदस्य, कृषी मंत्री सदस्य आणि माननीय राज्य मंत्री पाणीपुरवठा हे सदस्य असतील. त्याचबरोबर संबंधित विभागांचे सचिव देखील त्यात सदस्य असतील.

महोदय, हा आदेश 23 फेब्रूवारी, 1998 रोजी निर्गमित झाला होता. याचा अर्थ असा की, राज्यात वाढलेले नागरिकरण, राज्यात वाढलेले वेगवेगळे औद्योगिक प्रकल्प आणि त्यांना द्यावे लागणारे पाणी यासंबंधी निर्णय घेण्यासाठीचा जो अधिकार शासनाचा होता तो अधिकार मंत्रिमंडळाच्या उप समितीने घ्यावा असाही निर्णय सन 1998 मध्ये तत्कालीन सरकारने घेतला होता. त्याच पध्दतीने त्याची अंमलबजावणी नंतरच्या काळात सुरु झाली. त्यानंतर सन 2003 मध्ये हा जो निर्णय घेण्यात आला त्याला हे स्वरुप देण्यात आले आहे. सन 2003 मध्ये राज्य शासनाने एक जल नीती तयार केली. त्या जल नीतीच्या अनुषंगाने प्राधान्यक्रम ठरविण्यात आले असून पिण्याच्या पाण्याला अग्रक्रम देण्यात आला. पूर्वी सन 1960 मध्ये बर्वे कमिशनने ज्या शिफारशी केल्या होत्या त्याच शिफारशी यामध्ये होत्या. मघाशी या विधेयकाबाबतची हीच पार्श्वभूमी सांगण्याचा मी प्रयत्न करीत होतो पण दुर्दैवाने त्याला हरकत घेण्यात आली. मला हेच सांगावयाचे होते की, पाण्यासंबंधीचे शासनाचे धोरण, बर्वे आयोगाच्या शिफारशी हे सर्व शासनाने स्वीकारलेले असल्याने प्रत्यक्षात सिंचन क्षेत्रात वाढ करणे, कृषी क्षेत्राला प्रोत्साहन देणे तसेच वेगवेगळे पूरक व्यवसाय वाढविण्याचा निर्णय देखील त्यावेळच्या सरकारने घेतला आणि प्राधान्याने या क्षेत्रांना प्रोत्साहन दिलेले आहे. सन 2003 मध्ये जल नीती स्वीकारत असताना तोच प्राधान्यक्रम ठेवण्यात आला होता. सन 2005 मध्ये एक निर्णय शासनाने घेतला होता. हा निर्णय घेत असताना त्यात सन 1976 चा पाटबंधारे कायदा, सबंध राज्यात सिंचनाचे लाभ क्षेत्र वाढविण्यासंबंधीचा घेतलेला निर्णय आणि त्या माध्यमातून घ्यावयाची भूमिका अशा सर्व बाबींचा या सन 2005 मधील निर्णयामध्ये विचार करण्यात आला आहे. राज्यातील सिंचनासाठी अशाच व्यवस्थेची आवश्यकता असल्याचे शासनाने स्वीकारले.

यानंतर श्री. जुन्नरे

अशुध्दलिखित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे .......

जलसंपत्ती नियमन प्राधिकरण व पाणी वाटपाचा अधिकार असे दोन महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.

सिंचनाची व्यवस्था बळकट करावयाची असेल तर लाभक्षेत्रामध्ये येणा-या शेतक-यांकडे पाणी वाटपाचा अधिकार त्यांच्याकडे रहावा, त्यांच्या माध्यमातून देखभाल केली जावी. त्यांच्या पध्दतीने पाण्यासाठी संस्था स्थापन करावी अशा प्रकारचा क्रांतिकारी निर्णय संपूर्ण देशात आपल्या राज्याने पहिल्यांदा घेतलेला आहे. प्राधिकरणाचा नियम किंवा तशा प्रकारचा कायदा करीत असतांना तो प्रथम विधानसभेच्या पुढे आला व नंतर विधानसभेने संयुक्त समितीकडे चर्चेसाठी पाठविला व त्यानंतर विधानसभेने पारित केले. विधेयक पारित करीत असतांना सन 2005 च्या कायद्यामध्ये तो अधिकार प्राधिकरणाकडेही होता. 1976 चा कायदा अस्तित्वात असल्यामुळे पाटबंधारे कायद्याद्वारे तो अधिकार सरकारकडे सुध्दा रहात होता. त्यामुळे एकाच वेळेला दोन वेगवेगळया ॲथोरिटीकडे अधिकार होते म्हणून ते सुस्पष्ट करण्यासाठी सुधारणा विधेयक मांडले गेले. या क्षेत्रात काम करीत असतांना अनेक वर्षापासून चर्चा होत होती. विशेष करुन सन 2005 मध्ये प्राधिकरणाची स्थापना झ ााल्यानंतर सातत्याने बोलले जात होते की, पाण्याचा वापर बिगर सिंचनासाठी मोठया प्रमाणात केला गेला.

सन 2005 च्या नंतर जे निर्णय झाले त्यामध्ये महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास मंडळाकडे पिण्याच्या पाण्यासाठी एकंदर 23 प्रस्ताव आले होते व त्यासाठी 76.93 द.घ.मीटर पाणी मंजूर केले. औद्योगिकरणासाठी एकंदर 17 प्रस्ताव आले होते त्यामध्ये 451द.घ.मीटर पाणी मंजूर केले गेले. कृष्णा खोरे विकास मंडळाच्या माध्यमातून संबंध क्षेत्रामध्ये 40 प्रस्ताव आले होते. त्यावेळी 528 द.घ.मीटर पाण्याचा वापर बिगर सिंचनासाठी मंजूर झाला. गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाकडे एकंदर 12 प्रस्ताव आले होते. तेथे 406 द.घ.मीटर पाणी पिण्यासाठी दिले गेले. औद्योगिकरणासाठी एकंदर 11 प्रस्ताव आले त्यासाठी 203 द.घ.मीटर पाणी देण्यात आले. एकंदरित बिगर सिंचनासाठी 23 प्रस्ताव आले त्यासाठी गोदावरी मराठवाडा मंडळाकडून 609 द.घ.मीटर बिगर सिंचनाच्या पाणी वापरसाठी मान्यता देण्यात आली. विदर्भ महामंडळाच्या मार्फत पिण्याच्या पाण्यासाठी एकंदर 9 प्रस्ताव आले त्यामध्ये 115 द.घ.मीटर पाणी पिण्याच्या पाण्यासाठी देण्यात आले. औद्योगिकरणासाठी एकंदर 13 प्रस्ताव आले त्या माध्यमातून 437.5 द.घ.मीटर



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे .......

पाणी औद्योगिकरणासाठी मंजूर झाले होते. बिगर सिंचनासाठी एकंदर 17 प्रस्ताव आले व 552 द.घ.मीटर कोकणामधून पिण्याच्या पाण्याचे एकंदर 10 प्रस्ताव आले होते त्यासाठी 143 द.घ.मीटर पाणी मंजूर झाले, औद्योगिकरणासाठी 7 प्रस्ताव आले होते व त्यासाठी 165 द.घ.मीटर पाणी उपलब्ध करुन देण्यात आले. एकंदर बिगर सिंचनाच्या 17 प्रस्तावामधून 309 द.घ.मीटर पाण्याचा वापर अनुज्ञेय झाला. तापी विकास महामंडळाच्या मार्फत पिण्याच्या पाण्यासाठी केवळ .023 चा एकच प्रस्ताव आला होता. यामध्ये औद्योगिकरणासाठी एकही प्रस्ताव आला नव्हता.

सभापती महोदय, सांगण्याचे कारण एवढेच आहे की, एकंदरीत पाणी वाटपाच्या जल नीती मध्ये धोरणात्मकरित्या बदल झाला तरी सुध्दा उच्चाधिकार समितीने व सरकारने घेतलेल्या निर्णयाच्या संदर्भात बिगर सिंचनासाठी पाण्याचा वापर करीत असतांना यातील बहुतांशी म्हणजे जवळपास 70 ते 80 टक्के पाणी पिण्याच्या पाण्यासाठी वापरण्यात आले. आज राज्यामध्ये उपलब्ध असलेल्या पाणी साठयापैकी 70 ते 72 टक्के पाणी सिंचनासाठी उपलब्ध आहे. 26 ते 27 टक्के पाणी बिगर सिंचनासाठी होते त्यातील 17 ते 18 टक्के पाणी पिण्याच्या पाण्यासाठी आहे व खाजगी करणासाठी वापरण्यात आलेल्या पाण्याची टक्केवारी केवळ 6 ते 7 टक्क्याच्या आसपास आहे. मधील काळात सिंचनाचे लाभ क्षेत्र मोठया प्रमाणात वाढले होते. मी समर्थन करीत नाही परंतु शेवटी विधेयकाच्या सुधारणेचा भाग असल्यामुळे मी सांगू इच्छितो की, ज्यावेळेस आपल्या राज्यात विजेची तूट निर्माण झाली होती त्यावेळेस आपल्याला भारनियमन करावे लागले होते. या सा-याचा परिणाम इतर गोष्टीवर झाला. आता त्याच्या खोलात मी जाऊ इच्छित नाही. परंतु कृषी क्षेत्रावर याचा परिणाम फार मोठया प्रमाणात झाला होता. रब्बी,खरीप व उन्हाळी पीक ज्यावेळेस हातामध्ये येणार होते त्याच वेळेला विजेचा पुरवठा खंडीत झाल्यामुळे शेतक-यांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाल्याचे आपण त्या कालावधीत पाहिलेले आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे ..

त्यामुळे विजेची गरज भागविण्यासाठी वीज निर्मितीला प्राधान्य देण्याकरिता सरकारला काही पावले उचलावी लागली होती.

ज्यावेळी बिगर मोसमी पावसावर शेती केली जाते त्यावेळेस विद्युतीकरणा शिवाय ती होऊ शकत नाही. प्रवाही सिंचन किती आहे आणि उचलून पाणी किती वापरतो याचा विचार केला तर कृषी क्षेत्रातील उत्पादनासाठी विजेचा वापर अपरिहार्य ठरतो यात कोणाच्याही मनात दुमत असण्याचे काराण नाही. त्यामुळे या संदर्भात शासनाने वेगवेगळे निर्णय घेतलेले असले तरी राज्यातील शेतक-यांच्या हिताच्या दृष्टीनेच सरकारने पावले उचलली आहेत.गेल्या पाच सहा वर्षात निर्णय घेत असतांना आपत्ती आल्यामुळे सरकारने शेतक-यांना मदत करण्याचे धोरण स्वीकारले होते. कृषी मालाला किंवा शेतक-यांना अधिक प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने देखील प्रयत्न झाला होता. केन्द्रातील डॉ.मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वाखालील युपीए सरकारने त्या कालावधीत काही मदत दिली होती. शेतक-यावरील कर्ज माफ करण्याचा निर्णय राज्य सरकारने या पूर्वीच स्वीकारला होता. माननीय कृषी मंत्री श्री शरद पवार यांनी शेतक-यांच्या कर्ज माफीचा प्रस्ताव देश पातळीवर मांडला व कर्ज माफीचा निर्णय जाहीर केला होता त्यावेळी देशातील सर्वसामान्य शेतक-यांचे 72 हजार कोटी रुपयांचे कर्ज माफ करण्याचा महत्वाकांक्षी निर्णय डॉ मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वा खालील युपीए सरकारने घेतला होता. त्याचा फायदा महाराष्ट्रातील शेतक-यांना मिळाला होता परतु बहुतांशी शेतक-यांना त्याचा फायदा मिळत नाही असे लक्षात आल्यानंतर या सरकारने शेतक-यांवर अन्याय होऊ देणार नाही अशी भूमिका घेतली होती. केन्द्र सरकारने जो निर्णय घेतला होता त्या निर्णयाची अंमलबजावणी करीत असतांना महाराष्ट्र राज्यातील शेतकरी काही प्रमाणात वंचित राहतात असे दिसून आले म्हणून राज्य सरकारने आपल्या तिजोरीतून पाच ते सहा हजार कोटी रुपये देण्याचा महत्वाकांक्षी निर्णय त्या काळात घेतला होता. अशा प्रकारे एकाच वेळी शेती, उद्योग, रोजगार आणि शेती मालाचे उत्पादन यावर भर देण्याचा सरकारने प्रयत्न केलेला आहे. परंतु अशा प्रकारचे धोरण स्वीकारल्या नतर शेतक-यांवर दरोडा टाकला गेला शेतक-यांवर आधात केले गेले आणि रात्रीच्या काळोखात हे विधेयक मंजूर करण्यात आले होते असे सांगण्याचा प्रयत्न केला जात आहे. परंतु या संदर्भात सरकारची भूमिका सांगणे हे माझे कर्तव्य आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सोफिया कंपनी संबंधीचा उल्लेख करावा.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे : त्याही बद्दल मी बोलणार आहे. शासनाने जे काही निर्णय घेतलेले आहेत त्याची अंमलबजावणी आम्ही चांगल्या प्रकारे करीत आहोत. 1960 साली बर्वे आयोगाने ज्या काही शिफारशी केल्या होत्या त्या शिफारशी शासनाने तत्वत: जरी स्वीकारल्या असल्या तरी प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी करीत असतांना कृषी क्षेत्राला प्राधान्य दिले होते. 2005 साली जल संपत्ती नियमन प्राधिकरण केले होते त्यानंतर सुध्दा उच्चाधिकार समितीने काही निर्णय घेतले होते त्या निर्णयातून सुध्दा शेतक-यांचे हित प्राधान्याने जपण्याकरिता प्रयत्न निश्चितपणे झालेले आहेत. तरी सुध्दा काही गोष्टीबद्दल संभ्रम असू शकतो.सरकारने जे काही निर्णय घेतलेले आहे त्यामध्ये पारदर्शकता आणि स्पष्टपणा तर आहेच. कृषी क्षेत्राला प्राधान्य देत असतांना राज्याला सर्व क्षेत्रात पुढे नेण्यासंबंधीची भूमिका देखील शासनाला घ्यावी लागते. उद्योग क्षेत्रामध्ये गुजराथ राज्य आमच्या पेक्षा पुढे गेलेले आहे असे अर्थसंकल्पाच्या चर्चेच्या वेळी सन्माननीय सदस्यांकडून सांगण्यात येते. तेव्हा त्यांना त्या राज्याची स्तुती करावयाची होती की आमच्या धोरणाबद्दल काही बोलावयाचे होते असा प्रश्न आमच्या समोर पडत असतो.

श्री.दिवाकर रावते (बसून) आपण मागे वळून पाहू नका. मागे वळून पाहण्यामध्ये आपल्याला धोका आहे.

श्री.सुनील तटकरे : मी मागे न पाहता सन्माननीय सदस्यांकडे पाहूनच बोलत आहे.

श्री.राधाकृष्ण विखे पाटील(बसून) : या विधेयकाला माझा पाठिंबा आहे.

श्री.सुनील तटकरे : या विधेयकाला त्यांचा पाठिंबा आहे असे त्यांनी सागितले आहे.सन्माननीय सदस्य कितीही बोलले तरी माननीय कृषी मंत्री श्री राधाकृष्ण विखे पाटील यांचा मला पाठिंबा राहणारच आहे. तुमच्यामध्ये काही वेळा मतभेद होत असतात परंतु आमच्याकडे मात्र समन्वय चांगला आहे.आम्ही तीन वेळा सत्तेवर आलेलो आहोत. आम्ही काही काल सत्तेवर आलेलो नाही.यापूर्वी तीन निवडणुका जिंकत असतांना लोकशाही आघाडी सरकारने हे धोरण लोकापुढे ठेवले म्हणूनच लोकांनी आम्हाला निवडून दिले आहे. आम्ही घेतलेल्या धोरणाचा स्वीकार राज्यातील जनतेले केला म्हणूनच आम्ही येथे बहुमताने बसलेलो आहोत. लोकशाहीमधील हे बहुमत लोकांनी आम्हाला दिलेले आहे. हे कोणीही नाकारु शकत नाही एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

3..



VTG/ KGS/ KTG/ प्रथम श्री.जुन्नरे 10.45

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, या संदर्भात ज्यावेळी चर्चा व्हावयास लागली त्यावेळी सन्माननीय सदस्यांनी बाहेर काही प्रतिक्रिया दिल्या होत्या. केन्द्रीय कृषी मंत्री आदरणीय श्री शरद पवार यांच्या बरोबर माझी तीन वेळा चर्चा झाली होती . महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्री माणिकराव ठाकरे यांनी काही भूमिका मांडली होती तसेच श्री मधुकर पिचड यांनी सुध्दा काही भूमिका मांडली होती.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे...

त्याबाबतीत सरकारची भूमिका स्पष्ट आहे. शेवटी आपण जे काही धोरण तयार केले आहे त्याबाबत जलसंपदा विभागाचा मंत्री या नात्याने मी सांगू इच्छितो की, धोरणामधील प्राधान्यक्रम बदलण्यासाठी माझा विभाग पूर्णपणे खुला आहे. शेवटी मंत्रिमंडळ आणि माननीय मुख्यमंत्री जे ठरवतील त्याप्रमाणे प्राधान्यक्रम बदलण्याच्या दृष्टीने एखादा प्रस्ताव आला किंवा त्या बाबत योग्य अशी सूचना करण्यात आली तर ती स्वीकारण्याची आपली तयारी आहे. शेवटी या सर्व गोष्टींच्या माध्यमातून आपणास घ्यावयाचे निर्णय शेवटी या दोन्ही गोष्टींना पूरक असलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. एका बाजूला आपण रोजगाराचे प्रश्न सोडविले पाहिजेत, वाढत्या नागरीकरणाला न्याय द्यावयाचा असेल तर राज्यातील सर्व महानगरपालिका, अ,ब,क,ड नगरपालिकांच्या क्षेत्रातील पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत, पाटबंधारे विभागाची असलेली बहुतांशी जलाशये या मधील उपलब्ध असलेले पाणी पिण्यासाठी देण्याबाबत असलेला अग्रक्रम कायम ठेवणे समयोचित ठरु शकते. तो अग्रक्रम देण्याच्या बाबतीत आपण या ठिकाणी चर्चा करुन सूचना सुचवू शकतो. या विधेयकामध्ये सुधारणा करण्याचे कारण असे आहे की, 1976 च्या कायद्यान्वये शासनाकडे अधिकार होते. सन 2005 च्या कायद्यानुसार ते अधिकार जलसंपत्ती नियम प्राधिकरणाकडे देण्यात आले आहेत. त्यामुळे या दोन ॲथॉरिटींकडे एकाच कायद्यामधील अधिकार असल्यामुळे त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी.........

श्री. जयंत प्र. पाटील : जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचे सदस्य कोण आहेत ते सांगा.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी त्यांच्या भाषणामध्ये हा प्रश्न उपस्थित केल्यास मी माझ्या उत्तराच्या भाषणामध्ये त्याचे उत्तर देईन. मी आताच ते सांगितले पाहिजे असे नाही.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी ती नावे आता सांगितली पाहिजेत. मला त्याच मुद्दयावर भाषण करावयाचे आहे...

श्री. सुनील तटकरे : मला आता ते सांगण्याची गरज वाटत नाही.

(गोंधळ)

श्री. जयंत प्र. पाटील : त्यावर तर मला आता बोलावयाचे आहे.....

श्री.सुनील तटकरे : मी काय उत्तर द्यावे हे तुम्ही मला डिक्टेट करु शकत नाही, मी माझ्या पध्दतीने उत्तर देईन....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : एवढया आविर्भावामध्ये आपण बोलू नका, या पध्दतीने बोलून चालणार नाही. त्या प्राधिकरणामध्ये कोण सदस्य आहेत हे आम्हाला समजले पाहिजे तो आमचा अधिकार आहे...

(गोंधळ)

**उप सभापती** : माननीय सदस्यांनी कृपया शांत व्हावे....

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी काय बोलावे काय बोलू नये हे मला कळते. सभापती महोदय, माझे काही चुकत असेल तर आपण मला सांगा....

**उप सभापती** : माननीय सदस्यांनी कृपया माझे ऐकावे...

श्री.जयंत प्र. पाटील : त्या प्राधिकरणावर कोण सदस्य आहेत याची आम्हाला माहिती मिळाली पाहिजे...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या ठिकाणी मंत्री महोदय असे म्हणाले की, मला पाहिजे ते मी बोलेन अशी जर त्यांची बोलण्याची पध्दत असेल तर त्यांना या सभागृहामध्ये बसण्याचा अधिकार नाही. ते या ठिकाणी शासन म्हणून अन्सरेबल आहेत. सरकारच्या प्रती त्यांचे उत्तरदायित्व आहे. परंतु ते या ठिकाणी असे कसे बोलत आहेत?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी माझ्या भाषणावर हरकतीचा मुद्दा उपस्थित केलेला नाही....

(अडथळा)

सभापती महोदय, मला आपले संरक्षण हवे आहे. मी या ठिकाणी बोलत असतांना माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील उभे राहून बोलले, त्यावेळी आपण त्यांना परवानगी दिली नव्हती आणि त्यांनी हरकतीचा मुद्दा देखील उपस्थित केला नव्हता. त्यांना जे बोलावयाचे असेल ते त्यांनी त्यांच्या भाषणामध्ये बोलावे. त्याचे उत्तर मी माझ्या उत्तराच्या भाषणामध्ये देईन. ते म्हणाले की, मला आता नावे सांगा त्यावेळी मी म्हणालो की, तुमच्या प्रश्नाचे उत्तर केव्हा ध्यायचे हा माझा अधिकार आहे यामध्ये मी काही वावगे बोललो नाही. सभापती महोदय, मला संसदीय परंपरा कळते, मी देखील 20 वर्षापासून सभागृहाचा सदस्य आहे. त्यामुळे तसे समजण्याचे काही कारण नाही. तुम्ही देखील

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ KTG/

श्री. सुनील तटकरे...

या सभागृहाचे सदस्य आहात आणि मी देखील आहे. संसदीय परंपरांचे जतन आपण सर्वांनी केले पाहिजे. या ठिकाणी वेगळा विचार करण्यापेक्षा या विधेयकावर चर्चा करावी एवढीच माझी अपेक्षा आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी उपस्थित केलेल्या मुद्याबाबत आपले काय म्हणणे आहे?

**उप सभापती** : माननीय विरोधी पक्षनेत्यांनी कृपया माझे ऐकून घ्यावे....

श्री. जयंत प्र. पाटील : आपण हा प्रश्न का प्रतिष्ठेचा करीत आहात हेच मला कळत नाही....

**उप सभापती** : आपण माझे कां ऐकून घेत नाही हेच मला कळत नाही? माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील मी आपणा सर्वांना विनंती करतो की, मंत्री महोदयांचे भाषण संपल्यानंतर आपल्याला भाषणामध्ये जे काही मुद्दे उपस्थित करावयाचे असतील ते आपण करावेत. आपल्या सर्व मुद्यांना मंत्री महोदय उत्तर देतील.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, या विधेयकाचा उद्देश काय आहे तो आम्हाला कळला पाहिजे.

(गोंधळ)

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय हेच जवळजवळ एक तास सांगत आहेत. आम्हाला बरे वाटले, आनंद झाला. कारण आता माननीय मंत्री महोदय एवढ्या विस्तृतपणे सांगत आहेत, त्यामुळे आम्हाला भाषण करण्यासाठी काही मुद्देच रहाणार नाहीत याचा आनंद झाला. म्हणून आम्ही त्यांना विचारले की, अमुक बाब राहिली त्याबाबत सांगावे, तमुक बाब राहिली त्याबाबत सांगावे असा हा विषय आहे. आम्ही तुमचे कौतुक करीत आहोत. पण तुम्हाला त्या कौतुकाची सुध्दा दाद देता येत नाही. माननीय मंत्री महोदय, आपण पूर्वीपासून एक कार्यक्षम मंत्री आहात. कृपा करुन लक्षात घ्यावे. आपण इतक्या वेळा मंत्रीपद उपभोगल्यानंतर तुमच्या तोंडून अशा प्रकारचे वाक्य बाहेर येणे योग्य नाही,मला जे वाटेल तेच उत्तर देईन, असे आपण म्हणालात

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मी असे बोललो नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, याबाबतीत रेकॉर्ड काढून पहावे. रेकॉर्ड तपासावे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मी याबाबतीत असे बोललो नाही. सन्माननीय सदस्यांनी जी भूमिका मांडली त्याबाबत सांगावयाचे तर जलसंपत्ती प्राधिकरणामध्ये जे सदस्य आहेत त्यांची नावे सांगतो. त्यानुसार श्री.अजित निंबाळकर हे अध्यक्ष आहेत. श्री.ए.के.डी.जाधव हे सदस्य आहेत, श्री.व्ही.व्ही.गायकवाड हे सदस्य आहेत. याबाबतीत सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी जी माहिती विचारली होती, ती मी येथे सांगितली आहे. एकंदरीत या सुधारणा विधेयकाचा जो गाभा आहे, त्याबाबत मी मघाशीच सांगितलेले आहे. 1976 चा कायदा हा अस्तित्वात होता आणि आहे. त्याचबरोबर 2005 मधील जलसंपत्ती अधिनियम कायदा देखील अस्तित्वात आहे. या दोन्ही कायद्यांमध्ये पाणी वाटपाचे जे अधिकार आहेत त्यामध्ये स्पष्टता यावी आणि तसे होत असतानाच ते अधिकार सरकारकडे राहतील ही बाब स्पष्ट करणारे हे विधेयक आहे आणि इतर ज्या बाबी आहेत त्याठिकाणी नमूद केलेल्या आहेत. मी आज याठिकाणी विधेयक मांडलेले आहे. सभागृहाने यावर चर्चा करुन . .....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी आपल्याला सांगू इच्छितो की, काल बैठक झ ाली, त्यावेळी आदरणीय माननीय मुख्यमंत्री महोदय, माननीय उप मुख्यमंत्री महोदय आणि माननीय संसदीय कार्यमंत्री आणि आपणही उपस्थित होता. त्यावेळी माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, यावर मी पूर्ण चर्चा केलेली आहे. या विधेयकामध्ये सर्वांना खटकणारी जी बाब आहे, माननीय मंत्री महोदयांचे शब्द वेगळे होते. पण त्याबाबत आम्ही उप सूचना मांडत आहोत आणि त्या उप सूचनेसह हे विधेयक विधान परिषदेमध्ये मंजूर झाल्यानंतर विधानसभेमध्ये मांडावयाचे आहे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

सभापती महोदय, आपणही त्यावेळी होतात. परंतु माननीय मंत्री महोदयांनी याठिकाणी उप सूचना मांडलीच नाही. विचार करा, विचार करा म्हणजे काय ? माननीय मंत्री महोदयांनी येथे विधेयक सादर केलेले आहे.

श्री.माणिकराव ठाकरे (खाली बसून) : सन्माननीय मंत्री महोदय जे बोलले आहेत ते समजून घ्यावे.

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी जरा थांबावे. मला या बाबतीत विधान मंडळाच्या प्रधान सचिवांनी सांगावे. माननीय मंत्री महोदयांनी असे म्हटले पाहिजे की, मी या विधेयकाला या उप सूचनेसहित सदनामध्ये मांडत आहे.सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे हे देखील मंत्री होते. मला कळत नाही. उप सूचनेचा अर्थ काय ? याठिकाणी असे सांगावे लागते की, या विधेयकामध्ये अमुक खंडातील अमुक कलमामध्ये अमुक प्रकारची सुधारणा मी मांडत आहे आणि त्या उप सूचनेची प्रत सन्माननीय सदस्यांना द्यावी लागते. तुम्ही असे कसे म्हणत आहात की, माननीय मंत्री महोदय जे बोलले आहेत ते समजून घ्यावे.अशा प्रकारे सभागृहाचे कामकाज चालते काय ? मला काही कळत नाही. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे आपण मंत्री होता. निदान तुम्ही तरी असे बोलू नका. माननीय मुख्यमंत्री एक म्हणतात, माननीय उप मुख्यमंत्रीही सांगतात आणि त्यावेळी आपणही उपस्थित होतात. त्यामुळे असे सांगावे लागेल की, आम्ही या विधेयकातील पान क्र.अमुकवर, अमुक उपखंडाकरता, अमुक कलमाकरता ही उप सूचना मांडत आहोत. मला काही कळत नाही. आम्ही प्रत्येक गोष्टीबाबत बोलतो. आम्ही बावळट झालो आहोत, मूर्ख झालो आहोत.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

**उप सभापती** : मला याबाबतीत सायटेशन वाचू द्यावे. त्याशिवाय पुढील चर्चा करता येत नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, अगोदर उप सूचना मांडली पाहिजे. या सदनामध्ये काय चालले आहे ?

**उप सभापती** : विधेयक खंडश:विचारात घेण्याची प्रक्रिया पुढे आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी काल बोललो तर समोरच्या बाकावरील सर्व सन्माननीय सदस्यांना राग आला आणि सर्वजण उठून उभे राहिले. माननीय मुख्यमंत्री बनवाबनवी

करतात असे मी म्हटले होते. पण मी ते शब्द मागे घेतले. मग आता आम्ही काय म्हणावयाचे ? आम्हाला माननीय सभापतींच्या दालनामध्ये बोलविण्यात आले, आम्ही गेलो नव्हतो.

श्री.जयंत प्र.पाटील (खाली बसून) : सभापती महोदय, सभागृहाची बैठक 15 मिनिटे तहकूब करावी.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मला काही कळतच नाही. आपण संसदीय कार्यपध्दतीचा देखील अवलंब करणार नाही काय ?

(माननीय उप सभापती बेल वाजवितात)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, तुम्हाला अशा प्रकारे ठोकाठोकी करावयाची असेल तर करा. हे काय चालले आहे?

**उप सभापती** : या ठिकाणी जे सायटेशन आहे . . . .

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सायटेशन गेले खड्ड्यात. याठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी विधेयक मांडले आहे....

**उप सभापती** : ते विचारात घेण्यात यावे असे मी म्हणत आहे. आपण जे म्हणत आहात ती तिसरी स्टेज आहे. ती नंतर होईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, ही नवीन पध्दत कोणती आहे ?

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात )

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय सभापती महोदयांच्या दालनात काल विरोधी पक्ष नेत्यांना व गट नेत्यांना बोलावण्यात आले होते. त्या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय संसदीय कार्य मंत्री आणि सभापती महोदय, आपणही त्या ठिकाणी उपस्थित होता. त्या ठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांनी असे सांगितले की, या विधेयकाच्या बाबतीत आमची सर्वंकष चर्चा झालेली आहे. या विधेयकाला अमेंडमेंट सुचविण्यात येईल आणि ती अमेंडमेंट विधानपरिषदेत मंजूर झाल्या नंतर ते विधेयक या अमेंडमेंटसह विधानसभेमध्ये जाईल आणि त्यानंतर हे विधेयक विधानसभेमध्ये मंजूर केले जाईल. मंत्री महोदयांनी या ठिकाणी जे विधेयक मांडलेले आहे, त्या विधेयकासोबत सुचविण्यात आलेली अमेंडमेंट यावयास पाहिजे होती, पण माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी ती अमेंडमेंट मांडलेली नाही, त्यामुळे आम्हाला फसविण्यात आले आहे. या ठिकाणी जे विधेयक मांडण्यात आलेले आहे, ते अमेंडमेंटसहित यावयास पाहिजे त्या शिवाय हे विधेयक या ठिकाणी मांडता येणार नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय सभापती यांच्या दालनात अशी चर्चा झाली होती की, या विधेयकाला अमेंडमेंट सुचविण्यात येईल आणि त्या उप सूचनेसह ते विधेयक विधानसभेत जाईल, शासनाकडे जास्त वेळ नाही, अशी आम्हाला विनंती करण्यात आली. त्यामुळे या विधेयकावरील आमची भाषणे आम्ही आवरती घेऊ असे सांगितले होते, असे असताना या ठिकाणी माननीय मंत्री महोदय एक तास भाषण करीत आहेत.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, हे विधेयक विधानसभेत मंजूर झालेले आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या विधेयकाला अमेंडमेंट आणली जाईल असे आम्हाला सांगण्यात आले होते. सभापती महोदय, आपणही त्यावेळी त्या ठिकाणी होता. पण ती अमेंडमेंट या विधेयकामध्ये दिसत नाही.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते तसेच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या ठिकाणी हरकतीचा मुद्दा मांडलेला आहे. परंतु या विधेयकावर चर्चा होत असताना आता पर्यंतच्या प्रथेनुसार सन्माननीय सदस्य सुधारणा मांडतात.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या संदर्भातील चर्चेसाठी आपण माननीय सभापती यांच्याकडे जाऊ या.

श्री. जयंत पाटील : या विधेयकाला सुधारणा आणणार असे आज सकाळी टी.व्ही. वर दाखविण्यात येत होते.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहाचे कामकाज थांबवून या संदर्भात चर्चा करण्यासाठी आपण माननीय सभापतींच्या दालनात जाऊ या.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या विधेयकाला सुधारणा आणणार असे आज सकाळी टी.व्ही. वर दाखविण्यात येत होते.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, सभागृहाचे कामकाज पंधरा मिनिटांसाठी थांबविण्यात यावे.

( अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात )

**उप सभापती** : मी सभागृहाचे कामकाज थांबविणार नाही. सभागृहाचे कामकाज कशासाठी थांबवावयाचे? सर्व सन्माननीय सदस्यांनी आपल्या जागेवर बसावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, जर या विधेयकाला सुधारणा आणण्यात येणार नसेल तर चर्चा करण्यासाठी माननीय सभापतींच्या दालनात कशासाठी बोलावण्यात आले होते? सभापती महोदय, सभागृहाचे कामकाज थांबविणार नाही, अमुक करणार नाही, अशा प्रकारे आपणही दादागिरी करावयाला लागला आहात. हे वैधानिक काम आहे.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना एवढीच विनंती आहे की, विधानसभेने जे विधेयक पारित केलेले आहे, ते विधेयक सन्माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी मांडल्या नंतर त्या विधेयकावर ज्यावेळी चर्चेला सुरुवात होईल त्यावेळी सन्माननीय सदस्यांना सुधारणा सुचविता येतील. त्याप्रमाणे या विधेयकामध्ये सुधारणा करता येतील. सन्माननीय सदस्यांनी चर्चेला सुरुवात करावी.

( अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात )

सभापती महोदय, चर्चेतून आपोआप सूचना येतील त्या माध्यमातून या विधेयकामध्ये सुधारणा करता येतील. सभापती महोदय. जर अमेंडमेंट झाली नाही तर मग हरकतीचा मुद्दा उपस्थित करता येईल. या विधेयकावरील चर्चेला सुरुवात झाल्यानंतर हा प्रश्न निकाली निघणार आहे.

यानंतर श्री. बरवड....

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माझा पॉइन्ट ऑफ प्रोसीजर आहे. विधेयकाच्या कामकाजाच्या संदर्भातील हा मुद्दा आहे. विधेयकाच्या मांडणीच्या संदर्भातील हा मुद्दा आहे. काल सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी असे सांगितले होते की, माननीय विरोधी पक्ष नेते, माननीय गट नेते तसेच माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उपमुख्यमंत्री हे सर्व माननीय सभापतींच्या दालनामध्ये चर्चेसाठी बसलेले आहेत, त्यामुळे काल ही चर्चा थांबविण्यात आली. आम्ही त्या ठिकाणी नव्हतो पण आम्हाला असे सांगण्यात आले की, या संबंधातील जी आवश्यक दुरुस्ती आहे ती करण्यात येईल. कोणती दुरुस्ती करण्यात येईल या संबंधीचे आश्वासन जर माननीय मंत्री महोदयांनी दिले तर योग्य होईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : असे नाही.

श्री. दिवाकर रावते : बिलाला अमुक सुधारणा आणत आहोत असे सांगावे लागते.

( विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

**उप सभापती** : माननीय सभापतींच्या दालनात चर्चा करण्यासाठी मी सभागृहाची बैठक 14 मिनिटांकरिता स्थगित करतो. आपण माननीय सभापतींच्या दालनात चर्चेसाठी जाऊ. 11 वाजून 20 मिनिटांनी सभागृहाचे कामकाज पुन्हा सुरु होईल.

श्री. दिवाकर रावते : दिवाकर रावते एवढ्या सुखासुखी जाणार नाही. काय व्हायचे असेल ते होऊ द्या. मी एवढी बनवाबनवी सहन करु शकत नाही.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य या ठिकाणी जे सांगत आहेत त्या बाबत सांगू इच्छितो की यामध्ये दोन गोष्टी आहेत. एक तर पाण्याचा अग्रक्रम बदलणे हा विषय आम्ही आजच मंत्रिमंडळापुढे नेऊ. त्यामध्ये पहिला अग्रक्रम पिण्याच्या पाण्याला राहील. दुसरा अग्रक्रम शेतीला राहील. दुसरा जो अग्रक्रम आहे त्या बाबत मंत्रिमंडळाला अधिकार राहतील. दुसरा जो अग्रक्रम आहे तो सुध्दा जी.आर.च्या व्दारे असल्यामुळे मंत्रिमंडळामध्ये प्रस्ताव आणून आता जे उच्चाधिकार समितीकडे अधिकार आहेत ते मंत्रिमंडळाकडे राहतील. ही सुधारणा आम्ही यामध्ये निश्चितपणे करणार आहोत.

प्रश्न प्रस्तुत झाला.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/

**उप सभापती** : मी आता माननीय सभापतींबरोबर चर्चा करण्यासाठी सभागृहाची बैठक 13 मिनिटांकरिता स्थगित करतो. माननीय विरोधी पक्ष नेते, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते, सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील आपण माननीय सभापतींच्या दालनात यावे. मी स्वत: त्या ठिकाणी येतो. आता आपण माननीय सभापतींकडे जाऊ.

श्री. दिवाकर रावते : माननीय मंत्री महोदय श्री. रामराजे नाईक-निंबाळकर यांनाही त्या ठिकाणी बोलवावे.

**उप सभापती** : माननीय मंत्री महोदय श्री. रामराजे नाईक-निंबाळकर हे सुध्दा येतील. आता आपण माननीय सभापतींकडे जाऊ. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन 11 वाजून 20 मिनिटांनी पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक सकाळी 11.08 ते 11.20 वाजेपर्यंत स्थगित झाली )

यानंतर श्री. शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी**

**तालिका सभापती** : मी सभागृहाची बैठक 20 मिनिटे तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक 11.20 ते 11.40 पर्यन्त स्थगित झाली.)

----

....नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.मोहन जोशी**

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)** : सभागृहाची बैठक 20 मिनिटांसाठी तहकूब करण्यात येत आहे. सभागृहाची बैठक दुपारी 12.00 वाजता पुन: सुरु होईल.

**( सभागृहाची बैठक दुपारी 11.40 ते 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली. )**

---------

यानंतर श्री. भोगले..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी)**

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक दुपारी 12.30 वाजेपर्यंत तहकूब करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.00 ते 12.30 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगिती नंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

**पृ.शी.**: जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) विधेयक

L.A. BILL NO. I OF 2011

(A BILL TO AMEND THE MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY ACT, 2005.)

AND MOTIONS FOR REFERRING THE BILL TO JOINT COMMITTEE

**उप सभापती** : विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतचा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी दिलेला आहे. त्यांनी तो मांडावा.

( प्रस्ताव मांडण्यात आला नाही )

**उप सभापती** : विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतचा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी दिलेला आहे. त्यांनी तो मांडावा.

( प्रस्ताव मांडण्यात आला नाही )

( चर्चा पुढे सुरु....

श्री. माणिकराव ठाकरे (विधानसभेने निवडलेले) : महोदय, सन 2011 चे वि. स. वि. क्र. 1- महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, 2005 यामध्ये सुधारणा करण्यासाठी जे विधेयक सभागृहासमोर आलेले आहे त्यात मी काही उपसूचना मांडून पाठिंबा देण्यासाठी उभा आहे. एक ऐतिहासिक स्वरुपाचे विधेयक सभागृहात चर्चेसाठी आलेले आहे.

श्री. दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी प्रथम "टू द पॉईंट" आपली उपसूचना मांडून नंतर भाषण करावे, अशी माझी विनंती आहे.

श्री. माणिकराव ठाकरे : महोदय, विधेयकाला सुधारणा देत असताना ती या स्टेजला दिली जात नसून ज्यावेळेस विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रस्ताव मांडला जातो तेव्हा द्यावयाची असते. मी माझी सुधारणा त्याच स्टेजला मांडणार आहे. तोपर्यंत भाषण करणार आहे.

महोदय, मी जरी प्रदेश कॉंग्रेसचा अध्यक्ष असलो तरी या सभागृहाचा सदस्य सुध्दा आहे. तसेच चार वेळा विधानसभेवर सदस्य म्हणून निवडून आलो होतो व आता पुन्हा मला या वरिष्ठ सभागृहाचे प्रतिनिधीत्व करण्याची संधी पक्षाने मला दिली आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे ...

माझा बराच काळ विधिमंडळाच्या कामकाजात गेलेला आहे. प्रमुख्याने या विधेयकावर मी आज अधिक काही बोलणार नाही परंतु वैधानिक विकास मंडळाच्या कलम 371 च्या अनुषंगाने मी यापूर्वीही सदनात आग्रही राहिलेलो आहे. हे विधेयक परत मांडले जावे आणि केंद्र शासनाने त्यास परवानगी द्यावी यासाठी मी बरेच प्रयत्न केलेले आहेत. पाण्याच्या संदर्भातील अत्यंत महत्वाचे विधेयक या ठिकाणी चर्चेला येत आहे. सूंपर्ण महाराष्ट्राच्या दृष्टिकोनातून पाणी हा विषय सर्व विषयांपेक्षा जास्त महत्वाचा असून तो विदर्भासाठी खास महत्वाचा आहे. विदर्भासाठी तो यासाठी महत्वाचा आहे की, विदर्भामध्ये मोठया प्रमाणात सिंचनाचा बॅकलॉग आहे त्यामुळे विदर्भाला आपण सर्वांनी न्याय देण्याची आवश्यकता आहे अशी माझी विधेयकाच्या संदर्भातील भूमिका आहे. विदर्भ ज्या वेळेला महाराष्ट्रात आला त्यावेळी नागपूर करार करण्यात आला होता. मी स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांचे आभार मानतो. स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांनी विदर्भासाठी काही महत्वाचे निर्णय घेतले नसते तर, आमचा विकास झाला नाही, तो भरुन काढला पाहिजे असे आम्ही कितीही सांगितले असते तरी आम्हाला न्याय मिळाला नसता. स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांनी त्यासाठीच विदर्भातील प्रमुख नेत्यांची चर्चा करुन नागपूर करार केला होता. आपला विकास महाराष्ट्राच्या इतर भागांप्रमाणेच होईल असा विश्वास त्यांनी विदर्भातील जनतेला दिला होता. आम्ही मागे पडत आहोत किंवा आम्हाला सोडून विकास होत आहे असे वाटले तर त्यासाठी घटनेतील कलम 371 कलमाचा अंतर्भाव करण्यात आला व त्याचा अधिकार विदर्भ व मराठवाडयाला प्राप्त करुन देण्यात आले. अशा प्रकारचे अधिकार प्राप्त झाल्यानंतर आम्ही विश्वासाने सांगतो की, संपूर्ण महाराष्ट्र विकासाच्या संदर्भात आमच्या पाठीमागे उभा आहे व तशा प्रकारचा प्रत्यय आम्हाला आलेला देखील आहे.

मागील वर्षात वैधानिक विकास महामंडळाची मुदत संपली होती. विदर्भाचा आर्थिक बॅकलॉग संपलेला आहे अशा प्रकारे सांगितले गेले होते परंतु आम्ही आग्रह धरला व वैधानिक विकास मंडळाची मुदत वाढवून मिळाली. आर्थिक स्तरावर बॅकलॉग भरला गेला पाहिजे. विदर्भ,मराठवाडयाचा पाण्याच्या संदर्भातील महत्वाचा बॅकलॉग होता त्याची पूर्तता आम्हाला या बजेटमधून प्रत्ययास आलेली आहे. वैधानिक विकास मंडळ असल्यामुळे इतर भागांप्रमाणेच

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे ...

विदर्भातील बॅकलॉग भरण्यासाठी 2.5 हजार कोटी रुपये आम्हाला मिळाले आहेत. जर वैधानिक विकास मंडळ नसते व स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांनी तशा प्रकारची व्यवस्था केली नसती तर विदर्भाची काय अवस्था झाली असती याचे गणित आपण करु शकलो नसतो. आज पाण्याच्या संदर्भातील चर्चा या विधेयकाच्या निमित्ताने या सदनात होते आहे. स्वाभाविकपणे विदर्भातील व मराठवाडयातील किंवा ज्या जिल्हयांमध्ये सिंचनाची व्यवस्था बरोबर झालेली नाही त्या जनतेचे लक्ष अधिवेशन काळात विधानमंडळाकडे लागलेले असते. या सगळया परिस्थितीमध्ये

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे..

ज्या पध्दतीने हे विधेयक या ठिकाणी आले आहे त्या पध्दतीचा , ज्या कारणांसाठी विधेयक आले आहे त्या कारणांचा तसेच या विधेयकामध्ये ज्या काही तरतुदी केलेल्या आहेत त्या तरतुदींचा साकल्याने विचार केला तर यामध्ये बरीचशी स्थित्यंतरे घडत गेली आहेत असे दिसते. जल संपत्तीचा वापर योग्य प्रमाणात व्हावा, त्याचे नियोजन व्यवस्थित व्हावे, व्यवस्थापन चांगल्या प्रकारे व्हावे यासंदर्भात शासनाने जबाबदारीने पावले टाकली पाहिजेत.

सभापती महोदय, मागच्या काळात जर आपण पाहिले तर आपल्याला असे दिसून येईल की ज्या विधेयकावर आपण आज चर्चा करीत आहोत त्या संदर्भात जलसंपत्ती नियमन प्राधिकरण कायद्याने स्थापित झाले होते तेव्हा देखील हे प्राधिकरण का स्थापित केले होते हा विषय आपल्या सर्वाच्या समोर होता. हे प्राधिकरण स्थापन होत असतांना विधानसभेमध्ये वादळी चर्चा
झाली होती तसेच या सभागृहात देखील चर्चा झाली होती. अशा प्रकारचे अधिकार प्राधिकरणाकडे सोपवू नका हे अधिकार सोपवल्यामुळे ठराविक लोकांच्या हातात पाणी वाटपाची सत्ता जाईल असे त्यावेळी आम्ही सांगितले होते. अशा प्रकारचे अधिकार प्राधिकरणाला असता कामा नये यासाठी विधान सभेमध्ये आणि विधान परिषदेमध्ये प्रखर भूमिका मांडण्यात आली होती. त्यानंतर त्या विधेयकामध्ये ब-याचशा दुरुस्त्या करण्याची गरज आहे असे सर्वानाच वाटू लागले आपण ज्यावेळी एखाद्या संस्थेकडे पाणी वाटपाच्या संदर्भातील अधिकार सोपवतो त्यावेळी व्यापक स्वरुपाची चर्चा होणे आवश्यक आहे. म्हणूनच हे विध्येयक विधान सभा आणि विधान परिषद सदस्यांच्या सर्व पक्षीय संयुक्त समितीकडे पाठविण्यात आले होते.त्याठिकाणी अत्यंत चांगल्या प्रकारची चर्चा झाली होती. माननीय उप मुख्यमंत्री आणि वित्त मंत्री श्री अजित दादा पवार त्यावेळी जलसंपदा मंत्री होते त्यामुळे तेच या समितीचे समिती प्रमुखही होते.माजी सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख त्या समितीमध्ये सदस्य होते त्यांच्या व्यतिरिक्त इतरही काही सन्माननीय सदस्य त्या समितीमध्ये होते . जवळजवळ तीन ते चार महिने त्या समितीमध्ये चर्चा झाली होती. या समितीच्या अनेक बैठका झाल्या होत्या. पाण्याचे नियोजन कशा प्रकारे झाले पाहिजे याबाबतीत या संयुक्त समितीने चांगल्या सूचना केल्या होत्या. जलसंपत्ती प्राधिकरणाकडे तीन प्रमुख अधिकार देण्यात आले होते. या राज्यातील निरनिराळया खो-यामध्ये एकूण पाणी किती आहे त्या पाण्याचा

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे..

साठा निश्चित ठरविण्यासाठी सर्व्हे करण्याचा अधिकार प्राधिकरणाला देण्यात आला होता त्याचप्रमाणे पाण्याचे वाटप कशा पध्दतीने करावयाचे हे ठरविण्याचा अधिकार प्राधिकरणाला देण्यात आला होता. जे साठलेले पाणी असेल वा जमिनी खालील पाणी असेल त्याचे वाटप करण्याची पध्दत कशी असली पाहिजे हे ठरविण्याचा अधिकार त्यांच्याकडे देण्यात आला होता. त्याच प्रमाणे पाण्याची किंमत किती असावी,शेतक-यांना किती पाणीपट्टी लावावयाची , उद्योगासाठी किती दर लावावयाचे,पिण्याच्या पाण्यासाठी किती दर लावावयाचे अशा प्रकारे हे दर ठरविण्याचे अधिकार देखील प्राधिकरणाकडे देण्यात आले होते. प्राधिकरण स्थापन होण्यापूर्वी उच्चाधिकार समिती निर्माण करण्यात आली होती आणि प्राधिकरणाची स्थापना झाल्यानंतर त्या समितीचे काम संपुष्टात यावयास पाहिजे होते. ज्या वेळी जल प्राधिकरणाकडे आपण संपूर्ण अधिकार कायदेशीररीत्या देतो, व त्यासबंधीचे विधेयक ज्यावेळी दोन्ही सदनामध्ये पास होते त्यावेळी सर्व अधिकार प्राधिकरणाकडे आपोआपच यावयास पाहिजे होते परंतु प्राधिकरणाकडे हे अधिकार येऊ शकले नाहीत. त्यामुळे पाण्यासाठी मागणी करणारे अर्ज उच्चाधिकार समितीकडे आले आणि त्या समितीने .....

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे...

त्या ठिकाणी वीज निर्माण करण्यासाठी, कोळशावर आधारित वीज प्रकल्पाला पाणी देण्यासाठी निर्णय घेतला. अशाप्रकारचे निर्णय बऱ्याच ठिकाणी घेणे गरजेचे होते. शहरामध्ये पिण्याच्या पाण्याची गरज निर्माण झाल्यानंतर ते पाणी उपलब्ध करुन दिले पाहिजे यादृष्टीने निर्णय घेण्यात आला. परंतु काही निर्णय विदर्भाच्या दृष्टीने अहितकारक झाले, त्यामध्ये बऱ्याचशा गोष्टी अंतर्भूत आहेत. एकेका जिल्ह्यामध्ये आठ ते नऊ विजेचे प्रकल्प सुरु करावयाचे ठरविले तर त्यांना पाणी देण्याच्या संदर्भात निर्णय घेण्यात आला...

श्री. जयंत प्र. पाटील : माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे साहेब तुमचे भाषण सुरु असतांना आम्ही तुम्हाला थांबविणार नाही. तुम्ही आमची बाजू न घेता शेतकऱ्यांची बाजू घ्या...

श्री. माणिकराव ठाकरे : तुम्ही देखील शेतकरी आहात, तुमच्या पक्षाचे नाव शेतकरी कामगार पक्ष आहे. त्या संदर्भात मला सुचवावयाचे होते की, पाणी वाटपामध्ये नियोजनाचा अभाव दिसून आल्यामुळे बरेचसे दुष्परिणाम विदर्भातील शेतकऱ्यांच्या सिंचनाच्या पाण्यावर झाले हे आपल्याला नाकारता येणार नाही. विदर्भामध्ये उपलब्ध असलेल्या कोळशावर आधारित वीज तयार होऊन ती लोकांना कशी मिळेल याची राजकीय लोकांना चिंता वाटते. आपल्या राज्याला पुरेशा प्रमाणात वीज मिळाली पाहिजे याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. त्याचबरोबर पश्चिम महाराष्ट्रामध्ये वीज तयार झाली नसेल तर पश्चिम महाराष्ट्राला देखील वीज उपलब्ध करुन दिली पाहिजे ही गोष्ट मी नाकारीत नाही. अशाप्रकारे पश्चिम महाराष्ट्रासाठी वीज देत असतांना महाराष्ट्रासाठी एकूण लागणारी वीज कुणी कोठून निर्माण करावी याबाबत सुध्दा शासनाने विचार करण्याची गरज आहे. ज्यावेळी संपूर्ण देशाच्या पातळीवर विजेचा प्रश्न निर्माण झाला त्यावेळी सन 1948 मध्ये संपूर्ण देशामध्ये विजेचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. त्यामधून फक्त तीन शहरांना वगळण्यात आले. त्यामध्ये मुंबई आणि कलकत्ता या शहरांचा समावेश होता. त्यावेळी राष्ट्रीयीकरण केल्यानंतर राज्य सरकारने निर्माण केलेल्या संस्थांनी वीज निर्माण करावी अशाप्रकारची सिस्टीम सुरु करण्यात आली. बऱ्याच वेळेला या संस्था वीज वितरणामध्ये ग्राहकांना सवलत देऊ लागल्यामुळे राज्य विद्युत मंडळ अडचणीत यायला लागले. बऱ्याच राज्यातील विजेच्या मागणीपेक्षा वीज पुरवठा कमी होऊ लागला म्हणून घेण्यात आलेला निर्णय चांगला होता असे मी म्हणणार नाही परंतु नाईलाजास्तव केंद्र सरकारला असा निर्णय घ्यावा लागला की, विजेचे राष्ट्रीयीकरण उठवून देश



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. माणिकराव ठाकरे....

पातळीवर खाजगीकरण झाले पाहिजे. ज्याला वाटेल त्याने वीज निर्माण करावी. निर्माण झालेल्या विजेचे वहन करण्यासाठी एमएसईबी ने त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या लाईन योग्य अशी फी आकारुन खाजगी क्षेत्रांना उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत आणि त्यामार्फत खाजगी क्षेत्रामधून विजेची वितरण व्यवस्था निर्माण झाली पाहिजे. आज एमएसईबीबरोबर वेगवेगळया कंपन्या वीज निर्माण करण्यासाठी पुढे आल्या त्यावेळी त्यांनी राज्य सरकारला स्पष्ट सूचना केल्या की, वीज तयार करणे हा तुमचा प्रमुख व्यवसाय राहिलेला नाही. वेगवेगळया कंपन्या स्थापन होऊन विजेची निर्मिती होऊ लागली.

राज्य सरकारने सुरुवातीला तीन कंपन्या स्थापन केल्या. त्यामध्ये वीज निर्माण करणारी एक कंपनी, वीज वाहून नेणारी एक कंपनी आणि वीज वितरित करणारी कंपनी स्थापन केली. या तीन कंपन्या स्थापन झाल्यानंतर एक बाब आपणा सर्वांच्या लक्षात येणे आवश्यक होते.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 12:50

श्री.माणिकराव ठाकरे . . . .

विशेषत: सरकारच्याही ही बाब लक्षात यावयास पाहिजे किंवा वीज मंडळातील ज्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी आहे त्यांच्याही लक्षात यावयास पाहिजे की, आता आपला याबाबतीत एकाधिकार हटलेला आहे आणि खाजगीकरण होत आहे. त्यावर जर आपण नियंत्रण ठेवले नाही तर आपण त्याठिकाणी व्यवस्थित नियोजन करु शकणार नाही आाणि खऱ्या अर्थाने त्याची सुरुवात या ठिकाणाहून झाली आहे असे माझे स्पष्ट मत आहे. ज्यावेळेला आपण खाजगीकरणासाठी प्रवेश देतो. महाराष्ट्रामध्ये एम.एस.ई.बी.होते आणि इतर कोणत्याही राज्यामध्ये अशा चांगल्या प्रकारचे बोर्ड नव्हते. या बोर्डामार्फत अत्यंत चांगल्या प्रकारचा कारभार करण्यात आला. याठिकाणी 15 हजार मे.वॅ.चे विद्युत प्रकल्प हाती घेण्यात आले आणि दुसरे कितीही मोठे राज्य असले तरी तेथे अशा प्रकारचे विद्युत प्रकल्प नाहीत. काही राज्यांमध्ये तीन हजार मे.वॅ., काही राज्यांमध्ये पाच हजार मे.वॅ., काही राज्यांमध्ये चार हजार मे.वॅ. तर काही ठिकाणी दोन हजार मे.वॅ., काही राज्यांमध्ये एक हजार मे.वॅ.किंवा 500 मे.वॅ. अशा प्रकारचे प्रकल्प काही राज्यांमध्ये घेण्यात आले. परंतु आपल्या राज्यामध्ये मात्र 15 हजार मे.वॅ.वीज निर्मिती करण्याच्या दृष्टीकोनातून एम.एस.ई.बी.ने अत्यंत चांगल्या प्रकारचे काम केले होते. केंद्र शासनाच्या एन.टी.पी.सी.ने अनेक राज्यांमध्ये पॉवर प्रोजेक्ट किंवा वेगवेगळे प्रकल्प उभारलेले आहेत. आज सुध्दा कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि इतर राज्यांमध्ये याचे जाळे निर्माण केले. पण आम्ही या राज्यामध्ये एम.एस.ई.बी.च्या माध्यमातून सक्षम आहोत, आम्हाला तुमची गरज नाही. म्हणून आपल्या राज्यामध्ये एन.टी.पी.सी.ने सुरु केलेले प्रकल्प दिसून येत नाहीत.केंद्र शासनामध्ये माननीय श्री.सुशिलकुमार शिंदे साहेब ऊर्जा मंत्री झाल्यानंतर त्यांनी आपल्या राज्यामध्ये सोलापूर आणि मौदा येथे एन.टी.पी.सी.तर्फे दोन प्रकल्प आणलेले आहेत. त्यापूर्वी आम्ही एन.टी.पी.सी.कडून प्रकल्प येऊ देत नव्हतो. कारण आमच्या महाराष्ट्रामध्ये विजेचे उत्पादन करणारी संस्था मजबूत आहे आणि आपण त्या संस्थेला मजबूत केले पाहिजे अशा प्रकारची आमची त्यावेळी भूमिका होती. परंतु जेव्हा 2003 मध्ये खाजगीकरण झाले, त्यावेळी याकडे दुर्लक्ष झाले आणि आपण कुठेतरी खाजगीकरणावर नियंत्रण ठेवण्यामध्ये चुकलो आहोत. त्यामुळे आज राज्यामध्ये अशी परिस्थिती निर्माण झाली.

सभापती महोदय, याठिकाणी मोठया प्रमाणात जे पाणी उपलब्ध आहे,ते खाजगीकरणामुळे त्यांना मिळालेल्या अधिकारामुळे त्याचा वापर करीत आहेत.आज राज्यामध्ये किती वीज पाहिजे? आज या राज्यामध्ये आपण संपूर्ण विजेच्या बाबतीतच कामाला लागलो आहेत अशी स्थिती नाही.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे . . . .

पुढील दोन वर्षामध्ये वीज कंपनीचे लोक तुमच्याकडे येतील की, तुम्ही आमची वीज घ्यावी.आम्ही ती कमी पैशाने देतो,हे खाजगीकरण आहे. आज जे सुरु असलेले प्रकल्प आहेत, त्यासंबंधात मी सांगू इच्छितो की, शासनाची आकडेवारी माझ्याकडे आहे. तसेच माझ्याकडे वेगळी आकडेवारी देखील आहे, परंतु मी माझ्या कडील आकडेवारी सांगणार नाही. कारण शासनाने जी यादी दिलेली आहे, त्यामध्ये मला बरेचसे प्रोजेक्ट दिसत नाहीत. परंतु जे खाजगी प्रकल्प आहेत, त्याला महाराष्ट्र शासनाने "लेटर ऑफ सपोर्ट" दिलेले आहेत. ज्या प्रकल्पांची कामे सुरु झालेली आहेत असे एकंदर 22 प्रकल्प राज्य शासनाने खाजगीकरणांतर्गत दिलेले आहेत. त्यातून खाजगी क्षेत्रामध्ये एकंदर 30,150 इतकी मे.वॅ.वीज तयार होणार आहे. तसेच एम.ओ.यु.झालेले जे प्रकल्प आहेत, ते सुध्दा 12,168 मे.वॅ.चे आहेत. ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान केलेले तीन प्रोजेक्ट आहेत. आपण एकूण 42,318 क्युसेस मे.वॅ.इतक्या मोठया प्रमाणात प्रकल्प दिलेले आहे आणि यातील मॅक्झीमम प्रकल्प हे विदर्भातील आहेत.

सभापती महोदय, यातील दोन प्रकल्प खानदेशमधील असून, एक प्रकल्प कोकणमध्ये, एक प्रकल्प पश्चिम महाराष्ट्रामध्ये, सोलापूर येथे प्रकल्प आहे.या व्यतिरिक्त दुसरे प्रोजेक्ट नाहीत. मराठवाड्या मध्ये दोन प्रोजेक्ट आहेत. यामध्ये जास्तीतजास्त प्रोजेक्ट विदर्भातील आहेत. तसेच या प्रकल्पांसाठी पाणी लागते. या संदर्भात नियंत्रण कसे ठेवावयाचे? कारण केंद्र शासनाचा ॲक्ट आहे की,तुम्ही संबंधितांना मदत केली पाहिजे, त्यांना वीज वहनाच्या तारा दिल्या पाहिजेत, वीज वितरणाच्या बाबतीत मदत केली पाहिजे. तेथे जमीन मिळण्यासाठी मदत केली पाहिजे आणि आपण याबाबतीत तशा प्रकारचे कायदे केले आहेत. पण नियंत्रण ठेवणारी एकच गोष्ट आहे आणि ते म्हणजे पाणी. शासनाने याठिकाणी पाणी उपलब्ध करुन दिल्याशिवाय कोणीही प्रकल्प उभा करु शकत नाही.

यानंतर कु.थोरात . .. .

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ प्रथम सौ. रणदिवे.... 12:55

श्री. माणिकराव ठाकरे....

राज्य शासनाने 19 हजार मेगॅवॅटचे प्रकल्प उभारण्यास सुरुवात केलेली आहे. आपल्या गरजेपेक्षा आज तीन हजार मेगॅवॅटची गॅप आहे हे मी मान्य करतो. आणखी पाच वर्षाचे प्लॅनिंग केले तर आणखी सात हजार मेगॅवॅट वीज निर्मिती होऊ शकते. मग राज्य शासनाकडून ही गरज भागत असताना खाजगी प्रकल्पांना वाव देण्यात येतो. सभापती महोदय, पाणी हे दुर्मिळ आहे. विदर्भामध्ये पाणी कमी आहे. या पाण्यामुळे विदर्भातील शेतकऱ्यांचे भविष्यात प्रचंड अशा प्रकारचे नुकसान होणार आहे. म्हणून या संदर्भात मला शासनाला सूचना करावयाची आहे. विजेच्या संदर्भातील जे प्रकल्प आहेत, ते मी या ठिकाणी सांगितले आहेत. पण काही प्रकल्प शासनाच्या रेकॉर्डवर नाहीत. यवतमाळ जिल्हयामध्ये कालच दोन ठिकाणी जन सुनावण्या सुरु झाल्या पण लोकांनी त्या बंद पाडल्या आणि त्यांना परत पाठविले. मी या ठिकाणी जे वाचून दाखविले आहे, ज्यांच्या संदर्भात पत्र दिले आहे आणि ज्यांची कामे सुरु झालेली आहेत त्यांची नावेच नाहीत. यवतमाळ जिल्हयात माहीत नसलेल्या दोन प्रकल्पाची कार्यवाही सुरु आहे. तर महाराष्ट्रात एकूण किती प्रकल्प आहेत. कोळशाच्या मागणीची दिल्लीमध्ये काही प्रकरणे प्रलंबित आहेत. मी केंद्र शासनाकडे या संदर्भात चौकशी केली की, या संदर्भात किती अर्ज आलेले आहेत, साधारणत: काय स्थिती आहे, तेव्हा त्यांनी असे सांगितले की, आमच्या कडे 65 अर्ज आलेले आहेत. 65 पैकी वेगवेगळया शासनाचे आहेत. मग त्यातील काही केंद्र शासनाचे असतील काही राज्य शासनाचे असतील. 65 पैकी 50 प्रोजेक्ट कोळसा मागण्या करिता खाजगी रित्या आलेले आहेत. 50 पैकी 41 प्रॉजेक्ट फक्त एकटया विदर्भातील आहेत. आता जे प्रॉजेक्ट उभे आहेत त्यांची कामे सुरु आहेत. पाईप लाईनचे काम कुठे अडले असेल तर ते व्हायला पाहिजे. मी सांगितलेले यवतमाळ किंवा इतर जिल्हयातील नवीन जनसुनावणीच्या माध्यमातून येणारे अर्ज आहेत. कोळशा करिता ज्यांनी अर्ज केलेले आहेत त्यांचे जमीन आणि पाणी मागण्यासाठी अर्ज येणार आहेत, त्यांना जमीन आणि पाणी किती द्यावयाचे याचे नियमन करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, ज्यांच्याकडे हे सर्व अधिकार दिले होते त्या जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची या सदनाने विश्वासाने नेमणूक केली होती. त्या प्राधिकरणाने काय केले, किती प्रकल्पांना मान्यता दिली हे सांगितले पाहिजे. किती ठिकाणी सुनावण्या घेतल्या, त्या ठिकाणी कोणते अधिकारी होते? कशा प्रकारचे मंडळ नेमावे याबाबतीत मी जेव्हा राज्य मंत्री म्हणून

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे.....

कॅबिनेटमध्ये होतो त्यावेळी मी सांगितले की, किमान एका भागातील दोन सदस्य असले पाहिजेत. मराठवाडयाचे दोन, विदर्भाचे दोन पश्चिम महाराष्ट्राचे दोन सदस्य असले पाहिजे पण आज मंत्री महोदय श्री. सुनील तटकरे यांनी या ठिकाणी जी यादी वाचून दाखविली त्यामध्ये मला तीन अधिकाऱ्यांची नावे दिसली. मला माहीत नाही. सुरुवातीला ज्यावेळी कॅबिनेट मसुदा तयार झाला होता तो त्या आधारावर झाला होता. ज्या शिफारशी दोन्ही सदनामध्ये करण्यात आल्या त्यामुळे काही बदल झाला असेल तर मला माहीत नाही. सभापती महोदय, कोळशावर आधारित प्रकल्प मोठया प्रमाणात येण्याचे काम चालू आहे. माझ्याकडे त्यासंबंधीची आकडेवारी आहे. विदर्भामध्ये 42, कोकणमध्ये 3, खानदेशमध्ये 2, मराठवाडयामध्ये 2 आणि पश्चिम महाराष्ट्रात 1 इतक्या प्रॉजेक्टनी कोळशाची मागणी केलेली आहे.

सभापती महोदय, विदर्भामध्ये या प्रकल्पासाठी पाण्याचा वापर मोठया प्रमाणात होत आहे. आज पाण्याचा संचय झालेला आहे. पाणी साठा असेल, शेतकऱ्यांचे कॅनॉल तयार झाले असतील आणि त्या कॅनॉलमधील पाणी मिळणे चालू असेल तर त्या शेतकऱ्यांना आज जरी कळले नाही तरी कॅनॉलमधून येणारे पाणी निघून गेल्याचे उद्या कळले तर त्यांची शासना विषयीची मन:स्थिती काय होईल, याची कल्पना न केलेली बरी.

यानंतर श्री. बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : सभागृहाची आजची विशेष बैठकीची वेळ सकाळी 10 ते दुपारी 1.00 अशी होती. आता दुपारचा 1.00 वाजलेला आहे. सभागृहाची बैठक मी तहकूब करीत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.15 वाजता सुरु होईल.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.00 ते 1.15 वाजेपर्यन्त स्थगित झाली.)

----

....नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**सभापतीस्थानी माननीय उप सभापती**

**नियम 289 अन्वये प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याबाबतच्या सूचनांसंबंधी**

**उप सभापती** : नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावासंबंधीच्या तीन सूचना माझ्याकडे आलेल्या आहेत. पहिली सूचना सन्माननीय सदस्य सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, विनोद तावडे, रामदास कदम, चंद्रकांत पाटील,संजय केळकर, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री धनंजय मुंडे, केशवराव मानकर, रामनाथ मोते यांनी " कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत संचालकांनी केलेला गैरव्यवहार, सदर प्रकरणी केलेल्या चौकशीमध्ये संचालकांनी स्वत:च्या संबंधित व्यक्ती व संस्थांना नियमबाहय कर्जाचे वाटप केल्याचे उघडकीस येणे, जिल्हा सहकारी बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करुन बँकेवर प्रशासकाची नियुक्ती करणे, संचालक मंडळावर दिनांक 31 मार्च,2010 रोजी आरोपपत्र दाखल करण्यात येऊनही अद्यापपर्यंत कोणतीही फौजदारी अथवा इतर स्वरुपाची कायदेशीर कारवाई न होणे, त्यामुळे जनतेत निर्माण झालेला तीव्र असंतोष." या विषयावर दिलेली आहे.

उपरोक्त विषयाच्या बाबतीत सभागृहात तारांकित प्रश्न उपस्थित करण्यात आला होता, त्यावेळी वरील चर्चेसाठी माननीय सभापतींनी पाच मिनिटांचा वेळ वाढवून दिला होता.

वरील सूचनेच्या संदर्भात काही चर्चा करावयाची असेल तर माननीय सभापतीच्या अनुमतीने या विषयाची चर्चा घेण्यात येईल. सदरहू चर्चा आपल्याला आता घेता येणार नाही. ही चर्चा कधी घ्यावयाची या विषयाचा निर्णय माननीय सभापती घेतील.

श्री. रामदास कदम : या गैरव्यवहारात 15 मंत्र्यांचा सहभाग आहे.

**उप सभापती** : माननीय सभापतींच्या दालनात जी चर्चा झाली, त्या चर्चेच्या अनुषंगाने जो निर्णय झाला आहे, तो मी या ठिकाणी सांगतो आहे. मी आपल्याला मघाशी असे सांगितले आहे की, माननीय सभापतींच्या अनुमतीने या संदर्भात पुढील निर्णय घेण्यात येईल.

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती.....

सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी " कोकणात माहे एप्रिल, 2011 च्या सुमारास झ ाालेल्या अवकाळी वादळी पावसामुळे आंबा व काजू बागायतदारांचे झालेले नुकसान, त्यामुळे बागायतदारांमध्ये पसरलेले चिंतेचे वातावरण, याकरिता तातडीने कोकणातील शेतकऱ्यांना भरीव आर्थिक मदत देण्याबाबत नियम 289 अन्वये प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याबाबत सूचना दिलेली आहे.

या सूचनेच्या संदर्भात उद्या होणाऱ्या कामकाजात 20 ते 25 मिनिटांचा वेळ कशा प्रकारे देता येईल या बाबतीत माननीय सभापती स्वत: निर्णय घेणार आहेत.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी " उल्हासनगरमध्ये शिशमहाल इमारत कोसळून 9 लोकांचा बळी जाणे, हा अपघात नसून भष्ट अधिकारी, बिल्डर आणि राजकीय दलाल यांच्या संगनमताने झालेल्या भ्रष्टाचारामुळे या 9 लोकांचा बळी जाणे, उल्हासनगर महानगरपालिकेतील अनेक अधिकारी तुरुंगात असणे, अशा अनेक अनधिकृत व बेकायदा बांधकाम केलेल्या इमारतींमुळे हजारो नागरिकांचे जीवन धोक्यात येणे, संपूर्ण उल्हासनगर मनपा प्रशासनच भ्रष्ट असल्याने ही महानगरपालिका बरखास्त करुन चौकशी करण्याची आवश्यकता " या विषयाबाबत नियम 289 अन्वये प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याबाबतची सूचना दिलेली आहे.

श्री. कपिल पाटील : मला दोन मिनिटे बोलण्याची संधी द्यावी.

**उप सभापती** : या घटने संदर्भात शासनाने निवेदन करावे.

श्री.कपिल पाटील : मला फक्त दोन मिनिटे बोलण्याची संधी द्यावी.

**उप सभापती** : या घटने संदर्भात शासनाने निवेदन करावे असे मी आदेश दिलेले आहेत. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांना बोलण्याची परवानगी देता येत नाही. आता मी अल्पसूचना प्रश्न क्रमांक 17683 पुकारतो.

श्री.जयंत प्र.पाटील : माननीय सभापतींच्या दालनामध्ये आज प्रश्नोत्तराचा तास घेतला जाणार नाही असा निर्णय घेण्यात आला आहे.

3..





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : आज प्रश्नोत्तराचा तास घेतला जाणार नाही. मी अल्पसूचना प्रश्न पुकारीत आहे.

श्री.जयंत प्र. पाटील : माननीय सभापती महोदय, आज प्रश्नोत्तराचा तास घेतला जाणार नाही असा निर्णय माननीय सभापतींच्या दालनात झालेला आहे. तरी देखील आपण अल्पसूचना प्रश्न पुकारीत आहात. माननीय सभापतींच्या दालनातील बैठकीस मी देखील उपस्थित होतो. प्रश्नोत्तराचा तास आणि पुढील कामकाज घ्यावयाचे नाही असा निर्णय त्या बैठकीत घेण्यात आला आहे...

**उप सभापती** : फक्त प्रश्नोत्तराचा तास घेतला जाणार नाही असा निर्णय माननीय सभापतींच्या दालनात घेण्यात आलेला आहे. आजच्या कार्यक्रमपत्रिकेवर जे कामकाज दाखविण्यात आलेले आहे. ते कामकाज आपण पूर्ण करणार आहोत.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**"कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली टंचाई"**

**अल्प सूचना क्रमांक १७६८३ श्री.अरुण गुजराथी**

**सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-**

(१) कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात पिण्याच्या पाण्याची टंचाई आहे, हे खरे आहे काय,
(२) या संदर्भात दिनांक १७ मार्च, २०११ रोजी महापौरांच्या अधिपत्याखाली सर्वपक्षीय मोर्चा निघाला होता हे खरे आहे काय,
(३) उल्हास नदीतून १४० दशलक्ष लीटर पिण्याच्या पाण्याची मागणी केली आहे हे खरे आहे काय, यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा कोणती उपाययोजना करण्यात येणार आहे?

**श्री.भास्कर जाधव, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता :** (१) होय, हे खरे आहे.
कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात शहाड व जांभूळ या जलशुद्धीकरण केंद्रावरून पाणीपुरवठा होतो. महानगरपालिकेस शहाड जल शुद्धीकरण केंद्रावरून होणारा पाणीपुरवठा काही वर्षात टप्प्याटप्प्याने मंजूर कोटयापेक्षा कमी झाला असल्याने व कल्याण पूर्व, डोंबिवली पूर्व हा भाग त्याच पाण्यावर अवलंबून असल्याने या भागात पाणी टंचाई भासते.
(२) कल्याण पूर्व व डोंबिवली पूर्व या भागाकरीता १० द.ल.लीटर प्रतिदिन पाणी वाढविण्याचे आश्वासन देऊनही कार्यवाही न केल्याच्या कारणास्तव महापौर यांच्या नेतृत्वाखाली सर्वपक्षीय शिष्टमंडळ दि.१८/०३/२०११ रोजी अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, डोंबिवली यांचेकडे चर्चेसाठी गेले होते.
(३) कल्याण-डोंबिवली शहराची वाढती लोकसंख्या विचारात घेऊन, उल्हास नदी खोऱ्यातून महानगरपालिकेस वाढीव पाणी उपलब्ध व्हावे यासाठी महानगरपालिका स्तरावर पाठपुरावा सुरू आहे. शहरासाठी पाणीपुरवठा बळकटीकरण (Augmentation of Water Supply) या प्रकल्पास केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निमाण अभियानांतर्गत मंजुरी मिळाली असून काम प्रगतीपथावर आहे. बारवी धरणातून १४० द.ल.लीटर प्रतिदिन पाणी पुरवठा कल्याण-डोंबिवली शहरास मंजूर करण्याबाबत माननीय मंत्री, जलसंपदा यांच्या अध्यक्षतेखाली दि. १३/८/२००९ रोजी झालेल्या उच्चाधिकार समितीच्या २२ व्या बैठकीत निर्णय झालेला आहे.

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, उत्तरामध्ये म्हटले आहे की, मंजूर कोट्यापेक्षा कमी पाणी मिळते. म्हणजे यापुढे आणखी कमी पाणी मिळणार असा या उत्तराचा अर्थ लावता येईल. 10 दशलक्ष लीटर पाणी प्रतिदिन वाढविण्याचे आश्वासन देऊनही कारवाई का झाली नाही, 140 दशलक्ष लीटर प्रतिदिन पाणी मिळण्याबाबत निश्चित धोरण काय आहे, पाणी केव्हा मिळेल?

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

अल्पसूचना प्रश्न क्रमांक-17683.....

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, पाणीपुरवठा मंत्री महोदयांकडे बैठक झाल्यानंतरही एमआयडीसीने पाणी वाढवून दिले नाही याबद्दल प्रश्न विचारला आहे. या संदर्भात माहिती घेतली असता असे दिसून आले की, पूर्वीची जी पाईप लाईन आहे त्यापेक्षा अधिक क्षमतेची पाईप लाईन टाकावी लागेल. सध्याच्या पाईप लाईनमधून अधिक प्रमाणात पाणी प्रवाही होऊ शकणार नाही. ही पाईप लाईन बदलण्याचे काम सुरु करण्यासाठी चीफ इंजिनिअरची तात्काळ मंजुरी घेण्याच्या सूचना कालच देण्यात आल्या आहेत. ही मंजुरी ताबडतोब घेण्यात येईल. या शहराच्या पाणी टंचाईचा प्रश्न कायमचा सोडविण्यासाठी बारवी धरणाची उंची वाढविण्याशिवाय पर्याय नाही, ही बाब लक्षात आली आहे. म्हणून या धरणाची उंची वाढवून आता जो 140 दशलक्ष लीटर पाण्याचा साठा होतो त्यापेक्षा दुप्पट पाण्याचा साठा होऊ शकतो आणि हा पाण्याचा प्रश्न सुटू शकेल या दृष्टीने कार्यवाही सुरु आहे.

--------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**"मुंबईतील पायधुनी येथील रहिम मंजिल ही इमारत कोसळून झालेला अपघात"**

**अल्पसूचना प्रश्न क्रमांक- १७६८२ श्री. अरुण गुजराथी**

**सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय** : -
(१) दिनांक १७ मार्च, २०११ रोजी पायधुनी येथे रहिम मंजिल ही चार मजली इमारत कोसळली आहे, हे खरे आहे काय,
(२) सदर अपघातात ४ जणांचा मृत्यु व १५ जण जखमी झाले हे खरे आहे काय,
(३) सदर इमारत कोसळण्याची सर्वसाधारण कारणे कोणती,
(४) अपघातात मृत झालेल्यांना तसेच जखमींना शासनाने कोणती मदत केली आहे वा करण्यात येत आहे?

**श्री.सचिन अहिर, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता** : (१) होय.
(२) सदर अपघातात ५ जणांचा मृत्यू झालेला असून , ९ जण जखमी झालेले आहेत. त्यापैकी ४ जण गंभीर जखमी आहेत.
(३) सदर इमारत दुरुस्ती मंडळामार्फत दुरुस्तीसाठी घेण्यात आलेली होती. इमारतीच्या दुरुस्तीसाठ ीचे नकाशे व अंदाजपत्रक दिनांक ३०.१०.२०१० रोजी मंजूर करण्यात आले. निविदेच्या छाननीनंतर इमारतीच्या दुरुस्तीचे काम मे. एम एस बेग यांना देण्यात आले. तसेच दुरुस्तीचे काम सुरु करण्याचे आदेश दिनांक २१.१.२०११ अन्वये देण्यात आले. दुरुस्ती कामावर देखरेख करण्यासाठी मे गज्जर अँड असो (वास्तुशास्त्रज्ञ) यांची नेमणूक करण्यात आली आहे. दुरुस्तीचे काम सुरु करण्यापूर्वी ठेकेदाराने इमारतीला टेकू लावण्याची तयारी सुरु केली. तथापि, इमारतीतील रहिवाशांनी टेकू लावण्याच्या कामास विरोध केला व दुरुस्तीचे काम पुढे ढकलण्याची विनंती केली. सदरहू इमारतीतील रहिवाशांनी इमारत खाली करण्यासाठी असहकार्य केल्यामुळे कंत्राटदार दुरुस्तीचे काम सुरु शकला नाही.
(४) जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांना मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधी अंतर्गत ५ मृतांमागे प्रत्येकी रु. १ लाख प्रमाणे ५ लाख प्राप्त झालेले आहेत. तर ४ जखमींना प्रत्येकी रु. २५ हजार प्रमाणे रु. १ लाख प्राप्त झालेले आहेत. त्यांना मदत वाटप करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, साधारणत: पावसाळ्यात धोकादायक इमारती कोसळतात. परंतु ही घटना मार्च-एप्रिल महिन्यात घडली आहे. याकरिता शासनाने अधिक काळजी घेणे अत्यंत महत्वाचे आहे. या मुंबई शहरामध्ये किती इमारती धोकादायक आहेत आणि अशी घटना पुन्हा घडू नये या संदर्भात शासन कोणती खबरदारी घेणार आहे?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..4..

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मुंबई शहरात साधारणपणे 16 हजार उपकर प्राप्त इमारती आहेत. या इमारतींचे धोकादायक आणि अति धोकादायक असे दोन भाग केले आहेत. अति धोकादायक इमारतींची संख्या 29 असून त्यापैकी 17 इमारतीतील भाडेकरुंना पर्यायी जागा देण्याचे काम केले आहे. पुढील काळात अशा घटना घडू नयेत म्हणून दर तीन महिन्यांनी अशा इमारतींचा सर्वे केला जाणार आहे. आतापर्यंत पावसाळ्यापूर्वी आणि पावसाळ्यानंतर सर्वे केला जात होता. या पुढील काळात दर तीन महिन्यांनी सर्वे केला जाईल आणि धोकादायक व अति धोकादायक इमारतींची यादी जाहीर केली जाईल. अति धोकादायक इमारत असेल तेथील भाडेकरुंना संक्रमण शिबीरामध्ये पर्यायी जागा देऊन त्या इमारतीची पुनर्बांधणी करण्याचे काम केले जाईल.

-------

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी.** : लेखी उत्तरे

**मु.शी.**: तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवणे

सह सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मंगळवार, दिनांक 19 एप्रिल, 2011 रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवीत आहे.

**उप सभापती** : दिनांक 19 एप्रिल, 2011 रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

----

..6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.सचिन अहिर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य माहिती आयोगाचा सन 2010 चा पाचवा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे सन 2007-2008 चे वार्षिक लेखा आणि लेखा विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : वार्षिक लेखा आणि लेखा विवरणपत्र सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

-----

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (सुधारणा) नियम, 2011 प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक मुवक.1511/प्र.क्र.44/कराधान-1, दिनांकित 17 मार्च, 2011 सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

-----

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (दुसरी सुधारणा) नियम, 2011 प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक मुवक.1511/ प्र.क्र.45/कराधान-1, दिनांकित 17 मार्च, 2011 व शुध्दीपत्र क्रमांक मुवक.1511/ प्र.क्र.45/कराधान-1, दिनांकित 25 मार्च, 2011 सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

----

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य अपंग वित्त आणि विकास महामंडळ मर्यादितचा सन 2005-2006 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

नंतर 2ए.1...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल देशमुख (अन्न व नागरी पुरवठा मंत्री) : महोदय, मी आपल्या अनुमतीने दिनांक 16 मार्च, 2011 रोजी सर्वश्री पांडुरंग फुंडकर व इतर वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या म.वि.प. नियम 260 अन्वये प्रस्तावाच्या चर्चेच्या वेळी दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कारवाईची माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : आश्वासनाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कारवाईची माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

प्रेस : येथे सोबत जोडलेली माहिती छापावी.

------

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: रोजगार हमी योजना समितीचा अहवाल सादर करणे

श्री. सुभाष चव्हाण (सदस्य) : महोदय, मी आपल्या अनुमतीने रोजगार हमी योजना समितीचा आठवा, नववा आणि दहावा अहवाल सभागृहाला सादर करतो.

**उप सभापती** : रोजगार हमी योजना समितीचा आठवा, नववा आणि दहावा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

-------

....3......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: अनुसूचित जमाती कल्याण समितीचा सहावा अहवाल (सन 2011-12) सादर करणे

श्री. रमेश शेंडगे (समिती सदस्य) : महोदय, मी आपल्या अनुमतीने अनुसूचित जमाती कल्याण समितीचा सहावा अहवाल सभागृहाला सादर करतो.

महोदय, हे करीत असताना मी एक बाब समितीच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, बीड जिल्हापरिषदेत निलंबित करण्यात आलेल्या 19 कर्मचाऱ्यांची सेवाज्येष्ठता यादी डावलून त्याऐवजी इतर कर्मचाऱ्यांची भरती करण्यात आली. यासंबंधीची चौकशी करुन योग्य ती कारवाई करावी असे अहवालात नमूद करण्यात आले आहे. सभागृहातील प्रत्येक सन्माननीय सदस्य कुठल्या ना कुठल्या समितीचा सदस्य असल्याकारणाने जेवढे अहवाल समितीच्या वतीने सादर करण्यात येतात त्यांच्याबाबत कोणतीच कारवाई होत नाही. आमच्या समितीच्या वतीने हा सहावा अहवाल आम्ही सादर करीत आहोत पण आजपर्यंत एकाही अहवालावर कारवाई करण्यात आली नाही अथवा त्यासंबंधीची माहिती देखील देण्यात आलेली नाही, याची शासनाने नोंद घ्यावी.

**उप सभापती** : अनुसूचित जमाती कल्याण समितीचा सहावा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

-------

....4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ पूर्वी श्री. भोगले...... 13:25

**पृ.शी./मु.शी.**: अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सादर करणे व संमत करणे

श्री. चंद्रकांत पाटील (समिती प्रमुख) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला सादर करतो.

गुरुवार, दिनांक 21 एप्रिल, 2011 रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या अशासकीय विधेयकांना द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता बुधवार, दिनांक 20 एप्रिल, 2011 रोजी समितीची बैठक झाली. अशासकीय कामकाजासाठी एकूण 150 मिनिटांचा वेळ उपलब्ध आहे. अशासकीय विधेयकांना 150 मिनिटांचा वेळ देण्यात यावा, अशी शिफारस समितीने केली आहे.

**अशासकीय विधेयके**

पुर:स्थापनार्थ

डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांचे सन 2011 चे वि.प.वि.क्रमांक 5 - 10 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

विचारार्थ

1. श्री. किरण पावसकर, वि.प.स. यांचे सन 2011 चे वि.प.वि.क्र. 3-70 मिनिटांपेक्षा जास्त नाही.
2. सर्वश्री विनोद तावडे व इतर वि.प.स. यांचे सन 2011 चे वि.प.वि.क्र.4 - 70 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

**उप सभापती** : अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

श्री. चंद्रकांत पाटील : महोदय, अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला संमत आहे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

-------

....5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: विनंती अर्ज सादर करणे

श्री. मोहन जोशी (नामनियुक्त) : महोदय, मौ. चौफुला, मांजरेवाडी, पिंपळे जगताप मु.पो. शिक्रापूर, ता. शिरुर, जि. पुणे येथील शेत जमिनीतून रिलायन्स गॅस पाईपलाईन गेल्यामुळे नुकसान भरपाई देण्यामध्ये पक्षपात/अन्याय असल्याप्रकरणी न्याय मिळणेबाबत" या विषयावरील विनंती अर्ज मी आपल्या अनुमतीने सभागृहाला सादर करतो.

**उप सभापती** : विनंती अर्ज सभागृहाला सादर झाला आहे. हा विनंती अर्ज प्रतिवृत्त सादर करण्याकरिता विनंती अर्ज समितीकडे सोपविण्यात आला आहे. प्रतिवृत्त सभागृहाला सादर झाल्यावर त्याची प्रत प्रत्येक सदस्याकडे पाठविली जाईल.

----------

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी सूचना क्रमांक 1,2 व 3 बाबत**

**उप सभापती** : आता लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात येतील.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, लक्षवेधी सूचना क्रमांक 1,2 व 3 च्या संदर्भात संबंधित मंत्री सभागृहात उपस्थित नसणे ही अतिशय गंभीर बाब आहे. त्यामुळे सभागृहाची बैठक थोडया वेळासाठी स्थगित करण्यात यावी अशी विनंती आहे.

**उप सभापती** : ठीक आहे. सभागृहाची बैठक 15 मिनिटांसाठी स्थगित करण्यात येत आहे.

( सभागृहाची बैठक 1.31 ते 1.45 पर्यंत स्थगित झाली.)

---------------

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

**<u>हरकतीच्या मुद्याबाबत</u>**

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. वेळे अभावी आजचा प्रश्नोत्तराचा तास आपण रद्द केलेला आहे आणि त्यानंतर लक्षवेधी सूचना पुकारल्या नंतर माननीय मंत्री महोदय उपस्थित नाहीत म्हणून सभागृहाची बैठक तहकूब करण्यात आली. ही बाब बरोबर नाही. माननीय मंत्र्यांनी सभागृहात उपस्थित रहावयास पाहिजे होते.

**उप सभापती** : आपण सांगितल्यामुळेच मी सभागृहाची बैठक तहकूब केली होती.

श्री.रामदास कदम : सभागृहात मंत्री उपस्थित नव्हते म्हणून मी बैठक तहकूब करा असे सागितले होते.

**उप सभापती** : माननीय मंत्री सभागृहात उपस्थित नव्हते ही गोष्ट खरी आहे.

श्री.रामदास कदम : यामध्ये आमची काहीही चूक नाही त्यामुळे आता प्रश्नोत्तराचा तास घेण्यात यावा. तसेच माननीय मंत्री सभागृहात उपस्थित नसल्यामुळे त्यांना ताकीद देण्यात यावी.

**उप सभापती** : लक्षवेधी सूचना मघाशी पुकारण्यात आली होती तेव्हा माननीय मंत्री सभागृहात उपस्थित नव्हते.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, लक्षवेधी सूचना घेण्याचे ठरले नव्हते.

**उप सभापती** : प्रश्नोत्तराचा तास रद्द झालेला आहे आणि आता लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात येतील असे मी आल्यानंतर प्रथम सांगितले होते.

**विनियोजन विधेयक अगोदर घेण्याबाबत**

श्री.अजित पवार : सभापती महोदय, विनियोजन विधेयक अगोदर चर्चेला घेण्यात यावे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

श्री.दिवाकर रावते : विनियोजन विधेयकाच्या प्रती आम्हाला मिळाल्या नाहीत.

**वार्ताहर कक्षातील ए.सी. बंद पडल्याबाबत**

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, वार्ताहर कक्षाच्या बाजूकडील ए.सी.पूर्णपणे बंद पडलेला आहे.तेव्हा पत्रकारांनी आपले वाभाडे काढू नयेत व लवकर वार्ताहर कक्षातून बाहेर जावे यासाठी ए.सी. बंद ठेवला आहे काय ?

**उप सभापती** : त्या बाबतीत मी संबंधितांना सांगितले आहे.

20-04-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) CC-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. सेंट्रल एक्सप्रेस वे च्या विकास आराखडयात बदल करणे
मु.शी. :सेंट्रल एक्सप्रेस वे च्या विकास आराखडयात बदल करण्यासंबंधी
सर्वश्री विनोद तावडे,चंद्रकांत पाटील,संजय केळकर,रामनाथ मोते,
वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" मुंबई शहरातील वाढती वाहतूक सुरळीत करण्याच्या दृष्टीने गिरगाव चौपाटी ते लालबाग पूल व सायनपर्यंत सेंट्रल आयलंड एक्सप्रेस वे चे आरक्षण मंजूर विकास आराखड्यात दाखविण्यात येणे, याची रुंदी 46 मीटर असणे, गिरगाव चौपाटी-लालबाग पूल ते सायन या भागातील रस्त्यांच्या शेजारी सुमारे 12000 पेक्षा जास्त इमारती ज्यात 5000 इमारती या 1940 पूर्वीच्या असून या नियोजित आरक्षणामुळे या इमारतीत राहणाऱ्या लाखो नागरिकांच्या निवासाची समस्या निर्माण होणे, सदर बाब लक्षात घेता मुंबई विकास योजनेतील सेंट्रल आयलंड एक्सप्रेस वे च्या आरक्षणामध्ये बदल करण्या संदर्भात मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली 19/11/2009 रोजी झालेल्या बैठकीत सदर सेंट्रल एक्सप्रेस वे चे आरक्षण निष्कासित करुन याबाबतचा विकास योजनेतील फेरबदलाचा प्रस्ताव मुंबई महानगर पालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 मधील तरतूदीनुसार महाराष्ट्र शासनाकडे सादर करणेबाबत निर्णय होणे, परंतु सदर फेरबदल बाबतचा प्रस्ताव मुंबई महानगरपालिकेने सादर न करणे, प्रशासनाच्या या विलंबामुळे या भागात मोडकळीस आलेल्या व जुन्या इमारतींच्या पुनर्विकासामध्ये येत असलेल्या अडचणी, या भागातील लाखो नागरिकांचे जीव धोक्यात येणे, सदर आरक्षणाचा फेरविचार करण्याबाबतचा प्रस्ताव मुंबई प्रदेश विकास प्राधिकरण यांनी महानगर पालिका प्रशासनाकडे सादर करणे, सदर प्रकरणी सेंट्रल आयलंड एक्सप्रेस वे चे आरक्षण केले असून त्यावर महानगर पालिका प्रशासनाने त्वरित कारवाई करण्याबाबत व मुख्य सचिव यांच्या बैठकीत झालेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात होत असलेल्या दिरंगाईची चौकशी करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया".



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण (मुख्य मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



- निवेदनानंतर -

श्री.विनोद तावडे : 1963 साली सेंट्रल आयलंड एक्सप्रेस प्रपोज झाला होता त्यानंतर 1981 -2001 च्या डी.पी.मध्ये त्या एक्सप्रेसचा समावेश करण्यात आला होता. मला शासनाला असे विचारावयाचे आहे की, त्या ठिकाणी मेट्रो रेल, मोनो रेल आणि मेट्रो कॉरिडॉर होत आहे. 15 मार्च 2008 च्या एमएमआरडीएच्या बैठकीमध्ये या विषयावर चर्चा झाली होती. त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री श्री विलासराव देशमुख हे एमएमआरडीएचे अध्यक्ष होते. त्यावेळी सेंट्रल आयलॅंड एक्सप्रेसच्या रस्ते विकास आराखडयामध्ये काही बदल करावयाचा आहे असा मुद्दा नगरसेवक श्री आशिष शेलार यांनी मांडला होता. त्यानंतर या एमएमआरडीएचे चेअरमन, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव, ......

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

महानगरपालिकेचे प्रभारी आयुक्त, बांधकाम विभागाचे सचिव, संचालक, अभियांत्रिकी सेवा प्रकल्प, महानगरपालिका अशा सर्व अधिकाऱ्यांची बैठक होऊन त्याचे मिनिटस ठरविण्यात आले. त्यावेळी मुख्य सचिवांनी असे निदेश दिले की, "वरील निर्णयाप्रमाणे संपूर्ण विकास योजनेच्या सुधारणा प्रस्तावासाठी वाट न पहाता मुंबई महानगर पालिकेने या बाबत अभ्यास करणे आवश्यक आहे वगैरे..." सभापती महोदय, 1963 सालामध्ये या सर्व गोष्टी घडल्यानंतर बरेच बदल झाले. त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग हा एक मोठा रस्ता बांधण्यात आला, हा इंग्रजांच्या काळातील प्रस्तावित रस्ता होता. त्या भागामध्ये कनिष्ठ, मध्यमवर्गीय लोकांच्या अनेक जुन्या इमारती आहेत. त्यामधील कुणीही रहिवाशी परवानगी मागण्यास गेल्यानंतर या ठिकाणी सेंट्रल आयलंड एक्सप्रेस होणार असल्यामुळे आम्ही तुम्हाला परवानगी देऊ शकत नाही असे सांगितले जाते. या बाबत बैठकीत चर्चा झाल्यानंतर ठरलेल्या निर्णयाप्रमाणे त्याची अंमलबजावणी करावयाची आहे. सदरचा निर्णय 20 नोव्हेंबर रोजी झाला, त्याचे मिनिट्स मी आपणासमोर मांडले. ते कन्फर्म झाले असून आपण ते किती दिवसात अंमलात आणणार आहात?

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी सेंट्रल आयलंड एक्सप्रेस वे बाबत प्रश्न विचारला आहे त्याबाबत बरीच चर्चा झाली आहे. यामध्ये मुंबईच्या वाढत्या रहदारीची समस्या पहाता हा रस्ता असावा, त्याची रुंदी कमी करण्यात येऊ नये अशाप्रकारचा एक विचार आहे. परंतु जर रस्त्याची रुंदी कमी केली नाही तर त्या ठिकाणी जुन्या असलेल्या सेसच्या इमारतींच्या पुनर्विकासामध्ये अडचणी येत आहेत. या दोन परस्पर विरोधी गोष्टी माननीय सदस्यांनी आपल्यासमोर मांडल्या आहेत. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली नोव्हेंबर 2009 मध्ये एक बैठक घेण्यात आली होती. त्याचप्रमाणे नवीन डी.पी. मध्ये कोणत्या सुधारणा कराव्यात याबाबत सुध्दा चर्चा सुरु आहे. सध्याच्या लेटेस्ट परिस्थितीमध्ये मेट्रो रेल होत आहे, मोनो रेल होत आहे, फ्लाय ओव्हर होत आहेत. त्या दृष्टीने वहातूक व्हेकेट करण्यासाठी हा एक्सप्रेस वे कशाप्रकारे असावा या करिता आपली आग्रही भूमिका आहे. त्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेने सुधारीत विकास योजना करण्याचा इरादा व्यक्त केला आहे. त्यानुसार शासनाने 30 जून 2010 रोजीच्या पत्रान्वये सविस्तर अभिप्राय मागविले आहेत. ते प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर गुणवत्तेनुसार निर्णय घेतला जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी 30 जून 2010 रोजीच्या पत्रान्वये अभिप्राय मागविले असल्याचे सांगितले आहे. मी या ठिकाणी मुद्दाम कधीही अधिकाऱ्यांची नावे वाचत नाही. परंतु या ठिकाणी झालेल्या बैठकीला जे अधिकारी उपस्थित होते त्यांची नावे मी यासाठी वाचली की, त्यांनी कोणताही अभ्यास न करता आपले मत मांडले काय? तसे असेल तर मी गप्प बसतो. आपण काल उल्हासनगरला एक इमारत पडल्याचे पाहिले आहे. अशाप्रकारे इमारत पडून माणसे मेली तर आपण निर्णय घेणार काय? हा 1963 सालचा प्रस्ताव आहे, त्यानंतर मेट्रो रेल,मोनो रेल हे प्रकल्प होणार आहेत, फ्लाय ओव्हर होत आहेत. जर हे मुंबईसाठी आवश्यक असेल तर मी काही म्हणणार नाही.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे . . . .

पण मुळामध्ये प्रॅक्टीकली जो पूल बांधण्याचे सुचविले आहे, तो आता बांधणे शक्य आहे की नाही याचा तरी अभ्यास केला आहे काय ? खरे म्हणजे आता असा पूल बांधणे शक्यच नाही. हा पूल प्रॅक्टीकली होऊ शकत नाही. त्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांनी टाईम बाऊंड स्वरुपामध्ये सांगावे की, पुढील महिन्याभरामध्ये सदर प्रस्तावित रस्त्याची रुंदी पंडीता रमाबाई मार्ग ते लालबाग पूल या दाट वस्ती भागातील रस्त्याची रुंदी कमी करण्याच्या बाबतीत जो निर्णय झालेला आहे,त्याची अंमलबजावणी करु एवढी माफक अपेक्षा आहे. नाहीतर सेस इमारतींच्या बाबतीत अपघात झाला किंवा ती इमारत कोसळून माणसे मरण पावल्यानंतर आपण धावपळ करणार काय? याची गरज आहे काय? माझी आपल्याला एवढीच विनंती आहे की, आम्ही या महिन्याभरामध्ये अभ्यास पूर्ण करु एवढेच आपण सांगावे.

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, 2009 मध्ये निर्णय प्रक्रिया झाली होती. परंतु आताची वाढती लोकसंख्या आणि वेगाने वाढणारी वाहनांची संख्या लक्षात घेता याबाबतीत कोणताही अभ्यास किंवा त्यासंबंधातील अहवाल प्राप्त करुन न घेताच जर आपण काही निर्णय घेतला तर फार मोठ्या प्रमाणात जनतेकडून हरकती येतील, जनतेमध्ये असंतोष निर्माण होईल. म्हणून जून मध्ये परत एकदा अभ्यास करुन प्रस्ताव सादर करण्याबाबत विनंती केलेली आहे आणि त्याप्रमाणे प्रस्ताव येत आहेत आणि ते प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतरच त्याबाबत उचित निर्णय घेता येईल.

श्री.विनोद तावडे (खाली बसून) : सभापती महोदय, ही बाब 2009 पासून पेंडींग आहे.

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, रस्त्याची जी कपॅसिटी आहे, त्याबाबतीत आता कॉम्प्रमाईज् करावयाचे काय? ज्याठिकाणी रस्ता रुंद ठेवणे शक्य आहे, तेथे रुंद ठेवावयाचा काय? तसेच ज्याठिकाणी रुंदी कमी आहे त्याठिकाणी ते तसेच ठेवावयाचे की पुन्हा त्यामध्ये वाढ करावयाची याबाबत चर्चा सुरु आहे.तसेच आता दुसरा एक पर्याय पुढे आलेला आहे की, जेथे रुंदी कमी आहे आणि ती वाढविणे अशक्य आहे अशा ठिकाणी फ्लाय ओव्हरवर अजून दुप्पट फ्लाय ओव्हर बांधता येईल काय या दृष्टीनेही विचार सुरु आहे. कारण आपल्याला सेंट्रल आयलँड एक्सप्रेस वे च्या माध्यमातून गर्दी कमी करावयाची आहे.अर्थात याबाबतीत जर कोस्टल रोडचे प्रपोजल मंजूर झाले तर वेगळी गोष्ट आहे.

श्री.विनोद तावडे (खाली बसून) : आपल्या अधिकाऱ्यांना याबाबत अचानक शोध लागला.पण

20-04-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) EE-2

APR/ 13:55

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अगोदर त्यांना माहिती नव्हते. त्यामुळे तेथील गरिबांची घरे अडलेली आहेत.

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, आता ही शक्यता निर्माण झालेली आहे. याबद्दल ओव्हर ब्रिजच्या बाबतीत काही प्रस्ताव करता आला तर विचार करता येईल. परंतु मी आता वेळेच्या बाबतीत आश्वासन देऊ शकत नाही. पण मी लवकरात लवकर करण्याचा प्रयत्न करतो. कारण माझ्याकडे याबाबतीत अहवाल आला पाहिजे. याबाबतीत अहवाल आलेला आहे काय हे पहातो. यासंबंधातील अहवाल मागविण्यात आलेला आहे आणि तो प्राप्त झाल्यानंतर त्यामध्ये काय-काय पर्याय सुचविलेले आहेत, ते पहावे लागेल.

श्री.विनोद तावडे (खाली बसून) : सभापती महोदय, 2009 च्या बाबतीत अजून निर्णय होत नाही.

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचे म्हणणे बरोबर आहे. 2009 नंतर जून 2010 मध्ये निर्णय घेतला की, याबाबतीत पुन्हा अहवाल मागविण्यात यावा. त्यामुळे आता आपण 2009 हे वर्ष सोडून देऊ. आता जून 2010 मध्ये अहवाल मागविला आहे.

श्री.विनोद तावडे (खाली बसून) : सभापती महोदय, तरी देखील त्याला आता वर्ष होईल. याठिकाणी चार विभागातील अधिकाऱ्यांच्या आपसात भानगडी आहेत.

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, हा एक गहन प्रश्न आणि दोन परस्पर विरोधी मागण्या आहेत. एकतर रस्त्याची रुंदी कमी करण्यात येऊ नये अशी जोरदार मागणी होत आहे. त्याचबरोबर सेस इमारतींचा देखील विकास झाला पाहिजे ही देखील ग्राह्य मागणी आहे. त्यामुळे जर दोन मजली दुहेरी रस्ता करता आला, ओव्हर ब्रिज केला तर तोही रस्ता . . .

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय पंतप्रधान यांचे असे म्हणणे आहे की, विकासाला मानवी चेहेरा असावा. त्यामुळे सेस इमारतीमधील ब्लॉक . . ..

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, जर आपण तेथील सगळी रहदारी ब्लॉक केली आणि उत्तरेकडून दक्षिणेकडे जाण्यासाठी दोन-दोन तास लागणार असतील तर . . ..

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, जर त्याठिकाणी रहदारी ब्लॉक झाली असती तर मी हा विषय देखील उपस्थित केला नसता. मी त्या रस्त्यावरुन गेलो आहे. पण मी अतिशय प्रामाणिकपणे ....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांच्या भावनांशी सहमत आहे. मला सन्माननीय सदस्यांनी थोडा वेळ द्यावा. मी परत एकदा पाहून घेतो आणि याबाबतीत पुन्हा एकदा बैठक घेऊन या संबंधातील प्रकरणांची स्थिती कुठपर्यंत आलेली आहे याची माहिती घेऊन लवकरात लवकर करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करतो.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, याठिकाणी सेंट्रल आयलँड एक्सप्रेस-वे बाबत ज्या काही अडचणी आहेत, त्यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी चर्चा केली. माझा एक स्पेसिफीक प्रश्न आहे की, 1963 मध्ये नव्याने झालेले काही प्रस्ताव होते. डी.पी.मध्ये गेली 40 वर्षे अनेक रोडस्च्या वाईंडींगच्या बाबतीत देखील अनेक प्रपोजल्स् पेंडींग आहेत. अनेक वर्षापासून डी.पी.बाबत अंमलबजावणी देखील होत नाही. आजच्या बदलत्या परिस्थितीमध्ये ज्या काही नवीन-नवीन योजना पुढे येत आहेत. मग त्यामध्ये मेट्रो रेल असेल, मोनो रेल असेल, सी-लिंक किंवा कोस्टल रोड असतील या योजनांच्या माध्यमातून ज्या काही ट्रान्सपोर्टच्या सुविधा निर्माण होत आहेत किंवा रस्त्यांची सुविधा निर्माण होत आहे. त्यामुळे ट्रॅफीक मुव्हमेंट सुरळीत होणार आहे. याचा कन्सॉलिडेटेड विचार करुन आपण मुंबईसाठी एक मास्टर प्लॅन तयार करण्याच्या दृष्टीने योजना आखणार आहात काय ?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, मुंबईतील वाहतुकीची समस्या दूर करण्यासाठी आणि सर्वसामान्य लोकांची सोय होण्यासाठी बराच विचार झाला आणि मास्टर प्लॅन वगैरे बाबत चर्चा झालेली आहे. त्यातूनच आपण मेट्रोचा प्रकल्प राबविला. तसेच फ्लाय-ओव्हरची देखील कामे करीत आहोत. त्याचप्रमाणे आपण मोनो रेलचा प्रकल्प, वॉक-वे चा प्रकल्प राबवित आहोत.

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण.....

नवीन कल्पनेप्रमाणे कोस्टल रिंग रोडचा प्रकल्प विचाराधीन आहे. सी.आर.झेड.कडून स्टील्ट रोडची परवानगी मिळाली, तेव्हा हा प्रस्ताव पुन्हा उपस्थित झाला. स्टील्ट रोड व्यावहारिक वाटत नाही. कोस्टल रोडच्या संदर्भात आताच्या सी.आर.झेड.च्या नोटिफिकेशनमध्ये काही उल्लेख नसला तरी तो आपल्याला करता येईल. कारण त्याबाबतीत केंद्रीय पर्यावरण मंत्र्यां बरोबर प्रदीर्घ अशी चर्चा झ ाालेली आहे. या सगळया गोष्टीचा पर्याय पुढे ठेवून, बहुतेक मेट्रो रेलच्या चाचण्या या वर्षा अखेर पूर्ण होतील आणि पुढच्या वर्षी मेट्रो रेल सुरु होईल. मोनो रेलचीही तशीच परिस्थिती आहे. अशा प्रकारे वेगवेगळया पर्यांयाचा मुंबईतील वाहतूक समस्येबाबत विचार करण्यात येत आहे. नवीन डीपी हा सन 2014 पर्यंत अपेक्षित आहे.डीपीमध्ये रस्त्यांच्या बद्दल काय करावयाचे किंवा त्यामध्ये मोनो रेल किंवा मेट्रो प्रकल्प आणखी कुठे हाताळता येतील काय याबद्दल विचार करण्यात येणार आहे. मेट्रो बद्दल दुसऱ्या कॉरिडॉरची पर्यावरण विषयक मंजुरी मिळालेली आहे. त्या बद्दल मी नुकतेच काही दिवसा पूर्वी जाहीर केले होते. मुंबईच्या या सर्व समस्यांच्या संदर्भात कुठे फ्लाय ओव्हर करायचे, नवीन मेट्रो रेल किंवा मोनो रेल करावयाची काय, या बाबत नवीन डीपीमध्ये विचार सुरु आहे.

----

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबईत गढूळ पाणीपुरवठा केल्याने दोन गर्भवती महिलांचा मृत्यू होणे.

**मु. शी.** : मुंबईत गढूळ पाणीपुरवठा केल्याने दोन गर्भवती महिलांचा मृत्यू होणे यासंबंधी सर्वश्री किरण पावसकर,प्रकश बिनसाळे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. किरण पावसकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबई महानगरपालिकेने दिनांक 3 मार्च,2011 रोजी मुंबईकरांना गढूळ पाणी पुरवठा केल्याने दोन गर्भवती महिलांचा मृत्यू होणे तसेच दिनांक 11 डिसेंबर,2011 रोजी मुंबई घाटकोपर येथील महापालिकेच्या शाळेतील आठ मुलांना सुगंधी दुधाची बाधा होवून घाटकोपर येथील रुग्णालयात दाखल करावे लागणे, यामुळे महापालिकेच्या कारभाराबाबत निर्माण झालेली साशंकता ,महानगरपलिकेच्या कारभाराबाबत चिंतेचा प्रश्न निर्माण होणे तसेच झेब्रा क्रॉसिंग करण्याबाबत महापालिकेकडून आदेशाचे पालन न केल्याने मा.मुंबई हार्यकोर्टाचा अवमान होणे तसेच अपघातांचे वाढत असलेले प्रमाण याबाबत शासनाने लक्ष घालून केलेली वा करण्यात येत असलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया"

श्री. पृथ्वीराज चव्हाण ( मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो. असे करीत असताना मी आपल्या अनुमतीने निवेदनात पुढील दुरुस्ती करु इच्छितो. निवेदनाच्या दुसऱ्या पानावर खालून तिसऱ्या ओळीत "स्थायी कार्यादेश" या ऐवजी "कार्यादेश" असे वाचावे.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी निवेदनामध्ये सुरुवातीलाच असे म्हटले आहे की, "गढूळ पाण्याने गर्भवती दोन महिलांचा मृत्यू झाला असे निदर्शनास आलेले नाही." सभापती महोदय. वरळी येथील दोन गर्भवती महिलांचा मृत्यू झाला, त्यांनतर याबाबतीत जनहित याचिका दाखल करण्यात आली. ही याचिका न्यायमूर्ती श्री. पी. बी. मुजुमदार आणि श्री. ए.ए. सय्यद खंडपीठासमोर आली. या याचिकेच्या निकालात स्पष्टपणे असे म्हटले आहे की, पालिकेत All is well. त्याबाबतीत त्यांनी पुढे असे म्हटले आहे की, गुन्हेगार कारागृहात असायला हवे होते ते मोकाट फिरत आहेत. सभापती महोदय, हा गढूळ पाण्याचा एक प्रकार झाला.

सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेमध्ये पिवळया पाण्याच्या बाटल्या दाखविण्यात आल्या होत्या. याची माहिती कदाचित अधिकाऱ्यांकडे नसावी. या बाटल्या सत्ताधाऱ्यांनी दाखविल्या होत्या. तरी देखील निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, असा मृत्यू झालेला नाही आणि याची माहिती नाही. अधिकाऱ्यांनी याची माहिती दिली नाही असे वाटते तेव्हा याबाबतची चौकशी व्हावी.

सभापती महोदय, सुगंधी दूध योजना मुलांसाठी होती. प्रत्येक राजकीय पक्षाचे पुढारी कार्यक्रमाला जातात आणि मुलांसमोर चांगली भाषणे करतात आणि देश घडविणारी उद्याची हीच पिढी आहे असे सांगतात. पण त्या पिढीची व्यवस्था अतिशय दुर्लक्षित आहे. सुगंधी दूध योजनेच्या बाबतीत शासनाने असे म्हटले आहे की, ही योजना ऑक्टोबरमध्ये सुरु झाली. शाळा जूनमध्ये चालू होतात आणि योजना ऑक्टोबरमध्ये चालू झाली आहे. या योजनेच्या बाबतीतील ठराव कधी पास झाला, टेंडर कधी निघाले ते कोणाला देण्यात आले हे निवेदनामध्ये दिलेले आहे. ऑक्टोबरमध्ये सुरु झालेल्या योजनेमध्ये मालाड आणि मालवणी येथील शाळांमधील 32 मुलांना त्रास झाला. त्यानंतर दिनांक 10 डिसेंबर रोजी, घाटकोपर (पश्चिम) येथील महापालिका शाळा क्रमांक 1 मधील 8 मुलांना त्रास झाला. ही दूध योजना दोन महिन्यात बारगळली. सुंगधी दूध योजनेच्या बाबतीत कोणाला दोषी ठरविण्यात आलेले आहे? याबाबतीत उत्तरामध्ये असे दिले आहे की, प्रयोगशाळेमध्ये चाचणीसाठी पाठविण्यात आले आहे. अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही. बहुसंख्य मुलांना या योजनेचा फायदा मिळणार होता पण या दोन प्रकारानंतर ते या योजनेपासून वंचित राहिले आहेत.

..4..





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर....

सभापती महोदय, झेब्रा क्रॉसिंगसाठी एक वर्षाचा कालावधी देऊनही पुन्हा चार महिने वाढवून दिलेले आहेत. त्यावर उच्च न्यायालयाने ताशेरे ओढलेले आहेत. दोन महिन्यात वेगवेगळया कारणामुळे नऊ वेळा या महापालिकेवर हायकोर्टाने ताशेरे ओढलेले आहेत. कोणाचा मृत्यू झ ाल्यानंतर, कोणाचा अपघात झाल्यानंतर अशा प्रत्येक वेळी जनहित याचिका दाखल करण्यात येतात.पण त्याबाबत कोणतीही कारवाई होत नाही. एका वर्षा पासून झेब्रॉ क्रॉसिंग होत नाही. सुगंधी दुधाची योजना वर्षभरापासून तशीच पडून आहे. पाण्याच्या बाबतीत तसेच झालेले आहे.

या नंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी कु. थोरात 14:05

श्री.किरण पावसकर...

अशा प्रकारे महापालिकेचा कारभार होत असेल तर त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी शासन कोणती ठोस कारवाई करणार आहे ?

श्री. पृथ्वीराज चव्हाण : या लक्षवेधीला अतिशय विस्तृत उत्तर दिलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी तीन मुद्दे उपस्थित केलेले आहे. गढूळ पाणी प्यायला मुळे मृत्यू झाला का असा प्रश्न विचारलेला आहे. त्या संबंधी असे उत्तर देण्यात आलेले आहे की, गढूळ पाण्याचा आणि मृत्यूचा संबंध दिसून आला नाही. सप्टेंबर 2010पासून सुगंधी दूध पुरवठा ही नवीन योजना सुरु करण्यात आली. शालेय वर्ष सुरु होताना ही योजना सुरु करावयास पाहिजे होती. परंतु दुसरे शालेय वर्ष सुरु होई पर्यन्त थांबण्यात काहीच अर्थ नव्हता म्हणून सप्टेंबर 2010 पासून ही योजना सुरु केलेली आहे. शाळातील काही विद्यार्थ्यांना या सुगंधी दुधाचा त्रास झाला ही गोष्ट खरी आहे. गेल्या हिवाळी अधिवेशनामध्ये हा विषय उपस्थित झाला होता. या संबंधीही माहिती देण्यात आलेली आहे. दुधाचे नमुने तपासणी करिता पाठविलेले आहेत. या बाबतचा पोलीस तपास चालू आहे. यासंबंधी त्रिसदस्य समिती नेमलेली आहे. त्या समितीने सन 2011-2012च्या शैक्षणिक सत्रामध्ये सुगंधी दुधाचा पुरवठा करण्याबाबतचा निर्णय घ्यावयाचा आहे. पुन्हा फेर निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. पूर्वीचे कंत्राट रद्द करण्याचा निर्णय घेतलेला आहे. एका बाजूला पोलीस कारवाई चालू असून दुस-या बाजूला कंत्राट रद्द केलेले आहे. तसेच ही योजना पुढे चालू ठेवायची की नाही यासंबधी समिती निर्णय घेणार आहे. सुगंधी दूध पुरवठा करण्याची कल्पना चांगली आहे. ही योजना कार्यान्वित करताना चूक झालेली आहे. सुगंधी दूध पुरवठा करण्याच्या बाबतीत शीतगृह, वाहने अशा प्रकारच्या काही अडचणी निश्चितपणे आहेत.

झेब्रा क्रॉसिंगच्या संदर्भात विलंब झालेला आहे ही गोष्ट खरी आहे. उच्च न्यायालयाने 23.2.2011च्या आदेशानुसार 4 महिन्यांचा कालावधी वाढवून दिलेला आहे. त्या कालावधीत कंत्राटदाराला हे काम पूर्ण करण्याचे आदेश दिलेले आहेत.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : शासनमान्य अशासकीय शाळांतील मागासवर्गीयांना पदोन्नती मिळण्याच्या बाबतीत होत असलेला अन्याय

**मु.शी.** : शासनमान्य अशासकीय शाळांतील मागासवर्गीयांना पदोन्नती मिळण्याच्या बाबतीत होत असलेला अन्याय या संबंधी सर्वश्री रामनाथ मोते,भगवान साळुंखे, संजय केळकर, विनोद तावडे व चंद्रकांत पाटील, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो अणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील शासनमान्य अशासकीय शाळांना 1981 ची महाराष्ट्र खाजगी शाळा सेवाशर्ती नियमावली लागू असणे, या नियमावलीमध्ये सरळ सेवा भरती व पदोन्नतीसाठी मागासवर्गीयांसाठी आरक्षणाची टक्केवारी निश्चित केलेली असणे, सरळ सेवा भरतीसाठी एकत्रितरित्या (शिक्षक व शिक्षकेत्तर) 52 टक्के आरक्षण असणे, पदोन्नतीसाठी 33 टक्के आरक्षण असणे, 5 नोव्हेंबर, 2009 च्या जी.आर.नुसार सामान्य प्रशासन विभागाने आरक्षणाचे धोरण निश्चित करणे, एखाद्या संवर्गातील दोन पदांसाठी एक पद आरक्षित ठेवण्याची तरतूद असणे, 1981 च्या नियमावलीत 33 टक्के आरक्षण असल्याने दोन पदांसाठी आरक्षण लागू न होणे, मुंबई उच्च न्यायालयात अनेक याचिका दाखल होणे, सर्व याचिकांमध्ये दोन पदांना आरक्षण लागू नसल्याचा निर्णय होणे, शासकीय अधिकारी या निर्णयाची दखल घेत नसणे, न्यायालयीन आदेशाचा अवमान होणे, 1981 च्या नियमावलीत 2 पदांना आरक्षण असल्याची तरतूद न होणे, मागासवर्गीयांना पदोन्नती मिळताना अन्याय होणे, याबाबत शासनाची प्रतिक्रिया, करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

प्रा. फौजिया खान (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

..3..



MSS/ पूर्वी कु. थोरात 14:05

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, शासन न्यायालयाच्या आदेशा नुसार कारवाई करीत नाही. मागासवर्गीयांना पदोन्नती मिळण्यासाठी कायद्यामध्ये जो काही बदल करणे अपेक्षित आहे तो बदल सुध्दा शासन करीत नाही आणि त्यामुळे मला ही लक्षवेधी सूचना मांडावी लागली आहे. राज्यातील सर्व शाळांना 1981ची नियमावली लागू आहे. या नियमावलीतील नियम क्रमांक 9 नुसार सरळसेवा भरतीसाठी 52 टक्के आणि पदोन्नतीसाठी 33 टक्के आरक्षण लागू आहे. या पूर्वी पदोन्नतीसाठी 24 टक्के आरक्षण होते. त्यामुळे मुख्याध्यापक/उप मुख्याध्यापक संवर्गात 3 पदापर्यंत आरक्षण लागू नव्हते. 4 पदे असतील तर त्यापैकी एक पद आरक्षित होत होते. ही टक्केवारी 33 झाल्यामुळे सहाजिकच या संख्येमध्ये बदल झालेला आहे. 5 नाव्हेंबर 2009 ला सामान्य प्रशासन विभागाने आदेश काढलेले आहेत. त्यामध्ये असे स्पष्ट म्हटलेले आहे की, 2 पदांमधील एक पद आरक्षित ठेवायचे. एका पदाला आरक्षण नाही हे मान्य आहे. परंतु कायद्यामध्ये त्रुटी असल्यामुळे आणि 33 टक्के आरक्षण लागू केल्यामुळे 2 पदापर्यन्त आरक्षण लागू होत नाही. त्यामुळे अनेक न्यायालयीन प्रकरणे निर्माण होत आहेत. 2 पदांना आरक्षण लागू करता येणार नाही असा निर्णय न्यायालयाने दिलेला आहे. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, मागासवर्गीयांना ख-या अर्थाने न्याय द्यायचा असेल, मागासवर्गीय कर्मचारी पदोन्नती पासून वंचित राहू नये असे वाटत असेल तर शासनाला कायद्यामध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घ्यावा लागेल. न्यायालयात प्रकरण गेले तेथे न्यायालयाचा निर्णय आपल्या विरोधात आहे. म्हणून मागासवर्गीयांना ख-या अर्थाने न्याय द्यायचा असेल तर 1977च्या कायद्यामध्ये आणि 1981च्या नियमावलीमध्ये तातडीने बदल करावा लागेल. ही बिनपैशाची मागणी आहे. शासनावर कोणताही आर्थिक बोजा पडणार नाही. तेव्हा 15 दिवसाच्या आत 1977च्या कायद्यामध्ये आणि 1981च्या नियमावलीमध्ये बदल करणारे नोटिफिकेशन काढून शासन मागासवर्गीयांना न्याय देणार आहे काय ?

....नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान : सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी अतिशय चांगल्या विषयाची लक्षवेधी सूचना सभागृहात उपस्थित केलेली आहे. त्यांनी प्रश्नाच्या अनुषंगाने जी बाब निदर्शनास आणून दिली आहे, ती बाब खरी आहे. मला या ठिकाणी सांगावयाचे आहे की, एमईपीएस रुल्स आहेत. त्यातही पदोन्नतीसाठी 33 टक्के आरक्षण आहे. सामान्य प्रशासन विभागाची जी पॉलिसी ठरविण्यात आली आहे, त्यात देखील पदोन्नतीसाठी 33 टक्के आरक्षण ठेवण्यात आलेले आहे. मुख्याध्यापकांची पदे कमी असतात. मुख्याध्यापकांची दोन पदे असतात, त्यात एक पद मागासवर्गीयांसाठी आरक्षित असते आणि ते पद आरक्षित असावे असे माझे देखील मत आहे. शासनाने पदोन्नतीसाठी असेच धोरण ठरविलेले आहे. न्यायालयाने एका प्रकरणाच्या संदर्भात असा निर्णय दिला आहे की, दोन पैकी एक आरक्षणानुसार पद देता येणार नाही त्याचे 0.6 आहे आणि त्याचे राऊंडअप करताना कनफ्यूजन राहिलेले आहे. या संदर्भात न्यायालयाने जो निर्णय दिलेला आहे. त्या निर्णया विरुध्द सुप्रीम कोर्टात अपील करील. त्यासंदर्भात रिव्हू पिटीशन देखील आपण दाखल करु. शालेय शिक्षण विभागाच्या माध्यमातून एक परिपत्रक काढून ज्या कायद्यातील तरतूदी आहेत तसेच बिंदू नामावली आहे. सामान्य प्रशासनाच्या या बाबतीत गाईड लाईन्स आहेत. त्या नुसार सर्वांनी पालन करावे, यासंबंधी परिपत्रक काढण्यात येईल. या नियमावलीमध्ये बदल करण्यासंबंधी नोटिफिकेशन काढू. त्या संदर्भातील कार्यवाही सुरु आहे एवढेच मी या निमित्ताने सांगू इच्छिते.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा मुद्दा नाही. तुम्ही 1981च्या नियमावलीत आणि 1977 च्या सेवा शर्तीमध्ये बदल न केल्यामुळे असा निर्णय येतो आहे. कायद्यात अमेंडमेंट करण्याची जबाबदारी शासनाची आहे. ती जबाबदारी शासन कधी पूर्ण पार पाडणार आहात ? सदरहू कायद्यात अमेंडमेंट करुन सुधारित कायदा पुढील अधिवेशनात सभागृहाच्या मान्यतेसाठी ठेवला जाईल काय ? शासनाला या बाबतीत अध्यादेश काढता येईल, त्यास कोणी हरकत घेणार नाही.

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, नियमामध्ये क्लॅरिफिकेशन करण्याची कार्यवाही सुरु आहे. ती कार्यवाही लवकरात लवकर करण्यात येईल.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यासंबंधी**</u>

**उप सभापती** : आजच्या कार्यक्रमपत्रिकेतील अनुक्रमांक 4 वरील लक्षवेधी सूचने संदर्भात मला सांगावयाचे आहे की, संबंधित माननीय मंत्री सभागृहात अनुपस्थित असल्यामुळे ती लक्षवेधी सूचना उद्या चर्चेला घेण्यात येईल. आता विधेयकावर चर्चा सुरु करण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते: सभापती महोदय, कार्यक्रमपत्रिकेप्रमाणे सभागृहाचे कामकाज चालवावे अशी माझी विनंती आहे. आम्हाला विश्वासात घेऊन कामकाज करावयाचे नसेल तर आपण आपल्या मनाप्रमाणे कामकाज करावे, त्यास आमची हरकत नाही. सभागृहातील कामकाजाच्या संदर्भात पीठासीन अधिकाऱ्यांच्या दालनात बैठका होतात, त्या ठिकाणी आम्हाला यापुढे बोलवत जाऊ नका. मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री आणि संसदीय कामकाज मंत्री या बैठकीस उपस्थित असतात. त्या बैठकीत वेगळे निर्णय घेतले जातात आणि या ठिकाणी तेथे झालेल्या निर्णयाप्रमाणे कामकाज झाले पाहिजे. आजचा प्रश्नोत्तराचा तास का रद्द केला. आता कामकाज पत्रिकेप्रमाणे नियम 97 च्या सूचना घेतल्या गेल्या पाहिजेत. अशा पध्दतीने कामकाज चालविण्यात येत असेल तर विधिमंडळाला काही अर्थ राहिलेला नाही असे मला वाटते. या ठिकाणी मनमानी कारभार चालला आहे असे माझे स्पष्ट मत आहे.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



ABG/ प्रथम श्री.शिगम 14:10

**पृ.शी.**: जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) विधेयक

L.A. BILL NO. I OF 2011

(A BILL TO AMEND THE MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY ACT, 2005.)

AND MOTIONS FOR REFERRING THE BILL TO JOINT COMMITTEE

चर्चा पुढे सुरु.....

श्री. माणिकराव ठाकरे ( विधानसभेने निवडलेले ) सभापती महोदय, सिंचन हा अतिशय महत्वाचा विषय आहे. विदर्भातील सिंचनाच्या बाबतीत शासनाच्या काही निर्णय होणे आवश्यक आहे. सिंचनाच्या बाबतीत काही गोष्टींचा उल्लेख मी या ठिकाणी केला. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये सिंचनाकरिता तसेच इतर उपयोगाकरिता 1 लाख 64 हजार 820 घनमीटर पाणी उपलब्ध आहे, त्यातील सिंचनाकरिता 1 लाख 12 हजार 560 घनमीटर पाणी उपलब्ध आहे.

यानंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे......

यामधून 126 लाख हेक्टर इतकी सिंचन क्षमता निर्माण होणार आहे. विदर्भातील एकूण सिंचनाचा जो अनुशेष आहे तो दूर करण्यासाठी माननीय राज्यपालांनी वेळोवेळी निर्देश दिले. विदर्भातील जनतेच्या दृष्टीने त्या निर्देशांचे पालन होणे गरजेचे आहे. अलीकडे मला जी माहिती मिळाली त्यानुसार अमरावती येथील एका प्रकल्पाकरिता कोर्टात शासनाच्या वतीने असा युक्तिवाद केला गेला की, माननीय राज्यपालांना निर्देश देण्याचे अधिकार आहेत का? अनुशेष दूर करण्यासाठी एका बाजूला शासनाने प्रयत्न करायचे, वैधानिक विकास मंडळाची स्थापना करायची, माननीय राज्यपालांकडे त्यांचे नियंत्रण ठेवायचे आणि अंमलबजावणी करीत असताना माननीय राज्यपालांना अशा प्रकारे निर्देश देण्याचा अधिकार आहे का असा विचार मांडायचा ही भूमिका योग्य नाही. अनुशेष दूर करण्याबाबत शासनाची जी भूमिका आहे त्या संदर्भात विदर्भ आणि मराठवाड्यातील जनतेच्या मनात शंका निर्माण होऊ शकते. शासनाने विदर्भ आणि मराठवाड्यातील अनुशेष दूर करण्याबाबत विचार केला, त्यासाठी जो काही निधी लागेल तो व्यवस्थित विभागून दिला की नाही हे माननीय राज्यपालांनी पहायचे, त्याच्यावर पूर्णपणे नियंत्रण ठेवायचे, त्या प्रमाणात निधी उपलब्ध करुन द्यायचा आणि अंमलबजावणी करताना माननीय राज्यपालांच्या निर्देशाला आव्हान द्यायचे ही भूमिका योग्य नाही. अनुशेष दूर करीत असताना कोणत्याही प्रकारचे गालबोट लागेल असे पाऊल उचलले जाऊ नये अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, कोणतेही विधेयक सभागृहात चर्चेला येत असताना ते विधेयक लोकहिताच्या दृष्टीने महत्वाचे असले पाहिजे. ज्या विधेयकावर आपण चर्चा करतो ते विधेयक राज्यातील जनतेच्या दृष्टीकोनातून हिताचे असले पाहिजे. त्या दृष्टीने आवश्यक बाबींचा विधेयकामध्ये अंतर्भाव करणे गरजेचे आहे. या विधेयकाच्या माध्यमातून जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचे मुख्य अधिकार काढून घेण्यात येत आहेत. हे अधिकार कोणाला द्यायचे या संदर्भात चर्चा सुरु आहे. हे अधिकार कोणालाही दिले तरी त्यांनी त्या अधिकाराचा दुरुपयोग केला तर त्या विरुध्द न्याय मागण्याचा, हायकोर्टात जाण्याचा अधिकार हिरावून घेतला जाऊ नये. तशा प्रकारची व्यवस्था या विधेयकात नसेल तर शासनाने गांभीर्याने विचार केला पाहिजे. न्याय मागण्याचा अधिकार दिला पाहिजे. कोणताही प्रकल्प उभारताना त्या भागातील जनतेवर परिणाम करणारा विषय कोणता असेल तर तो पाणी हा विषय आहे.

नंतर 2जे.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे .......

या पाण्यावरील शेतकऱ्याचा हक्क संपतो की काय, अशीच त्याला भीती वाटत आहे. कारण त्याच्या शेतीला मिळणाऱ्या पाण्याचे भविष्य काय आहे याबद्दल शेतकरी साशंक आहे. बऱ्याच वेळेला आम्ही हेलिकॉप्टरमधून फिरत असताना विदर्भातील जमिनीचे चित्र पाहतो तेव्हा ते अत्यंत विदारक दिसून येते. एकीकडे शासन विदर्भात सिंचन व्यवस्था निर्माण केली म्हणून सांगत असली तरी प्रत्यक्षात मात्र चित्र अगदीच वेगळे आहे. अशा परिस्थितीत या शेतकऱ्याला त्याच्या जमिनीसाठी लांबवरुन पाणी आणावे लागते तर दुसरीकडे मात्र त्याचे हक्काचे पाणी इतर ठिकाणी फिरविताना त्या शेतकऱ्याला विचारले जात नाही, त्याला विचारले पाहिजे अशी मी मागणी करतो. राज्यात असे आपण अनेक प्रकल्प घेत असतो, त्यात काही केंद्र शासनाने सांगितलेले असतील तर काही राज्यातचे असतील. ज्या प्रकल्पामध्ये प्रदुषणाचा प्रश्न येतो तेथे जन सुनावणी घेतली पाहिजे, कारण त्या भागात प्रदुषणाचा किती त्रास होऊ शकतो हे या जन सुनावणीतून समोर येऊ शकते. तसेच जिल्हाधिकारी किंवा तहसीलदारांच्या माध्यमातून सुध्दा जनतेचा कौल घेता येईल व जनताच ठरविल की हा प्रकल्प आमच्या भागात व्हावा की होऊ नये. याकडे मात्र शासनाने लक्ष दिले पाहिजे. प्रकल्प होत असताना जनतेला खरे तर त्यासंबंधीची काहीच माहिती नसते, जिल्हाधिकाऱ्यांकडून सुध्दा ती दिली जात नाही. उलट लवकरात लवकर प्रकल्प कसा घेता येईल अशा प्रकारे उरकण्याचाच प्रयत्न होतांना दिसतो. असे न करता त्या शेतकऱ्याचे पाणी कोणी हिरावून घेणार नाही याकडे शासनाने कटाक्षाने लक्ष दिले पाहिजे.

या विधेयकाच्या निमित्ताने जे प्राधिकरण निर्माण होणार आहे त्या प्राधिकरणाने प्रकल्पाबाबत किती ठिकाणी जन सुनावणी घेतली याची माहिती मला नाही. पण विदर्भात कोठेही अशी जन सुनावणी झाल्याचे मी ऐकले नाही. केवळ उच्चाधिकार समितीला दिलेल्या अधिकाराचा वापर करुन पाणी वळवित राहिले तर त्यात शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होणार आहे, याचाही शासनाने विचार करावा तसेच विदर्भात अशा जन सुनावण्या ठिकठिकाणी घेण्याचाही शासनाने विचार करावा. हे प्राधिकरण निर्माण झाल्यानंतर उच्चाधिकार समितीला किती अधिकार आहेत हा विषय नंतर येणारच आहे तसेच या विधेयकाच्या माध्यमातून ते रेग्युलर होणार हेही मला मान्य आहे. पण माझ ी अशी सूचना आहे की, उच्चाधिकार समिती किंवा सचिव समितीमार्फत शासनाने हे अधिकार

....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे ........

कॅबिनेटला द्यावेत. हे करीत असताना ज्या प्रकल्पांना शासनाने मान्यता दिली असेल ती व्यवस्थित दिली नसल्यास अशा प्रकल्पांचा फेरविचार सुध्दा कॅबिनेटने करावा व तसे धोरण जाहीर करावे, अशी मी अपेक्षा करतो. कारण आज विदर्भात होऊ घातलेले सर्वच प्रकल्प पूर्ण झाले तर विदर्भाची राखरांगोळी होऊ शकते.

चंद्रपूर येथील औष्णिक विद्युत केंद्राचे परिणाम आपण त्या भागात पाहत आहोत. या प्रकल्पासाठी वरोरा शहराभोवती जे जंगल होते ते संपूर्णपणे कापण्यात आले आहे. औष्णिक वीज केंद्रातून बाहेर पडणाऱ्या राखेमुळे या भागात एक प्रकारचे जाळेच तयार झाल्याचे तेथील शेतकरी सांगत आहेत....

यानंतर श्री. जुन्नरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे...

त्या ठिकाणी निर्माण होणारे परिणाम तर अजूनच वेगळे आहेत. प्रकल्प येत असतांना आजुबाजूचा 5-50 कि.मी. परिसर राखेने व प्रदूषणाने व्यापला जातो. एकेकाळी चंद्रपूर शहर वनराईने नटलेले असे शहर होते. चंद्रपूर आणि गडचिरोली मधील जंगलातील झाडांची उंची फार मोठया प्रमाणात आहे. या वनराईची उंची इतर ठिकाणच्या जंगलापेक्षा अधिक प्रमाणात आहे. चंद्रपूर व गडचिरोली मधील झाडांची उंची पाहून आपण थक्क होत असतो. चंद्रपूरला प्रकल्प उभारण्याची गरज असल्यामुळे सुरुवातीला चंद्रपूरमध्ये मोठमोठे प्रकल्प उभारण्यात आले. चंद्रपूर येथे मोठया प्रमाणात कोळसा असल्यामुळे या ठिकाणी मोठया प्रमाणात औष्णिक ऊर्जेचे तसेच सिमेंटचे कारखाने उभारले गेले. आज संपूर्ण देशामध्ये चंद्रपूर शहर हे दुस-या क्रमांकाचे प्रदूषित शहर झालेले आहे. काल परवाच्या रिपोर्टमध्ये यासंदर्भाचा तपशील देण्यात आलेला आहे. विदर्भामधून महाराष्ट्राची गरज भागविण्याकरिता आम्ही सर्व प्रकारचे सहकार्य करण्यास तयार आहोत परंतु आज विदर्भामध्ये कोणताही विचार न करता भरमसाठ प्रकल्प आणले जात आहेत. प्रकल्पाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची जनसुनावणी न करता, तेथील जनतेशी कोणत्याही प्रकारची चर्चा न करता विदर्भात प्रकल्प आणले जात आहेत. त्यामुळे यासंदर्भात फेर विचार करणे गरजेचे असल्यामुळे यासंदर्भातील चर्चा करण्याचे पूर्णपणे अधिकार कॅबिनेटला दिले जावे व त्यामध्ये यासंदर्भात सविस्तर चर्चा केली जावी अशा प्रकारची सूचना मी या निमित्ताने करु इच्छितो.

राष्ट्रीय जल नीतीचे धोरण आपण स्वीकारलेले आहे. यामध्ये आपण सर्वात जास्त प्राधान्य पिण्याच्या पाण्याला दिलेले आहे व दुसरे प्राधान्य कृषीसाठी दिलेले आहे तिसरे प्राधान्य कृषीवर आधारित प्रकल्पाला दिलेले आहेत व चौथे प्राधान्य इतर उद्योगाला दिलेले आहे. संपूर्ण जगामध्ये पिण्याच्या पाण्यानंतर शेतीच्या पाण्याला प्राधान्य दिलेले आहे. परंतु महाराष्ट्रात अनेक वर्षापासून म्हणजे 1960-62 पासून अशा प्रकारचे धोरण सुरु आहे की, पहिला क्रमांक पिण्याच्या पाण्यासाठी, दुसरा क्रमांक उद्योग व तिसरे प्राधान्य शेतीसाठी देण्यात आलेले आहे. परंतु याबाबत शासनाने निर्णय घेण्याची आवश्यकता आहे की, पहिले प्राधान्य पिण्याच्या पाण्यासाठी दुसरे प्राधान्य शेतीसाठी असले पाहिजे व त्यानंतर शेतीवर आधारित उद्योगाला व नंतर इतर उद्योगासाठी पाणी उपलब्ध करुन दिले गेले पाहिजे. उद्योग उभारले जावे या मताचे आम्ही देखील आहोत. परंतु आपण ज्या

..2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे...

ठिकाणी उद्योग उभारीत आहात त्या ठिकाणच्या जनसुनावणी साठी उपस्थित राहण्यास आम्ही तयार आहोत. परंतु या ठिकाणी कोणते प्रकल्प येणार आहेत ? आमच्या विदर्भात विजेचे प्रकल्प आहेत परंतु या प्रकल्पासून आमच्या भागाला काहीही फायदा होत नाही. उद्योगाकरिता पाणी जाणार आहे त्यामुळे या प्रकल्पांचा सुध्दा काही उपयोग नाही तर आमच्या वाटयाला केवळ प्रदूषणच येणार आहे. विदर्भातील वीज पश्चिम महाराष्ट्राला दिली जाते त्याबाबत आम्हाला काही म्हणावयाचे नाही कारण आपला महाराष्ट्र एक संघ आहे. परंतु विदर्भातील महत्वाचे पाणी आपण जर नेले तर विदर्भातील जनता भविष्यात कधीही उभी राहू शकणार नाही. त्यामुळे पाण्याला आपण महत्व दिले पाहिजे व त्यासाठी योग्य ते नियोजन केले पाहिजे. पाण्याचे नियोजन करणे प्राधिकरणाच्या शक्तीच्या बाहेर असेल, त्यांनी आपले काम केले नसेल, त्यांचे अधिकार दुस-याने वापरले असेल परंतु पाण्याचे नियोजन होण्याच्या दृष्टिकोनातून शासनाने नियोजन करावे व उद्योगासाठी किती पाणी घ्यावे याबाबत सखोल चर्चा शासनाने करण्याची आवश्यकता आहे. तसेच पाण्याचे व्यवस्थापन करण्यासाठी शासनाने श्वेतपत्रिका काढण्याची आवश्यकता आहे. पाण्याची श्वेत पत्रिका काढली तर पाण्याचे वाटप वेगळया पध्दतीने कोणाला करता येणार नाही व यामधून जल नीतीच्या संदर्भात शासनाचे धोरणही स्पष्ट होईल. त्यामुळे जल वाटपाच्या संदर्भात शासनाने श्वेत पत्रिका काढावी अशी शासनाकडून अपेक्षा व्यक्त करतो.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे..

सभापती महोदय, यानंतर मला दुसरा महत्वाचा मुद्दा येथे मांडावयाचा आहे. पाणी देण्याचा जो क्रम आहे त्यामध्ये दुस-या क्रमांकावर सिंचनासाठी पाणी देण्यात आले पाहिजे. त्यामध्ये कोणत्याही प्रकारची तडजोड करता कामा नये.त्या विधेयकामध्ये आता आपण सुधारणा सुचवू शकत नाही तेव्हा या संदर्भात वेगवेगळी विधेयके या सदनामध्ये मांडण्यात आली होती. अध्यादेशाच्या संदर्भात हे विधेयक मांडण्यात आलेले आहे.तेव्हा त्या अध्यादेशाच्या अनुषंगाने पुढे सर्व बाबी चालू रहाव्यात याकरता हे विधेयक आलेले आहे त्यामुळे या विधेयकामध्ये जरी प्रस्तुत सुधारणेचा समावेश तांत्रिक अडचण असल्यामुळे होऊ शकत नसला तरी त्या संदर्भात सन्माननीय सदस्यांच्या सूचनांचा जर या विधेयकात समावेश होत असेल तर त्याचा येथेच विचार करु. मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करीन की, आपण येथेच बसून त्याचा विचार करु. तांत्रिक दृष्टया जर ती सुधारणा स्वीकारता येत नसेल तर शासनाने आज किंवा उद्या त्यासंबंधी जाहीर करावे, अशा प्रकारची मागणी करण्यात आली होती.या संदर्भात श्वेतपत्रिका राज्य सरकारने तात्काळ काढावी अशी अपेक्षा मी करतो.

. श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मी मंत्री महोदयांना विनती करीन आणि ते विचार करतील असे सन्माननीय सदस्य मघाशी म्हणाले होते तेव्हा त्याचा अर्थ काय आहे. सन्माननीय सदस्य कॅबिनेट मंत्री वा मुख्यमंत्री आहेत काय ?

श्री.माणिकराव ठाकरे :सभापती महोदय,या ठिकाणी मी चर्चा करण्याकरिता उभा आहे. माझ्या चर्चेच्या अनुषंगाने ज्यावेळी एखादा सदस्य टेकनिकल मुद्यावर बोलतो त्यावेळी मी त्यांना असे म्हणालो होतो की तुमचे म्हणणे जर खरे असेल तर मी आता माननीय मुख्यमंत्र्यांना तसेच माननीय मंत्र्यांनासुध्दा सांगेन. अजूनही मी या विधेयकावर बोलत आहे.त्यांना सांगण्याचा अधिकार मला प्राप्त झालेला आहे.

सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले होते की, विजेच्या संदर्भात वितरण कंपनी पारेषण कंपनी अशा प्रकारच्या विविध कंपन्या आपण स्थापन केल्या आहेत. अशा प्रकारे वेगवेगळया कंपन्या करण्या ऐवजी प्रत्येक विभागाची कंपनी करण्यात यावी असे मी त्यावेळी देखील सांगितले होते. विदर्भाची कंपनी, पश्चिम महाराष्ट्राची कंपनी, खानदेशची कंपनी, कोकणची कंपनी तसेच मराठवाडयाची कंपनी अशा प्रकारे प्रत्येक भागासाठी वेग वेगळी कंपनी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे....

करण्यात यावी . अशा पध्दतीने प्रत्येक विभागाची जर कंपनी तयार केली तर विजेकरिता किती पैसे द्यावे लागतात आणि वीज किती लागते हे आपल्याला कळून येईल . विदर्भामध्ये वीज कंपनीला एक पैसासुध्दा तोटा झालेला नाही उलट ही कंपनी फायद्यामध्ये आहे.हे मी आपल्याला सांगू इच्छितो.

श्री.जयंत प्र.पाटील : सन्माननीय सदस्यांचे चिरंजीव जनसुनावणीसाठी गेले होते.

श्री.माणिकराव ठाकरे :. माझा मुलगा जिल्हा परिषदेचा अध्यक्ष असल्यामुळे लोकप्रतिनिधी म्हणून त्याला जनसुनावणीसाठी जावेच लागेल. तसेच कोणती गोष्ट बरोबर आहे कोणती गोष्ट चुकीची आहे हे लोकांना सांगावेच लागेल.राज्यामध्ये विजेच्या कंपन्या स्थापन करीत असतांना विभागवार कंपन्या करावयास पाहिजे होत्या असे मी या पूर्वी देखील सांगितले होते व आज पुन्हा सांगत आहे. विदभार्मध्ये वीज निर्मिती करण्याकरिता मोठया प्रमाणावर पाणी दिले जाते. त्यावेळी वीज निर्मितीसाठी विदर्भामध्ये एक पैसासुध्दा तोटा होत नाही.शेतक-यांचे प्रमाणापेक्षा जास्त पाणी वीज निर्मिती करण्याकरिता दिले जाते.परंतु त्यांचे म्हणणे ऐकून घेतले जात नाही तेव्हा या गोष्टी मला या ठिकाणी सांगाव्याच लागतील. पश्चिम महाराष्ट्रामध्ये दरवर्षी 1200 ते 1300 कोटी रुपयांचा तोटा होत असतो. मराठवाडयामध्ये दरवर्षी 300 ते 400 कोटी रुपयांचा तोटा होत असतो. खानदेशमध्ये सुध्दा 300 ते 400 कोटी रुपयांचा तोटा होत असतो. लेखी माहितीच्या आधारे मी आकडेवारी देत नाही त्यामुळे थोडा फार फरक पडू शकेल.

नंतर श्री.सारफरे

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे...

कोकणामध्ये तोटा कमी आहे, विदर्भात देखील तोटा कमी आहे. याची प्रमुख कारणे अशी आहेत की, ज्या ठिकाणी विजेचा जास्त वापर होतो त्या ठिकाणी जास्त तोटा होतो. पश्चिम महाराष्ट्रामध्ये 70 टक्के विजेचा वापर होतो, विदर्भामध्ये 23 टक्के विजेचा वापर होतो. 70 टक्के वीज ही घरगुती वापरासाठी व वेगवेगळया औद्योगिक कारणाकरिता वापरली जाते. त्या ठिकाणी विजेवर मोठया प्रमाणात अनुदानाच्या स्वरुपात सबसिडी दिली जाते. त्या सबसिडीचा उपयोग विशिष्ट भागामध्ये होतो असे सांगितले जाते. शेवटी आपण या ठिकाणी संपूर्ण राज्याचा विचार करीत आहोत. विदर्भामध्ये वीज तयार करुन ती राज्याच्या इतर भागामध्ये सुध्दा दिली जाते. परंतु अनाठायी, चुकीच्या पध्दतीने वीज निर्माण करण्यासाठी वाटेल त्या पध्दतीने पाणी उचलले जाणार असेल तर त्याला आपला विरोध आहे.

**उप सभापती** : माननीय सदस्यांना आणखी किती वेळ लागणार आहे हे कृपया आपण सांगावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय सदस्यांना सत्ताधारी पक्षाच्या वतीने उपसूचना मांडण्यासाठी उभे करण्यात आले आहे. नाही तर या विधेयकावरील चर्चेला विरोधी पक्षाच्या वतीने आम्ही सुरुवात करणार होतो, तो आमचा अधिकार आम्ही बाजूला ठेवला. ती उपसूचना मांडण्यासाठी माननीय सदस्य उभे राहिले होते, त्यांनी आता उपसूचना मांडली नाही तर हे सभागृह स्थगित करण्यात यावे. मागील दोन तासापासून ते उपसूचना मांडतो असे सांगत आहेत. दुपारी साडे बारा वाजल्यापासून अडीच वाजेपर्यंत ते या विधेयकावर भाषण करीत आहेत परंतु उपसूचना मांडीत नाहीत...

(गोंधळ)

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, या विधेयकावर विरोधी पक्ष म्हणून आम्हाला बोलण्याचा अधिकार आहे. आम्हाला आमची उपसूचना मांडण्याचा अधिकार आहे.

श्री. दिवाकर रावते : तुम्ही जर उपसूचना मांडीत नसाल तर आमची उपसूचना स्वीकारा, ते सुध्दा आपण करीत नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय सभापतींच्या दालनामध्ये ठरल्याप्रमाणे विधेयक मांडण्यात आल्यानंतर त्याला सत्ताधारी पक्षाच्या वतीने एका ओळीची उपसूचना देण्यात येईल आणि त्यानंतर विधेयकावरील चर्चा सुरु करण्यात येईल. परंतु माननीय सदस्यांनी उपसूचना

DGS/

श्री. पांडुरंग फुंडकर ...

न मांडता केवळ भाषण सुरु ठेवले आहे. तेव्हा जर उपसूचना मांडली जाणार नसेल तर विधेयकावरील चर्चा सुरु केली पाहिजे.

(गोंधळ)

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण आता या विधेयकावरील चर्चा स्थगित ठेवून पुढील कामकाज सुरु करावे अशी माझी विनंती आहे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, माननीय सभापतींच्या दालनातील बैठकीमध्ये काय ठरते आणि प्रत्यक्षात सभागृहामध्ये काय सुरु आहे?

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय सदस्यांकडून उपसूचना न मांडता दोन तास दळण दळण्याचे काम सुरु आहे. अनुशेषाबाबत सारखे रडगाणे सुरु आहे. तुम्ही जर उपसूचना मांडणार नसाल तर आमची उपसूचना स्वीकारली पाहिजे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मला देखील विधेयकावर बोलावयाचे आहे, मी उपसूचना दिलेली आहे ती मला मांडावयाची आहे.

(गोंधळ)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय सभापतींच्या दालनामध्ये ठरल्याप्रमाणे जर कामकाज होणार नसेल तर आम्ही शासनावर विश्वास कसा ठेवायचा?

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, दालनामध्ये एक निर्णय घेतला जातो आणि प्रत्यक्षात सभागृहामध्ये वेगळ्या पध्दतीचे कामकाज सुरु आहे हे बरोबर नाही. असे असेल तर या विधेयकावर आता चर्चा होणार नाही.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, मी या विधेयकावर उप सूचना दिलेली आहे. मला जर या विधेयकावर बोलण्यास मिळणार नसेल तर मी सभागृहामधून निघून जाईन. हे राष्ट्रवादी भवन आहे की, कॉंग्रेस भवन आहे हे आम्हाला समजले पाहिजे.

(गोंधळ)

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, आपण सभागृहाचे कामकाज दहा मिनिटांकरिता स्थगित करावे अशी मी विनंती करतो.

**उप सभापती** : सभागृहाचे कामकाज दुपारी 3.00 वाजेपर्यन्त स्थगित करण्यात येत आहे.

(दुपारी 2.39 ते 3.00 वाजेपर्यन्त सभागृह स्थगित झाले.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

----

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

**सभापतीस्थानी - तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)**

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक 3 वाजून 15 मिनिटांपर्यंत तहकूब करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक 3.00 ते 3.15 पर्यंत स्थगित झाली.)

-----

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगिती नंतर )**

**सभापतीस्थानी माननीय उप सभापती**

श्री. दिवाकर रावते : मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले होते की, मी बरोबर 3.00 ते 3.15 वाजेपर्यंत या सभागृहात येतो आणि आपण सर्वांनी मिळून म्हणजे सभागृहातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी मिळून जो निर्णय घेतला आहे तो मी जाहीर करतो. माननीय मुख्यमंत्री सभागृहात आले तर बरे होईल त्यामुळे या विधेयकाच्या पुढच्या वाटचालीला चालना मिळेल.सभापती महोदय, आपण त्यांना तशी विनंती करावी.

**उप सभापती** : मुख्यमंत्री महोदयांना मी निरोप पाठवितो.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, एकूणच या विधेयकाच्या संदर्भामध्ये माझे विचार मी या ठिकाणी मांडलेले आहेत. त्याबाबतीत शासनाने निर्णय घ्यावेत अशी मी या ठिकाणी अपेक्षा व्यक्त केली आहे. हे विधेयक विधानसभेमध्ये गेल्यानंतर तेथे सुध्दा चर्चा होणे आवश्यक आहे. सभापती महोदय, या अनुषंगाने मी शासनाकडून दोन-तीन अपेक्षा व्यक्त करतो. एकूणच जलसंपत्तीच्या बाबतीत शासनाने एक श्वेतपत्रिका काढावी. या पाण्याचे नियोजन करण्याच्या दृष्टिकोनातून, शेतकऱ्यांचे पाणी सुरक्षित राहण्याच्या दृष्टिकोनातून आणि त्यांना न्याय देण्याच्या दृष्टीकोनातून राज्य शासनाने जाहीर करावे, त्याचा उल्लेख या विधेकामध्ये करता आला नाही तरी शासनाने वेगळया माध्यमातून तो उल्लेख करावा, अशी अपेक्षा मी या ठिकाणी व्यक्त केलेली आहे.

सभापती महोदय, एकूण राष्ट्रीय जल धोरणाला अनुसरुन राज्याचे धोरण असावे. पहिला क्रम पिण्याच्या पाण्याकरिता, दुसरा क्रम शेती करिता, तिसरा क्रम शेती उद्योगा करिता आणि त्यानंतर उद्योगा करिता अशा प्रकारचा क्रम असावा, या संदर्भातील धोरण शासनाने जाहीर करावे, अशी माझी मागणी आहे. तसेच या बाबतीत कोर्टामध्ये जाण्याच्या दृटिकोनातून कशा पध्दतीने सुधारणा करता येईल याचा विचार करावा. सभापती महोदय, मी या ठिकाणी एक सुधारणा मांडणार आहे. हे विधेयक या ठिकाणी मंजूर झाल्यानंतर विधानसभेमध्ये गेल्यानंतर त्यावर तेथे देखील चर्चा होईल.

यानंतर श्री. बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे .....

सभापती महोदय, मी या ठिकाणी या विधेयकाला पुढील सुधारणा सुचवित आहे.

खंड 5, पृष्ठ क्रमांक 4, ओळ क्रमांक 5 नंतर पुढील मजकूर दाखल करण्यात येईल.

"परंतु आणखी असे की, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अधिनियम 2011, राजपत्रात प्रसिध्द झाल्याचे दिनांकानंतर राज्य मंत्रिमंडळ क्षेत्रीय वाटप निर्धारित करील"

सभापती महोदय, ही सुधारणा मी सभागृहापुढे मांडत आहे. या सुधारणेसह सभागृहाने हे विधेयक मंजूर करावे अशा प्रकारची अपेक्षा मी या ठिकाणी व्यक्त करतो. पूर्ण मंत्रिमंडळाच्या समितीला अधिकार असावेत, इतर कोणतीही उपसमिती किंवा वेगवेगळ्या समित्या न करता मंत्रिमंडळाने निर्णय घ्यावा, अशा प्रकारची ही सुधारणा आहे. या बिलाच्या संदर्भात मला परत एकच बाब सांगावयाची आहे की, आता विदर्भातील सिंचनाचे एक थेंब पाणी सुध्दा इतर विजेसारख्या प्रकल्पाकरिता वापरु नका, असे माझे स्पष्ट मत व्यक्त करतो. सभापती महोदय, या बिलावर बोलण्यासाठी आपण मला बराच वेळ दिला त्याबद्दल आपले आभार व्यक्त करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

सुधारणा प्रस्तुत झाली.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी आता या विधेयकाला जी सुधारणा सुचविलेली आहे त्या सुधारणेला आधी सभागृहाची मंजुरी घ्यावी आणि त्यानंतर चर्चा सुरु करावी.

**उप सभापती** : ठीक आहे. आता मी सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी मांडलेली सुधारणा मतास टाकतो.

सुधारणा एकमताने संमत झाली.

**उप सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या विधेयकावर आपले भाषण सुरु करावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या बिलावरची चर्चा पुढे सुरु करण्याच्या अगोदर शासनाला जर विनियोजन विधेयक मंजूर करुन घ्यावयाचे असेल तर ते विधेयक आधी घ्यावे. मी विनियोजन विधेयक मंजूर करुन घ्यावे अशी सूचना मी केली परंतु आता माननीय वित्त राज्यमंत्री सभागृहातून निघून गेले आहेत.

**उप सभापती** : विनियोजन विधेयक विधानसभेत मंजूर होऊन आले आहे हे मलाही माहीत नव्हते.

श्री. दिवाकर रावते : वित्त मंत्री सभागृहात आल्याशिवाय ते बिल घेता येणार नाही.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, सगळ्या सन्माननीय सदस्यांची भाषणे झाल्यानंतर उपसूचना मंजूर करावी.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी मांडलेली सुधारणा एकमताने मंजूर झालेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या विधेयकावर आपले भाषण सुरु करावे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, महाराष्ट्रातील कृषिप्रधान अशा विभागावर मोठा आघात करणारे विधेयक या विधिमंडळामध्ये दाखल झाले. या विधेयकामुळे शेतकऱ्यांच्या जीवनावर अत्यंत गंभीर आणि दूरगामी परिणाम करणाऱ्या घटना घडलेल्या आहेत. आपण अंधारामध्ये केलेले पाप आता वठवून घेऊ, कायदेशीर करु या निमित्ताने हे विधेयक या विधिमंडळात विधानसभेमध्ये पहिल्या दिवशीच आणले होते. परंतु त्या सभागृहातील जागरुक सन्माननीय सदस्यांनी त्याच दिवशी यावर हल्ला चढविल्यामुळे त्यावेळी विधेयक ताबडतोब मागे घेण्यात आले. या महाराष्ट्र विधिमंडळामध्ये विधानसभा आणि विधान परिषद या संस्था या देशाला प्रगल्भता देणाऱ्या आहेत.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. बरवड 15:25

श्री. दिवाकर रावते...

किंबहुना देशाच्या विविध राज्यातील विधिमंडळामध्ये काही अडचण आली तर त्याबाबतीत महाराष्ट्रातील विधिमंडळाकडे विचारणा केली जाते, सल्ला घेतला जातो. राज्यातील त्या त्या विधानसभेमध्ये काही मतभेद निर्माण झाले तर आपल्याकडील प्रथा, परंपरा आणि निर्णय पाहून त्यांना मार्गदर्शन केले जाते. आता आपण सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये आहोत. हे सुवर्ण महोत्सवी वर्ष आपण अभिमानाने साजरे करीत आहोत. हे सर्व करीत असताना या विधिमंडळाचे पावित्र्य राखण्याची जबाबदारी सत्ताधारी पक्षाची आणि खासकरुन विरोधी पक्षाची आहे. त्यामुळे या विधिमंडळाची मान शरमेने खाली जाईल अशा प्रकारचे कुकर्म आपण कधीही करता कामा नये आणि ही जबाबदारी सत्ताधारी पक्षाची आहे. मला एका गोष्टीची जाणीव आहे. या सदनाचे सदस्य श्री. रामदास कदम यांनी विधानसभेमध्ये विरोधी पक्षनेता म्हणून देदीप्यमान कामगिरी केलेली आहे. त्यांच्या ताकदीप्रमाणे त्यांनी सरकारचे वस्त्रहरण केले होते. परंतु लोकशाहीचा गाभा कलंकित होईल अशा प्रकारचे काम विरोधी पक्षाने कधीही करण्याचा प्रयत्न केला नाही. चुकून भावनावेग झाला तर आम्ही सभापतींची माफी मागतो. त्यांनी दिलेल्या आदेशांचे पालन करतो. परंतु जेव्हा भावनावेग असतो त्यावेळी प्रथा, परंपरांना कुठे धक्का लागावा हा उद्देश नसतो. विधानसभेमध्ये जे काही घडले ते मी आपणास वाचून दाखविले. त्याचे समर्थन सत्ताधारी पक्षाचे सन्माननीय सदस्य कसेही करु शकतात. 14 एप्रिल रोजी पहाटे 6.00 वाजता चैत्यभूमीवर जाऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आपण अभिवादन केले. आपण मनापासून अभिवादन केले. मी असे म्हणणार नाही की ते आपले ढोंग होते. दलित समाजाला एकत्र आणून त्यांना उन्नतीचा मार्ग दाखविणा-या डॉ.बाबासाहेब आंबेडकरानी या देशाला घटना देऊन यावत्‌चंद्र दिवाकरो असे काम केलेले आहे. कोणत्याही देशापेक्षा आपल्या देशाची घटना श्रेष्ठ आहे. मला सांगायला खेद होतो की, त्या दिवशी विधानसभेचे कामकाज चालू राहिले.

ॲड. उषा दराडे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार "दलित" शब्द वापरला तर तो ॲट्रॉसिटीचा गुन्हा होतो. "दलित" ऐवजी "मागासवर्गीय" शब्द वापरावा.

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : "मागासवर्गीय" या शब्दा पेक्षा "दलित" शब्द चांगला आहे. .. सर्वोच्च न्यायालयाचे काय कौतुक करायचे ? सर्वोच्च न्यायालयाने, "जेलमध्ये असलेल्या कैद्यांना स्त्रियांचा सहवास मिळाला पाहिजे" अशा प्रकारचा निर्णय दिलेला आहे. जेलमध्ये असलेले कैदी ही देखील माणसे आहेत. त्यांना सुध्दा स्त्री-सहवास करता आला पाहिजे. काही वेळेला आपल्याला असहाय्य करणा-या गोष्टी तिकडून येतात त्यावेळी काय करायचे ?

....नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील : पुढे काय करावयाचे त्याची माहिती तुम्हीच आम्हाला सांगा.

श्री. दिवाकर रावते : पुढे काय करावयाचे हे हसून तुम्ही सांगितले. माननीय गृहमंत्री श्री. आर.आर.पाटील यांना पुढे एक गंभीर गोष्ट सांगतो. तुम्ही घटस्फोट घेतलेला असला तरी..(अडथळा ) आबासाहेब, घटस्फोट घेण्याची तुमची हिंमत होणार नाही. त्याचे कारण त्यांच्या घरात बारबाला घुसतात. ते फोटो काढून घेतात. सभापती महोदय, हा गंमतीचा भाग झाला.

सभापती महोदय, घटस्फोट झाल्यानंतर सुध्दा तुम्ही एकत्र राहिलात तरी चालेल असाही निर्णय कोर्टाने दिलेला आहे. मी यासंबंधी अनेक उदाहरण सांगू शकतो. परंतु ते सांगण्याची मला गरज वाटत नाही.

सभापती महोदय, मागासवर्गीयांचे परमप्रिय असलेले दैवत असलेले आदरणीय डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त विधान परिषदेने सुटी घेतली होती. विधान परिषदेच्या सभागृहाने पूर्ण आठवडा सुटी घेतली होती. रामनवमी आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती या दिवशी विधानसभा सभागृहात कामकाज करण्यात आले.

सभापती महोदय, मला विधेयकावर बोलण्यास कोणी अडवू शकणार नाही. बोलण्याची अमर्याद सत्ता माझ्या हातात आहे. शाहू, फुले, आंबेडकर यांचे नाव घेऊन राज्य कारभार चालविला जात आहे. त्या आदर्श व महान व्यक्ती होत्या. त्यांच्या स्मृतीला अभिवादन करणे म्हणजे आपण त्यांच्याकडचे चैतन्य घेऊन भविष्यातील काळ पुढे घेऊन जाणे, ही त्यामागची भूमिका आहे. हार अर्पण करणे, मेणबत्ती लावणे हा विषय नसतो. माझ्या स्वभावामध्ये कोठेही मानवतेच्या बाबतीमध्ये काही अगतिक घडणार नाही आणि मी सत्तेवर असताना त्या सत्तेचा वापर पद मागासवर्गीयासाठी करणे गरजेचे आहे. दलितांनी कधीच पददलित अशी मागणी केलेली नाही.

माझा विषय असा आहे की, हे विधेयक या अधिवेशनात मंजूर झाले नाही तर शासनाचे फार मोठे नुकसान होणार नाही. या अनुषंगाने अध्यादेश काढता येतो. हे काही 13 व्या वित्त आयोगाचे काम नाही. 13 व्या वित्त आयोगाने एवढे पैसे देऊ केलेले आहेत, तुम्ही जर त्यांच्या अटींचे पालन केले नाही तर पैसे मिळणार नाहीत. अशी यात भानगड नाही. उलट शासनाने या

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

संबंधी अध्यादेश काढला असता तर भांडवलदारांना तीन महिने पाणी वाटप करण्याची संधी मिळाली असती. उलट शासनाच्या दृष्टीने ती गोष्ट फायदेशीर ठरली असती.

या संदर्भात काय घडले हे मला कळले नाही. अलिबाबा हळूच गेले. विधानसभेचा दरवाजा उघडला. आतमध्ये पाहिले. समोर सगळी सामसूम आहे. सर्व झोपलेले आहेत. दोन, चार सदस्य खडबडून जागे राहिले आहेत. त्यानंतर आपल्या 40 सहकाऱ्यांना बोलाविले. त्यांनी सभागृहात उपस्थित रहावे म्हणून निरोप पाठविले. त्यातील काही सभासद आले. रात्री 1 वाजून 29 मिनिटांनी हे विधेयक पारीत करुन घेतले. मघाशी मला सन्माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी यांनी मार्गदर्शन केलेले आहे. विधानसभा सभागृह सार्वभौम असून त्यावर बोलता येत नाही. सार्वभौमत्वावर बोलावयाचे नाही, कृतीवर बोलावयाचे. शासनाला हे विधेयक सभागृहात आणण्यासाठी एवढी घाई का होती ?

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 15:35

श्री.दिवाकर रावते.......

या सभागृहापुढे आलेले विधेयक हे अनैसर्गिक आहे. डॉ.बाबासाहेबांचा अवमान करणारे विधेयक आहे. कारण या देशात आणि महाराष्ट्रात ज्या दिवशी त्यांचा आदर राखण्याकरिता सुट्टी जाहीर झाली होती त्याच दिवशी मंजूर झालेले हे विधेयक या सभागृहापुढे आलेले आहे. रामनवमीच्या आदल्या दिवशी विधानसभेची बैठक रात्री 11.59 वाजता तहकूब झाली. म्हणजे रात्रीचे 12.00 वाजू दिले नाहीत, कारण दुसरा दिवस उजाडतो. मी हे का सांगत आहे हे कृपया समजून घ्यावे. मध्यरात्री विधेयक मंजूर केले नसते तर काही आक्रीत घडले नसते. 13 तारखेला रात्री म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या दिवशीच घाईगर्दीने विधेयक मंजूर करुन घेण्यात आले. नाही तरी आता हे विधेयक पुन्हा विधानसभेपुढे जाणार आहे. यापुढे तुम्ही डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेतले तरी आम्ही उभे राहणार आहोत. तुम्ही किती निष्ठेने काम करीत आहात हे दाखविण्याचा प्रयत्न सुरु आहे.

सभापती महोदय, माझ्याकडे मंत्रीमंडळातील एका मंत्र्यांनी केलेल्या वक्तव्याचे वृत्तपत्रातील कात्रण उपलब्ध आहे. मला अजून त्याचा अर्थ कळलेला नाही. हेडलाईन अशी होती, 'महाराष्ट्राचे शिक्षण जाती जातीमध्ये विभागले'. मला काही कळले नाही. मंत्री महोदय महाराष्ट्राला संदेश देतात. महाराष्ट्राचे शिक्षण जाती जातीमध्ये विभागले गेले आहे. विधेयक खालच्या सभागृहात मंजूर करताना तुम्ही अंधारात जरी काही कर्म केले तरी वरच्या सभागृहात विधेयक मंजुरीसाठी येतेच. तसे हे विधेयक या सभागृहापुढे मंजुरीसाठी आले आहे. या विधेयकातील सगळ्या त्रुटी आमच्या लक्षात आल्या आणि आम्ही त्या सांगायला सुरुवात केली. मी आदरणीय मुख्यमंत्र्यांना धन्यवाद देतो. मुख्यमंत्र्यांच्या सहकाऱ्यांना धन्यवाद देतो. शेतीवर घाला घालून उद्योगपतींचे भले करुन या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या उद्ध्वस्त जीवनाचे दृश्य उभे रहात आहे त्यामध्ये बदल घडला पाहिजे. अशा प्रकारची विरोधी पक्षाची ठाम भूमिका होती. आम्ही सत्तारुढ पक्षातील आदरणीय मुख्यमंत्र्यांच्या त्रुटी निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी पावले उचलायला सुरुवात केली, असे आम्हाला त्यांच्या कृतीवरुन दिसून आले. आमच्या सर्व सहकाऱ्यांना वाटते की, हे सतत माननीय सभापतींच्या दालनात जाऊन काय चर्चा करतात? काही गुप्तता होती का? काही गुप्तता नव्हती. या विधेयकाचे आणखी काय झाले हे मी सांगणार आहे. अध्यादेशामुळे काय घडले हे सांगण्याचा प्रयत्न करणार आहे. बेछूट आणि बेकायदेशीर पध्दतीने

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 15:35

श्री.दिवाकर रावते.......

पाणी वाटपाचा अधिकार समितीला दिलेला होता. त्यांनी 2005 ते 2010 या काळात जे पाणी वाटप केले ते शेतकऱ्यांना उद्ध्वस्त करणारे आहे. शेतीचे अधिकृत पाणी काढून घेतलेले आहे. मागील पाच वर्षात त्यांनी अयोग्य पध्दतीने पाणी वाटप केले. बेकायदेशीर पाणी वाटप केले, पाण्याची चोरी केली असे मी म्हणणार नाही. काँग्रेस पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांनी सत्तेतील दुसऱ्या पक्षाकडून कसे दरोडे घातले जात आहेत हे महाराष्ट्राला दूरदर्शनच्या माध्यमातून खुलवून खुलवून सांगितले.

नंतर 2टी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ......

महोदय, अशा प्रकारे यापूर्वी वाटप झालेले पाणी हे विधेयक मंजूर झाल्यानंतर सर्व नियमित होणार आहे, पण असे होऊ नये असेच आमचे मत आहे. सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांचे भाषण ऐकल्यानंतर कदाचित त्यांनाही वाटले असेल की, सरकारने हे अत्यंत चुकीचे काम केलेले आहे. पण ही चूक सुधारण्याकरिता वडीलधाऱ्यांचा मान राखावा म्हणून माननीय मुख्यमंत्र्यांनी पुढाकार घेतला. आता "झाले गेले गंगेला मिळाले" असे समजून पुढे जाऊ असे होणार आहे. आमच्या सर्व पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी असा निर्णय घेतला असे आपण काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष म्हणून जाहीर केले. शेवटी तो त्यांचा अधिकार आहे. पाणी वाटपाच्या सूत्राबाबत मुख्य जो आक्षेप होता त्याबाबत चर्चा करण्यासाठी माननीय श्री. दादा हे आमच्यासोबत तीन वेळा चर्चा करण्यासाठी बसले होते. तेव्हा चर्चेत त्यांनी सांगितले की, यापुढे हा अधिकार मंत्रिमंडळाकडे जाईल.....अडथळा.....हे श्रेय शेवटी आपल्यालाच मिळणार आहे. ते श्रेय तुम्ही घेतले की मी याला महत्व नाही तर शेतकऱ्यांच्या हितासाठी हा निर्णय महत्वाचा आहे व तो निर्णय माननीय मुख्यमंत्री स्वत: सभागृहात येऊन जाहीर करतील असे त्यांनी सांगितले आहे. राज्याचे प्रमुख म्हणून ज्यावेळेस मुख्यमंत्री सभागृहात एखादे आश्वासन देत असतात त्याचा परिणाम जनतेची विश्वासार्हता वाढण्यात होतो म्हणून मी मागणी केली की, माननीय मुख्यमंत्री सभागृहात येऊन जाहीर करतील असे वक्तव्य सभागृहात सन्माननीय सदस्यांनी करु नये. असे एकदाच नव्हे तर चार चार वेळा सन्माननीय सदस्यांनी सांगितले म्हणून मी बोललो.

श्री. माणिकराव ठाकरे : महोदय, माझ्या नावाचा उल्लेख झाल्यामुळे मला स्पष्टीकरण दिले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी जो उल्लेख केला त्याचे स्पष्टीकरण यापूर्वीच मी माझ्या भाषणातून केलेले आहे. त्यांनी मध्येच सन्माननीय सदस्यांनी तांत्रिक मुद्दा उपस्थित केला होता म्हणून मला माझे म्हणणे मांडावे लागले होते. मी त्याच वेळी बोललो की शासनाला या विधेयकाच्या अनुषंगाने ज्या सुधारणा देणार आहे त्या मी माझ्या भाषणातून सुध्दा करु शकतो, कुठल्याही प्रकारे बाजूला जाऊन काही करतो अशातला भाग नाही.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : महोदय, हा सन्माननीय सदस्यांचा अधिकार आहे आणि ते भाषण करण्यास उभे राहिल्यानंतर सुरुवातीलाच त्यांनी सांगितले होते की, मी काँगेस पक्षाचा अध्यक्ष आहे पण या सभागृहाचा सदस्य सुध्दा आहे. पण मला समजले नाही की काँग्रेस पक्षाचा सदस्य आहे असे सांगण्याची वेळ सन्माननीय सदस्यांवर का यावी ? ......अडथळा........मी शिवसेना पक्षाचा नेता आहे असे मी कधी सांगत नाही. सकाळी मला वाटत होते की, दुपारपर्यंत काही तरी बदल होईल. मला भीती वाटत होती की, दादा सभागृहात पुढे येऊन बसले होते, म्हणूनच सन्माननीय सदस्यांना मी मनापासून धन्यवाद देतो. कारण आज मला खरी धन्यता वाटली ती म्हणजे आपण सांगितले की, मी काँग्रेस पक्षाचा अध्यक्ष आहे. सन्माननीय सदस्यांच्या या बोलण्याचे कौतुक का करतो हे आपल्याला आता कळेलच. सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे हे सभागृहात नेहमीच विदर्भाविषयीचा मुद्दा मांडत असतात. या मुद्यावर आमचे पक्षाच्या पलिकडे जाऊन एकमत आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

मी जेव्हा विदर्भाच्या दौ-यावर मी जेव्हा होतो तेव्हा मी सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांना सांगितले होते माणिकराव आपण आपल्या हातामध्ये वैधानिक विकास मंडळाच्या संदर्भात पुढाकार घ्या. असे करुन मी त्यांना मोठेपणाचा मान दिला होता. मी जे काही करतो ते कृतीमधून करीत असतो. कारण ते सत्तारुढ पक्षाचे अध्यक्ष आहेत व तसा त्यांना अधिकारही आहे. त्यांचा मान अधिकृतरित्या मोठा आहे. आज मला आनंद एवढयासाठी झाला की, त्यांनी आपल्या भाषणामध्ये असे सांगितले की, 42 हजार क्यूसेक्स मेगावॅट विजेची निर्मिती विदर्भातून निर्माण होणार आहे. पुढे त्यांनी सांगितले की, मी पक्षाचा अध्यक्ष असल्यामुळे संपूर्ण राज्याचा नेता असल्यामुळे आमच्याकडील वीज महाराष्ट्रातील इतर भागात गेली तर त्याचा मला आनंद आहे. आपल्या म्हणण्याचे मी स्वागत करतो. एका पक्षाचे अध्यक्ष बोलतात म्हणजे त्यांचे सरकारला मार्गदर्शन असते असा त्याचा अर्थ आहे. आता तुमच्या तोंडून बाण सुटला गेला आहे.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नाला सन्माननीय सदस्यांनीच उत्तर दिलेले आहे. मी अध्यक्ष पद व सदस्यात्वाची जाणीव याकरिता करुन दिली होती की, तुमचे या संदर्भात जे काही शब्द येणार होते ते माहिती असल्यामुळे मी तसे बोललो असून ते शब्द आपणच दुरुस्त केलेले आहेत.

**उप सभापती** : आपण बाण हा शब्द वापरला आहे. त्यासंदर्भात मला एक काव्य पंक्ती आठवली आहे.

"हाती धनुष्य ज्याच्या, त्याला कसे कळावे,
हृदयात बाण ज्याच्या, त्यालाच दु:ख ठावे".

त्यामुळे सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, आता आपण परत परत बाण मारु नका.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांच्या मधील हिरवटपणा आपल्याला माहीत असेल हे मला माहिती नव्हते.

सभापती महोदय, पक्ष प्रमुखाचे मार्गदर्शन सरकारला होते ते फार मोलाचे असते असे मी वारंवार बोलतो आहे. माणिकराव असे म्हणाले की, 19 हजार युनिट वीज येत्या दीड दोन वर्षात

श्री. दिवाकर रावते .....

तयार होणार आहे. महाराष्ट्राचा 3 हजार मे.वॅट विजेचा बॅकलॉग आहे व फार फार तर अजून 3 वर्षात तो 7 हजाराचा होईल. 19 हजार मे.वॅट पैकी 10 हजार मे.वॅट वीज आम्हाला मिळतेच आहे. तर आमच्या विदर्भात 42 हजार क्यूसेंसचे प्रकल्प कशासाठी टाकले ? मी माणिकरावांचे एवढयासाठी स्वागत केले की, पाण्याची लूट कशी झाली, गेल्या पाच वर्षात असे का घडले ? यासंदर्भात संपूर्ण यादी माझ्याकडे आहे. विदर्भामध्ये 55 प्रकल्पांना मान्यता दिलेली आहे. 5-6 वर्षापूर्वी यासंदर्भात केंद्राने निर्णय घेतला आहे की, ज्याला पाहिजे त्याने वीज निर्माण करावी, कंपनी काढावी परंतु त्यासाठी लागणारी पायाभूत सुविधा राज्य सरकार कडून पुरविण्याची हमी घ्यावी अशा प्रकारची त्यामध्ये अट आहे. अशा प्रकारे आमच्या विदर्भामध्ये विदर्भ इंडस्ट्रीयल पॉवर लिमिटेड, एमआयडीसी,बुटीबोरी कंपनीची कॅपेसीटी 300 मे.वॅटची आहे. परंतु या कंपनीला 12.35 इतके पाणी लागणार असून हे पाणी निम्न वर्धा वडगाव, जळगाव, उमरेड मधून घेतले जाणार आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ..

एन.टी.पी.सी.लि., मौदा, जिल्हा नागपूर 1000 मेगावॅट, आयडियल एनर्जी प्रोजेक्ट लि., बेला, नागपूर, 270 मेगावॅट, मुरली इंडस्ट्रीज लि.वडोदा, ता.कामठी, 660 मेगावॅट,लेनेक्सीस एनर्जी कं., उमरेड, 1000 मेगावॅट,डॉल्बी मायनिंग ॲन्ड पॉवर लि. उमरी, ता.सावनेर,1320 मेगावॅट,अस्टार्क पॉवर प्रा.लि, पांढरताल ता.उमरेड, 1320 मेगावॅट, कोराडी/खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र, कोराडी,खापरखेडा, 2080 मेगावॅट,कोराडी औष्णिक विद्युत केंद्र, विस्तार, कोराडी,1000 मेगावॅट, रेक पॉवर लि. 10 मेगावॅट,लॅम्को महानदी ताप वीज केंद्र, मांडवा ता.आर्वी, 1320 मेगावॅट,अे.अे.एनर्जी लि. वडसा, देसाईगंज, 10 मेगावॅट, नागभिड औष्णिक विद्युत केंद्र, अडवळ मेंढा, ता.नागभीड, 540 मेगावॅट, आय.एस.एम.टी.औष्णिक वीज प्रकल्प, कुर्ला ता.वरोरा, 40 मेगावॅट, भद्रावती औष्णिक वीज प्रकल्प महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ. भद्रावती, 1000 मेगावॅट, सिपको औष्णिक वीज प्रकल्प, भद्रावती, 668 मेगावॅट, इंडोरामा औष्णिक वीज प्रकल्प, विश्लॉन ता.वरोरा, 1320 मेगावॅट, नागपूर एनर्जी इन्फ्रास्ट्रक्चर लि. देऊळगाव ता. भद्रावती 1000, गुप्ता एनर्जी प्रा. लि. उसेगाव ता. चंद्रपूर 100, धारीवाल इन्फ्रा स्ट्रक्चर लि.ताडाली,चंद्रपूर, 600 मेगावॅट, शालीवाहन कन्स्ट्रक्श्न लि. इरई,एकोंडी ता.कोरपना, 300 मेगावॅट, वरोरा औद्योगिक विकास केंद्र, वरोरा, 1060 मेगावॅट, बी.एस.इस्पात लि.भद्रावती,300 मेगावॅट, महाराष्ट्र इलेक्ट्रोस्मेल्ट लि. चंद्रपूर, 120 मेगावॅट,श्याम सेंचुरी इन्फ्रास्ट्रक्चर लि. तुमना, वरोरा 1000 मेगावॅट, म.रा. पॉवर जनरेशन कंपनी लि., बल्लारपूर, चंद्रपूर 500 मेगावॅट, जिंभूविश पॉवर जनरेशन प्रा.लि. वरोरा, चंद्रपूर 540 मेगावॅट, नंदलाल एन्टरप्राईजेस लि. नागाव ता. कोरपना 750 मेगावॅट, गोंडवाना इस्पात लि. मांजरा, ता. वरोरा, 100 मेगावॅट, गुप्ता एनर्जी प्रा.लि. उसेगाव ता.चंद्रपूर, 540 मेगावॅट,बी.एस.इस्पात लि. आष्टा ता. वरोरा, 25 मेगावॅट, अपर्णा इन्फ्रास्ट्रक्चर लि. ता.चिमूर 110 मेगावॅट,अपर्णा इन्फ्रा एनर्जी लि. कवठाळा, ता.चिमूर 250 मेगावॅट, शारदाम्बिका पॉवर प्लॅन्ट, चंद्रपूर, 10 मेगावॅट, मुरली ॲग्रो लि. कोरपणा, जि. चंद्रपूर 50 मेगावॅट,आयर्न कोल बेनिफिकेशन्स लि. पांढरपौनी ता.राजुरा 120 मेगावॅट,गुप्ता एनर्जी प्रा.लि. उसेगाव ,जि.चंद्रपूर 660 मेगावॅट,चंद्रपूर ओष्णिक विद्युत प्रकल्प, चंद्रपूर 2340 मेगावॅट,म.रा.पॉवर जनरेशन कं.लि.चंद्रपूर 500मेगावॅट,अदानी पॉवर महाराष्ट्र प्रा.लि. तिरोडा,गोदिंया, 3300 मेगावॅट, जे.एस.डी.यवतमाळ एनर्जी लि. गोदिंया,1215 मेगावॅट, सनफ्लॅग

2..

श्री.दिवाकर रावते ..

आयर्न ॲन्ड स्टील लि. वर्थी जि. भंडारा, 750 मेगावॅट,डी.बी.प्रोजेक्ट प्रा.लि. पांढरबरी जि. भंडारा 1320 मेगावॅट,क्रिश्नपिंग पॉवर लि. मांडळ ता.तुमसर जि.भंडारा 50 मेगावॅट,पारस ओष्णिक विद्युत प्रकल्प, पारस जि.अकोला 250 मेगावॅट,पारस औष्णिक विद्युत प्रकल्प, पारस जि.अकोला 250 मेगावॅट, सोफिया पॉवर कंपनी लि. नांदगाव पेठ ता.अमरावती 2640 मेगावॅट,

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

अमरावती थर्मल पॉवर 1320 मेगावॅट, लोणारा औष्णिक विद्युत प्रकल्प 500 मेगावॅट, बिजोरा औष्णिक विद्युत प्रकल्प, बिजोरा 500 मेगावॅट, आयर्न कोल बेनिफिकेशन प्रायव्हेट लिमिटेड, गुडगाव, तालुका वणी 120 मेगावॅट, शालीवाहन प्रोजेक्ट प्रायव्हेट लिमिटेड, जिल्हा यवतमाळ 10 मेगावॅट, श्रीनिवास प्रोजेक्ट लिमिटेड, वडगी यवतमाळ 500 मेगावॅट, महाजनको, वणी 1320 मेगावॅट. सभापती महोदय, ही मोठी यादी वाचण्यासाठी मी सभागृहाचा वेळ घेतला. सर्व माननीय सदस्य म्हणत असतील की, ही यादी आपण कशासाठी वाचत आहात? याच्या दुप्पट महाराष्ट्रातील प्रकल्पांची यादी माझ्याकडे आहे, ती वाचायला गेलो तर आणखी एक तास लागेल. सभापती महोदय, मी या करिता माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांचे अभिनंदन केले आहे.

या महाराष्ट्राचे तत्कालीन माजी मुख्यमंत्री आणि केंद्रामधील विद्युत मंत्री यांनी असे जाहीर केले की, या देशामध्ये येत्या 15 वर्षात 1 लाख 5 हजार मेगावॅट विजेची निर्मिती होणार आहे आणि ती येत्या 20 वर्षामध्ये आम्ही नक्की निर्माण करु. महाराष्ट्रातील एक कर्तृत्ववान माजी मुख्यमंत्री केंद्रामध्ये 1 लाख 5 हजार मेगावॅट विजेच्या निर्मितीचे नियोजन करीत आहेत व त्याबाबत घोषणा करीत आहेत हे ऐकल्यानंतर मला आनंद झाला. या देशाकरिता महाराष्ट्राचे कर्तृत्व दिल्लीला पणाला लागले आहे. सभापती महोदय, दोन महिन्यानंतर माझ्या असे लक्षात आले की, 1 लाख 5 हजार मेगावॅट इतकी वीज देशासाठी निर्माण होणार आहे, त्यामधील 55 हजार मेगावॅट वीज कोकणामध्ये आणि 50 हजार मेगावॅट वीज विदर्भामध्ये निर्माण होणार आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.रामदास कदम या ठिकाणी कोकणामध्ये होणाऱ्या 44 विजेच्या प्रकल्पांची यादी वाचून दाखविणार आहेत. मी या ठिकाणी वाचून दाखविलेल्या प्रकल्पांपेक्षा त्यामध्ये जास्त प्रकल्प आहेत. या बाबतीत आम्हा दोघांमध्ये दुमत नाही. हा त्या भागातील लोकांच्या अस्तित्वाचा प्रश्न आहे. अशाप्रकारे विदर्भ आणि कोकणामध्ये एवढी औष्णिक वीज निर्माण होणार आहे आणि त्यामध्ये जैतापूरची 10 हजार मेगावॅट वीज 25 वर्षांनी निर्माण होणार आहे. त्यामधून महाराष्ट्राकरिता फक्त 4 हजार मेगावॅट वीज मिळणार आहे, बाकीची वीज सेंट्रल ग्रीडमधून देशाकरिता दिली जाणार आहे. या ठिकाणी निर्माण होणाऱ्या 10 हजार मेगावॅट विजेकरिता तुम्ही आंदोलन कशासाठी करीत आहात अशाप्रकारचे तुणतुणे वाजविले जात आहे. त्यांना मला सांगावयाचे आहे की, ती संपूर्ण वीज महाराष्ट्राला मिळणार नाही हे आपण लक्षात घ्या.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. दिवाकर रावते ....

एवढया मोठया प्रमाणात वीज प्रकल्प आले आहेत, त्यापैकी अर्ध्यापेक्षा जास्त वीज प्रकल्पांना बेकायदेशीररित्या पाणी देण्याचा निर्णय तत्कालीन मंत्री गटाच्या समितीने घेतला, तो निर्णय शेतकऱ्यांचा घात करुन घेतला. हे विधेयक बेकायदेशीररित्या केलेली कामे कायदेशीर करण्यासाठी आणले आहे. प्रत्येक प्रकल्पाला बेकायदेशीररित्या देण्यात आलेल्या पाण्याचा पाढा या ठिकाणी मी वाचावयास लागलो तर उद्याच्या संध्याकाळपर्यंत मला या ठिकाणी उभे रहावे लागेल. मी या ठिकाणी एक गोष्ट सांगणार आहे. या एका गोष्टीवरुन लपवा लपवी कशी होते ते आपल्याला समजेल.

सभापती महोदय, ज्या गोष्टीचा उल्लेख कॉंग्रेस पक्षाच्या माननीय अध्यक्षांनी केला त्या अमरावतीमधील सोफिया प्रकल्पाची कथा सांगण्याचा मी प्रयत्न करणार आहे. शितावरुन भाताची परीक्षा घेतली जाते ही स्टोरी कशी निर्माण झाली हे आपल्या चटकन लक्षात येईल. सभापती महोदय, मी माहितीच्या अधिकारामध्ये त्या ठिकाणी पाण्याची उपलब्धी किती आहे याची माहिती घेतली.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

आमच्याकडे माहितीच्या अधिकारामध्ये तेथील पाण्याची उपलब्धी काय आहे हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला. त्यानुसार प्राप्त झालेली जी उपलब्धी आहे, ती आपणामार्फत मी माननीय मंत्री महोदयांना देऊ शकतो. कदाचित त्यांच्याकडे देखील ही माहिति असेलच. पण त्यांच्याकडे बनवाबनवी सुध्दा आहे. कारण ती बनवाबनवी अधिकृत आहे, शासकीय कागदोपत्री आहे. याठिकाणी सोफिया प्रकल्पाबाबत मांडत असताना मी अत्यंत . . . .

श्री.जयंत प्र.पाटील (खाली बसून) : त्यांचा काहीच संबंध नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, यांचा काहीच संबंध नाही. "घट डोईवर हात कमरेवर" तसे बिचारे आमचे मंत्री कोणाच्या तरी पापाचा घडा डोक्यावर घेऊन पुढे चालले आहेत. आपण त्यांना सांभाळले पाहिजे. सन्माननीय सदस्य हे कोकणातील आहेत म्हणून त्यांना यांच्याबद्दल प्रेम वाटते आणि असे मनात येते की, माझ्या माणसाला कशासाठी खड्डयात घातले.

श्री.जयंत प्र.पाटील (खाली बसून) : हे काय आहे ?

श्री.दिवाकर रावते : माननीय मंत्री श्री.भास्करराव जाधव हे देखील त्यांना सपोर्ट करण्यासाठी उभे राहिले. माननीय मंत्री महोदय, आपण फार भाग्यवान आहात. कारण आपल्याला माननीय मंत्री श्री.भास्करराव जाधव यांचा सपोर्ट मिळाला म्हणजे काय ? आज कोकणामध्ये ही बातमी गेली तरी आनंदाने ढोल, ताशा वाजविला जाईल.

श्री.सुनील तटकरे (खाली बसून) : आता सन्माननीय सदस्यांनी आटोपते घ्यावे, भरपूर झाले.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आमच्याकडे माहितीच्या अधिकारानुसार आकडेवारी आलेली आहे. माझ्याकडे वाच्छाव लवाद आहे. त्या लवादाला अपील नाही. तुमचा कोणताही अधिकारी असे सांगू शकत नाही की, जर वाटप करण्याचा अधिकार असेल तर इंटरस्टेट आहे त्याप्रमाणे जर आम्हाला दिले तर आम्ही पाणी घेऊ शकतो. "The Report of the Godavari Water Disputes Tribunal" यामध्ये असे म्हटलेले आहे की, " Agreement entered into between the States of Maharashtra, Madhya Pradesh and Andhra Pradesh" यामध्ये मध्य प्रदेश सरकार बरोबर वर्धा सब डिव्हीजनबाबत आपला जो करार झालेला आहे त्यातल्या पाण्याच्या संदर्भात मी येथे मुद्दा मांडणार आहे.वर्धा सब डिव्हीजनचा जो निर्णय आहे त्यासंदर्भात असे म्हटलेले आहे की, "The State of Madhya Pradesh in terms of the



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

Agreement relating to certain inter-state irrigation and hydel projects between Madhya Pradesh and Maharashtra dated 18th December, 1968 can use 9 TMC for its existing, under construction and proposed schemes, projects which are located upstream of the contemplated Upper Wardha Project of the State of Maharashtra." म्हणजे जे 9 टीएमसी पाणी आहे, ते आम्ही यामधून मध्य प्रदेशला दिलेले आहे. हे पाणी त्यांचे आहे, आपले नाही. म्हणून माहिती अधिकाराच्या माध्यमातून जेव्हा सर्व माहिती घेतली. त्यामध्ये असे दिलेले आहे की, 9 टीएमसी पाणी वापरण्याचा अधिकार आहे, याचे लवादाप्रमाणे काही दशलक्ष घनमीटर पाणी होते. पुढे असे म्हटलेले आहे की, "उर्ध्व वर्धा प्रकल्पाच्या कॅचमेंट एरियामध्ये किती पाणी आहे ? तर याबाबत अशी माहिती देण्यात आली की, 161.604 दशलक्ष घ.मी. पाणी आहे आणि त्याची मी फोड करुन सांगणार आहे. दुसरे असे सांगण्यात आले आहे की, 50 दशलक्ष घ.मी. हे कॅचमेंट एरियामध्ये उर्ध्व प्रकल्प सोडून महाराष्ट्रातील लघु व मध्यम प्रकल्पाच्या बाबतीत भविष्यात किती पाणी वापरावयाचे याचे जे नियोजन आहे, ते 50 टीएमसी इतके आहे. बाष्पीभवन 68.535 टक्के इतके आहे आणि मी बाष्पी भवनाच्या चोरीच्या बाबतीत देखील सांगणार आहे. चतुर्थ सुधारित मान्यतेनुसार उर्ध्व प्रकल्पाच्या पाण्यामधून उद्योगासाठी किती पाणी दिले तर 24.735 घ.मी. तसेच चतुर्थ सुधारित मान्यतेनुसार उर्ध्व वर्धा प्रकल्पाच्या पाण्यातून किती पिण्याचे पाणी राखून ठेवले तर 77.329 घ.मी. चतुर्थ सुधारित मान्यतेनुसार उर्ध्व वर्धा प्रकल्पाच्या पाण्यातून वीज प्रकल्पाकरता म्हणजे दोन प्रकल्पासाठी ज्याचा मी मघाशी उल्लेख केला होता त्यासाठी किती पाणी राखून ठेवले ? एक म्हणजे सोफिया ऊर्जा प्रकल्पासाठी 123.52 घ.मी.पाणी राखून ठेवले. माननीय पंतप्रधान यांनी जे पॅकेज मंजूर केले आहे, त्यात उर्ध्व प्रकल्पामध्ये 302.78 दशलक्ष घ.मी.पाणी 75 हजार हेक्टर सिंचनासाठी राखीव होते हे खरे आहे काय ? तर "होय" असे म्हटलेले आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

सभापती महोदय, उर्ध्व वर्धा प्रकल्पामध्ये एकूण पाणलोट क्षेत्रामध्ये 75 टक्के म्हणजे किती पाणी उपलब्ध आहे तर 500.72 दश लक्ष घन मीटर पाणी उपलब्ध आहे. शासकीय निकषानुसार एक दश लक्ष घन मीटर पाण्यामध्ये किती हेक्टर सिंचन होते तर 150 हेक्टर क्षेत्रात रब्बी पिकाचे सिंचन व्हावयास पाहिजे, असे म्हटलेले आहे. सभापती महोदय, हा सगळा हिशेब मांडला तर फक्त 500.72 दश लक्ष घन मीटर इतके पाणी उपलब्ध आहे. पण प्रत्यक्षात 1063.353 दश लक्ष घन मीटर इतक्या पाण्याचे वाटप झालेले आहे. 500.72 दश लक्ष घन मीटर पाणी उपलबध असेल तर 1063.353 दश लक्ष घन मीटर पाण्याचे वाटप कसे केले, याचे उत्तर मिळाले पाहिजे. केवळ सोफिया प्रॉजेक्ट त्यांना देण्याकरिता जी काही जग्लरी करण्यात आली ती दुदैवी आहे.

सभापती महोदय, या देशाचे माननीय पंतप्रधान महाराष्ट्रात आले त्यावेळी सरकारी आकडयाप्रमाणे 6084 आत्महत्या दाखविण्यात आल्या होत्या. प्रत्यक्षात त्या दहा हजारच्या वर झालेल्या आहेत. ठीक आहे. आम्ही शासनाचा आकडा स्वीकारतो. माननीय पंतप्रधान विदर्भात आले, धामणगाव वगैरे या भागामध्ये गेले आणि त्यांनी स्वत: पाहणी केली. सभापती महोदय, माननीय पंतप्रधान यांनी जे म्हटलेले आहे ते फार गंभीर आहे. माननीय मुख्यमंत्री त्यावेळेला माननीय पंतप्रधान कार्यालयात होते माननीय पंतप्रधानांच्या वतीने ते महाराष्ट्रात आले होते. माननीय पंतप्रधान यांचा अहवाल माझ्याकडे आहे. माननीय पंतप्रधान यांनी त्यांच्या अहवालामध्ये असे म्हटले आहे की, " The primary ones seems to be continual crop failure.." शेती उद्ध्वस्त होणे, "..low yields.." कमी उत्पन्न, "..poor irrigation.." सिंचनाची अत्यंत त्रुटी आणि "..medical expenses.." वैद्यकीय खर्च यामुळे आत्महत्या होतात. हा अहवाल शासनाकडे आहे. या अहवालातील सगळया बाबींवर बोलून सभागृहाचा वेळ मला घ्यावयाचा नाही. पंतप्रधान महोदय, यांना असे कळले की, पाणी कमी असल्यामुळे, शेतकऱ्यांना पीक मिळत नाही आणि पीक मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. म्हणून आदरणीय पंतप्रधान यांनी Long Term Relief Measures मध्ये असे म्हंटले आहे की, "There is a crying demand all around for improving irrigation. We are allocating Rs. 2177 crores from the Central Government for completion of major, medium and minor irrigation projects in these districts over the next 3 years." आत्महत्याग्रस्त

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

शेतकऱ्यांच्या कुटुंबाचा आक्रोश त्यांच्यापर्यंत पोहचला आणि त्यांनी 2177 कोटी रुपयाचे पॅकेज जाहीर केले. हे पॅकेज जाहीर केल्यानंतर लाल किल्यावरुन त्यांचे भाषण झाले त्यावेळी संपूर्ण देशाला उद्देशून ते बोलले. मी या ठिकाणी जो विषय मांडणार आहे त्या विषयातून पंतप्रधान पॅकेजमध्ये काही गडबड झाली असेल तर या विधेयकाला उत्तर देताना शासन त्या संदर्भात कोणती भूमिका घेणार आहे हे विचारण्या करिता मी या ठिकाणी उभा आहे. बाकीचा विषय वेगळा आहे,तो कृषी मंत्री हाताळत आहेत. या देशाचे पंतप्रधान लाल किल्ल्यावरुन भाषण करतात. संपूर्ण हिंदुस्थान त्यांचे भाषण ऐकत असतो.

सभापती महोदय, त्यांच्या भाषणातील शब्द मी या ठिकाणी वाचून दाखवितो. "भाइयो और बहिनो, जब मैं विदर्भ में गया तो वहां के किसानों की हालात ने मुझ पर गहरा असर डाला. इन्हीं हालात की वजह से किसान खुदकुशी करने के लिए मजबूर हो रहे हैं. हमें सोचना होगा कि हम उनकी दिक्कतों को कैसे दूर करें और उन्हें बेहतर आमदनी कैसे दिलाएं."

. . . नंतर बरवड.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

सभापती महोदय, डोळ्यात पाणी आणणारी अशी ही आदरणीय पंतप्रधानांनी लाल किल्ल्यावरुन विदर्भातील शेतकऱ्यांच्या संदर्भात केलेल्या भाषणातील वाक्ये आहेत. ते पुढे असे म्हणाले की, "हमे सोचना होगा कि हम उनकी दिक्कतों को कैसे दूर करें और उन्हे बेहतर आमदनी कैसे दिलाये." सभापती महोदय, 'Vidarbha is a grave-yard of Maharashtra Farmers' म्हणून अहवालामध्ये ज्यांची हिंदुस्थानात नोंद झाली त्यांच्या आक्रंदणातील भावना माननीय पंतप्रधानांपर्यंत पोहोचल्या आणि त्यांनी लाल किल्ल्यावरुन आमच्या विदर्भातील शेतकरी का मरतो हे संपूर्ण देशाला सांगितले. आदरणीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत म्हणून मी हे बोलत नाही. त्यावेळी पंतप्रधान पॅकेजचा अधिकार त्यांच्याकडे होता. ते मुख्यमंत्री का झाले याचा मी नेहमी विचार करतो. या ठिकाणी कोणी लायक नव्हते म्हणून मुख्यमंत्री म्हणून ते आले का असा मी नेहमी विचार करतो. त्यावेळी एक वाक्य निर्माण झाले. आपल्याला ते माहीत आहे. राज्य सरकारकडून या पॅकेजची योग्यरित्या अंमलबजावणी होईल की नाही याची खात्री नसल्यामुळे केंद्र सरकार पूर्णपणे त्यांच्यावर निर्भर होते. ते काम आपल्याकडे होते. त्यावेळी पंतप्रधान कार्यालयामध्ये असलेल्या तत्कालीन मंत्र्यांवर पंतप्रधानांनी विश्वास टाकून महाराष्ट्राच्या या कारभाराकडे लक्ष ठेवा असे त्यांना सांगितले. त्यांना पूर्ण कारभाराकरिता या ठिकाणी पाठविले. आदर्शचे प्रकरण घडले पण पंतप्रधान पॅकेज खाल्ले म्हणून या ठिकाणी ते आले असावेत असा माझा अंदाज आहे. बाकीचा जो भाग आहे तो जाऊ द्या पण द ग्रेव्ह यार्ड ऑफ फामर्स म्हणून संपूर्ण जगामध्ये ज्याचा बदलौकिक गेला त्याकरिता देशवासीयांकडे माननीय पंतप्रधान आक्रंदन निर्माण करतात आणि ते आक्रंदन किती गांभीर्याने घ्यावयाचे याचा विचार येथील राज्यकर्त्यांनी करणे आवश्यक होते.

या ठिकाणी 2177 कोटी रुपयांचे पॅकेज आले आणि मला आनंद आहे की, हे जे पॅकेज आले त्याचे ड्राफ्टींग माननीय मुख्यमंत्री पंतप्रधान कार्यालयामध्ये असताना त्यांच्या हातातून तयार झाले असावे, असे मला वाटते. अधिकारी हुशार असतात. मग हे पैसे कसे वापरावयाचे ? कायद्यातील अंतर्गत उणिवा दाखवून हे पैसे कसे वापरता येणार नाहीत असे ते दाखवितात.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. दिवाकर रावते .....

जो निधी दिला ते पैसे वापरण्याच्या संदर्भात असे म्हटले आहे की, " New project could be included in the programme only on completion of an ongoing project under AIBP on one to one basis except for projects benefiting (a) drought-prone areas; (b) tribal areas; (c) States with lower irrigation development as compared to national average and (d)....." या तीन बाबीत विदर्भात जर प्रकल्प बसत नसतील तर त्या ठिकाणी माननीय पंतप्रधानांनी आपला अधिकार वापरला आणि आमच्या विदर्भातील त्या पैशाच्या वापराकरिता अत्यंत वेगळा शब्द वापरला. त्यामध्ये त्यांनी असा उल्लेख केला आहे की, "...districts identified under the PM's package for agrarian distress districts." यामध्ये त्यांनी डिस्ट्रेस डिस्ट्रिक्टस् असा शब्द वापरुन त्यांची यादी दिली आहे. त्या यादीमध्ये अप्पर वर्धा प्रकल्प दुसऱ्या क्रमांकावर आहे. जर तो प्रकल्प बाकीच्यामध्ये बसत नसेल तर डिस्ट्रेसमध्ये घ्यावा. माननीय पंतप्रधानांनी लाल किल्ल्यावर जाऊन व्यथा व्यक्त केली एवढ्यापुरतेच ते मर्यादित राहिले नाही. पंतप्रधान त्या ठिकाणी आले, त्यांनी पाहणी केली आणि ते निघून गेले एवढ्यापुरते ते राहिले नाही तर

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. बरवड 16:15

श्री. दिवाकर रावते...

त्या शेतक-यांकरिता मला काही तरी केले पाहिजे असे सांगणा-या देशाच्या पंतप्रधानांनी कृती करुन दाखविली.

मला ज्या एका गोष्टीचे वाईट वाटते त्याचा मी जाता जाता उल्लेख करतो. राज्यातील उद्ध्वस्त शेतक-यांच्या बाबतीत स्वत: राहुल गांधींनी लक्ष घातले. ते शेतक-यांच्या घरी गेले. त्यांना मदत करण्याचा प्रयत्न केला. हा जाणिवेचा भाग आहे. शेतकरी मरतोय, आत्महत्या करतो, त्याला बळ दिले पाहिजे ही त्यांची भावना होती आणि एक राजकीय कार्यकर्ता म्हणून त्यांनी ते केले. परंतु त्याच वेळी या राज्याचे तत्कालीन महसूल मंत्री जाहीररित्या सांगत होते की शेतकरी दारु पिऊन मरतो, आत्महत्या करतो. शेतक-याची अशा प्रकारे निर्भत्सना त्यांनी केली. एका बाजूला त्यांच्याच पक्षाचे देशाचे पंतप्रधान शेतक-यांकरिता केवळ आक्रंदन नाही तर कृती करतात आणि त्याच वेळी या राज्याचे महसूल मंत्री आदरणीय श्री. नारायण राणे हे शेतकरी दारु पिऊन मरतो अशा प्रकारचे वक्तव्य करतात. त्यांच्या वक्तव्यानंतर सभागृहात गदारोळ झाला होता. तरी सुध्दा मी बोललो तेच बरोबर आहे असे माध्यमांना त्यांनी सांगितले. याचा काय अर्थ घ्यायचा तो सरकार घेईल. यामध्ये "डिस्ट्रेस्ड" हा शब्द फार महत्वाचा आहे. पंतप्रधानांनी व्यक्त केलेल्या भावनांबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो.

या ठिकाणी राज्याचे आदरणीय मुख्यमंत्री उपस्थित आहेत. पैसे घेण्याच्या संदर्भात केन्द्र सरकारने आपल्या राज्य सरकार बरोबर एमओयू केला. कारण त्यांना राज्य सरकारवर विश्वासच नव्हता. "The State Government will be required to enter into an MOU with the MOWR (Annexure II for the major/medium projects and Annexure III for the minor irrigation Schemes." अशा प्रकारे अट घातलेली आहे. ही अट फार मोठी आहे. हे दिलेले पैसे कसे वापरणार ? "The Utilisation Certificate must contain physical achievement of the Irrigation Potential as agreed to in the MOU on year to year basis." या पैशाचे काय केले, कसे वापरले ते सांगण्याची अट घातली. पंतप्रधान पॅकेजमध्ये अप्पर वर्धा प्रकल्प दुस-या क्रमांकावर होता. हा प्रकल्प पूर्ण करण्याचे वचन आपल्या राज्याने केन्द्राला दिले. "The project will be completed by the Government of Maharashtra by 2009...." त्याला दोन वर्षे झालेली आहेत. "...Its completion will be

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

informed immediately thereafter to the CWC Ministry of Water Resources and the Planning Commission for deleting the project from the list of on going projects " अशी महाराष्ट्र सरकारने त्यांना कबुली दिली. हे मी का सांगतोय ? पुढे जी गंभीर घटना घडलेली आहे ती सांगण्यासाठी मी हे सर्व आपणास सांगितले. सोफिया प्रोजेक्ट आला. सोफिया प्रोजेक्ट बद्दल एवढे प्रेम का आहे ? गुजराथचे मुख्यमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांनी देखील प्रशिक्षण घ्यावे इतके जलद काम या सोफिया प्रकल्पाचे होत आहे. देशामध्ये असे कुठे घडले नसेल. माझ्याकडे ओरिजनल डॉक्युमेंटस्च्या झेरॉक्स प्रती आहेत.

सोफिया हा बुल इंडियाचा प्रोजेक्ट आहे. त्यांनी 20 तारखेला दिल्लीवरुन फॅक्सने अर्ज केला. त्यांचा अर्ज आल्यानंतर इकडे सर्वांचे धाबे दणाणले. अर्ज आला, आता काय करायचे ? 21 तारखेला तातडीची बैठक झाली.

....नंतर श्री.गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. त्यांना या राज्याविषयी सर्व माहिती आहे. एक लक्षात ठेवले पाहिजे की, पहिली गोष्ट म्हणजे विश्वासार्हता असावी. विश्वासार्हता ज्यांच्यावर ठेवावी की, आपण यांना काही सांगितले की, त्या बाबतीत ते काही तरी कार्यवाही करतील. आज माननीय मुख्यमंत्र्यांची जनमानसामध्ये चांगली प्रतिमा आहे. सभागृहातील सदस्यांमध्ये देखील त्यांच्याबद्दल अतिशय चांगली प्रतिमा आहे. आपण या ठिकाणी प्रामाणिकपणे आपले गाऱ्हाणे सांगतो आहोत. नळी फुंकली सोनारी अशी या सभागृहात परिस्थिती निर्माण झालेली आहे. तसेच नळी फुंकली सोनारी अशी परिस्थिती आपण सगळयांनी पूर्वी पाहिलेली आहे. चार, पाच मुख्यमंत्री आपण बघितले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी सांगितले की, मी कॉंग्रेस पक्षाचा अध्यक्ष आहे. या सभागृहात दिशा देणारे आणि दिशा घेऊन चालणारे दोन्ही उपस्थित आहेत.

सभापती महोदय, सोफिया कंपनीचा 20 तारखेस दिल्ली येथून फॅक्सने अर्ज आला. या संदर्भात 21 तारखेस तातडीची बैठक घेण्यात आली. 22 तारखेस त्या प्रकल्पाला पाणी देण्याबाबत मान्यता दिली गेली. मला आश्चर्य वाटते की, सोफिया पॉवर कंपनी लिमिटेड, इंडिया बूल हाऊस, 448, 451, उद्योग विहार, फेज 5, गुडगाव 12201, सब्जेक्ट- वॉटर ॲलोकशन फॉर 2640 मे.वॅ. आपण अमरावती येथील पाणी का पळविले ? संपूर्ण महाराष्ट्रामध्ये अमरावती हा सिंचनाच्या बाबतीत मागासलेला जिल्हा आहे. अमरावती जिल्हा अनुशेषग्रस्त जिल्हा आहे. त्या ठिकाणी प्रकल्प आला. तो प्रकल्प देखील तीन दिवसात मंजूर करण्यात आला. तीन दिवसात पाण्याची कमिटमेंट केली गेली. दि 22-02-2008 च्या पत्रामध्ये असे म्हंटले आहे की, "Water Allocation for 2640 MW Mega Thermal Power Project in Amravati." "In response to your letter this is to inform you that water allocation to the tune of 240 MLD (87.6 MCM) for your proposed Mega Thermal Power Station of 2640 MW capacity in Amravati through Upper Wardha Project Storage is hereby approved."

अमरावतीचा शेतकरी पाण्याच्या बाबतीत उद्ध्वस्त होऊन या महाराष्ट्रामध्ये जगतो आहे. अमरावतीतील शेतकऱ्यांचे पाणी तीन दिवसात प्रोजेक्टसाठी उपलब्ध करुन दिले. ही घाई का झाली?

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

या बाबतीत उत्तर कोण देणार हे मला माहिती नाही. माझ्याकडे माहितीच्या अधिकाराच्या अनुषंगाने काही माहिती उपलब्ध झाली आहे. त्याच्यात पाण्याच्या बाबतीत कशी लपवालपवी झाली आहे ते सांगून मी माझे बोलणे संपविणार आहे.

सभापती महोदय, उपलब्ध पाणी साठा आहे. 75 टक्के डिपेंडेबल वीज आहे, ती 602 मे.वॅ.एवढी आहे. उत्तर प्रदेशास दिलेले पाणी 336 घनमीटर आहे. मध्यप्रदेशात 259 घनमीटर पाणी जाते. या सगळयांना पाणी देण्याकरिता यिल्ड 500 घनमीटर दाखविले. उपलब्ध पाणी 338 घनमीटर दाखविले आहे. मध्यप्रदेशचे पाणी आपल्याचकडे आहे असे दाखविले. 161 घनमीटर पाणी उपलब्ध नाही, ते पाणी उपलब्ध आहे असे दाखविले. मला एका गोष्टीचा खेद होतो की, 74 हजार हेक्टरचा विकास करण्यासाठी पंतप्रधान पॅकेजच्या माध्यमातून निधी आला होता. पंतप्रधानांना एमओयू खाली लिहून दिले की, आम्ही 75 हजार हेक्टर क्षेत्राचा विकास करण्यासाठी तो निधी वापरणार आहोत.

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते........

75 हजार हेक्टर सिंचनाकरिता 302.78 दलघमी पाणी राखून ठेवले होते आणि आता ते काय दाखवितात? As per foot revised estimate, चौथ्या सुधारित एस्टीमेटमध्ये 200 दलघमी दाखवितात. अधिकृतपणे 302 दलघमी असावयास पाहिजे, त्याऐवजी 200 दलघमी दाखवितात. पिण्याच्या पाण्याकरिता त्या वेळेला 79.72 दलघमी प्रमाण होते ते कमी झाले. हे प्रमाण वाढविले पाहिजे होते त्या ऐवजी 77.329 दलघमी दाखविले आणि मध्यप्रदेशातील पांढुर्णा गावाला 5 एमएलडी पाणी दिले. हिशोबाकरिता कागदोपत्री ते पाणी आमच्याकडे आहे असे दाखविले. औद्योगिक वापरासाठी 10 एमएलडी पाणी होते ते एकदम 24 एमएलडी करुन दाखविले.

सभापती महोदय, इव्हॅपोरेशन लॉसेसचे प्रमाण 93.26 दलघमी होते. सोफिया प्रकल्पाला पाणी द्यायचे होते त्यामुळे हे प्रमाण 93.26 दलघमी ऐवजी 68 दलघमी दाखविण्यात आले. विदर्भात महाबळेश्वरसारखे थंड हवेचे ठिकाण निर्माण झाले आहे का हे माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी आम्हाला सांगावे. म्हणजे त्या भागात दौऱ्यावर जाताना स्वेटर वगैरे घेऊन जाता येईल. अधिकृतरित्या हे अधिकारी एवढी बनवाबनवी करतात. इंडिया बुल्स कंपनीच्या प्रकल्पाला पाणी देण्यासाठी ही धडपड चालली आहे. एवढ्यावरच थांबले नाहीत. Additional sanction for the thermal power is 123.52. उपलब्ध साठा 227 असताना 494 साठा दाखविला. हा घोळ केवळ सोफिया प्रकल्पाला पाणी देण्याकरिता घातला आहे. पंतप्रधान पॅकेजमधून जे पाणी उपलब्ध झाले ते सोफिया प्रकल्पाला दिले. जे कायदेशीरपणे देता येत नव्हते. माननीय मुख्यमंत्र्यांना मी विनंती करणार आहे. ते पंतप्रधान कार्यालयात राज्यमंत्री म्हणून कार्यरत होते. एमओयू प्रमाणे युटिलायझेशन सर्टिफिकेट पाठवायचे होते. मूळ युटिलायझेशन सर्टिफिकेट केंद्राकडे पाठविण्यात आले, त्याची प्रत माझ्याकडे उपलब्ध आहे. त्यामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की,

"Utilisation Certificate of Central Assistance for Upper Wardha Project (Maharashtra) under AIBP"

"This is to certify that Central Loan Assistance under AIBP for Upper Wardha River Project (Maharashtra) during the year 2004-2005 amounting to Rs. 43.94 crores is sanctioned vide letters as quoted under reference (a) & (2) during the year 2006-07 the first installment of Rs. 29.04 Crores is

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते........

sanctioned vide letter quoted under reference (3). The expenditure incurred during 2004-2005, 2005-2006 and 2006-2007 and 2007-08 (Upto 30/6/2007) on works and establishment (as eligible) expenditure on establishment is taken as the minimum of state share and 15% of expenditure on works on AIBP components of Upper Wardha River Project is Rs. 23.922 crores, Rs. 26.396, Rs. 4.73 and Rs. 9.45 crores (0n works) respectively.

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या सिंचनासाठी दिलेला पैसा आम्ही वापरला, त्याचे युटिलायझेशन सर्टिफिकेट क्रमांक 1 दिले आहे. "Projected Irrigation potential 75080 Hectre is already created by June 2006" असे युटिलायझेशन सर्टिफिकेट दिले आहे. 300 एमएलडी पाणी वापरुन एवढी सिंचन क्षमता आम्ही क्रिएट केली. हे तिसरे युटिलायझेशन सर्टिफिकेट पंतप्रधान कार्यालयाला पाठविले आहे. त्यामध्ये त्यांनी सांगितले की, आम्ही शेतकऱ्यांकरिता हे पाणी वापरले आणि एवढी सिंचन क्षमता निर्माण केली. त्यातील 156 एमएलडी पाणी सोफिया प्रकल्पाला काढून दिले आणि पंतप्रधान कार्यालयाशी बनवाबनवी केली आहे.

नंतर 3डी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...........

आता पॅकेज अंतर्गत 450 कोटी रुपये मिळाले होते त्यापैकी 157 कोटीच खर्च केले म्हणून संबंधितांना निलंबित केले. अशा प्रकारे पॅकेजच्या नावाखाली विदर्भातील शेतकऱ्यांची शासनाने फसवाफसवी केली आहे. ज्या शेतकऱ्यांच्या बाबतीत माननीय पंतप्रधान दिल्लीच्या लाल किल्ल्यावरुन भाषण करताना सांगतात की, या देशातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या कशामुळे होतात. पण मूळ कारण म्हणजे याच शेतकऱ्यांचे पाणी सोफिया सारख्या प्रकल्पाला देण्याचे काम हे शासन करीत आहे. अमरावती सारख्या मागास भागातील शेतकऱ्यांची अशा प्रकारे बनवाबनवी केली जाते त्यासाठी कोणावर कारवाई करणार, कोणती कारवाई करणार हे विदर्भातील जनतेला समजले पाहिजे. कारण पंतप्रधान पॅकेजच्या पैशाच्या आधारे बनवाबनवी करणे ही गंभीर बाब आहे. आतापर्यंत मी फक्त एकच बाब सांगितली, तसे या विषयावर बोलण्यासारखे खूप काही आहे. अन्य बाबी सांगायला खूप वेळ लागेल म्हणून एवढेच सांगू इच्छितो की, आता जो अधिकार मंत्रिमंडळाकडे देण्याचा निर्णय घेण्याचे शासनाने मान्य केले त्या कॅबिनेटचे प्रमुख म्हणून माननीय मुख्यमंत्रीच राहणार आहेत. यापूर्वी मात्र असे वातावरण तयार केले होते की, जणू मंत्रिमंडळानेच ही उप समिती नेमली असून त्या समितीनेच पाणी वाटपाच्या सूत्राबाबतचे निर्णय घ्यावयाचे आहेत. सर्व काही त्यात असेल मग जे काही पाप होईल ते सर्वांवर होईल. आता यामध्ये बदल होणार असल्याने आणि माननीय मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वात ही समिती वाण्याचे वाटप करणार अशी चर्चा मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्र्यांनी मान्य केली त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. तसेच या निमित्ताने सांगू इच्छितो की, सन 2005 ते 2010 या काळात जे पाणी शेतीसाठी दिले गेले ते ॲडिशनल होते व ते सुध्दा रेग्युलर झालेले आहे, याबाबत मुख्यमंत्री कोणती भूमिका घेणार आहेत, हा महत्वाचा प्रश्न आहे.

जाता जाता इतकेच बोलणार आहे की, या पाच वर्षाच्या काळात तत्कालीन जलसंपदा मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या उच्चाधिकार समितीने राज्यातील 38 धरणातील साधारणपणे 1500 घन मीटर इतके सिंचनाचे पाणी खाजगील कंपन्या, उद्योग व मोठ्या शहरांसाठी पळविले. शेतकऱ्यांना अंधारात ठेवून हा जो निर्णय घेतला होता त्याचा परिणाम म्हणून 2.06 लक्ष हेक्टर सिंचन क्षेत्र बाधित झालेले आहे. या अपारदर्शक व अन्यायकारक निर्णयाविरुध्द

......2.......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .........

लोक कोर्टात गेले. या विधेयकामध्ये सर्वात जाचक अट अशी आहे की, शासनाच्या या समितीने घेतलेल्या निर्णयाच्या विरोधात न्यायालयात जाता येणार नाही. अशा प्रकारे "हम करे सो कायदा, आणि आम्ही घेऊ तोच निर्णय" यात तरतूद असणे म्हणजे हुकूमशाहीतच असल्यासारखे वाटते. अशा प्रकारे अन्यायाची दाद मागण्यासाठी कोर्टात जाण्याचाही अधिकार नसेल तर लोकांनी काय करावे, मंत्रिमंडळावर विश्वास ठेवून त्यांनी दिलेला निर्णय गुपचूप मान्य करावा हे योग्य नाही. म्हणून या विधेयकातील या जाचक अटीचा फेरविचार होणे आवश्यक आहे. लोकांना न्याय मिळाला पाहिजे, अन्यथा कोणी तरी न्यायालयात जाणारच आहे. म्हणून जलसंपदा विधेयकाबाबत बोलत असताना एवढेच सांगणार आहे की, अंधारात केलेले कृत्य पुन्हा एकदा उजेडात आणावेच लागेल, त्याशिवाय पर्याय नाही.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अवमान करुन या सभागृहात आपण हे बिल आणलेले आहे त्याची मी खंत व्यक्त करतो. पंतप्रधान पॅकेजच्या अमलबजावणीमध्ये माननीय पंतप्रधानांचीच जी बनावाबनवी झ ालेली आहे त्यासंदर्भात कारवाईची अपेक्षा व्यक्त करतो, या विधेयकाच्या संदर्भात मी जी उपसूचना दिलेली आहे तिच्यावर योग्यवेळी मी भाष्य करेन एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो. धन्यवाद.

--------------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विनियोजन विधेयक

**पृ.शी.**: विनियोजन विधेयक

L.A. BILL NO. XXI OF 2011

( A BILL TO AUTHORISE PAYMENT AND APPROPRIATION OF CERTAIN FURTHER SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES OF THE YEAR ENDING ON THE THIRTY-FIRST DAY OF MARCH 2012.)

श्री. राजेंद्र मुळक (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2011 चे वि.स.वि. क्रमांक 21, दिनांक 31 मार्च, 2012 रोजी संपणा-या वर्षाच्या कामांसाठी राज्याच्या एकत्रित निधीतून आणखी विवक्षित रकमा देणे व त्यांचे विनियोजन करणे यांस अधिकृत मंजुरी देण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असतांना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद, 207,खंड (1) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** :विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडशः सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

( खंड 2 व 3 अनुसूची,खंड 1,संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेंण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

**सभापती** : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

-------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) विधेयक

L.A. BILL NO. I OF 2011

( A BILL TO AMEND THE MAHARASHTRA WATER RESOURCES REGULATORY AUTHORITY ACT, 2005.)

AND MOTIONS FOR REFERRING THE BILL TO JOINT COMMITTEE

( चर्चा पुढे सुरु....

श्री. पृथ्वीराज चव्हाण (मुख्यमंत्री) : आदरणीय सभापती महोदय, महाराष्ट्रातील जनतेच्या दृष्टीने हे बिल अत्यंत महत्वाचे असून खास करुन महाराष्ट्रातील शेतक-यांच्या दृष्टीने तर हे बिल अतिशय महत्वाचे आहे. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) विधेयक, 2011 हे विधेयक सभागृहासमोर चर्चेसाठी आलेले आहे. हे विधेयक मुर्त स्वरुपात सप्टेंबर, 2010 साली जो अध्यादेश प्रस्थापित करण्यात आला होता त्या अध्यादेशाचे रुपांतर अधिनियमामध्ये करण्याकरिता आपण प्रस्ताव आणला व त्या दृष्टीने विधानसभेने तो प्रस्ताव त्या स्वरुपात मान्य केला. परंतु हा अत्यंत आणि जिव्हाळयाचा प्रश्न असल्यामुळे विधिमंडळाच्या आत व विधी मंडळाच्या बाहेर तसेच आपापल्या मतदार संघामध्ये आणि सन्माननीय सदस्यांच्या आपापल्या गावामध्ये या विधेयकाच्या अनुषंगाने चर्चा झाली तसेच उलट सुलट प्रतिक्रियाही आली होती. या सर्व प्रक्रियेतून चर्चा सुरु असतांना मंत्रिमंडळामध्ये या खात्याचे सन्माननीय मंत्री श्री. सुनील तटकरे, उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार व माझ्या सर्व सहका-यांनी या विधेयकावर विस्तृतपणे चर्चा केलेली आहे. या विधेयकावर सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी सुध्दा विस्तृतपणे विचार मांडलेले आहेत. या विधेयकाच्या संदर्भात ब-याच सन्माननीय सदस्यांनी साधक-बाधक चर्चा केली आहे. या बिलाच्या संदर्भात सभागृहामध्ये व सभागृहाच्या बाहेर देखील चर्चा झालेली आहे.

या चर्चेतून 2-3 प्रश्न प्रामुख्याने पुढे आलेले आहेत. पाण्याच्या नियमनाचा संदर्भात 1960 साली सन्माननीय श्री. स.गो.बर्वे यांच्या अध्यक्षतेखाली सिंचन आयोग स्थापन केला होता त्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण...

वेळेपासून पाण्याच्या वाटपाबद्दल सिंचन किती असले पाहिजे तसेच सिंचन क्षेत्र वाढविण्याबाबत चर्चा सुरु आहे. 1960 सालच्या सिंचन आयोगाने काही शिफारशी केल्या होत्या व या शिफारसी तशाच अंमलात आणून राज्याचे सिंचन धोरण राबविले होते. या विधेयकाच्या अनुषंगाने 2-3 गोष्टी पुढे आलेल्या आहेत.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण ...

एका बाजूला महाराष्ट्रामध्ये विजेचा प्रचंड तुटवडा आहे. गेल्या दहा वर्षाचा इतिहास जर आपण पाहिला तर कोणत्या भागात किती तास भारनियमन होत असावयाचे हे आपणा सर्वांनाच माहीत आहे.उद्योगाकरिता विजेचा वापर होतो तसेच शेतीसाठी पंपाव्दारे पाणी उचलून ते पाणी देण्याकरितासुध्दा विजेचा वापर होतो. वाढत्या शहरीकरणामुळे देखील विजेचा वापर वाढला आहे.40 टक्के घरामध्ये आज जरी वीज उपलब्ध नसली तरी वीज वापराचे प्रमाण नागरीकरणाच्या माध्यमातून वाढत चालले आहे.त्यामुळे एका बाजूला वीज निर्मितीचे नवीन प्रकल्प उभे राहिले पाहिजे.भार नियमन संपले पाहिजे.यासाठी प्रयत्न होणे आवश्यक होते. त्यामुळे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे विभाजन केले आणि नवीन व्यवस्था आणली होती.त्याचबरोबर केन्द्र सरकारने नियामक मंडळ स्थापन केले व त्या अनुषंगाने आपल्याकडे एम.ई.आर.सी.ची स्थापना झाली होती. त्यामुळे वीज क्षेत्रामध्ये खूप सुधारणा झाली होती. वीज निर्मिती हा एक वाणिज्यिक विषय आहे.या क्षेत्रामध्ये खाजगी कंपन्या याव्यात आणि मोठया प्रमाणावर गुंतवणूक व्हावी. अशी आपली अपेक्षा आहे परंतु खाजगी कंपन्या वा सरकारी कंपन्या वीज निर्मितीच्या क्षेत्रात आल्या आणि त्यांनी पुरविलेल्या विजेचा मोबदला जर त्यांना मिळू शकला नाही तर ती व्यवस्था कोलमडून पडेल त्यामुळे वीज निर्मिती, वीज पारेषण , अशा प्रकारच्या वेगवेगळया कंपन्या केल्यामुळे वीज क्षेत्रात पुढे जाण्याची प्रक्रिया सुरु झाली होती. महाराष्ट्रामध्ये देखील भार नियमनाचे तास कमी कमी व्हावयास लागले आहेत.

सभापती महोदय, सुरुवातीला मी विजेच्या संदर्भात बोलणार आहे.काही दिवसापूर्वी विजेच्या भार नियमनाच्या संदर्भात शेतक-यांनी विधिमंडळावर मोर्चा काढला होता. त्यावेळी किमान आठ तास वीज मिळावी अशा प्रकारची मागणी त्यांनी केली होती. परंतु त्यांना 10 तास वीज मिळेल अशी मागणी मान्य करण्यात आली होती. विजेची परिस्थिती थोडीशी सुधारल्यामुळे शेतक-यांना रात्री 10 तास वीज देण्याचा निर्णय घेतला आहे.

सभापती महोदय, अशाच प्रकारे पाण्याचे नियमन करण्याकरितासुध्दा एक वेगळे प्राधिकरण असावे यासाठी राज्य सरकारने निर्णय घेतला होता. पाण्यासाठी जर प्राधिकरण नेमण्यात आले तर कोणाला किती पाण्याचे वाटप करावयाचे हा निर्णय प्राधिकरणाच्या माध्यमातून





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण ....

होईल आणि मग प्राधिकरणाकडून जो काही निर्णय घेण्यात येईल त्याप्रमाणे पाण्याचे वाटप केले जाईल. अशी संकल्पना हे प्राधिकरण स्थापन करण्या मागची होती.त्यामध्ये दोन गोष्टी प्रामुख्याने आपल्या समोर आल्या होत्या. 1960 साली बर्वे आयोगाच्या शिफारशी नुसार पाणी वाटपाचा प्राधान्य क्रम ठरविण्यात आला होता त्यानुसार पहिला प्राधान्य क्रम पिण्याच्या पाण्याला दिला होता दुसरा प्राधान्य क्रम उद्योगा करिता लागणा-या पाण्याला देण्यात आला होता आणि तिसरा प्राधान्यक्रम शेतीकरिता लागणा-या पाण्याला देण्यात आला होता. 1960 सालापर्यत ही पध्दत सुरु होती. तिला महाराष्ट्र राज्याच्या जलनीतीने मूर्तस्वरुप दिले होते. त्यावेळचे माननीय मुख्यमंत्री श्री सुशीलकुमार शिंदे यांनी 2003 साली आपल्यासमोर जलनीती ठेवली होती. आपल्या सर्वांना माहिती असेल की या जलनीतीमध्ये पाणी वापराचा प्राधान्य क्रम पुढील प्रमाणे ठरविण्यात आला होता .पशुधनासह पिण्याच्या पाण्यासाठी तसेच शीतकरण,आरोग्य आणि स्वच्छता विषयक गरजा इत्यादी घरगुती वापरासाठी पहिला प्राधान्य क्रम ठरविण्यात आला होता. त्यानंतर औद्योगिक, वाणिज्यिक वापर व कृषी उत्पादनावर आधारित उद्योगासाठी दुसरा प्राधान्यक्रम ठरविण्यात आला होता. त्यानंतर कृषी व जलविद्युत यांच्याकरिता तिसरा प्राधान्य क्रम ठरविण्यात आला होता त्यानंतर पर्यावरण आणि करमणूक यासाठी चौथा प्राधान्य क्रम व इतर सर्व वापरासाठी पाचवा प्राधान्य क्रम ठरविण्यात आला होता. ही जलनीती 2003 साली राज्यासमोर आणली होती. एका बाजूला वीज क्षेत्रामध्ये वीज नियामक आयोगामुळे प्रगती सुरु होती. विजेच्या दराबद्दलचे नियम काय असावेत,किती तास भारनियमन करावयाचे, कॉस्ट सबसिडी कशी द्यावयाची याचा निर्णय नियामक आयोगाकडून घेतले जातो. अशा प्रकाराची व्यवस्था पाण्याच्या बाबतीतसुध्दा व्हावी यासाठी 2005 साली आपल्या राज्याने जलसंपत्ती नियमन प्राधिकरण निर्माण केले होते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नंतर श्री.सरफरे

DGS/ 16:45

श्री. पृथ्वीराज चव्हाण...

आणि त्या प्राधिकरणामध्ये देखील पाणी वापरण्याचा प्राधान्यक्रम असाच राहिल. पहिले प्राधान्य पिण्याच्या पाण्याला दिले जाईल, दुसरे प्राधान्य उद्योगाला दिले जाईल आणि तिसरे प्राधान्य शेतीला दिले जाईल. या अनुषंगाने आपण प्राधिकरणाचे काम चालू केले आहे. आपला जो जुना जलसिंचन कायदा आहे, तो रद्दबातल ठरवून एक प्राधिकरण निर्माण करुन जलवाटपाचे अधिकार शेतकऱ्यांनी स्थापन केलेल्या सोसायटयांना ध्यावेत. या करिता दोन कायदे, दोन संकल्पना पुढे येऊन सन 2005 मध्ये नवीन कायदा करण्यात आला. त्या बाबत निर्णय घेत असतांना सन 2003 च्या शासन निर्णयानुसार जल संपदा मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समिती स्थापन करणे आवश्यक होते त्याप्रमाणे ती स्थापन करण्यात आली. सन 2005 च्या जलसंपत्ती नियमन प्राधिकरण कायद्यानुसार प्राधिकरणामार्फत पाण्याचे वाटप व्हावे अशाप्रकारची व्यवस्था करण्यात आली. सन 2005 चा कायदा निर्माण झाल्यानंतर उच्याधिकार समितीचे काम संपणे आवश्यक होते परंतु तसे झाले नाही. ज्यावेळी प्राधिकरणाचे काम सुरु झाले होते त्या पाच वर्षाच्या काळात उच्याधिकार समितीच्या माध्यमातून सुध्दा निर्णय घेतले गेले. म्हणून त्या व्यवस्थेमध्ये सुधारणा करण्यासाठी आजचे हे विधेयक आणले आहे. या बाबत विस्तृतपणे चर्चा करीत असतांना प्रामुख्याने हा एक विषय आपल्यासमोर आला. मी माझ्या दालनामध्ये बसून माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे साहेबांचे भाषण ऐकत होतो. त्याचप्रमाणे या अगोदर माननीय विरोधी पक्षनेत्यांबरोबर मी माझ्या दालनामध्ये चर्चा केली होती. तसेच, या करिता मी विदर्भाच्या आणि कोकणातील आमदार महोदयांबरोबर बैठक घेतली. त्यानंतर प्रकर्षाने एक बाब पुढे आली कदाचित ती खरी किंवा खोटी असू शकेल. यामध्ये शेतीला लागणारे पाणी मोठया प्रमाणात उद्योगाकडे विशेषत: वीज निर्मितीसाठी वळविले जाणार आहे अशी चर्चा सुरु झाली. या चर्चेमधून त्या प्रकल्पांची नावे देखील समोर आली आहेत. महाराष्ट्राला किती वीज लागणार आहे, याबाबत आपण गंभीरपणे विचार केला पाहिजे. त्यामध्ये कोळशावर आधारित किती वीज प्रकल्प उभे करावयाचे, पवन चक्क्या किती उभ्या करावयाच्या? त्याचबरोबर लहान प्रमाणात सौर ऊर्जेचा पर्याय आपल्यासमोर आहे, अणु ऊर्जेचा दुसरा पर्याय देखील आपण स्वीकारला पाहिजे. या राज्याला आणि देशाला प्रगत राज्य, प्रगत राष्ट्र म्हणून पुढे न्यावयाचे असेल तर आपल्याला मोठया प्रमाणात विजेची गरज लागणार आहे हे मी यापूर्वीच्या माझ्या भाषणामध्ये सांगितले होते. आजची आपल्या देशाची 1 लाख 60 हजार मेगावॅट इतकी विद्युत निर्मिती क्षमता आहे आणि चीनची 7 लाख मेगावॅट इतकी विद्युत निर्मिती क्षमता आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. पृथ्वीराज चव्हाण...

सन 2030 पर्यन्त आपल्याला एक प्रगत राज्य म्हणून पुढे जावयाचे असेल, या राज्यातील प्रत्येक घरामध्ये आपल्याला वीज न्यावयाची असेल तर किमान 6 लाख मेगावॅट इतकी वीज निर्माण करावी लागेल. म्हणजे आजच्या क्षमतेच्या चौपट वीज निर्मिती करावी लागेल. त्या करिता आपल्याकडे उपलब्ध असलेल्या प्रत्येक साधनांचा वापर करुन ही वीज निर्मिती करावी लागेल. त्यामध्ये कोळसा हे सर्वात मोठे साधन आहे, त्याचप्रमाणे नैसर्गिक तेल हे देखील एक महत्वाचे साधन आहे, जल विद्युत निर्मिती करावी लागेल, त्याचप्रमाणे इतर अपारंपारिक ऊर्जेचे पर्याय आपल्याला वापरावे लागतील.

आपल्या राज्यात यापुढे मोठया प्रमाणात जल विद्युत प्रकल्प होतील असे वाटत नाही. याचे कारण त्यामध्ये पुनर्वसनाचा प्रश्न गंभीर स्वरुपाचा आहे, जमिनीचा देखील प्रश्न आहे. कोळशापासून औष्णिक वीज निर्माण करण्यात आली तरी त्यामधून स्मोक आणि राख निर्माण होत असल्यामुळे चंद्रपूरसारख्या जिल्ह्यामध्ये मोठा प्रक्षोभ निर्माण होत असल्याचे आपण पहात आहोत. त्यामुळे औष्णिक वीज निर्मिती प्रकल्पाचे नाव काढले तर त्यामुळे कोकण, विदर्भ, मराठवाडा या भागामध्ये चिंतेचे वातावरण निर्माण होत आहे. त्याचबरोबर एका बाजूला कोळशावर आधारीत वीज निर्मिती करण्यासाठी त्या प्रकल्पाला पाणी द्यावयाचे आणि तेच पाणी शेतीसाठी वापरावयाचे हा गंभीर स्वरुपाचा विषय झाल्यामुळे आमच्या विदर्भातील सहकाऱ्यांनी याबाबत खूप चिंता व्यक्त केली आहे. आपण राज्यात किती वीज प्रकल्प उभे करीत आहोत, त्यामध्ये होऊ घातलेले वीज प्रकल्प खाजगी क्षेत्रातील आहेत, सार्वजनिक क्षेत्रातील आहेत, राज्य सरकारचे आहेत, केंद्र सरकारचे आहेत काय? सदर प्रकल्प कोणकोणत्या जिल्ह्यामध्ये उभे रहात आहेत, ते पूर्ण होण्याची शक्यता आहे काय? याबाबत चिंता व्यक्त करण्यात आली. त्या संबंधीची एक श्वेतपत्रिका सादर करण्याची मागणी करण्यात आली.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण . . ..

सभापती महोदय, आपल्याला सर्वांना माहिती आहे की, केंद्र शासनाच्या नवीन धोरणाप्रमाणे आज कोणत्याही खाजगी व्यक्तीला कुठेही वीज प्रकल्प उभा करता येतो. त्यासाठी जमीन घ्यावयाची, केंद्र शासनाकडून कोळशाचे लिंकेज घ्यावयाचे, पैसे उभे करावयाचे आणि प्रकल्प सुरु करावयाचा. फक्त पाण्यासाठी राज्य शासनाकडे जावे लागते. एका दृष्टीने पाण्याचा परवाना हे वीज निर्मिती प्रकल्पासाठी लागणारे लायसन्स आहे अशा प्रकारची व्यवस्था निर्माण झालेली आहे. म्हणून एका बाजूला विजेची प्रचंड वाढती भूक आणि दुसऱ्या बाजूला सिंचनाचा बॅकलॉग अशा वेळी आपण या दोन्हीमध्ये कशा प्रकारचा सुवर्णमध्य गाठावयाचा असा प्रश्न राज्यकर्त्यांसमोर आणि राज्य व्यवस्थेसमोर बऱ्याच वर्षापासून प्रलंबित राहिलेला आहे. याठिकाणी मी जल नीतीबाबत विचार करीत असताना किंवा मी केंद्र शासनामध्ये असताना देखील हा विषय आमच्यासमोर आला होता. मी त्यावेळी पंतप्रधान कार्यालयामध्ये असल्यामुळे सगळेच विषय त्याठिकाणी येत असत. त्यावेळी या बाबी पाहिल्यानंतर मला असे दिसून आले की, महाराष्ट्र हे एकमेव राज्य असे आहे की, ज्याठिकाणी आपण उद्योगाला व्दितीय प्राधान्यक्रम दिलेला आहे. आपण राष्ट्रीय धोरण पाहिले तर त्याठिक्‍राणी कृषी साठी व्दितीय प्राधान्यक्रम दिलेला आहे.जर आपण जगातील राष्ट्रीय धोरणे पाहिली तर त्यामध्ये प्रथम पिण्यासाठी पाणी, नंतर कृषी आणि त्यानंतर उद्योग असा प्राधान्यक्रम दिलेला आहे. मग महाराष्ट्रामध्ये असे का झाले? कदाचित 1960 मध्ये हे एक औद्योगिक राज्य आहे म्हणून येथे औद्योगिकीकरण मोठ्या प्रमाणात झाले पाहिजे अशा प्रकारचा मॅसेज सगळीकडे गेला पाहिजे अशी कल्पना असू शकते. म्हणून कदाचित तसे झाले असेल आणि आपण तीच जल नीती 2003 मध्ये पुन्हा प्रचलित केली.

सभापती महोदय, मला आज याठिकाणी सांगण्यास आनंद वाटतो की,याबाबतीत संपूर्ण मंत्रिमंडळाने तसेच माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार,माननीय मंत्री श्री.सुनीलजी तटकरे आणि आमच्या पक्षाच्या सर्व नेतेमंडळींनी गेल्या काही दिवसापासून या विषयाबाबत विचार केला आणि विचार केल्यानंतर आम्ही या निर्णयाप्रत आलो की,पहिल्यांदा 1960 आणि 2003 मध्ये घेण्यात आलेल्या धोरणामध्ये आपल्याला बदल करावा लागेल आणि त्याबाबत आज विस्तृत चर्चा देखील झ ालेली आहे आणि तशा प्रकारचा निर्णय सरकारने घेतलेला आहे.मला अतिशय आनंद वाटतो की, आज आम्ही राज्याच्या जल नीतीच्या धोरणामध्ये बदल करुन पहिल्या क्रमांकावर पिण्याचे पाणी दुसऱ्या क्रमांकावर कृषी आणि तिसऱ्या क्रमांकावर उद्योग अशा प्रकारचा क्रम ......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ठरविलेला आहे. मला असे वाटते की, हा अत्यंत ऐतिहासिक आणि क्रांतीकारक निर्णय आहे.कारण आज महाराष्ट्रामध्ये फक्त 16 ते 17 टक्के भूमीमध्ये सिंचन होते हे आपल्याला सर्वांना माहिती आहे. देशाची सरासरी पाहिली तर ती 30 टक्के आहे. पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश यासारख्या राज्यांमध्ये ही टक्केवारी 70, 80, 90 टक्के सिंचन होत आहे. आपण सिंचन वाढवून-वाढवून वाढविले तरी ते फार मोठ्या प्रमाणात वाढविता येणार नाही. म्हणून उपलब्ध असलेल्या पाण्याचा वापर अतिशय योग्य प्रकारे केला पाहिजे. याबाबतीत ठिबक सिंचनाची व्यवस्था करण्याची गरज असेल तर ती करावी लागेल. संगणकाच्या माध्यमातून पाणी वाटप करावे लागेल इ.आपल्याला सगळया गोष्टी कराव्या लागतील. परंतु खाद्य सुरक्षितता आणि आमचा शेतकरी बांधव हा अत्यंत महत्वाचा राज्यकर्ता आहे हे देखील याठिकाणी सूचित करणे गरजेचे होते. म्हणून हा ऐतिहासिक आणि क्रांतीकारक निर्णय राज्य शासनाने घेतलेला आहे. अर्थात याचा अर्थ आम्ही उद्योगाला कमी प्राधान्य दिले असले तरी आम्हाला उद्योग नको आहेत असा याचा बिलकूल अर्थ होत नाही. पण या पुढच्या काळामध्ये उद्योगासाठी वेळ पडली तर सांडपाणी विकत घेऊन ते शुध्द करुन वापरावे लागेल. शेती किंवा पिण्याच्या पाण्याबाबत खूप अडचणी येणार आहेत. म्हणून याबाबतही निर्णय घेणे आवश्यक आहे. कारण मी प्रत्येक ठिकाणी पाहिल्यावर दिसून आले की, पाणी हा अत्यंत गंभीर आणि महत्वाचा विषय झालेला आहे. म्हणून आज आम्ही जो धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे, तो आम्ही राबवू. पण त्याचबरोबर या राज्यामध्ये औद्योगिकीकरणामध्ये वाढ होईल याबाबत मी आपल्याला आश्वासन देतो. राज्यामध्ये औद्योगिकीकरण झाले पाहिजे कारण आज सुशिक्षित मुले मोठ्या प्रमाणात शिकून बाहेर पडत आहेत. अशा वेळी त्यांच्या हाताला काम मिळाले पाहिजे आणि सिंचनासाठी, शेतीसाठी वीज किती गरज आहे हे आपल्याला माहिती आहे.अशा वेळी राज्यामध्ये शेतीसाठी वीज पाहिजे, उद्योगही पाहिजेत आणि अधुनिक शेती निर्माण झाली पाहिजे आणि या सर्व गोष्टींचा सुवर्णमध्य गाठण्यासाठी राज्याच्या मंत्रिमंडळाने हा महत्वाचा निर्णय घेतलेला आहे.

सभापती महोदय, याठिकाणी दुसरी एक महत्वाची मागणी करण्यात आली होती आणि त्याबाबत उप सूचना मांडण्यात आली आहे.ही मागणी अशा प्रकारची होती की, प्राधान्यक्रम ठरवित असताना उद्योगाला किती पाणी द्यावयाचे, कोणत्या जिल्ह्यामध्ये किती उद्योग व्हावयास पाहिजेत याबद्दलचा निर्णय मंत्रिमंडळाच्या स्तरावर घेतला जाईल.कारण हा अत्यंत महत्वाचा निर्णय आहे.हा





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अत्यंत जिव्हाळ्याचा निर्णय आहे. त्यामुळे हा निर्णय मंत्रिमंडळामध्येच घेण्यात यावा अशी महत्वाची उप सूचना मांडण्यात आलेली आहे.

यानंतर कु.थोरात . ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण.....

शासनाने ती उप सूचना मान्य करण्याचे ठरविलेले आहे, त्यामुळे सभागृहाने हे विधेयक पारित केल्या नंतर पुन: ते या दुरस्तीसह विधानसभेमध्ये जाईल. या ठिकाणी अतिशय चांगली साधक-बाधक चर्चा झालेली आहे. पाण्याच्या वापरा संबंधी पारदर्शकता निर्माण झाली पाहिजे. नियामक मंडळ महत्वाचे आहे. पाण्याचा दर ठरविण्याची महत्वाची भूमिका नियामक मंडळाने निभवावयाची आहे. परंतु पाण्याच्या वापरा बद्दलचा निर्णय मंत्रिमंडळ करील. या अशा व्यापक अशा धोरणा नंतर जलसंपदा मत्री हे विधेयक या ठिकाणी मांडतील, त्याला सभागृहाने संमती द्यावी, अशी विनंती करुन मी थांबतो. जय हिंद. जय महाराष्ट्र.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री यांनी या सदनातील सर्व सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन अत्यंत महत्वपूर्ण आणि क्रांतिकारक निर्णय या सदनामध्ये जाहीर केला आहे. सन 1960-1962 च्या दरम्यान घेतलेल्या निर्णयामध्ये आतापर्यंत कोणतीही सुधारणा करण्यात आली नव्हती. त्यामुळे शेतीच्या पाण्याचा क्रम तिसऱ्या ते चौथ्या क्रमांकावर जात होता. पिण्याच्या पाण्यानंतर शेतीच्या पाण्यासाठी दुसरा क्रमांक देण्याचा निर्णय माननीय मुख्यमंत्री यांनी जाहीर केला आहे. त्याबद्दल मी या सदनाच्या वतीने, सर्व जनतेच्या वतीने आणि शेतकऱ्यांच्या वतीने माननीय मुख्यमंत्र्यांचे आभार व्यक्त करु इच्छितो.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री यांनी श्वेतपत्रिकेच्या बाबतीत या ठिकाणी सांगितले. पाण्याचे नियोजन कसे असावे, पाण्याचे व्यवस्थापन कशा पध्दतीने होईल या संदर्भात एकूण संपूर्ण पाण्याच्या संदर्भामध्येच एक श्वेतपत्रिका जाहीर करुन पुढच्या वेळेला तसे धोरण आखून शासन पुढे जाईल असाही उल्लेख माननीय मुख्यमंत्री यांनी केला आहे. आज जेवढी गरजेची वीज आहे तेवढेच प्रकल्प घेण्यात येतील आणि इतर अधिकचे प्रकल्प असतील, अडचणीचे प्रकल्प असतील किंवा शेतकऱ्यांच्या हिताचे प्रकल्प नसतील तर अशा प्रकाल्पांच्या बाबतीत कॅबिनेटमध्ये चर्चा करण्यात येईल असेही सांगितले आहे. विधानपरिषदेमध्ये हे विधेयक पारित झाल्यानंतर विधानसभेमध्ये सुध्दा या संदर्भामध्ये चर्चा होणार आहे आणि सर्व विदर्भातील सन्माननीय सदस्यांना यासंबंधीच्या भावना व्यक्त करण्याची संधी मिळणार आहे. एकूणच या संदर्भामध्ये या राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी जी भूमिका घेतली आहे, त्या बाबतीत त्यांनी या ठिकाणी जाहीरपणे वक्तव्य

...2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/

श्री. माणिकराव ठाकरे...

केलेले आहे, तशा प्रकारची स्पष्टपणे घोषणा केली आहे आणि यापुढे अशा प्रकारचे निर्णय घेण्यात येतील असे सांगितले, त्याबद्दल मी त्यांचे आभार व्यक्त करतो. विशेषत: शेतकऱ्यांच्या वतीने आणि विदर्भातील जनतेच्या वतीने मी माननीय मुख्यमंत्र्यांचे आभार मानतो.

श्री. दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी शेतकऱ्यांच्या वतीने माननीय मुख्यमंत्र्यांचे आभार मानले आहेत त्याबद्दल बोलण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. सभापती महोदय, शासनाने आपली सहृदयता आणि प्रामाणिकपणा व्यक्त करण्यासाठी सिंचनाच्या बाबतीत अतिशय मागासलेला असलेला अमरावती जिल्हा लक्षात घ्यावा. आजही या अमरावती जिल्ह्याचा सिंचनाचा अनुशेष 17 हजार कोटी रुपये आहे हे लक्षात घेऊन सोफिया प्रकल्प ताबडतोबिने तातडीने रद्द करण्यात यावा अशी मी या ठिकाणी मागणी करतो.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, या राज्याचे मुख्यमंत्री माननीय श्री. पृथ्वीराज चव्हाण साहेब यांनी जे धोरण या ठिकाणी जाहीर केले आहे. त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, या राज्यातील शेतकऱ्यांवर, शेतीवर आणि सिंचनावर वर्षानुवर्षे अन्याय झालेला आहे. 1960 साली श्री. बर्वे यांच्या समितीने शेतीच्या पाण्याचा जो क्रम सुचविलेला होता,

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

आणि ज्या क्रमामुळे आजपर्यंत या महाराष्ट्रातील या महाराष्ट्राच्या सिंचनामध्ये शेतकऱ्यांच्या शेतीच्या बाबतीत फार प्रगती होऊ शकली नाही. विदर्भ आणि कोकणामध्ये तर सिंचनाचा प्रचंड बॅकलॉग निर्माण झाला. बर्वे कमिटीचे सूत्र धरुन 1960 पासून 2003 पर्यंत, त्यानंतर 2003 ते 2005 पर्यंत आणि 2005 ते 2011पर्यंत म्हणजे जवळपास 50 वर्षे या राज्यातील शेतकऱ्याला कनिष्ठ दर्जा दिला गेला.

सभापती महोदय, ज्यावेळी या देशाला स्वातंत्र्य मिळाले त्यावेळी "उत्तम शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी" अशी एक म्हण प्रचलित होती. परंतु स्वातंत्र्यानंतर उत्तम शेतीला प्रमुख उद्योगाचे स्थान कधीही मिळाले नाही. या महाराष्ट्रातील शेतकऱ्याला सिंचनाच्या पाण्यासाठी, आपला क्रम वर जावा यासाठी 50 वर्षे वाट पहावी लागली. मी माननीय मुख्यमंत्र्यांचे पुन्हा एकदा अभिनंदन करीन की, 50 वर्षानंतर आजचा दिवस हा महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये ऐतिहासिक दिवस आहे. गेली 50 वर्षे ज्यासाठी शेतकरी वाट पहात होता असा हा दिवस आहे. धरण झाले पण धरणातील पाणी शेतकऱ्यांकडे पाहात होते आणि शेतकरी धरणातील पाण्याकडे पाहात होता. ज्या धरणामध्ये शेतकऱ्याची शेती गेली, ज्या धरणामुळे शेतकरी निराधार झाला, भूमिहीन झाला, त्याचे पुनर्वसन वर्षानुवर्षेझाले नाही. त्यांच्या मुलांना नोकऱ्या मिळाल्या नाहीत. ते देशोधडीला लागले. त्यांनी दुसऱ्यांसाठी त्याग केला. धरण बांधले गेले, धरणामध्ये पाणी साचले पण ते पाणी मिळवित असताना शेतकऱ्याला तिसऱ्या नंबरवर उभे राहावे लागले. शेतकऱ्यांनी आपली जमीन सरकारला धरणासाठी दिली त्यावेळी आपल्या उरलेल्या शेतीला निश्चितपणे पाणी मिळेल, आमच्या बांधवांना पाणी मिळेल, आमच्या मुलाबाळांना पाणी मिळेल, आमची जमीन सुजलाम सुफलाम होईल, अन्नधान्याचे उत्पादन वाढेल असे त्यांना वाटले होते. म्हणून मी सांगितले की, यासाठी त्याला 50 वर्षे वाट पहावी लागली.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी उल्लेख केला ती गोष्ट खरी आहे. 2003 ला या राज्याची जलनीती आली. ती जलनीती आल्यानंतर मघाशी माननीय मंत्री महोदयांनी सांगितल्याप्रमाणे पाटबंधारे अधिनियम, 1976 निर्गमित न करता त्याचा आधार घेऊन

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. पांडुरंग फुंडकर ....

2005 मध्ये शासनाने महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, 2005 आणले. प्रामाणिक माणूस असला की, प्रामाणिक शब्द बाहेर पडतात. माननीय मुख्यमंत्र्यांनी आता निवेदन करीत असताना सांगितले की, हे बिल ज्या दिवशी आले त्याच दिवशी हे व्हावयास पाहिजे होते. कदाचित त्याच दिवशी जर हा निर्णय झाला असता तर जलसंपत्ती अधिनियम, 2005 झाल्यानंतर या राज्यात पाच वर्षात जे पाणी पळविले गेले, शेतकऱ्यांच्या सिचंनाचे जे पाणी उद्योगाला दिले गेले, पॉवर जनरेशनला दिले गेले,

यानंतर श्री. गिते ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ प्रथम श्री.शिगम 17:05

श्री. पांडुरंग फुंडकर...

त्यामुळे शेतकऱ्यांच्या ताटातील भाकरी ओढली गेली. आज माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, 2005 मध्ये ज्या दिवशी हे विधेयक सभागृहासमोर आले होते, त्याच दिवशी हा निर्णय झाला असता तर खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांना न्याय मिळाला असता. या विधेयकात दुरुस्ती आणण्याचे कारण काय ? 2005 पासून ज्या उद्योगांना पाणी दिले गेले, ते रेग्युराईज करण्यासाठी हे विधेयक सभागृहासमोर आलेले आहे. 2005 पासून ते 2010 पर्यंत शासनाने शेतकऱ्यांचे पाणी पळविण्याचे पाप केले आहे. त्यावर पांघरुण घालण्यासाठी हे विधेयक शासनाने सभागृहासमोर आणलेले आहे असे म्हटले तर ते काही वावगे होणार नाही. आता माननीय मुख्यमंत्र्यांनी कबुली दिली की, 2005 मध्ये ज्या दिवशी हे विधेयक सभागृहात मांडण्यात आले होते, त्यावेळीच हा निर्णय व्हावयास पाहिजे होता. 2003 मध्ये प्राधिकरण केले गेले. 2005 मध्ये उच्चाधिकार समिती नेमली गेली. शासनाने प्राधिकरण केले होते, तर उच्चाधिकार समिती नेमण्याची काहीही गरज नव्हती. या राज्यात अधिकाराचे केंद्रीकरण झाले आहे.

सभापती महोदय,या देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या देशाला कृषी प्रधान म्हटले गेले. या देशातील 75 टक्के शेतकरी शेती करतात म्हणून या देशाला कृषी प्रधान देश म्हणून संबोधले गेले आहे. परंतु या देशात नियोजनाची दिशा उलटी फिरवली गेली. शेतीला प्राधान्य दिले गेले नाही. शेतकऱ्यांच्या शेतीला उद्योगाचा दर्जा दिला गेला नाही. जर त्यावेळेलाच शेतीला उद्योगाचा दर्जा दिला गेला असता तर उद्योगास पाणी दिले गेले नसते. परंतु त्यावेळेला नियोजन उलटे फिरले. उद्योगाला प्रथम दर्जा दिला गेला. शेतीला कनिष्ठ दर्जा दिला गेला म्हणून शेतकऱ्याला पाणी मिळाले नाही. शेतकऱ्याला वीज मिळाली नाही. शेतकऱ्याला आपल्या मालाचा भाव ठरविता आला नाही. शेतकऱ्यांच्या मालाला बाजारपेठ मिळाली नाही. शेतकऱ्यांच्या धान्याला योग्य तो भाव मिळाला नाही. निसर्गाच्या भरवशावर शेती करणारा शेतकरी सिंचनाची व्यवस्था नसल्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती बिकट झाली. शेतकऱ्यांवर नैसर्गिक संकटे आली आणि दिवसेंदिवस हळूहळू शेतकरी अडचणीत जाऊ लागला. शेवटी तो कर्जबाजारी झाला. शेतकरी कर्जबाजारी झाल्यामुळे गेल्या पाच, सात वर्षामध्ये त्याचे परिणाम अतिशय वाईट झाले. शेतकरी कर्जबाजारी झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या सुरु झाल्या.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

या ठिकाणी उल्लेख झाला की, एकटया विदर्भात 5 हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. त्यामुळे माननीय पंतप्रधानांनी विदर्भास भेट दिली. आणि त्यांनी आत्महत्याग्रस्त जिल्हयासाठी स्वतंत्र पॅकेज जाहीर केले. देशाचा अन्नदाता असणारा शेतकरी कशामुळे आत्महत्येपर्यंत गेला. त्यांच्या शेतीला पाणी आणि वीज दिली असती, त्यांच्या शेतातून निर्माण होणाऱ्या मालाला योग्य भाव मिळाला असता, तर कदाचित हे शेतकरी आत्महत्या करण्यास प्रवृत्त झाले नसते. शेतकऱ्याच्या शेतीला प्रमुख उद्योगाचे स्थान मिळाले नाही. त्यांच्या शेतीला प्राधान्य मिळाले नाही, पाणी उपलब्ध होते, परंतु शेतकऱ्यांच्या शेतीला पाणी मिळत नाही. शेतकऱ्यांच्या नावावर राज्यात मोठया प्रमाणात धरणे बांधली गेली.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर......

त्याला आशेचा किरण दाखविण्यात आला. पण त्या धरणातील पाणी मात्र त्याला मिळाले नाही. महाराष्ट्रातील सिंचन वाढले पाहिजे जास्तीत जास्त जमीन सिंचनाखाली आली पाहिजे, या हेतूने धरणे बांधण्यात आली. या पुढील काळात धरणे बांधताना हेच सांगितले जाईल की, शेतकऱ्यांच्या सिंचनासाठी आम्ही धरणे बांधीत आहोत. धरण बांधण्याचा निर्णय झाला की, जमिनीचा प्रश्न येतो. त्यासाठी शेतकऱ्यांकडून जमीन घेतली जाईल. भूसंपादन केले जाईल. स्वखुशीने जमीन दिली नाही तर जबरदस्तीने घेतली जाईल. बंदुका दाखवून जमीन संपादित केली जाईल. 1894 चा ब्रिटिशकालीन कायदा भूसंपादनासाठी वापरला जातो. शेतकरी भूमिहीन झाला तरी चालेल. परंतु त्याची जमीन संपादित झाली पाहिजे, अशा पध्दतीचे धोरण या राज्यामध्ये राबविले जात आहे.

सभापती महोदय, धरणे बांधली जातात, त्यातील पाण्याचा लाभ प्राधान्याने शेतकऱ्यांना मिळालेला नाही. धरणातील पाण्याचा लाभ शेतकऱ्यांना किंवा त्यांच्या शेतीला न मिळता तो उद्योगांना मिळू लागला. जमीन शेतकऱ्यांची, पाणी निसर्गाचे आणि उद्योगपतींना मात्र पाणी विनासायास दिले जाते. वर्षानुवर्षे त्या भागात जगणारा शेतकरी मात्र विस्थापित होतो. त्याला भूमिहीन केले जाते. त्याच्या हक्काच्या जमिनीवरुन त्याला हाकलून दिले जाते. धरणातील पाण्यावर दुसराच कोणीतरी अधिकार सांगतो.

सभापती महोदय, शासनाने दिनांक 17 सप्टेंबर, 2010 रोजी अध्यादेश काढला होता व त्या अध्यादेशाचे कायद्यात रुपांतर करण्यासाठी हिवाळी अधिवेशनात विधेयक आणण्याचा प्रयत्न झाला होता. परंतु हिवाळी अधिवेशनात अशा पध्दतीच्या विधेयकाला विरोध झाला. 2005 च्या मूळ कायद्यात जी सुधारणा करण्यात येणार होती त्यामध्ये मेख होती. म्हणून त्या विधेयकाला विरोध झाला आणि नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात हे विधेयक मंजूर होऊ शकले नाही. त्यामुळे शासनाने पुन्हा दिनांक 11 जानेवारी, 2011 रोजी अध्यादेश निर्गमित केला. त्या अध्यादेशाच्या अनुषंगाने हे विधेयक सभागृहासमोर आलेले आहे. मूळ विधेयक अतिशय गंभीर स्वरुपाचे होते. विधानसभेत हे विधेयक रात्री 1.00 वाजता मंजूर झाले. या विधिमंडळामध्ये अशी प्रथा नाही. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा विषय असताना, माननीय श्री.पृथ्वीराज चव्हाण या राज्याचे मुख्यमंत्री असताना, या राज्याचे सुवर्ण महोत्सवी वर्ष आणि विधिमंडळाचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे होत असताना अशा प्रकारचे ऐतिहासिक विधेयक रात्री 1.00 वाजता मंजूर

..2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर......

केले जाते. मी तांत्रिक बाबीविषयी बोलणार नाही. परंतु हे खरे आहे की, कामकाज सल्लागार समितीमध्ये दिनांक 14 एप्रिल, 2011 रोजी सभागृहाला सुट्टी जाहीर केलेली होती. असे असताना या विधेयकामध्ये असे नमूद केले आहे की, "महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, 2005 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विधानसभेने दिनांक 14 एप्रिल, 2011 रोजी संमत केल्याप्रमाणे."

नंतर 3एम.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ........

दि. 13 एप्रिल, 2011 रोजी मध्यरात्रीनंतर असे म्हटले असते तरी चालले असते. या विधेयकाच्या बाबतीत आमचे दोन आक्षेप होते. त्यात पहिला आक्षेप म्हणजे प्राधिकरणाची उच्चाधिकार समिती नेमण्यात आली होती त्या समितीलाच हे अधिकार असता कामा नये तर लोकांनी निवडून दिलेल्या लोक प्रतिनिधींना हे अधिकार असले पाहिजेत म्हणूनच पाणी वाटपाचे सुत्र ठरविण्याचे अधिकार मंत्रिमंडळाकडे गेले पाहिजेत. त्यानंतर दुसरा आक्षेप असा होता की, शेतकऱ्याला पाणी वाटप करताना प्राधान्यक्रम तिसऱ्या नंबरवर होता तो अग्रक्रम दुसऱ्या क्रमांकावर असावा. तिसरी बाब म्हणजे अन्यायाविरुध्द कोर्टात दाद मागता येणार नाही ही अट घालून ठेवली आहे त्याला आमचा आक्षेप होता. आम्ही तशा सुधारणाही दिलेल्या आहेत. तसेच विधेयकाच्या पृ.क्र. 4 वर 31 (ग) येथे असे म्हटले आहे की, या अधिनियमात किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कुठल्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) विधेयक, 2011 याच्या कलम 1 च्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी म्हणजेच दि. 17 सप्टेबर, 2010 पूर्वी उच्चाधिकार समितीने किंवा नदी-खोरे अभिकरणाने अथवा राज्य शासनाने दिलेली परवानगी, वाटप, मंजुरी, प्राधिकार किंवा पाण्याची हक्कदारी ही वैध असेल आणि नेहमीकरिता वैध असल्याचे मानण्यात येईल आणि तद्नुसार कोणत्याही न्यायालयासमोर, न्यायाधिकरणासमोर किंवा इतर प्राधिकरणासमोर, पाणी घेण्यासाठी अशी परवानगी, वाटप, मंजुरी, प्राधिकार किंवा पाण्याची हक्कदारी यांना आक्षेप घेणारा कोणताही दावा, खटला किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही. याचा अर्थ आपण हुकूमशाहीकडे चाललो की काय अशी शंका येते. या देशातील जनतेला, सामान्य माणसाला समान स्वातंत्र्य, समान अधिकार तसेच समान हक्क डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले आहेत. अशा स्वातंत्र्यावर गदा आणून कोर्टात जाण्याचा हक्क सुध्दा हे शासन हिरावून घेण्याचे काम करीत आहे यालाच आम्ही सुधारणा सुचविल्या आहेत. मी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करतो की, या विधेयकाचा आपण फेरविचार करावा. ज्याप्रमाणे कृषी संबंधीचा निर्णय घेतला त्याप्रमाणेच याचाही फेरविचार करावा....

...2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार : महोदय, सन्माननीय सदस्यांनी उपसूचना मांडली, ती मंजूर झाली. त्यानंतर माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांनी ऐतिहासिक घोषणा करुन ते कलम कसे बदलले हे सर्व सांगितल्यानंतर किंवा ती उपसूचना मांडून सन्माननीय सदस्यांना काय सांगायचे आहे हे मला कळत नाही. माझी एकच विनंती आहे की, आपल्या भावनांना कोणाचाही विरोध नाही पण बोलत असताना महाराष्ट्राच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात असा जो नेहमी उल्लेख करीत आहेत त्यामागचा हेतू मी समजू शकतो. राज्यातील जनतेसमोर हे गेले पाहिजे हे ही मला मान्य आहे. तसेच विदर्भातील आमदारांना बोलण्याची संधी मिळाली, इतकेच नव्हे तर सर्वांनाच बोलण्याची संधी मिळेल म्हणून बोलताना ज्या भावना व्यक्त होत आहेत त्या सुध्दा ऐतिहासिकच असल्या पाहिजेत. कारण सगळ्याच भागात शेतकऱ्यांचे दु:ख सारखेच असते, वेदनाही सारख्याच असतात.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार ....

शेवटी मला एवढेच सांगावयाचे आहे की, आपण एक वाक्य असे उच्चारले आहे की, "सन्माननीय श्री. स.गो.बर्वे यांनी महाराष्ट्रावर अन्याय केलेला आहे". परंतु कृपया त्यांच्या बद्दल असे वाक्य वापरणे योग्य होणार नाही, कारण ते फार मोठे अधिकारी होते. ते त्या कमिटीचे हेड होते त्यामुळे त्यांच्या संदर्भात असे म्हणू नये एवढेच मला सांगावयाचे होते. ज्यांना ज्यांना न्यायाची अपेक्षा आहे त्या सर्वांना संधी मिळेल अशी भावना व्यक्त केली गेली पाहिजे. आपण या ठिकाणी असेही म्हटले आहे की, या राज्याला एक उत्तम असा मुख्यमंत्री मिळालेला आहे त्यामुळे मी आपल्याला विनंती करतो की, उद्या माननीय मुख्यमंत्री विधान परिषदेच्या सदस्यत्वासाठी फॉर्म भरणार आहेत त्यामुळे आपण त्यांना बिनविरोध निवडून पाठवा, अशी मी तमाम महाराष्ट्राच्या जनतेच्या वतीने आपल्याला विनंती करतो.

श्री. रामदास कदम : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जी उप सूचना दिलेली आहे ती वेगळी आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे म्हणणे असे होते की, या बिलामध्ये अशी तरतूद केलेली आहे की, ज्याच्यावर अन्याय झालेला आहे तो न्यायालयात सुध्दा जाऊ शकणार नाही त्यामुळे या बिलामध्ये जो उल्लेख केलेला आहे त्यासाठीच माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी उप सूचना दिलेली आहे व त्या अनुषंगाने मुख्यमंत्र्यांनी निर्णय घ्यावा असे त्यांनी म्हटलेले आहे.

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांचा काही तरी गैरसमज झालेला दिसतो. या बिलामध्ये कोर्टात जाता येणार नाही यासंदर्भात जो उल्लेख आहे त्यासाठी मी अमेंडमेंट दिलेली आहे. कृषीसाठी किंवा मंत्रिमंडळाच्या समोर गेले पाहिजे यासाठी मी अमेंडमेंट दिलेली नाही. शेतक-याला कोर्टात जाण्याचा अधिकार अबाधित असला पाहिजे, यासाठीच मी अमेंडमेंड दिलेली आहे. माझा दुसरा मुद्दा असा आहे की, श्री. स.गो.बर्वे यांनी अन्याय केला आहे असे मी म्हटलेले नाही. सन 1960 मध्ये स.गो.बर्वे समितीचा अहवालाची आवश्यकता असल्यामुळे तशा पध्दतीने अहवाल दिला असेल परंतु आता काळ बदलला आहे. त्यावेळी महाराष्ट्रामध्ये उद्योग धंद्याची संख्या कमी होती. महाराष्ट्रात उद्योग आले पाहिजे अशा भावनेतून त्यावेळेस निर्णय घेतला गेला असावा. परंतु 1960 ते 2010 यामध्ये 50 वर्षाचा काळ लोटला आहे. श्री. स.गो.बर्वे यांचा अहवाल आम्ही 50 वर्षे पुढे चालवत आणला असून त्याचा फेर
विचार करण्याची गरज होती असे मी म्हणालो होतो. शेतीला महत्व देण्याची गरज होती. या राज्याचे मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक झाले नसते तर या राज्यात हरित क्रांती झाली नसती व महाराष्ट्र अन्नधान्याच्या बाबतीतही मागे गेले असते. शेतक-यास न्यायालयात जाण्याचा अधिकार या बिलान्वये हिरावून घेण्यात आलेला आहे तो अबाधित ठेवावयास पाहिजे होतो, त्याच्या मूलभूत हक्कावर तसेच स्वातंत्र्यावर गदा आणावयास नको, त्याला न्यायालयात जाण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे. परंतु आपल्या राज्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात या राज्यातील शेतक-याला हे बिल आणून त्याला कोर्टात जाण्यापासून वंचित करणार असाल, मनाई करणार असाल तर तो शेतक-यावर अन्याय होईल. लोकशाहीच्या माध्यमातून आपली हुकूमशाहीकडे वाटचाल चालली आहे काय, अशा प्रकारचा मेसेज राज्यामध्ये जाणार आहे, त्यामुळेच यासंदर्भात आम्ही अमेंडमेंट दिलेली आहे. या विधेयकाच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांनी जो मुद्दा मांडलेला आहे त्याचा मी पुनरुच्चार करणार नाही. माननीय पंतप्रधानानी आपल्याला जे पॅकेज दिले होते त्यामध्ये माननीय पंतप्रधानांची सुध्दा फसवणूक झालेली आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ...

सभापती महोदय, 1 जुलै 2006 रोजी माननीय पंतप्रधानांनी शेतक-यांच्या आत्महत्येचे प्रमुख कारण सिंचनाची असुविधा असल्याचे अधिकृत वृत्तपत्रात सांगितले होते.माननीय पंतप्रधान विदर्भात आले होते त्यावेळी त्यांनी दोन दिवस येथे वास्तव्य केले होते. त्या कालावधीत ग्रामीण भागातील शेतक-यांच्या घरी जाऊन त्यांनी त्या कुटुंबाची विचारपूस केली होती . शेतक-यांची अनेक शिष्ट मंडळे माननीय पंतप्रधानांना भेटली होती. माननीय पंतप्रधान ज्यावेळी नागपूरला आले होते त्यावेळी मी सुध्दा त्यांची भेट घेतली होती. सिंचनाचा अभाव असल्यामुळेच विदर्भातील शेतकरी आत्महत्या करतात असे माननीय पतप्रधानांचे मत बनले होते. त्यावेळी त्यांनी 2 हजार 177 कोटी रुपयांचा निधी फक्त सिंचनाकरिता उपलब्ध करुन दिला होता . विदर्भामध्ये 75 हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्यासाठी हा निधी वापरण्यात येईल असे प्रमाणपत्र राज्य सरकारने त्यावेळी केन्द्र सरकाराला दिले होते. परंतु या निधीतून तयार झालेल्या धरणातील पाणी इंडिया बुल्सच्या सोफिया कंपनीला देण्यात आले होते. या विधेयकावर बोलत असतांना मी पुनरावृत्ती करणार नाही. सोफिया कंपनीची पूर्ण कहाणी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितली होती. त्यामुळे मी ते मुद्दे पुन्हा मांडणार नाही. मला फक्त एवढेच सांगावयाचे आहे की सोफिया कंपनीला पाणी देण्यात आले होते.

सभापती महोदय, सोफिया कंपनीशी कसा करार करण्यात आला होता या संदर्भात 20 तारखेला काय झाले, 21 तारखेला काय झाले आणि 22 तारखें्ला काय झाले यासबंधी त्यांनी सविस्तर खुलासा केलेला आहे. 20 तारखेला सोफिया कंपनीचा अर्ज आला होता, 21 तारखेला मिटींग घेण्यात आली होती आणि 22 तारखेला सोफिया कंपनीला पाण्याचे अलौटमेन्ट करण्यात आले होते. इतक्या तातडीने हा निर्णय का घेण्यात आला होता.? विदर्भातील गोसीखूर्द, अप्पर वर्धा ,उर्ध्व वर्धा इत्यादी प्रकल्प वर्षानुवषे रखडले होते परंतु त्या प्रकल्पासाठी पुरेसा निधी देण्यात आला नाही. त्यामुळे विदर्भातील सिंचनाचा अनुशेष कायम राहिला होता. सभापती महोदय, सन्माननीय मुख्यमंत्र्यांना मी सांगू इच्छितो की,सिंचनाचा अनुशेष काढण्यासाठी विदर्भासाठी अनेक पॅकेजेस देण्यात आली होती परंतु 2007-2008 पासून 2010 पर्यत दरवर्षी अनुशेष वाढतच गेला आहे.दरवर्षी विदर्भातील सिंचनाचा अनुशेष वाढतच गेला आहे.कदाचित पैशाचा अनुशेष गणिते करुन संपविला असेल परंतु विदर्भातील प्रकल्पाच्या किंमती वाढत गेल्यामुळे भौतिक सिंचनाचा





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ...

अनुशेष मात्र अजूनही संपलेला नाही. एखाद्या प्रकल्पाची मूळ किंमत 500 कोटी रुपये असेल तर तो प्रकल्प 5 हजार कोटी रुपयांचा झाला आहे. त्यामुळे विदर्भाला 5 हजार कोटी रुपये दिले आणि विदर्भातील अनुशेष संपला असे आपण सांगत असाल परंतु त्या भागातील जमिनीला प्रत्यक्षात पाणी मिळालेले नाही. त्यामुळे विदर्भातील भौतिक अनुशेष अजूनही संपलेला नाही. ज्या दिवशी विदर्भातील सिंचनाचा भौतिक अनुशेष संपेल त्यादिवशीच विदर्भाचा अनुशेष ख-या अर्थाने संपणार आहे. तोपर्यत अनुशेष संपणार नाही. त्यामुळे पैशामध्ये अनुशेष मोजता कामा नये.शासनाच्या चुकीमुळे तसेच पैसे देण्यास उशीर केल्यामुळे एक एक प्रकल्प 20 वर्षे रखडला व त्यामुळे विदर्भातील धरणाचे काम पूर्ण झालेले नाही. जिगाव प्रकल्पसुध्दा अनेक वर्षे रखडला आहे.त्यामुळे या प्रकल्पाची किंमत पाच पट वाढलेली आहे. अजूनही या प्रकल्पाच्या कामाला सुरुवात झालेली नाही. फार न बोलता मला एवढेच विचारावयाचे आहे की आज हे विधेयक आणण्याची आवश्यकता का भासली. ? या संदर्भात काढण्यात आलेला अध्यादेश सुरु होता परतु मी सुरुवातीला सागितले की सोफिया पॉवर प्रकल्प असो वा अन्य पॉवर प्रकल्प असो या प्रकल्पाना मान्यता देण्यात आली. त्यामुळे शासनाला हे विधेयक आणण्याची आवश्यकता भासली. सर्व राज्याचा विचार करुन ही मान्यता देण्यात आली नाही. राज्याच्या एकूण ऊर्जेपैकी 4 हजार 500 मेगावॅट वीज विदर्भात तयार होते आणि विदर्भाची विजेची गरज फक्त 1500 मेगावॅट इतकीच आहे.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

सभापती महोदय, विदर्भ हा एक महाराष्ट्राचा भाग असल्यामुळे माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी सांगितल्याप्रमाणे केवळ विदर्भाचा विचार करुन चालणार नाही तर विदर्भामध्ये निर्माण होणारी वीज महाराष्ट्राला दिली तर आम्हाला वाईट वाटणार नाही. परंतु विदर्भामध्ये लोड शेडींग कायम ठेवून जर ती वीज राज्याबाहेर जाणार असेल तर आम्हाला वाईट वाटेल. आज आमच्या विदर्भामध्ये 14-14 तासांचे लोड शेडींग आहे ते अजून थांबलेले नाही. आमच्या जिल्ह्यामध्ये पारस वीज निर्मिती केंद्र आहे. त्याच्याबरोबर आणखी एक नवीन वीज निर्मिती केंद्र सुरु होत आहे. त्यामध्ये 250 मेगावॅट इतकी वीज निर्माण होईल. आज आपण पहात आहोत की, राज्यामध्ये विजेची निर्मिती होत आहे, परंतु ती निर्माण होणारी वीज दुसरीकडे चालली आहे. कोराडी, खापरखेडा, चंद्रपूर हे वीज निर्मिती करणारे प्रकल्प विदर्भामध्ये सुरु आहेत तरी सुध्दा विदर्भाला वीज मिळत नाही. विदर्भाला वीज मिळत नसल्यामुळे आमच्याकडे नवीन कारखानदारी येत नाही. विदर्भातील शेतकऱ्यांच्या पंपाला वीज मिळालेली नाही. आज 5 लाख शेतकऱ्यांचे वीजेचे कनेक्शन पेंडींग आहेत त्यांना अजूनपर्यंत आपण कनेक्शन कां दिले नाही?

सभापती महोदय, या अधिवेशनामध्ये अर्थसंकल्पाचे भाषण करीत असतांना माननीय वित्त मंत्र्यांनी सांगितले की, आम्ही 2 लाख शेतकऱ्यांच्या विजेच्या पंपाना वीज देणार आहोत. आपली मागणी 5 लाख शेतकऱ्यांची असतांना त्यापैकी 2 लाख शेतकऱ्यांच्या पंपाना वीज देणार तर मग बाकीच्या पंपाना आपण वीज कोठून देणार आहात? या ठिकाणी केवळ घोषणा करुन चालणार नाही तर आपण अगोदर वीज निर्माण केली पाहिजे आणि त्यानंतरच घोषणा केली पाहिजे. विदर्भामध्ये वीज निर्मिती प्रकल्प असतांना, वीज निर्माण होत असतांना 5 लाखांच्या अनुशेषापैकी 2 लाख शेतकऱ्यांच्या पंपाना वीज देणार. आज कोकणातील जैतापूरच्या प्रकल्पामध्ये निर्माण होणारी वीज देखील आपल्याला न मिळता ती राज्याबाहेर जाणार आहे. सभापती महोदय, या ठिकाणी माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी भविष्यामध्ये होणाऱ्या 50 प्रकल्पांची यादी वाचून दाखविली आहे. परंतु विदर्भामधील ज्या प्रकल्पांना मंजुरी मिळाली आहे व त्यांच्याबरोबर पाण्याचे करार झाले आहेत अशा प्रकल्पांची नावे मी आपणास वाचून दाखवितो. त्यामध्ये ग्रेटा एनर्जी लिमिटेड, चंद्रपूर, अरनाडे इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड, चंद्रपूर, सेंट्रल इंडिया पॉवर कंपनी, चंद्रपूर, नागपूर एनर्जी इन्फ्रास्ट्रक्चर, देऊळवाडा, एमको एनर्जी, चंद्रपूर, धारीवाल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड, चंद्रपूर, सनफ्लॅग आर्यन, भंडारा, मुरली इंडस्ट्रिज, नागपूर, लेनेक्सीस एनर्जी, नागपूर,



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. पांडुरंग फुंडकर ...

इंडिया बुल्स पॉवर, अमरावती, अदानी पॉवर गोंदिया, पृथ्वी एनर्जी लिमिटेड, चंद्रपूर, पृथ्वी खनिज संपदा भंडारा, इंडोरामा सिंथेटिक्स, यवतमाळ, डी.बी. प्रोजेक्ट, भंडारा, गुप्ता एनर्जी, चंद्रपूर, ॲस्टार्क पावर, नागपूर, डॉल्बी मायनिंग, नागपूर, आयडीयल एनर्जी, नागपूर, जिम्मुविश पावर, यवतमाळ , बिजोरा येथील प्रकल्प, नेर येथील प्रकल्प असे एकूण 20,003 मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प असून त्यांना आपण मान्यता दिली आहे.

सभापती महोदय, कोकणामध्ये जेएसडब्लू स्टील, ठाणे, तारापूर, उमा एनर्जी लिमिटेड, रायगड, कोयना पावर लिमिटेड, ठाणे, पामोनियर गॅस पावर, रायगड...

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, नेर येथील प्रकल्पाबाबत माननीय विरोधी पक्षनेत्यांनी उल्लेख केला नाही. त्याबाबत जन सुनावणी झाली आहे, तो प्रकल्प कुणाचा आहे, त्यामध्ये कुणाची नावे आहेत? याबाबत मंत्री महोदयांनी नंतर उत्तर दिले तरी चालेल. जन सुनावणीच्या दिवशीच सुनावणी सुरु असल्याचे मला माहीत झाले. इतक्या गुप्तपणे त्या प्रकल्पाचे काम सुरु आहे याची कुणाला माहिती देखील नाही.

**सभापती** : आपण सांगितल्यानंतर मंत्री महोदयांच्या लक्षात आले आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माहितीच्या अधिकाराखाली 23 फेब्रुवारी रोजी माझ्याकडे ज्या प्रकल्पांची माहिती आली तीच माहिती मी या ठिकाणी दिलेली आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

मी माननीय श्री.माणिकराव ठाकरे यांना सांगू इच्छितो की, माहितीच्या अधिकारानुसार 23 फेब्रुवारी रोजी माझ्याकडे ज्या प्रकल्पाच्या बाबतीत माहिती आलेली आहे, त्याच प्रकल्पांच्या बाबतीत मी सांगितले आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य आपसात बोलतात.)

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी आपसात बोलू नये.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, कोकणामध्ये जे.एल.डब्ल्यु.एनर्जी रायगड, टाटा पॉवर कंपनी शहापूर, टाटा पॉवर कंपनी ट्रॉम्बे मुंबई, रिलायन्स् एनर्जी ठाणे, इस्पात एनर्जी रायगड, जी.एम.आर. महाराष्ट्र एनर्जी रत्नागिरी-पंढेरी, फिनोलेक्स रत्नागिरी, पावस, अर्बन एनर्जी रायगड, द्रोणागिरी, अर्बन एनजीर्, रायगड, कोंडगाव, अबर्न एनर्जी रायगड, वांगणी इ.कोकणातील मान्य झ ाालेले प्रोजेक्ट आहेत आणि बाकीचे प्रोजेक्ट प्रस्तावित आहेत. अशा प्रकारे विदर्भ आणि कोकणामध्ये एवढे प्रोजेक्ट होणार आहेत. मग विदर्भ आणि कोकणाचे काय होईल ? याठिकाणी चंद्रपूरच्या बाबतीत उल्लेख करण्यात आला. परंतु चंद्रपूर हे आता देशातील, महाराष्ट्रातील दुसऱ्या क्रमांकाचे प्रदूषित शहर आहे. अशा प्रकारे प्रयोग झाले तर विदर्भातील सिंचनाचे किती पाणी दिले जाईल ? असा प्रश्न आहे.शासनाने या ठिकाणी पाणी देण्याचे वचन दिलेले असून तसा करार झाला आहे. त्यामुळे करार झाल्यानंतर उपलब्ध असलेल्या पाण्यामधूनच पाणी द्यावे लागणार आहे. त्यासाठी नव्याने पाणी मिळणार नाही. जर उपलब्ध असलेल्या पाण्यामधून पाणी देण्यात आले तर निश्चितपणे सोफियाचे जसे झाले तसेच आता इतर प्रकल्पांच्या बाबतीत सुध्दा होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या सिंचनातील पाणी काढून प्रकल्पांसाठी द्यावे लागणार आहे. कारण शासनाकडे दुसरे पाणी उपलब्ध नाही. म्हणून शासन या दोन विभागातील शेतकऱ्यांना उद्ध्वस्त करणार आहे काय ? आता सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी सांगितले की, याठिकाणी आम्ही विभागीय असमतोल मांडण्यासाठी उभे नाही. ज्या दिवशी मोठ्या मनाने विदर्भ राज्याने महाराष्ट्रामध्ये विलीन होण्याचा निर्णय घेतला, त्या दिवसापासून आम्ही खऱ्या अर्थाने मनापासून महाराष्ट्रात सामील झालो आहोत. परंतु तुम्ही वर्षानुवर्षे विदर्भावर अन्याय केला.

सभापती महोदय, पूर्वी राज्यामध्ये कै.यशवंतरावजी चव्हाण यांच्यासारखे दूरदृष्टीचे नेते होते.त्यांना माहिती होते की,पुढच्या कालखंडामध्ये विदर्भावर अन्याय होऊ शकतो, मराठवाड्यावर अन्याय होऊ शकतो. म्हणून त्यांनी नागपूर करार करुन ठेवला. जेणेकरुन या नागपूर कराराला



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/

17:35

श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

जागून तरी निधीच्या बाबतीत नीट अंमलबजावणी होईल. त्यामुळे याठिकाणी आम्हाला नीट बोलता तरी येते.जर नागपूर करार झाला नसता तर कदाचित आम्हाला या सदनामध्ये बोलण्याची संधी मिळाली नसती.पण नागपूर करार झाल्यामुळे आज आम्हाला याठिकाणी बोलता येते आणि विदर्भावर कशा प्रकारे अन्याय झालेला आहे हे सांगता येते. संपत्तीचे वाटप समन्यायी झाले पाहिजे, तसेच ते लोकसंख्येच्या प्रमाणात झाले पाहिजे अशा प्रकारचे नागपूर करारामध्ये कलम होते. नोकरीमध्ये, पाणी देण्याच्या बाबतीत समन्यायी वाटप झाले पाहिजे. पण एकाही बाबतीत समन्यायी वाटप झालेले नाही. त्यामुळे या विधेयकाचे परिणाम भयंकर झाले असते. मात्र आज या बिलाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी हस्तक्षेप केला नसता आणि हे विधेयक पास झाले असते तर त्याचे अतिशय गंभीर परिणाम झाले असते. म्हणून ज्यदिवशी हे विधेयक मांडले गेले,त्या दिवसापासून संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांमध्ये भयावह वातावरण निर्माण झाले. त्यांना असे वाटत होते की, आता हे बिल आल्यानंतर आपले काय होईल? कारण आपल्या जमिनी गेल्या,आपल्या प्रॉपर्टीज् गेल्या, काही ठिकणी गावे रिकामी करावी लागली. मात्र आता धरणातून जे पाणी उपलब्ध झालेले आहे, ते पाणी सर्व उद्योगपती पळविणार आहेत.

सभापती महोदय, मी याठिकाणी एवढेच सांगणार आहे की, ज्या पध्दतीने याठिकाणी विधेयक आणले त्याची अंमलबजावणी करताना आता चलाखी करु नका.या विधेयकाची अंमलबजावणी करीत असताना ते प्रामाणिकपणे आणि इमानदारीने झाले पाहिजे. शेतकऱ्यांच्या शेती बाबत सांगावयाचे तर कायद्याची पळवाट काढून आणि शेतकऱ्यांना बाजूला सारुन इंडिया बुल सारखा एखादा मोठा बुल याठिकाणी आला.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

तर शेतकरी बाजूला जाईल आणि त्या बुलला पाणी दिले जाईल. आता जे करार करण्यात आले आहेत त्या कराराचे काय करण्यात येणार आहे? या विधेयकाच्या माध्यमातून मंत्रिमंडळ समिती करण्यात आली आहे. ही समिती हा अध्यादेश निघाल्यापासून लागू होणार आहे. हा अध्यादेश दिनांक 17 सप्टेंबर, 2010 रोजी निघाला. पण मागच्या पाच वर्षात उच्चाधिकार समितीने जे निर्णय घेतले आहेत त्याचे काय करणार? मंत्रिमंडळ समिती पुन्हा हे सर्व प्रॉजेक्ट आपल्या समोर बोलावणार आहे काय? किंवा 17 सप्टेबरला अध्यादेश निघाल्यानंतर ज्या नवीन प्रॉजेक्टला पाणी दिलेले आहे, मग ते विदर्भातील प्रॉजेक्ट असतील, कोकणातील असतील, तो निर्णय रद्द करण्यात येणार आहे काय, हे मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात सांगावे अन्यथा या विधेयकाने फसवणूक होणार आहे. या विधेयकामध्ये जे नमूद केलेले आहे, त्याची अंमलबजावणी प्रामाणिकपणे आणि इमानदारीने झाली पाहिजे, अशी मी या माध्यमातून शासनाला विनंती करतो.

सभापती महोदय, कलम 31 (ग) नुसार न्यायालयात जाण्याचा अधिकार काढून टाकण्यात आलेला आहे. कोणाच्याही स्वातंत्र्यांवर गदा आणता कामा नये, कोणाच्याही हक्कावर गदा आणता कामा नये. यामुळे घटनेची पायमल्ली होणार आहे. घटनेने या देशातील नागरिकांना मूलभूत हक्क आणि स्वातंत्र्य दिलेले आहे, त्याची गळचेपी होता कामा नये. म्हणून हे कलम या विधेयकातून डिलिट करण्यात यावे. माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. मी सुरुवातीलाच सांगितले की, हे महाराष्ट्राचे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. विधिमंडळाचे अमृत महोत्सवी वर्ष आहे. या वर्षामध्ये या पुरोगामी महाराष्ट्रामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतीबा फुले आणि शाहू महाराज यांचा जो महाराष्ट्र आहे, त्या महाराष्ट्रामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या घटनेची पायमल्ली होऊन नागरिकांचे न्यायालयात जाण्याचे अधिकार, एखाद्या विधेयकाच्या माध्यमातून काढून टाकण्याचा विचार केला असेल तर त्यांची प्रतारणा होईल म्हणून या विधेयकातील कलम 31 (ग) हे डिलिट करण्यात यावे, अशी मी या ठिकाणी आग्रहाची मागणी करतो आणि माझे भाषण संपवितो.

---

...2...





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन 2011 चे विधानसभा विधेयक क्रमांक 1 - महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण सुधारणा विधेयक या ठिकाणी चर्चेसाठी आलेले आहे. त्याला विरोध करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, ज्याला आपण विधिमंडळ असे म्हणतो, ज्याला आपण कायदेमंडळ असे म्हणतो, कायदा होत असताना ताक घुसळल्यानंतर त्यातून लोणी बाहेर पडते त्याप्रमाणे या विधिमंडळात दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी चर्चा करुन कायदा तयार कला जातो. पण या विधेयकावर चर्चा होताच कामा नये, म्हणून रात्रौ 1.00 वाजता अशा प्रकारचा कायदा आणून तो जबरदस्तीने मजूंर करुन घेण्याचे कामकाज या विधिमंडळामध्ये प्रथमच झालेले आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जरी माननीय मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन केले असले तरी मी त्यांचे अभिनंदन करणार नाही.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम ....

हे बिल आणतानाच या गोष्टीचा समावेश करुन जर बिल आणले असते तर निश्चितपणे मी अभिनंदन केले असते. पण गेल्या दोन दिवसांमध्ये या बिलाच्या माध्यमातून अनेक घडामोडी झाल्या, काँग्रेस पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना माननीय मुख्यमंत्र्यांकडे जावे लागले आणि आमच्या हक्कावर गदा येत आहे असे त्यांना सांगावे लागले आणि त्यातून मग सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांना उपसूचना द्यावी लागली आणि माननीय मुख्यमंत्र्यांना उठून त्या बाबतीत उत्तर द्यावे लागले. हे सर्व झाले नसते तर निश्चितपणे मी आपले अभिनंदन केले असते. पण या सगळ्या गोष्टी काय सांगून जातात ? या ठिकाणी बसलेले आम्ही सर्व सदस्य काही दुधखुळे नाही. आम्ही सर्व जाणकार सदस्य आहोत. आम्ही 3-3 लाख लोकांमधून निवडून आलेले सदस्य आहोत. कोंबडे कितीही झाकून ठेवण्याचा प्रयत्न केला तरी तो बांग दिल्याशिवाय राहात नाही. या बिलामध्ये या सबंध विधिमंडळाच्या हक्कावर गदा आणण्याचा प्रयत्न केला होता म्हणून माझी अशी प्रामाणिक इच्छा होती की, हे कोठे तरी थांबणे गरजेचे आहे हे मी माझ्या भाषणाच्या सुरुवातीलाच माननीय मुख्यमंत्र्यांना सांगेन. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या ठिकाणी एका गोष्टीचा उल्लेख केला. त्यासाठी मी देखील उपसूचना दिली आहे. या मध्ये आणखी काही शब्द घातले की, हा सगळा अधिकार मंत्रिमंडळाला असेल. या पाणी वाटपाच्या नियमाच्या अनुषंगाने भविष्यात कोणीही न्यायालयात जाऊ शकणार नाही, असे स्पष्टपणे या बिलामध्ये म्हटले आहे.

सभापती महोदय, मला जो अनुभव आहे तो पाहता महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये कधीही घडले नव्हते ते या अर्थसंकल्पामध्ये घडले आहे. महाराष्ट्राचा हा जो सगळा पैसा आहे तो जणुकाही राष्ट्रवादी काँग्रेसचाच आहे असे या अर्थसंकल्पामध्ये पहावयास मिळाले. या अर्थसंकल्पामध्ये जी कामे घेतली गेली त्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस पक्षाच्या आमदारांची कामेच घेतली गेली. विरोधी पक्षाच्या आमदारांना निधी वाटपातून वगळण्यात आले. वास्तविक पाहता या ठिकाणी लोकशाही असताना या लोकशाहीच्या माध्यमातून या पैशावर महाराष्ट्रातील 11 कोटी जनतेचा अधिकार आहे. पण त्या ठिकाणी देखील आमची दादागिरी आणि हम करे सो कायदा अशी परिस्थिती आहे. जणुकाही हा पैसा आमचाच आहे, या पैशावर आमचाच हक्क आहे

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. रामदास कदम .....

म्हणून या पैशाचे वाटप करताना जास्त पैसे राष्ट्रवादी काँग्रेसला आणि 20 टक्के काँग्रेसला दिले. दु:ख एवढ्यासाठीच होते की, 3-3 लाख लोकांमधून निवडून आलेले जे आमदार आहेत, मग ते शिवसेनेचे असो किंवा भारतीय जनता पक्षाचे असो, त्यांना निवडून देऊन लोकांनी चूक केली आहे का ? या बिलामध्ये स्पष्ट म्हटले आहे की, याच्या विरोधात तुम्हाला न्यायालयात जाता येणार नाही. उद्या जर कॅबिनेटमध्ये चुकीचा निर्णय घेतला, ज्या पध्दतीने अर्थसंकल्पामध्ये निर्णय घेतला आहे तसाच निर्णय जर पाणी वाटपाच्या बाबतीत घेतला गेला तर आम्हाला न्यायालयात जाता येणार नाही. मग आम्ही कोठे जावयाचे ? जो निर्णय आपण अर्थसंकल्पामध्ये घेतला तशाच पध्दतीने ज्या ठिकाणी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार आहेत त्याच ठिकाणी पाणी देणार, त्याच ठिकाणी आम्ही प्राधान्य देणार, असा निर्णय जर कॅबिनेटमध्ये घेतला तर आम्ही कोठे जावयाचे ? आपण आमच्या हक्कांवर गदा आणत आहात. लोकशाहीचा गळा घोटण्याचे पाप आपल्या हातून होऊ नये ही माझी देखील प्रामाणिक इच्छा आहे. त्यामुळे उत्तराच्या भाषणामध्ये त्या बाबत मंत्री महोदयांनी सांगावे. घटनेने आम्हाला अधिकार दिलेला आहे. घटनेने आम्हाला दिलेला अधिकार काढून घेण्याचा आपल्याला अधिकार नाही.

सभापती महोदय, मला या ठिकाणी एक बाब माननीय मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे. त्यांनी विजेच्या बाबतीत उल्लेख केला. महाराष्ट्राची विजेची भूक, सबंध देशाची विजेची भूक आणि ती वीज निर्माण करण्यासाठी लागणारे पाणी आणि त्या पाण्याचे नियोजन या बाबत त्यांनी सांगितले.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम....

सभापती महोदय, मी आपल्यामार्फत माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करतो. मी या ठिकाणी राजकीय भाषण करणार नाही. मी अतिशय गांभीयपूर्वक सांगतो की, राज्याला किती विजेची गरज आहे हे एकदा तपासून घ्यावे. मी गेली 20 वर्षे विधानसभेचा सदस्य म्हणून काम केलेले आहे. त्यामुळे माझा देखील सिंचन या विषयाबाबत थोडाबहुत अभ्यास आहे. माझ्या माहिती प्रमाणे राज्याला केवळ 6 हजार मेगावॅट विजेची आवश्यकता आहे. ही गरज 5 वर्षांनी 10 हजार होण्याची शक्यता आहे. तरी सुध्दा भविष्यात जास्तीत जास्त 20 हजार मेगावॅट इतकी विजेची गरज लागेल असे गृहीत धरले तरी हरकत नाही. परंतु विदर्भात 50 हजार व कोकणात 55 हजार मेगावॅटचे प्रकल्प प्रस्तावित केले आहेत. त्यामध्ये काही खाजगी व शासकीय ऊर्जा प्रकल्प आहेत. या प्रकल्पांसाठी शासनाने शेतकऱ्यांच्या जागा सुध्दा याच पध्दतीने ताब्यात घेतलेल्या आहेत. जैतापुर अणुऊर्जा प्रकल्पातून 10 हजार मेगावॅट इतकी वीज मिळणार आहे असे सांगितले जाते. राज्याला विजेची आवश्यकता आहे म्हणून जैतापूर अणुऊर्जा प्रकल्प होणारच असा जनतेला संदेश दिला जात आहे. तो अतिशय चुकीचा आहे. शासनाने यापूर्वीच 1 लाख मेगावॅट ऊर्जा प्रकल्पासाठी शेतकऱ्यांच्या जागा ताब्यात घेतल्या आहेत. माझी ही माहिती शासनाने तपासून पहावी, त्याचा अभ्यास करावा, कारण मी हे फार जबाबदारीने बोलत आहे. राज्यात सध्या 20 प्रकल्प सुरु आहेत, त्यातून केवळ 7 हजार मेगावॅट इतकी वीज उपलब्ध होत आहे.

मुख्यमंत्री महोदय, आज राज्यावर 2 लाख 39 हजार कोटी इतके कर्ज आहे. त्यापैकी 30 हजार कोटी रुपये विजेच्या निर्मितीसाठी खर्च केले असते तर त्यातून 7 हजार किंवा 8 हजार मेगावॅट इतकी वीज मागील 8-9 वर्षात निर्माण करु शकलो असतो. परंतु तेही शासनाकडून झ ालेले नाही. मी प्रामाणिकपणे सांगेन की, या राज्यात मागील 10 वर्षात शासनाने एकही मेगावॅट इतकी वीज निर्माण केलेले नाही. जैसे थे परिस्थिती आहे. या शासनाने केलेले पाप कोकणाच्या माथ्यावर का मारले जात आहे ? राज्याला जर विजेची गरज आहे याची मला खात्री पटली असती तर मी स्वत:हून होकार दिला असता. परंतु या जैतापूर प्रकल्पाबाबत संशय निर्माण झालेला आहे. संपूर्ण जगाने जपानची परिस्थिती पाहिलेली आहे. आपल्यावर तशी वेळ येईल की

2....

NTK/

श्री.रामदास कदम....

नाही ते माहीत नाही. परंतु एखादी गोष्ट आपल्याला सहजपणे उपलब्ध होत असताना तेथील लोकांना गोळ्या घालून प्रकल्प का आणला जात आहे ? माननीय श्री.राणे साहेबांच्या हट्टापायी हा प्रकल्प आणला जात आहे काय, कोणाच्या हट्टापायी आणला जात आहे, कशासाठी आणला जात आहे ? म्हणून शासनाने या प्रकल्पाबाबत पुन्हा विचार करावा. हा प्रकल्प होण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय नाही याची खात्री मुख्यमंत्री महोदयांची झाली असेल तर आम्हाला सांगावे. पण आज तशी परिस्थिती राज्यात, कोकणामध्ये नाही.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी विदर्भातील काही प्रकल्पांची नावानिशी माहिती शासनाला दिली आहे.  मी सुध्दा कोकणातील प्रकल्पांची नावे देतो. ती नावे मुख्यमंत्री महोदयांनी तपासून पहावी.  पण कोकणाला उद्ध्वस्त करुन सबंध देशाला वीज देण्याचे शासनाने ठरविलेच असेल तर मग मात्र दुसरा कोणताही पर्याय शिल्लक राहणार नाही. मुख्यमंत्री महोदयांनी हे पुन्हा एकदा तपासून पहावे अशी माझी त्यांना प्रामाणिकपणे हात जोडून कळकळीची विनंती आहे.

सभापती महोदय, मी आपल्यामार्फत माननीय मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणखी एक बाब आणून देऊ इच्छितो.  सबंध देशात सिंचन क्षमता किती निर्माण झाली आहे त्याची आकडेवारी मी देणार आहे.  मघाशी आमच्या गट नेत्यांनी एका गोष्टीबाबत शासनाचे अभिनंदन केले आहे, पण मी मात्र करणार नाही.  कारण या शासनकर्त्यांनी 60 वर्षांपासून जी चूक केलेली आहे ती चूक त्यांनी आज सुधारली आहे. त्यांनी जनतेवर मेहेरबानी केली आहे अशातील भाग नाही.

सभापती महोदय, देशामध्ये सरासरी 52 टक्के सिंचन क्षमता निर्माण झाली आहे.  काही राज्यात ती 70 टक्के, 80 टक्के, पंजाबमध्ये तर ती 90 टक्के निर्माण झाली आहे. परंतु महाराष्ट्रात केवळ 18 टक्के सिंचन क्षमता निर्माण झाली आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम.....

या 18 टक्क्या पैकी माझ्या कोकणामध्ये फक्त 2टक्के क्षेत्र सिंचनाखाली आलेले आहे. देशामध्ये काही ठिकाणी 70 ते 80 टक्के क्षेत्र सिंचनाखाली आलेले आहे. कोकणावर सातत्याने होणा-या अन्याया बाबत आम्ही बेंबीच्या देठापासून ओरडून सांगत आहोत. महाराष्ट्रामध्ये पडणा-या एकूण पावसाच्या 40 टक्के पाऊस फक्त कोकणामध्ये पडतो. कोकणामध्ये सर्वात जास्त पाऊस पडतो आणि कोकणामध्ये सर्वात जास्त दुष्काळ असतो. मग माझ्या कोकणातील लोकांनी असे काय पाप केलेले आहे ? कोकणातील लोकांना ही सजा कशासाठी ? राज्यामध्ये सिंचनाखालील क्षेत्र 45लाख हेक्टर आहे. तर कोकणामध्ये ते फक्त 90 हजार हेक्टर आहे. वेळेअभावी मी संपूर्ण आकडेवारी देत नाही. सभापती महोदय, माझी आपल्या मार्फत शासनाला विनंती आहे की, आता हे जे जलसंपत्ती नियमन विधेयक आणलेले आहे त्याचा फेरविचार करावा. कोकण आणि पश्चिम महाराष्ट्र हे उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळामध्ये येत असल्यामुळे कोकण पश्चिम महाराष्ट्राच्या दबावाखाली आहे. मी माननीय मुख्यमंत्र्यांना विचारु इच्छितो की, ते आमच्या कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास महामंडळ कधी देणार आहेत ? या संबंधी विधानसभेमध्ये दोन वेळा ठराव पास करुन ते दिल्लीला पाठविले. दोन्ही वेळेला ते ठराव पंतप्रधानांनी नाकारले. आमच्या कोकणावर त्यांचा राग का आहे हे मला माहीत नाही. परंतु आता जैतापूर प्रकल्पाच्या बाबतीत कोकणाबद्दल त्यांचे प्रेम उफाळून आलेले आहे.

श्री. पृथ्वीराज चव्हाण : कोकणासाठी वेगळे वैधानिक विकास मंडळ स्थापवे यासाठी मी आल्यानंतर केन्द्र सरकारला पुन्हा पत्र लिहिलेले आहे. काही दिवसापूर्वी मला केन्द्रीय गृह मंत्र्यांचे पत्र आलेले आहे. या विषयावर चर्चा करण्याकरिता दिल्लीला यावे असे त्यांनी सुचविलेले आहे. ते होईलच असे नाही. तरीही आपण पुन्हा आवर्जून मागणी करण्यासाठी दिल्लीला जाऊया.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, एवढ्यासाठी मी माननीय मुख्यमंत्र्यांचे आभार मानतो. त्यांच्यामध्ये आज कोकणाबद्दल थोडासा ओलावा दिसला. कदाचित ते मृगजळही असू शकेल.

श्री. अरुण गुजराथी : कोकणासाठी वेगळ्या वैधानिक विकास महामंडळासाठी आपण प्रयत्न केले. उत्तर महाराष्ट्र वैधानिक विकास महामंडळाच्या बाबतीत काय, तेही आपण सांगावे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, कोकणाची मागणी आली की, मध्ये दुसरी कुणाची तरी मागणी आलीच पाहिजे. कोकण वैधानिक विकास महामंडळाला मान्यता मिळावी यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांनी पुढाकार घेतला तर पक्ष बाजूला ठेवून कोकणातील सर्व आमदारांना बरोबर घेऊन आपण दिल्लीला जाऊ. प्रश्न असा आहे की, आमच्या कोकणाच्या नावाखाली सर्व पैसा पश्चिम महाराष्ट्रामध्ये जातोय. कोकण हे पश्चिम महाराष्ट्राच्या हाताखाली आहे. सर्वात जास्त पाणी ऊसाला लागते. जवळ जवळ 18 टक्के पाणी उसाला लागते. ही टक्केवारी आपण तपासून पहावी. मी हे जबाबदारीने बोलत आहे.

सभापती महोदय, या जलसंपत्ती नियमन विधेयकाच्या माध्यमातून मी अशी मागणी करीत आहे की आमच्या कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास महामंडळ द्यावे. तसेच कोकणामध्ये जैतापूर येथे् जो अणुऊर्जा प्रकल्प आपण करु इच्छित आहात त्या बाबत पुनर्विचार करावा अशी आग्रहाची मागणी करतो. शेतीमध्ये क्रांती घडविण्यासाठी तत्कालीन पंतप्रधान लालबहाद्दूर शास्त्री यांनी "जय जवान जय किसान" अशी घोषणा देशाला दिली होती, त्या घोषणेतील किसानाचा कणा मोडण्याचे काम गेल्या 60 वर्षापासून या महाराष्ट्र शासनाने केलेले आहे. पाण्याचे नियोजन होईल. देशाच्या तुलनेत आपल्या राज्यात केवळ 18 टक्के सिंचन व्यवस्था झालेली आहे. देशामध्ये ही सिंचनाची टक्केवारी सरासरी 52 टक्के आहे. त्या 52 टक्क्याच्या सरासरीमध्ये जाण्यासाठी आपण कोणते नियोजन केलेले आहे हे मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये सांगण्याची आवश्यकता आहे. जेवढे पाणी आहे तेवढयाच पाण्याचे वाटप होणार असेल तर ते योग्य नाही, असे होता कामा नये. देशाच्या सिंचनाच्या सरासरीमध्ये येण्यासाठी आपले प्रयत्न झाले पाहिजेत. सभापती महोदय, मी शेवटी आपल्या माध्यमातून माननीय मुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, ज्या विदर्भाची मानसिकता बदली त्या विदर्भाला देखील पाण्याच्या बाबतीत झुकते माप दिले पाहिजे. विदर्भामध्ये 16 हजार गायींचे वाटप केले.

....नंतर श्री. गिते...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम...

त्यातील अनेक गायीचे वाटप मंत्री महोदयांच्या नातेवाईकांना करण्यात आले. मी या ठिकाणी अतिशय जबाबदारीने बोलतो आहे. सभापती महोदय, माझ्याकडे जी माहिती उपलब्ध होती, ती संपूर्ण माहिती मी आपल्याला सादर केलेली आहे. या 16 हजार गायीपैकी किती गायी शिल्लक आहेत याची माहिती माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहाला द्यावी. शासनाने या बाबतचा सर्व्हे करावा. विदर्भात जनावरांना पिण्यासाठी पाणी नाही, खाण्यासाठी गवत नाही, त्यामुळे जवळपास 15 हजार गायी कत्तलखान्यात गेल्या अशी विदर्भाची वाईट अवस्था आहे. आपण तेथील शेतकऱ्यांना मदत करीत आहात, परंतु ती मदत प्रत्यक्षात कोठे जाते आहे याचा शोध घेण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, आपण मला बोलण्यासाठी संधी उपलब्ध करुन दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो आणि या विषयावरील माझे भाषण पूर्ण करतो.

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : या विधेयकाच्या अनुषंगाने माझ्या दालनात बैठक घेतली होती. त्या बैठकीला माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय विरोधी पक्ष नेते, पक्षाचे गट नेते तसेच इतर उपस्थित होते. या सभागृहात या विधेयकावर पाच तास चर्चा झालेली आहे. या सभागृहात सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी अतिशय स्वयंस्पष्ट निवेदन केले आहे. खरे म्हणजे महाराष्ट्रातील कृषी विषयक क्रांती आणि त्या क्रांतीच्या अनुषंगाने ही वाटचाल आहे, त्यादृष्टीने आपण पुढे जात आहोत. हे विधेयक अमेडमेंटसह मंजूर केल्यानंतर ते विधेयक विधानसभेत पुन्हा मंजुरी घेण्यासाठी पाठवावयाचे आहे. या विधेयकावर अजूनही काही सन्माननीय सदस्यांना बोलण्याची इच्छा आहे. माझ ी विरोधी पक्ष नेते, गट नेते यांना विनंती आहे की, हे विधेयक लवकरात लवकर मंजूर करुन विधानसभेकडे पाठविण्यासाठी सहकार्य करावे. सन्माननीय सदस्यांनी या विधेयकावरील आपली मते पाच मिनिटांमध्ये मांडावीत.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या विधेयकाच्या अनुषंगाने आज सकाळी आपल्या दालनात बैठक झाली, त्या बैठकीस मी देखील उपस्थित होतो. त्यावेळी मी सांगितले की, आम्हाला या विधेयकावर बोलावयाचे आहे. हे विधेयक गेल्या तीन दिवसापासून सभागृहासमोर येत आहे. शासनाचे या विधेयकावर एकमत होत नाही म्हणून या विधेयकावर चर्चा झाली नाही. आमची या विधेयकावर बोलण्याची तयारी होती. सभापती महोदय, मी आपला आदर करुन बोलतो की, या विधेयकाच्या बाबतीत जन आंदोलने झाली. हे विधेयक सभागृहासमोर मंजुरीसाठी येऊ नये म्हणून 2 लाख शेतकऱ्यांचा मोर्चा विधानसभेवर आणला होता. पाण्यावरील शेतकऱ्यांचा हक्क जाणार असल्यामुळे त्या विधेयकास विरोध करण्यासाठी आम्ही मोर्चा आणला होता. या विधेयकाच्या अनुषंगाने पूर्वी शासनाने वटहुकूम काढलेला आहे. पुन्हा शासनास अध्यादेश काढण्यास सांगू आणि शासनास पुढील अधिवेशनात हे विधेयक मांडण्यासाठी प्रवृत्त करु. आज सकाळी आपल्या दालनात झालेल्या बैठकीस माननीय विरोधी पक्ष नेते, आम्ही सर्व गट प्रमुख होते, श्री. रावते साहेब होते, आम्ही त्या बैठकीत मागणी केली की, शेतकऱ्याला कोर्टात जाऊन न्याय मिळविण्याचा अधिकार दिला गेला पाहिजे. दोन दिवसामध्ये शासनाचे मत परिवर्तन करण्यामध्ये आम्ही यशस्वी झालो. तसे आमचे म्हणणे ऐकून शासनाचे मत परिवर्तन होऊ शकते असे मला वाटते्. माननीय मुख्यमंत्र्यांकडून आमची वेगळी अपेक्षा आहे. जलसंपदा मंत्री श्री. सुनील तटकरे यांचा सकाळचा

3...

श्री.जयंत प्र.पाटील...

व्हयू मध्ये आणि आताच्या व्हयू मध्ये बराच फरक पडलेला दिसतो आहे. सभापती महोदय, आपण शेतकऱ्यांसाठी झगडला आहात. शेतकऱ्याच्या व्यथा आपल्याला माहिती आहेत. त्यामुळे थोडया वेळामध्ये आम्हाला या विधेयकावर आमची मते मांडता येणार नाहीत.

**सभापती** : मला असे वाटते् की, हे विधेयक लवकरात लवकर मंजूर होईल हा दृष्टीकोन समोर ठेवून सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडावेत. आता सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी या विधेयकावर आपले म्हणणे मांडावे.

----

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, 1951 साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दामोधर व्हॅली कॉर्पोरेशनच्या घटनेनुसार पाणी वाटपाचा अधिकार हा केंद्र सरकारला असला पाहिजे असे मत व्यक्त केले होते...

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 18:05

श्री.जयंत प्र.पाटील.....

सभापती महोदय, प्रत्येक राज्यात राज्य सरकारला अधिकार दिले. यामुळे राज्य सरकार मुजोर बनतील. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी 1951 साली सांगितले होते की, पाणी वाटपाचे अधिकार हे केंद्राकडेच असले पाहिजेत. परंतु त्यांचे म्हणणे कोणाला पटले नाही. दुर्दैवाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या दिवशी मध्यरात्री 1.00 वाजता हे विधेयक विधानसभेत मंजूर केले गेले.

सभापती महोदय, आम्ही आपला सन्मान करतो. आपले म्हणणे आम्ही कधी नाकारले नाही. सकाळपासून या विधेयकावर चर्चा सुरु आहे. मंत्री महोदयांनी सकाळीच आपली भूमिका बदलली असती तर एवढा वेळ वाया गेला नसता. सुधारणेचा मसुदा द्यायला राज्य सरकारला चार तास वेळ लागला. आम्ही वेळेचा अपव्यय केलेला नाही. हा इतिहास आहे. माध्यमांनी याची नोंद घेतली आहे. एका सुधारणेसाठी या सभागृहाचे कामकाज तब्बल आठ वेळा तहकूब करण्यात आले. शेतकऱ्यांच्या पाणी मागणीसाठी शासनावर ही परिस्थिती आली आहे. हे अधिवेशन सुरु होऊन सहा आठवडे झाले. असे असताना घाई गडबडीने विधेयक मंजूर करण्याचा प्रयत्न का केला जात आहे? सकाळी आम्ही आक्रमक भूमिका घेतली नसती तर सकाळीच हे विधेयक मंजूर झाले असते आणि विधानसभेत पुन्हा मंजुरीसाठी मांडण्यात आले असते.

सभापती महोदय, जगामध्ये पाणी वाटपासाठी देशादेशांमध्ये संघर्ष सुरु आहेत. जपानमध्ये 2003 साली तिसरी जागतिक जल परिषद संपन्न झाली होती. त्या परिषदेचे उद्‌घाटन जपानच्या पंतप्रधानांनी केले होते. त्यांनी सांगितले होते की, जगाच्या पाठीवर कोणत्याही प्रकारचे राजकारण न आणता पाण्यासारखा प्रश्न चर्चेतून सोडविला पाहिजे. आज जगातील सगळ्यात चांगली जल नीती फ्रान्स या देशाची आहे. फ्रान्स देशाची जल नीती जगामध्ये आदर्श जल नीती समजली जात असल्याचे जागतिक पातळीवर पाण्याचे नियोजन करीत असताना दिसून येते.

सभापती महोदय, आम्ही आपला सन्मान करतो. आपला सन्मान हा आमच्या सभागृहाचा सन्मान आहे. कृष्णा खोरे विकास महामंडळ या राज्यात स्थापन झाले. युती सरकारच्या काळात माननीय मंत्री श्री.रामराजे नाईक-निंबाळकर हे या महामंडळाचे उपाध्यक्ष होते. कृष्णा खोरे महामंडळाचे अपत्य माननीय श्री.रामराजे नाईक-निंबाळकर यांनी जन्माला घातले. आज या कृष्णा खोऱ्यातील सर्व कामे अपूर्ण आहेत. कृष्णा खोऱ्याच्या कामात अनेक कॉन्ट्रॅक्टर निर्माण झाले. या

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

कॉन्ट्रॅक्टर्सनी पुण्यामध्ये बंगले बांधले, राजवाडे बांधले. शेतकऱ्यांना मात्र पाणी मिळाले नाही. या कॉन्ट्रॅक्टर्सनी मोठमोठया गाड्या घेतल्या. इतकेच नव्हे तर हेलिकॉप्टर घेऊन फिरायला लागले. विमानातून फिरु लागले.

नंतर 3एक्स.1...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील........

पैसा कोणाचा तर कृष्णा खोऱ्याचा अशी परिस्थिती आहे. 32 वर्षापूर्वी साधा रिक्षावाला म्हणून ओळखली जाणारी कृष्णा खोऱ्यातील कंत्राटदार व्यक्ती आज हेलिकॉप्टरमध्ये फिरताना दिसत आहे. ही कोणाच्या पैशाची लयलूट चालली आणि आम्ही चर्चा करायची नाही असे कसे चालेल ? आज कृष्णा खोऱ्यातील उर्वरित कामे करण्यासाठी 80 हजार कोटी रुपयांची गरज आहे व तातडीची देयके अदा करण्यासाठी 16 हजार कोटीची गरज आहे. माझ्याकडे बरीच कात्रणे आहेत. या विधेयकावर बोलण्यासाठी मी पूर्ण तयारी करुन आलेलो असल्याने दोन तास तरी बोलू शकेल पण मी माननीय सभापतींना शब्द दिलेला असल्याने थोडक्यात बोलणार आहे. आज कृष्णा खोऱ्यात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे पगार देण्यासाठी सुध्दा पैसे नाहीत असे संघटनेचे म्हणणे आहे. कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या पुणे, नगर, सातारा, सांगली, सोलापूर आणि कोल्हापूर तसेच उस्मानाबाद या जिल्ह्यातील 12430 कर्मचाऱ्यांचे पगार गेल्या पाच महिन्यांपासून मिळालेले नाहीत, अशी परिस्थिती आहे. मग आपण कोणते सिंचन करणार आहात, कसले पाण्याचे नियोजन करणार आहात, हा प्रश्न उभा राहतो.

माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित असते तर बरे झाले असते, मला त्यांच्यासमोरच काही गोष्टींचा उहापोह करावयाचा होता. मी त्यांना सांगणार होतो की, आपण कृष्णा खोऱ्यातील कंत्राटदारांची पाहणी करावी, आम्ही सुध्दा आपल्यासोबत येण्यास तयार आहोत. आम्ही देखील आपल्याला सांगू शकतो की, कोणते काम कसे करावयाचे. अशा प्रकारे जेवढा पैसा खर्च झाला त्याच्या मोबदल्यात सिंचन किती झाले या प्रश्नाचे उत्तर "नाही" असेच मिळेल. कृष्णा खोऱ्याचा विकास करण्यासाठी शासनाने करोडो रुपयांचे कर्जरोखे काढले. पाच पाच हजार कोटी रुपये आम्ही सुध्दा आमच्या बँकेकडून उपलब्ध करुन दिले. त्यामागे उद्देश एवढाच होता की, शेतकऱ्याच्या जमिनीला पाणी मिळेल, शेतकऱ्याचे सिंचन वाढेल हाच विचार करुन आम्ही पैसे दिले.

सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी सिंचनाबाबतची आकडेवारी देताना सांगितले की, देशात सिंचनाचे क्षेत्र 45 टक्के आहे. आपल्या राज्यात मात्र केवळ 17 टक्के इतकीच जमीन पाण्याखाली आहे. मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र या भागात मी जवळजवळ 250 सभा घेतल्या. तसेच या कायद्याला विरोध करण्यासाठी दीड ते दोन लाख शेतकरी या विधानसभेवर

....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील.........

आणले होते. त्यावेळेस माननीय मंत्री महोदय, डॉ. पतंगराव कदम यांनी आम्हाला आश्वासन दिले होते. तसेच आज आम्हाला आनंद वाटतो की माननीय जलसंपदा मंत्र्यांच्या चेहऱ्यावर सुध्दा हास्य दिसत आहे. सकाळी माननीय सभापतींच्या दालनात माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, शेतकऱ्याला पाणी वाटपामध्ये दुसरा अग्रक्रम मिळालाच पाहिजे. पाणी वाटपासंबंधीचा निर्णय कॅबिनेटने घ्यावयाचा आहे असे ठरले. आमचा कॅबिनेटवर विश्वास आहे. शेवटी पैसे आहेत पण ते कोणत्याही गावात गेले तरी तेथील विकास तरी होणार यातच आम्हाला समाधान आहे. सभापती महोदय, आपल्याला माहितच असेल की, आम्ही अजूनही आपल्यासमोर नाखवाच्याच भूमिकेत आहोत, इतके आम्ही आपल्यापेक्षा लहान आहोत.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील...

राजकारणात काम करीत असतांना तत्वाने काम करावे लागते. ज्या शेतक-यांचे नाव घेऊन आपण राजकारण करीत आहोत त्या शेतक-यांना ख-या अर्थाने आपण न्याय दिला पाहिजे. राज्यकर्ते कोण आहेत ? राज्यकर्ते शेतक-यांचेच पुत्र आहेत व असे असतांना तेच शेतक-यांच्या विरोधात बिल आणतात त्याचेच मला दु:ख होते आहे.

ज्या वेळेस हे बिल आले त्यावेळेस माननीय मंत्रिमहोदयांना बिलाच्या संदर्भात मी विचारले तेव्हा मंत्री महोदय मला म्हणाले होते की, या बिलाला कॅबिनेटमध्ये सर्वांनी मंजुरी दिलेली आहे. खरे म्हणजे शेतक-याचाच पाण्यावर प्रथम अधिकार आहे. पेणचे आमदार गॅलरीत बसले आहेत. मी आपल्याला एक उदाहरण सांगू इच्छितो की, हेटवणे धरणाचे काम 95 टक्के पूर्ण झाले आहे व कालव्याचे काम 75 टक्के पूर्ण झाले आहे. या धरणाचे प्रस्तावित सिंचन क्षेत्र् 6600 हेक्टर आहे. मागावून यासंदर्भातील रिपोर्ट बदलवण्यात आला असून सिंचनाचे क्षेत्र 3300 हेक्टरवर आणले गेले आहे व आता फक्त 300 हेक्टर क्षेत्राचे सिंचन होते आहे. सरकारने आदेश काढला आहे की, पुढील कालव्याची कामे करु नका आपल्याला सर्व पाणी उद्योगाला द्यावयाचे आहे. मंत्री महोदयांचे पेणकडे बरेच लक्ष आहे, पेणमध्ये ते ब-याच फे-या मारत असतात त्यामुळे त्या ठिकाणच्या शेतक-यांना त्या ठिकाणचे उद्योगाच्या पाण्याचे बॅन उठवून कालव्याचे 25 टक्के राहिलेले काम पूर्ण करावयास पाहिजे. महाराष्ट्रामधील असा एकच तालुका आहे की, त्या ठिकाणी 95 टक्के क्षेत्र सिंचनाखाली येऊ शकतो व तो तालुका पेण आहे. माजी आमदार मोहन पाटील यांनी हेटवणे धरणासाठी आपली 200 एकर जमीन दिलेली आहे. शेतक-यांना पाणी मिळावे म्हणून त्यांनी आपली 200 एकर जमीन 25 वर्षापूर्वी कमी मोबदल्यात हेटवणे धरणासाठी दिलेली आहे. या धरणामुळे 5 गावांचे पुनर्वसन करावे लागले होते. या ठिकाणची 5 गावे धरणामुळे उठली परंतु आज या ठिकाणच्या 500 गावांना पाणी मिळते आहे. अशा रितीने तयार करण्यात आलेल्या धरणाचे पाणी तुम्ही उद्योगाकरिता देत आहात ? या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री चर्चा ऐकावयास हवे होते. खरे म्हणजे आपल्याला पाणी द्यावयाचे असेल तर तुम्ही हेटवणे धरणाच्या वर अजून एक धरण बांधा व त्यातून आपल्याला पाहिजे तेवढे पाणी उद्योगाला द्या. या ठिकाणी भरपूर पाणी आहे. हे पाणी न अडवल्यामुळे ते पाणी

..2..

श्री. जयंत प्र.पाटील...

समुद्राला जाऊन मिळते. त्यामुळे हेटवणे धरणाच्या वर धरण बांधा व ते पाणी नागरीकरणासाठी व उद्योगासाठी वापरले तर आमची त्याला हरकत राहणार नाही.

सभापती महोदय, राज्यामध्ये नियोजन शून्य काम सुरु आहे. कुठल्याही धरणाचे काम सुरु करतांना तेथील जमीन ताब्यात आल्याशिवाय धरणाच्या कामाला सुरुवात करु नये परंतु खास करुन विदर्भामध्ये धरण मंजूर करावयाचे, एस्टीमेट बनवायचे, टेंडर काढावयाचे व टेंडर काढल्यानंतर वर्क ऑर्डर द्यावयाची व ठेकेदाराला 10 टक्के ॲडव्हान्स द्यावयाचा परंतु जमीन ताब्यात नसतांनाही ठेकेदार सांगणार माझी एवढी मशिनरी आली आहे, एवढी इनव्हेस्टमेंट केली आहे त्यामुळे तो एक्स्ट्रा क्लेम करतो व प्रत्यक्षात धरणाचे काम अजिबात न होता करोडो रुपये खाल्ले जातात अशी परिस्थिती विदर्भात आज मोठया प्रमाणात होत आहे. मी जलसंपत्ती विधेयकाच्या विरोधात पूर्ण महाराष्ट्रात फिरलो आहे. जनतेला संघटित करण्यासाठी विदर्भात गेलो होतो, जळम व हिंगोलीमध्ये सुध्दा गेलो होतो. हिंगोलीमध्ये कागदावर 150 कोटीचे धरण बांधण्यात आलेले असून त्या ठिकाणच्या ठेकेदाराने 150 कोटी रुपयांचा एक्स्ट्रा क्लेम केलेला आहे की, माझी मशिनरी पडलेली असून त्या मशिनरीचे भाडे एवढे एवढे झालेले आहे. या ठिकाणची प्रत्यक्ष जमीन वन विभागाची आहे. वन विभागाने या ठिकाणच्या प्रकल्पाला मंजुरी दिलेली नाही अशा प्रकारे करोडो रुपये लंपास करण्याचा धंदा सुरु झालेला आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील..

मी या ठिकाणी आपल्याला निश्चितपणे सांगू इच्छितो की, पाण्याचे नियोजन ख-या अर्थाने चांगल्या प्रकारे केले गेले पाहिजे.धरणाचा प्लॅन आणि ठेकेदार याचा परिपूर्ण अभ्यास केला पाहिजे.

सभापती महोदय, या विधेयकावरील चर्चेच्या निमित्ताने मी माननीय मुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, ज्या सन्माननीय सदस्यांना शेतक-या विषयी खरोखर कळवळा आहे त्या सन्माननीय सदस्याना आपण एक दिवस चर्चेसाठी बोलवा.माननीय मंत्र्यांनी जरी अशा सन्माननीय सदस्यांना बोलावले तरी माझी हरकत नाही. परंतु माननीय मंत्री महोदय आम्हाला कधीही चर्चेसाठी बोलवत नाहीत. ते आमच्या जिल्हयातील असून मी त्यांची कॅबिन कधीही पाहिलेली नाही. औद्योगिकीकरणाला आमचा विरोध नाही परंतु उद्योगासाठी एखाद्या भागातील जमीन घ्यावयाची असेल तर तत्पूर्वी आमच्या सारख्या सन्माननीय सदस्यांबरोबर शासनाने चर्चा केली पाहिजे.

सभापती महोदय, समुद्राच्या पाण्यापासून वीज निर्मिती करता येऊ शकते, त्यासाठी जर जागा हवी असेल तर ती जागा आमच्याकडे मागा. ती जागा मिळविण्यासाठी आम्ही तेथील शेतक-यांना विश्वासात घेऊ. ज्या ठिकाणी गाव नाही अशा ठिकाणी भरपूर जागा पडलेली आहे.500 मेगावॅटचा प्रकल्प करण्यासाठी 300 एकर जागा लागते. मी सहा महिन्यापूर्वी हॉलंडमध्ये गेलो होतो आणि तेथील एक प्रकल्प मी पाहिला होता. 300 एकर जागे मध्ये 550 मेगावॅटचा प्रकल्प तेथे घेण्यात आला होता परंतु आपल्याकडे 500 मेगावॅट प्रकल्पासाठी 5 हजार एकर जागा मागितली जाते.रिअल इस्टेट करण्यासाठी ही जागा मागितली जाते असे मला सांगावयाचे आहे.आमच्या भागात जमिनीला सोन्याचा भाव आहे.जागा दिली नाही तर प्रकल्पाला विरोध केला जातो असे सांगून आम्हाला बदनाम केले जाते. 500 मेगावॅट प्रकल्पासाठी 300 एकर जागेची आवश्यकता असतांना मात्र 5 ते 6 हजार एकर जमीन मागितली जाते. आमच्या जमिनी घेऊन त्यावर प्रकल्प उभारुन प्रकल्प मात्र फ्री करण्याचा प्रयत्न केला जातो त्याला आमचा विरोध आहे म्हणून प्रकल्प सुरु करण्यापूर्वी शासनाने आमच्या बरोबर चर्चा करावी. आम्ही शासनाला निश्चितपणे जमीन देऊ शकतो.

सभापती महोदय, शासनाने या ठिकाणी जे जलसंपत्ती विधेयक मांडलेले आहे त्यावर चार पाच तास बोलण्याकरता मी खास तयारी करुन आलो होतो. गेल्या सहा महिन्यापासून मी राज्यामध्ये इतर भागात फिरत होतो. संपूर्ण भागाचा मी अभ्यास केला असून ग्रामीण भागातील





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील..

दैनावस्था मी पाहिली आहे.त्याचबरोबर पाण्याचे नियोजन कसे चुकीचे केले होते हे सुध्दा पाहिले आहे.म्हणून मी पोटतिडकीने बोलत आहे. माननीय मंत्र्यांबरोबर माझा कोणताही वैयक्तिक वाद नाही. त्यांच्या जमिनीला लागून माझी जमीन नाही त्यामुळे जमिनीवरुन त्यांचा माझा काही वाद नाही. आमच्या दोघांच्या जमिनीमध्ये भरपूर अंतर आहे.

सभापती महोदय,आज आम्ही 100 टक्के नाही पण 80 टक्के यशस्वी झालो आहोत याचा मला खूप आनंद झाला आहे.विधिमंडळामध्ये काम करीत असतांना या प्लॅटफॉर्मवर आम्ही जनतेचे प्रश्न सोडवू शकतो हे आम्हाला या विधेयकाच्या निमित्ताने दिसून आले आहे.

सभापती महोदय, डॉ.रणजित पाटील हे चांगले व सोज्वळ आमदार आहेत. त्यांची माफी मागून मी सांगतो की, प्रा.बी.टी.देशमुख हे एक लढवय्ये व अभ्यासू आमदार होते. एक आदर्श आमदार म्हणून त्यांनी अनेक वर्षे सभागृहात काम केले होते. त्यांचा बळी कोणी घेतला ?
सन्माननीय सदस्य डॉ.रणजित पाटील निवडून आले आहेत त्याबद्दल मला वाईट वाटत नाही.परंतु प्रा.बी.टी.देशमुख यांचा बळी सोफिया प्रकल्पाने घेतला होता. प्रा.बी.टी.देशमुख यांची आमदारकी इतर कोणीही घालवली नाही तर त्यांची आमदारकी सोफिया प्रकल्पाने घालवली होती त्यामुळे त्या दिवशी संपूर्ण सभागृह रडले होते. सभापती महोदय, आपण सुध्दा त्यांना वेगळया पध्दतीने निरोप दिला होता. भांडवलदार काय करु शकतो हे या निमित्ताने सर्वांना दिसले. एक लढवय्या व्यक्तीची आमदारकी सोफिया कंपनीमुळे गेली होती. सन्माननीय सदस्य डॉ.रणजित पाटील यांची मी सुरुवातीलाच माफी मागितली होती.प्रा.बी.टी.देशमुख यांच्यावर आपले प्रेम होते त्याचबरोबर सभागृहाचे देखील प्रेम होते. ते कोणत्याही पक्षाचे नव्हते तर अपक्ष म्हणून त्यांनी काम केले होते आणि जनतेचे प्रश्न येथे 20- 25 वर्षे मांडले होते.त्यांची वेगळी प्रतिमा होती, प्रामाणिकपणे लोकांचे प्रश्न घेऊन लढणा-या एका आमदाराचा सोफिया कंपनीमुळे बळी गेला ...

नंतर श्री.सरफरे

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील...

असे जर होणार असेल तर आमच्यासारखे आमदार या सभागृहामध्ये येणारच नाहीत. या पुढे जनतेसाठी लढणारा आमदार निवडून येऊच शकत नाही. आमच्याकडे तुमच्याएवढे पैसे नाहीत, आमच्याकडे सत्ता नाही परंतु जनतेची ताकद आणि जनतेचे प्रेम आहे. आज किंवा उद्या पुन्हा माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख या सभागृहामध्ये येतील. त्यांना आणण्याचे काम आपल्याला करावे लागेल. त्यांनी केलेले काम हे सोफियापेक्षा किती तरी पटीने मोठे आहे.

सभापती महोदय, या जलसंपत्ती विधेयकाच्या निमित्ताने विचारु इच्छितो की, ही जलसंपत्ती कुणाची आहे? ही शेतकऱ्यांची संपत्ती असून ती तुम्ही तुमच्या घरामध्ये नेऊ नका. ती कॉट्रॅक्टरच्या दारात नेऊ नका, रिक्शावाल्याला हेलिकॉप्टर चालविण्यासाठी प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न तुम्ही करु नका. त्याच्या दारामध्ये लाचारीने बघण्याचे पुढारीपण या महाराष्ट्रामध्ये होऊ देऊ नका हीच अपेक्षा मी या निमित्ताने करतो. सभापती महोदय, सकाळी या विधेयकाला आम्ही विरोध केला. माननीय सदस्य श्री. माणिकरावजी ठाकरे यांचे मी मोठया मनाने अभिनंदन करतो. त्यांनी देखील राजकीय विचार आणि मतभेद बाजूला ठेवून शेतकऱ्यांसाठी आम्हाला साथ दिली, त्याबद्दल त्यांना देखील आम्ही खऱ्या अर्थाने धन्यवाद देतो. त्याचप्रमाणे माननीय मुख्यमंत्र्यांनी दोन पावले मागे येऊन भूमिका घेतली आहे. हे जलसंपत्ती विधेयक सुट्टीच्या कालावधीत विधानसभेमध्ये मंजूर झाल्यानंतर माझी झ ोप नाहीशी झाली होती. या विधेयकासाठी मागील तीन दिवसात आम्ही तयारी केली होती. या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना आता पुन्हा रस्त्यावर उतरावे लागेल आणि या प्रश्नासाठी आम्हाला पुन्हा वेगळी लढाई लढावी लागेल असे वाटले होते, ती लढाई वाचविण्याचे काम तुम्ही या ठिकाणी केले. मंत्री महोदयांकडून माझी उत्तराच्या भाषणामध्ये एवढीच अपेक्षा आहे की, शेतकऱ्यांच्या वतीने तुम्ही कोर्टामध्ये जाण्याचा अधिकार अबाधित ठेवावा अशी मागणी करुन मी माझे विचार संपवितो. जय हिंद.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पॉईंट ऑफ इन्फर्मेशनसंबंधी**

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. काल उल्हासनगर येथे एक दुर्घटना घडली त्यामध्ये दहा लोकांचा मृत्यू झालेला आहे. काल सभागृहामध्ये मी हा मुद्दा उपस्थित केल्यानंतर आपण तात्काळ दखल घेऊन शासनाला निवेदन करण्यास सांगितले होते. काल या सभागृहामध्ये ते निवेदन झाले नाही. तसेच, आज सुध्दा दिवसभरामध्ये शासनाकडून निवेदन करण्यात आले नाही. सभागृहाचे कामकाज संपावयास आलेले आहे. त्यामुळे उल्हासनगरमध्ये नक्की काय परिस्थिती आहे? हे या सभागृहाला समजणे आवश्यक आहे.

**सभापती** : माननीय मंत्री श्री. सुनील तटकरे साहेब, या बाबत आपण दखल घेऊन संबंधित मंत्री महोदयांना निरोप पाठवून निवेदन करण्याबाबत सूचित करावे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, त्याच प्रमाणे माननीय राज्यपालांच्या निदेशांचे उल्लंघन करणाऱ्या अधिकाऱ्यांना निलंबित करण्यासंदर्भात शासनाने निवेदन करावे अशी मागणी करण्यात आली होती. त्या बाबत शासनाकडून निवेदन करण्यात आलेले नाही. तेव्हा त्या संदर्भात देखील आपण शासनाला निदेश द्यावेत अशी मी विनंती करतो.

श्री. हुसेन दलवाई : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. मी ज्या बांद्रा (पूर्व) या भागामध्ये रहातो तेथील खेरवाडीच्या भागामध्ये संजय गांधी नगर नावाची एक झोपडपट्टी आहे. त्या झोपडपट्टीला काल रात्री आग लागली त्यामध्ये 8 लोक जखमी झाले आहेत, 12 घरे पूर्णपणे जळून खाकी झाली आहेत. या संदर्भात त्या पीडित लोकांना शासनाकडून मदत मिळावी, त्यांचे पुनर्वसन व्हावे या बाबत उपाय योजना करण्यासंबंधी आपण शासनाला निदेश द्यावेत अशी मी विनंती करतो.

**सभापती** : सन्माननीय राज्यमंत्री श्री. डी. पी. सावंत साहेब, माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी उल्हासनगरमधील दुर्घटनेमध्ये आठ लोक मरण पावले याबाबत शासनाने निवेदन करण्याची मागणी केली आहे. त्याचप्रमाणे माननीय सदस्य श्री. हुसेन दलवाई यांनी वांद्रे येथे संजय गांधी नगर या झोपडपट्टीला लागलेल्या आगीमुळे आठ लोक जखमी झाल्याची बाब उपस्थित

सरफरे/

**सभापती** ...

केली आहे या संदर्भात आपण नोंद घ्यावी. तसेच, माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितलेल्या बाबीसंबंधी मला माहिती नसल्यामुळे आपण त्यासंबंधीची टिप्पणी दिल्यास त्यासंबंधी शासनाला सूचना करण्यात येईल. या विधेयकावरील चर्चा संपेपर्यन्त अन्य कोणत्याही सूचनांची नोंद घेण्यात येणार नाही.

आता माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी आपले भाषण सुरु करुन ते कमीत कमी वेळेत पूर्ण करावे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, आज या विधेयकाच्या निमित्ताने विधान परिषदेमध्ये अतिशय ऐतिहासिक स्वरुपाची चर्चा झाली. ही चर्चा होत असताना ज्यावेळेला विधानसभेमध्ये 13 एप्रिलच्या मध्यरात्री हे विधेयक पास झाले,तेव्हापासून आजपर्यंत ज्या-ज्या ठिकाणी शेतकरी आणि सामान्य लोक भेटत होते त्यावेळी लोक यासंदर्भात प्रश्न विचारीत होते.ज्याप्रमाणे शासनाने या विधेयकामध्ये बदल करण्याचे मान्य करुन परत एकदा विधान सभेमध्ये विधेयक पाठविण्याबबत निर्णय घेतलेला आहे,त्याबद्दल मी सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन करते आणि सभापती महोदय, याठिकाणी मला आपले यासाठी अभिनंदन करावयाचे आहे कारण या सभागृहातील विरोधी पक्ष बहुमतामध्ये नाही. त्यामुळे जर सत्ताधारी पक्षाने ठरविले असते की, विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांच्या आरडया-ओरड्याला सत्ताधारी पक्षाने चिथावणी द्यावयाची आणि मग शेवटी आमच्यातील एक-दोन सन्माननीय सदस्यांचे निलंबन करुन बाहुबलीच्या जोरावर सदरहू विधेयक पास करावयाचे तर सत्ताधारी पक्षाला ही गोष्ट शक्य होती. परंतु आमचे गट नेते, माननीय विरोधी पक्ष नेते, माननीय सभापती, माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री आणि संबंधित माननीय मंत्री श्री.सुनीलजी तटकरे या सर्वांबरोबर झालेल्या चर्चेतून आज असा निर्णय घेतला गेला तो निश्चितपण् महाराष्ट्र राज्यामध्ये चांगल्या प्रकारचा पायंडा आहे याकडे मला लक्ष वेधावयास पाहिजे.

सभापती महोदय, दुसरा महत्वाचा भाग म्हणजे माननीय मुख्यमंत्र्यांनी येथे असे मांडले की, 2003 मध्ये जलनीती झाली.परंतु मला याचे आश्चर्य वाटते की, मी गेली 8 वर्षे विधान परिषदेमध्ये काम करीत आहे.मला अनेक अनुभवही आहेत. 2003 मध्ये जलनीती झाली आणि याबाबतीत दर तीन वर्षांनी आढावा घेणे अपेक्षित असते.परंतु माझ्या माहितीप्रमाणे या जलनीतीमध्ये काय असावे, काय बदल केले पाहिजेत याबाबत राहुरी येथे अनेक बैठका झाल्या. तसेच विभागांनी देखील अनेक बैठका घेतल्या. तरी देखील या बैठकांमध्ये एकदा सुध्दा सर्व विधानसभा व विधान परिषदेमध्ये जलनीती काय असली पाहिजे,त्यामध्ये कोणते बदल करावयास पाहिजेत यासाठी 2007 मध्ये याचा परत एकदा आढावा घेणे अपेक्षित होते.ज्यावेळी कोणतेही धोरण मांडले जाते,तेव्हा दोन्ही सभागृहांमध्ये याबाबत चर्चा होणे अपेक्षित असते.पण दोन्ही सभागृहांमध्ये अशा प्रकारे कधीही चर्चा झ ाली नाही याकडे मला लक्ष वेधावयाचे आहे.तसेच मी सन्माननीय मंत्री महोदयांचे लक्ष याकडे वेधू इच्छिते की, वेगवेगळी विधेयके सदनासमोर आणली जातात. सदनामध्ये 2005 मध्ये जलसंपत्ती विनियमन विधेयक आणले गेले, त्याचे प्राधिकरण केले आणि आज येथे नवीन विधेयक आणून .....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे . . . .

त्यावर चर्चा करीत आहात. परंतु मला येथे आठवण करुन दिली पाहिजे की, शिवशाहीचे सरकार असताना पाण्याच्या प्रश्नाबाबत श्वेतपत्रिका काढण्यात आली होती. त्याचबरोबर प्रत्येक नदीच्या खोऱ्यामध्ये पाणी वापराच्या संदर्भात कशा प्रकारे अभ्यास करावयास पाहिजे या दृष्टीने आज देखील अहवाल तयार करण्यात आलेले आहेत.परंतु सध्या निवडून आलेल्या विधानसभेतील किती सन्माननीय सदस्यांना त्या अहवालांची माहिती आहे तसेच विधानपरिषदेतील किती आमदारांना याची माहिती आहे आणि याबाबत किती पारदर्शीपणे चर्चा होते याबाबत जर आपण विचार करु लागलो तर प्रत्येकजण कोणाच्या हाताला काय लागेल या पध्दतीने स्वत:चा गाव, स्वत:चा मतदार संघ, तेथे येणारे उद्योग, तेथील शेतीचे प्रश्न यापुरताच मर्यादित विचार करीत आहेत. त्यामुळे ठिकठिकाणी कधी जायकवाडीच्या धरणावरुन, कधी उजनीच्या धरणावरुन कधी विदर्भातील विविध धरणांवरुन जिल्ह्या जिल्ह्यांमध्ये वाद होत आहेत. याचे महत्वाचे कारण असे आहे की, जलनीतीमध्ये आपल्या भागाचा विकास करीत असताना इतर भागांच्या विकासासाठी पाण्याच्या प्रश्नाबाबत कोणती भूमिका घेतली पाहिजे असे सर्वंकश धोरण केल्याचे सरकार सांगत आहे, ते नक्की काय आहे आणि या सर्व गोष्टींमुळे लोकप्रतिनिधी सर्व महाराष्ट्र राज्याचा विचारच करु शकत नाही अशी परिस्थिती झाली आहे.

सभापती महोदय, आज शासनाने अग्रक्रमांच्या बाबतीत विचार केला, त्यामध्ये समन्यायी तत्वावर पाणी वाटपाचा जो मुद्दा होता, तो वगळला गेला होता. तसेच उच्चाधिकार समितीचे जे विविध निष्कर्ष दिसत आहेत आणि जे मला येथे रेकॉर्डवर मांडणे आवश्यक आहे. त्याचा आपण विचार करु लागलो तर महाराष्ट्रातील एकूण 38 धरणांपैकी मूळ शेतीसाठी असणारे जे पाणी होते त्यातील 1500 द.ल.घ.मी.सिंचनाचे पाणी बिगर सिंचनासाठी वळविण्यात आले. यामध्ये 89 टक्के पाणी वळविले गेले. त्यामध्ये कोकणामध्ये अंबा, बिरवडी, हेटवणे, पश्चिम महाराष्ट्रापैकी आरपाडी, चासकमान, दुरगांव, जेरुर, खडकवासला, खेळणा, मन, पवना, तरंगवाडी, उजनी आणि उत्तर महाराष्ट्रापैकी निम्न पांजरा, मुक्टी, सुनावडे, गंगापूर मराठवाड्यापैकी देवर्जन, अजिंठा, अंधारी, जाधव-जवळा, मांजरा, निवळी, रेणापूर, तिरु आणि विदर्भापैकी भागीमाहिरी, चारगाव, चिखली, नाला, धाम, धापेवाडा, गोसीखूर्द,जाम, निम्नवेण्णा, निम्नवर्धा, पेंच, उर्ध्व वर्धा्, वाण इ. येथील 45 टक्के पाणी वळविले गेले.

यानंतर कु.थोरात . . . .

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ प्रथम सौ. रणदिवे.... 18:35

डॉ. नीलम गोऱ्हे....

त्यामुळे 1 लाख 19 हजार 448 हेक्टर सिंचन क्षेत्र बाधित झाले. महाराष्ट्रातून जे एकूण पाणी बिगर सिंचनाकडे वळवले गेले, त्यामुळे 2 लाख 62 हजार 504 हेक्टर सिंचन क्षेत्र बाधित झालेले आहे. शासनाच्या कागदपत्राच्या आधारे 'प्रयास' या संस्थेने अहवाल तयार केलेला आहे. या अहवालावरुन असे दिसते की, 54 टक्के पाणी औद्योगिक वापरासाठी वळविण्यात आले आहे. मला या ठिकाणी नमूद करावयाचे आहे की, बिगर सिंचनासाठी पाण्याचा वापर करण्यासाठी सिंचनाची

पुनर्स्थापना करण्यासाठी 700 कोटी रुपये तर भांडवली अंशदानासाठी 141 कोटी रुपये वसूल करावेत असा उच्चाधिकार समितीने निर्णय दिला होता परंतु हा वसूल होणारा निधी बाधित शेतकऱ्यांसाठी कसा वापरणार याचे नियोजन करण्यात आलेले नाही. सन 2005 पासून आता पर्यंत झालेल्या दिरंगाईमुळे शेतकऱ्यांचे जे नुकसान झालेले आहे, त्या संदर्भात काय तोडगा काढण्यात येणार आहे, हा प्रश्न आजही अनुत्तरित आहे. त्याच बरोबर विविध ठिकाणी याचिका दाखल करण्यात आलेल्या आहेत. हेटवणे धरणाच्या प्रश्नाच्या संबंधात याचिका दाखल करण्यात आली आहे. मराठवाडयामध्येही याचिका दाखल करण्यात आलेल्या आहेत म्हणून याबाबतीत निर्णय घेण्यात आलेला आहे.

सभापती महोदय, पुण्याच्या बाबतीत बोलत असताना सातत्याने चर्चा होते की, पश्चिम महाराष्ट्रामध्ये सगळे पाणी वळविले जाते. इतर विभागाच्या तुलनेमध्ये पश्चिम महाराष्ट्राची पाण्याच्या बाबतीतील जी स्थिती बरी आहे. परंतु मला या ठिकाणी सांगावयाचे आहे की, पुणे शहराच्या जवळ असलेल्या नांदेड सिटी या प्रकल्पाला डायरेक्ट खडकवासला धरणातून पाणी देण्यात आलेले आहे. शिवसेनेचे खासदार श्री. आढळराव पाटील यांनी याबाबतीत प्रश्न विचारला तेव्हा पासून संपूर्ण जिल्हयामध्ये त्यांच्यावर गुन्हे दाखल करणे, विधानसभेत विकिलिक्सचे काही तरी काढणे, या गोष्टी सातत्याने घडत आहेत. 'लवासा'साठी वरसगावचे पाणी सरळ वापरण्यात आले. अशा पध्दतीने विविध जलाशयामधील, विविध धरणांमधील पाणी ज्या ज्या ठिकाणी नागरीकरण होत आहे, त्या त्या ठिकाणी वापरले जात असताना त्यासंदर्भात काही निकष लावले जाणार नसतील तर या संदर्भात आम्हाला कोणीच दाद मागायला वाली नाही, अशा प्रकारची परिस्थिती निर्माण झाली आहे. म्हणून ठिकठिकाणी शेतकऱ्यांचा संघर्ष वाढत आहे त्याचबरोबर पश्चिम महाराष्ट्र सुधारलेला आहे असे म्हणत असताना

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/

डॉ. नीलम गोऱ्हे....

पश्चिम महाराष्ट्रात फक्त धनदांडग्या बिल्डर्ससाठी पाणी वळविण्यासाठी धरणे वापरणार आहे काय, असा प्रश्न उपस्थित झालेला आहे.

सभापती महोदय, मला या ठिकाणी सांगावयाचे आहे की, जलसंपत्ती विधेयकाचा पुनर्विचार करत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आपल्या अधिकाराचा जो विचार होता, त्या अधिकारा बद्दलचे विधेयक अपुऱ्या उपस्थितीत दिनांक 14 एप्रिल रोजी विधानसभेमध्ये पास झाले असले तरी आज विधान परिषदेमध्ये आपण या बिलाबद्दल पुनर्विचार करुन या शासनाची सामान्य शेतकऱ्यां बद्दल दाद मागण्याची मानसिकता आहे, हे दाखविले असले तरी पुढच्या काळामध्ये कोर्टात जाण्याच्या संदर्भात निर्णय घेण्याची आवश्यकता आहे कारण जरी उद्या असे म्हटले की, तुम्हाला कोर्टात जाण्यास परवानगी नाही, तरी लोक कोर्टात जाणारच आहेत. मंत्री महोदय श्री. सुनील तटकरे हे एक तरुण मंत्री आहेत. अशा वेळेला आपण काल देखील हे विधेयक मंजूर करण्यासाठी सभागृहात उभे राहिलात. लोकांच्या मनात काय आहे, याची आपल्याला कल्पना आहे. अशा वेळेला आपल्या हेतू बद्दल आमच्या मनात शंका नाही. पण नको त्या ठिकाणी जाऊन घाईघाईने निर्णय घेतल्यामुळे आपल्या बद्दल गैरसमज पसरले जातात. खडकवासला धरणाचे पाणी असेल, लवासाचे पाणी असेल,जेथे जेथे शेतकऱ्यांना त्रास होतो त्या शेतकऱ्यांना दिलासा देण्याच्या दृष्टिकोनातून शासनाने योग्य ती पावले उचलली पाहिजेत य्‌कडे मला शासनाचे लक्ष वेधावेसे वाटते.

थोडयावेळा पूर्वी सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी सन्माननीय मुख्यमंत्र्यांना बिनविरोध निवडून द्यावे अशी विनंती केली आहे. हा अधिकार आमचा नाही. आमचे हाय कमांड, आमचा रिमोट कंट्रोल मातोश्रीवर आहे. आपण त्यांच्याकडे अधिकृतरित्या साकडे घालावे, जो काही पक्षाचा निर्णय असेल तो आम्हाला मान्य असेल. धन्यवाद.

----

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन 2001 चे विधानसभा विधेयक क्रमांक 1 - महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम 2005 यात सुधारणा करण्याकरिता अध्यादेश या ठिकाणी काढण्यात आलेला आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये पाण्याचे नियमन करण्यासाठी पाटबंधारे विभागाने 1976 मध्ये पहिल्यांदा कायदा केला. त्यानंतर जवळपास दिनांक 12 एप्रिल, 1989 मध्ये त्याची सुधारित आवृत्ती काढण्यात आली. त्यावेळी सखोल अभ्यास करुन शेतकऱ्यांचे हित, पिकाची पतवारी, वाढती लोकसंख्या, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न या सर्व गोष्टीच्या बाबतीत हा कायदा करण्यात आला होता.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस .....

31 जानेवारी, 2003 ला पाटबंधारे खात्याने शासन निर्णय काढला. त्या शासन निर्णयामध्ये बिगर सिंचनासाठी पाणी पुरवठा, पिण्यासाठी, औद्योगिक कारणासाठी, औष्णिक विद्युत केंद्र व अन्य सिंचनेतर संस्थांना वापरासाठी पाणी मिळणेबाबत असा त्यात समावेश केला. या ठिकाणी मघापासून जे चालू आहे त्यामध्ये घरगुती पाणी वापर, औद्योगिक कारणासाठी पाणी वापर,सिंचनासाठी पाणी वापर यामध्ये सिंचन हे तिसऱ्या क्रमांकावर गेले. परंतु 2003 मध्ये असेल किंवा 1976 मध्ये असेल, त्यामध्ये हेच नियमन आहे. परंतु हे करीत असताना कोठेही सिंचनाचे पाणी कमी झालेले नाही. घरगुती पाणी वापर 15 टक्के, औद्योगिक कारणासाठी 10 टक्के आणि सिंचनासाठी 75 टक्के हे प्रमाण आतापर्यंत आपण 2003 च्या शासन निर्णयामध्ये सुध्दा ठरविले होते. त्यामुळे या बदलामुळे 2010 चा कायदा आला किंवा त्यात दुरुस्ती करण्याची गरज आहे, असे मला वाटत नाही.

सभापती महोदय, प्राथम्यक्रम कसाही असला तरी सिंचनासाठी धरणातील पाणी द्यावयाचे हा निर्णय शासनाने, पाटबंधारे खात्याने घेतलाच होता. एवढेच नव्हे तर जेवढी धरणे झाली असतील, पाटबंधाऱ्यांची जेवढी कामे झाली असतील ती सगळी कामे शेतकऱ्यांच्या हितासाठी झाली असेच या ठिकाणी म्हणावेसे वाटते. परंतु हे करीत असताना धरणे बांधली पण पाटचाऱ्या काढल्या नाहीत. गेट बसविले नाहीत. फक्त धरणे तेवढी झाली पण शेतकऱ्यांना पाणी वापरण्याकरिता ज्या गोष्टींची गरज आहे त्या अपूर्ण असल्यामुळे आपण मोठ्या प्रमाणावर पाणी देऊ शकलो नाही. 2003 नंतर 2005 चा कायदा आला. 2003 चा शासन निर्णय होता. त्यामध्ये उच्चाधिकार समितीला अधिकार असला तरी तो शासन निर्णय होता. तो कायदा नव्हता. 2005 मध्ये जो कायदा आला. जगभर पाण्याचा भविष्यातील वापर व वाढती लोकसंख्या यामध्ये 2025 पर्यंतचा लोकसंख्येचा आढावा घेऊन या ठिकाणी कशा पध्दतीने आपल्याला पाण्याचा वापर करता येईल यासाठी 2003 मध्ये शासन निर्णय आला. या ठिकाणी लोकसंख्येतील अभूतपूर्व वाढ, वेगवान आर्थिक विकासाची निकड, लोकांच्या राहणीमानाच्या दर्जातील वाढ, अन्नधान्याची वाढीव आवश्यकता हे सर्व दिलेले आहे. विशेषत्वाने आपण वीज कमी आहे म्हणून मोठ्या प्रमाणावर विजेचे प्रकल्प घेत आहोत. पण त्याच वेळला आपण शेतीची जागा वीज प्रकल्पांना देत आहोत, शेतीचे पाणी वीज प्रकल्पांना देत आहोत. आज महाराष्ट्र अन्नधान्याच्या बाबतीत तुटीचे राज्य

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्रीमती शोभा फडणवीस .....

आहे. असे असताना आणखी ही सगळी शेतजमीन केवळ उद्योगाला दिली तर या राज्यामध्ये उद्या अन्नधान्याचा प्रश्नही मोठ्या प्रमाणामध्ये भयानक रुप धारण करील याचा विसर सरकारला पडला असेल तर ते बरोबर नाही. विद्युत प्रकल्प व्हावयास नको असे कोणीही म्हटलेले नाही. पण देशामध्ये चंद्रपूर जिल्हा प्रदूषणाच्या बाबतीत क्रमांक 2 वर आहे हे माहीत असताना सुध्दा आता त्या ठिकाणी जाणूनबुजून 12 विद्युत प्रकल्प उभारण्याचा जो घाट सुरु आहे त्यामुळे आम्ही कोठे जाणार ? आताच तो जिल्हा प्रदूषणाच्या बाबतीत दोन नंबरवर असताना, ते प्रदूषण कसे कमी करावयाचे याचा विचार करीत असताना पुन्हा आपण त्या ठिकाणी 12 प्रकल्प उभे करणार आणि ते प्रकल्प कोळशावरच आधारित असणार, अशा वेळी आमचा प्रदूषणाचा दर्जा कोठे जाणार हे शासनाने ठरवावे. माझे असे म्हणणे आहे की, हा उद्योग नाही. नोकऱ्या मिळण्याकरिता हा उद्योग आहे असे बोलले जाते पण हा उद्योग नाही. ते इन्फ्रास्ट्रक्चर आहे. कारखाना उभा करण्याकरिता जमीन पाहिजे, पाणी पाहिजे. वीज पाहिजे. इन्फ्रास्ट्रक्चर म्हणून जर याचा वापर होणार असेल तर आमच्या मुलांच्या नोकरीसाठी हा उद्योग आहे असे जे बोलले जाते ते या ठिकाणी होऊ शकणार नाही, असे माझे स्पष्ट मत आहे.

सभापती महोदय, 2005 मध्ये जलनीती धोरण आले. 2003 मध्ये शासन निर्णय झाला. शासन निर्णयामध्ये उच्चाधिकार समितीला सगळे अधिकार होते. 2005 ला महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण कायदा झाला. या कायद्यामध्ये खऱ्या अर्थाने सगळे अधिकार प्राधिकरणाला दिले. प्राधिकरणाला अधिकार दिल्यानंतर 2003 चा शासन निर्णय तसाही व्यपगत झालेला आहे. 1976 चा अधिकार सुध्दा संपलेला आहे. असे असताना कायद्याचा वापर न करता आपल्या अधिकाराचा वापर करुन जर 1500 क्युबिक मीटर पाणी बिगर शेतीसाठी वाटप केले असेल तर मघाशी सन्माननीय मुख्यमंत्री ही चूक झालेली आहे असे म्हणाले, ती चूक दुरुस्त करण्यासाठी हे केलेले 1500 क्युबिक मीटरचे वाटप त्यांनी रद्द करावे. कारण ते नियमानुसार नाही, कायदेशीर नाही. म्हणून ते वाटप रद्द करणे अतिशय आवश्यक आहे. ते त्यांनी करावे असे माझे स्पष्ट मत आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस....

2005 च्या कायद्यानुसार कच्चा बंधारा, साठवण तलाव घेता येत होते. अगदी छोटासा बंधारा बांधावयाचा असला तरी प्राधिकरणाकडे जावे लागत होते. त्यांच्याकडे परवानगी मागितल्यावर बंधाऱ्यात पाणी किती आहे, त्यातील पाणी देता येईल काय, बंधारा बांधता येईल काय हे पाहिले जाते. त्यांच्या निर्णय झाल्याशिवाय त्यावेळी बंधारा बांधता येत नव्हता. एकदा प्राधिकरणाने नकार दिल्यावर हायकोर्टात जाण्याशिवाय दुसरा पर्याय उपलब्ध नव्हता. 2005 च्या कायद्यानुसार शेतकऱ्यांना न्यायालयात जाण्याची सोय होती. या तरतुदीला शेतकऱ्यांनी विरोध केला नव्हता. परंतु शासनाने 2010 मध्ये कायदा केला त्या कायद्याद्वारे पाणी वाटप करण्यासाठी सर्व अधिकार स्वत:कडे घेतले आहेत. विदर्भातील शेतकऱ्यांना अप्पर वर्धा धरण पूर्ण होण्यासाठी 48 वर्षे वाट पहावी लागली. ते धरण पूर्ण झाल्याचे आम्हाला दिसत आहे, त्या धरणातील आमच्या शेतीला पाणी मिळणार आहे असे स्वप्न शेतकऱ्यांनी उराशी बाळगली असताना 3 दिवसामध्ये त्या धरणाचे पाणी सोफिया प्रकल्पाला देण्याचा निर्णय घेण्यात आला. माननीय पंतप्रधान यांनी मिश्रा समिती नियुक्त केली होती. त्या मिश्रा समितीच्या अहवालात सगळयात जास्त शेतकऱ्यांच्या आत्महत्या अमरावती जिल्ह्यात झाल्या आहेत असे नमूद केलेले आहे. सिंचनांचा सगळयात जास्त अनुशेष अमरावती जिल्ह्यात आहे. सगळयात जास्त दारिद्रय अमरावती जिल्ह्यात आहे. असे असताना सोफिया प्रकल्प अमरावती जिल्ह्यात सुरु केला जात आहे. शेतक-यांचे पाणी त्या प्रकल्पाला दिले जाणार आहे. शासनाने ही भयावह परिस्थिती निर्माण केल्यामुळे त्या भागातील महिलांच्या डोळ्यात अश्रू आले आहेत त्याकडे कोणाचेही लक्ष नाही. शासन कोणासाठी व कोणाच्या हितासाठी कायदे करते, लोकांच्या हितासाठी कायदे केले जातात की, कारखानदारांच्या हितासाठी केले जातात याचाही विचार करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, शासनाने 2005 च्या कायद्यानुसार पाणी वापर संस्था निर्माण केल्या आहेत. एखाद्या ठिकाणी पाणी वापर संस्था स्थापन झाली असेल तर त्यांनी कालव्याची दुरुस्ती करुन दिली पाहिजे. त्यांच्या हक्काचे पाणी दिले पाहिजे. पाण्याचे वाटप केल्यानंतर त्याचा पैसा

2....

श्रीमती शोभा फडणवीस.......

वसूल केला पाहिजे. परंतु यातील एकही काम झालेले नाही. मला पश्चिम महाराष्ट्राचे माहीत नाही, परंतु विदर्भातील पाणी वापर संस्था दारिद्रय रेषेखाली गेल्या असल्यामुळे या संस्थांमध्ये भांडणे होत आहेत. त्या पाणी वापर संस्थांकडून कालव्यांची दुरुस्ती करण्यात आलेली नाही, त्यांच्या हक्काचे पाणी त्यांना मिळालेले नाही.

सभापती महोदय, या कायद्यात अशी तरतूद करण्यात आली आहे की, या कायद्याच्या विरोधात लोकांना कोर्टात जाता येणार नाही. लोकशाहीत लोकांना कोर्टात जाण्याचा हक्क नाकारला जात असेल तर ही लोकशाही नाही तर हुकूमशाही आहे असे म्हणावे लागेल. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लोकांचे मूलभूत अधिकार अबाधित ठेवले गेले. ज्या घटनेने आम्हाला अधिकार दिला आहे, घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या आदल्या रात्री शासनाने हा कायदा मंजूर केला आहे. त्यामुळे त्यांच्यावर व त्यांनी निर्माण केलेल्या घटनेचा अनादर आहे. सर्वसामान्य जनतेवर अन्याय केला जात आहे. खऱ्या अर्थाने कोर्टात जाण्याचा अधिकार शासनाला रद्दच करता येत नाही. न्यायालयाचा अधिकार शासनाला घेता येणार नाही. परंतु न्यायालयाचा अधिकार शासन घेऊ पहात आहे तो कायद्यानुसारही योग्य नाही. घटनेतील तरतुदीच्या विरोधी आहे, मूलभूत हक्कांच्या विरोधी आहे. राज्यातील जनतेला वेठीला धरणारा हा कायदा रद्द करण्यात यावा असे सांगून मी माझे भाषण संपविते.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंतराव खोटरे ( अमरावती विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, वि.स.वि.क्रमांक 1 बाबत माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, आपण मला या विधेयकावर बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो. मी सुरुवातीलाच राज्याचे माननीय मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांचे अभिनंदन करतो. त्यांनी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण या कायद्यात सुधारणा केलेली आहे. त्यांनी पिण्याच्या पाण्याला प्रथम प्राधान्य व दुसरा प्राथम्यक्रम शेतीच्या पाण्यासाठी दिलेला आहे. सभापती महोदय, पाणी हे जीवन आहे. पाण्याला दुसरा कोणताच पर्याय असू शकत नाही. पाणी हे महत्वाचे असल्यामुळे कोणत्या तरी भविष्यवेत्त्याने असे म्हटले आहे की, पाण्यासाठी आता युध्द होणार आहे. शासनाने या विधेयकात जी काही तरतूद केली आहे ती पाहता ते युध्द आता लांब नाही असे दिसते. या कायद्याच्या कलम 31 (ब) मध्ये असे नमूद केले आहे की, शेतकऱ्यांना कोणताही दावा, खटला व कायदेशीर कारवाई करता येणार नाही." माझे असे मत आहे की, हा कायदा अतिशय धोकादायक आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 18:50

श्री. वसंतराव खोटरे...

या विधेयकामध्ये उच्चाधिकार समितीने अथवा शासनाने घेतलेल्या निर्णया विरोधात न्यायालयात दाद मागता येणार नाही. सदर तरतूद असंविधानिक आहे. न्यायालयात दाद मागणे हा या देशातील नागरिकांचा मूलभूत अधिकार आहे. त्यामुळे अशा प्रकारची तरतूद करणे संविधान विरोधी कायदा करण्यासारखे आहे. अशा प्रकारचा कायदा केला तर पाण्यावरुन भांडणे होतील, युध्दे करावी लागतील. म्हणून माझी विनंती आहे की, अशा प्रकारचा कायदा शासनाने करता कामा नये.

सभापती महोदय, राज्यातील अनुशेषग्रस्त जिल्ह्यांचा अनुशेष दूर होण्यासाठी केन्द्र आणि राज्य शासनाने पॅकेज जाहीर केले. मघाशी सन्माननीय सदस्यांनी बोलताना असे सांगितले की, विदर्भामध्ये 55 विद्युत प्रकल्प आहेत आणि कोकणामध्ये 44 विद्युत प्रकल्प आहेत. ज्या ठिकाणी सिंचनाखालील क्षेत्र कमी आहे तेथे प्रकल्प जास्त आहेत आणि जेथे सिंचनाखालील क्षेत्र जास्त आहे तेथे प्रकल्प कमी आहेत. माझी या निमित्ताने शासनाला विनंती आहे की, जे अनुशेषग्रस्त जिल्हे आहेत त्या ठिकाणी कोणतेही प्रकल्प सरकारने करता कामा नये. उदा. विदर्भातील अमरावती जिल्हा हा सर्वात जास्त अनुशेष असलेला जिल्हा आहे. तसेच अकोला, वाशिम हे जिल्हे देखील अनुशेषग्रस्त आहेत. या अनुशेषग्रस्त जिल्ह्यामध्ये कोणतेही प्रकल्प येता कामा नयेत. सन 2005 ते 2010 या कालावधीसाठी उच्चाधिकार समितीने शेतक-यांच्या विरोधी जो निर्णय घेतलेला आहे तो रद्द करावा. कारण हा कायदा प्रत्यक्षात 2011 मध्ये आणलेला असल्यामुळे त्याचा पूर्वलक्षीप्रभाव असू नये एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) विधेयकावर मी माझे विचार व्यक्त करण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, या विधेयकामध्ये दोन सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. त्या सुधारणा स्वागतार्ह आहेत. 50 वर्षानंतर अशा प्रकारे विधेयकामध्ये सुधारणा करुन शेतक-यांना न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे. काल हे विधेयक मांडण्यासाठी मंत्री महोदय उभे राहिले होते. या विधेयकाच्या संदर्भात विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी महत्वाचे मुद्दे सभागृहामध्ये उपस्थित केले नसते तर शासनाने काल हे विधेयक कोणत्याही प्रकारच्या सुधारणा न करता जसेच्या तसे मंजूर करुन घेतले असते. शासनाने या ज्या सुधारणा केल्या त्याबद्दल मी शासनाने अभिनंदन करीत असताना सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर आणि विरोधी पक्षाच्या अन्य सन्माननीय सदस्यांचे देखील मी अभिनंदन करतो. त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांमुळेच शासनाला या विधेयकामध्ये सुधारणा करणे भाग पडले. आज हे विधेयक सभागृहामध्ये चर्चेला आल्यानंतर त्यामध्ये 4 तासानंतर सुधारणा करण्यात आली. आता हे विधेयक सुधारणेसहीत विधानसभेमध्ये पाठविण्यात येणार आहे.

सभापती महोदय, पाणी वाटपाच्या संदर्भातील हे विधेयक आहे. मी आमच्या ठाणे जिल्ह्याच्या बाबतीत बोलणार आहे. ठाणे जिल्ह्यामध्ये अनेक प्रकारची धरणे झालेली आहेत. काही धरणे होत आहेत. वैतरणा धरण हे मुंबई महानगरपालिकेसाठी बांधलेले आहे. तानसा, भातसा, वैतरणा या धरणातील पाणी मिळण्यासाठी ठाण्यामध्ये अनेक आंदोलने झाली. पुढच्या काळामध्ये पाण्यासाठी मोठ्मोठ्या लढाया होणार आहेत. ठाणे हा या देशातील सर्वात जास्त लोकसंख्या असलेला, जास्त महानगरपालिका असलेला जिल्हा आहे. या ठाणे जिल्ह्यामध्ये सूर्या प्रकल्प झाला. या सूर्या प्रकल्पाचे पाणी तेथील लोकांना दिले जाणार आहे की नाही हा माझा या निमित्ताने शासनाला सवाल आहे. ज्या भूमीमध्ये धरणे बांधून आपण पाणी घेतो त्या भूमीतील लोकांना पाणी देणार की नाही हे पहिल्यांदा मंत्री महोदयांनी स्पष्ट करावे. ठाणे जिल्ह्यामध्ये अनेक प्रकल्प झालेले आहेत. असे असताना ठाणे जिल्ह्यातील आदिवासीना शेतीसाठी पाणी मिळत नाही. पाण्यासाठी ठाणे जिल्ह्यामध्ये आंदोलने चालू आहेत. ज्या ठिकाणी प्रकल्प होतात तेथील लोकांनाच

..3..





श्री. संजय केळकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पाणी मिळत नसेल तर तो अन्याय तेथील लोकांनी कसा काय सहन करायचा ? म्हणून तेथे आंदोलने होत आहेत. सभापती महोदय, या निमित्ताने माझी अशी मागणी आहे की, ठाणे जिल्ह्यातील पाणी जेथे न्यावयाचे असेल तेथे न्या, परंतु ठाणे जिल्ह्यात झालेल्या धरणांतील पाण्यावर प्रथम ठाणे जिल्ह्यातील नागरिकांचा हक्क आहे. त्यांना पहिल्यांदा पाणी दिले पाहिजे.

या विधेयकाच्या संदर्भात बोलत असताना अनेक सन्माननीय सदस्यांनी विजेच्या तसेच अन्य विविध मुद्यांना स्पर्श केलेला आहे. पाणी वाटपाच्या संदर्भात कोणताही वाद निर्माण झाला तर कोर्टात जाता येणार नाही अशी जी तरतूद या विधेयकामध्ये करण्यात आलेली आहे ती योग्य नाही.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर...

ही एक प्रकारची शेतकऱ्यांची मुस्कटदाबी आहे. मंत्रिमंडळाची समिती पाणी वाटपाच्या बाबतीत योग्य निर्णय घेईल. परंतु त्या समितीने चुकीचा निर्णय घेतला तर तेथील शेतकऱ्याला कोर्टाचा दरवाजा ठोठावण्याचा अधिकार नाही. शेतकऱ्यांना जो घटनात्मक अधिकार दिलेला आहे, तो आपण हिरावून घेत आहात. कोर्टात जाण्याचा घटनात्मक अधिकार तो अबाधित ठेवण्यात यावा तसा बदल या विधेयकात करण्यात यावा, अशा प्रकारची मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, या ठिकाणी पाणी वाटपाची चर्चा होत आहे. परंतु पाण्याची निर्मिती कशी करावयाची या संदर्भात कोणी बोलत नाही. राज्यात पाणी निर्मितीचे अनेक प्रोजेक्ट निधी अभावी रखडलेले आहेत. काही प्रकल्प तांत्रिक कारणामुळे रखडलेले आहेत, काही प्रकल्प वन विभागाच्या अडचणीमुळे रखडलेले आहेत, काही प्रकल्पांच्या बाबतीत आंदोलने चालू आहेत, त्यामुळे प्रकल्प रखडलेले आहेत,याकडे देखील शासनाने गांभीर्याने पाहिले पाहिजे. पाणी वाटपाचा महत्वाचा मुद्दा आहे तसाच पाणी निर्मितीचा मुद्दा देखील महत्वाचा आहे. उद्योगाला जे पाणी दिले जात आहे ते बंद करण्यात येईल काय ? ठाणे जिल्हयातील वाडा तालुक्यातील कोको-कोला कंपनीला आपण प्राधान्याने पाणी देत आहात. तेथील शेतकऱ्यांना पाणी देत नाही. तेथील लोकांना पिण्याचे पाणी मिळत नाही. कोका-कोला कंपनीला मात्र मोठया प्रमाणात पाणी दिले जात आहे ही दुर्दैवी गोष्ट आहे. या संदर्भात शासन काय करणार आहे, याचा खुलासा माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात करावा अशी मी विनंती करतो आणि या विषयावरील माझे मनोगत पूर्ण करतो.

----

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील ( अमरावती विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, 2005 यात सुधारणा करण्याकरिता विधेयक सभागृहात मांडण्यात आले आहे. त्यावर मला माझे विचार व्यक्त करण्यासाठी आपण संधी दिली त्याबद्दल मी प्रथम आपले आभार मानतो.

सभापती महोदय, 2005 मध्ये मंजूर झालेल्या या अधिनियमाच्या माध्यमातून आपण गेल्या सात वर्षापासून काम करीत आहोत. या अधिनियमात नेमक्या कोणत्या सुधारणा करावयाच्या आहेत, त्यासंदर्भात गेल्या दोन दिवसापासून सभागृहात चर्चा करीत आहोत. हा विषय शेतकऱ्यांचा अतिशय जिव्हाळयाचा आहे. शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीवर दूरगामी परिणाम करणारा असा हा अधिनियम आहे. पूर्वीपासून शेतकरी हा नदीच्या किनाऱ्यावर राहतो आहे. नदीच्या पाण्यावर पहिला हक्क हा शेतकऱ्यांचा आहे. 1960 मध्ये बर्वे समिती, 1976 मध्ये पाटबंधारे कायदा त्यानंतर 1998 मध्ये उच्चाधिकार समिती, त्यानंतर 2003 ची जलनीती, त्यानंतर 2005 चे महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम असे वेगवेगळे माध्यम पाणी वाटपासंदर्भात तयार केले गेले. या देशाला स्वातंत्र्य मिळून 50 वर्षे झाली आहेत. या देशात आणि या राज्यात मोठया प्रमाणात औद्योगिकीकरण झाले आहे. पाणी वाटपाच्या बाबतीत जी माध्यमे तयार केली गेली होती त्यात पाणी वाटपाच्या बाबतीत प्राधान्य ठरविण्यात आले आहे. पाणी वाटपासाठी जो प्राधान्यक्रम ठरविण्यात आला आहे, तो चुकीचा आहे असे मला वाटते. बेरोजगारांना रोजगार मिळाला पाहिजे, राज्यात मोठ मोठे उद्योग आले पाहिजेत. नागरीकरण मोठया प्रमाणात होत आहे. त्यामुळे उद्योगा सोबतच सिंचनाला देखील मोठया प्रमाणात पाणी मिळाले पाहिजे. सिंचनास लागणाऱ्या पाण्यास प्राधान्यक्रम दिला गेला पाहिजे. पूर्वी पाण्याचे वाटप केले गेले आहे, त्यामध्ये काळानुरुप बदल केला गेला पाहिजे, तरच पाणी वाटपाचा प्रश्न काही प्रमाणात सुटू शकतो.

सभापती महोदय, 2005 मध्ये हा अधिनियम लागू झाला, परंतु त्यात सुस्पष्टता नव्हती. ती सुस्पष्टता यावी म्हणून हे सुधारणा विधेयक आज सभागृहासमोर आणले आहे. खरे पाहिले तर सेल्फ एक्स्प्लॅनेटरी अधिनियम 2005 साली झाला.. सर्व पक्षाच्या संयुक्त समितीने तो अधिनियम केला होता. तो अतिशय सेल्फ एक्स्प्लॅनेटरी होता आणि कलेक्टीव्ह व्हिजनने तो बनला होता. या कायद्याचा मूळ गाभा आपण काढून घेत आहोत हे खरे दुर्दैव आहे.

यानंतर श्री. भोगले..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील.....

या महाराष्ट्राच्या सिंचनावर, पाण्याच्या वापरावर, त्याच्या हक्कदारीवर, समन्यायी वाटपावर, क्षेत्रीय वाटपावर व शेतकऱ्यांच्या सिंचन पध्दतीच्या व्यवस्थानावर दूरगामी परिणाम करणारी ही सुधारणा आहे. आज हा विषय चव्हाट्यावर का आला याचा आपण सर्वांनी विचार केला पाहिजे. खरी मेख सोफिया प्रकल्पाला पाणी देण्याविरुध्द हायकोर्टात जी याचिका दाखल झाली त्यात आहे. त्या प्रकरणात हायकोर्टाचे असे मत झाले की, या कंपनीला पाणी वाटप करण्याचा निर्णय उच्चाधिकार समितीने घेतलेला आहे. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अस्तित्वात असताना उच्चाधिकार समितीला अधिकार असण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. त्यामुळे राज्य सरकारने मागील तारीख टाकून उच्चाधिकार समितीला हे अधिकार देण्याचा खटाटोप केला.

सभापती महोदय, मागील 46 वर्षापासून अप्पर वर्धा प्रकल्पाचे काम सुरु होते. अमरावती जिल्हा हा अतिशय अनुशेषग्रस्त भाग आहे. सोफिया प्रकल्पाला पाणी वाटप करण्यासाठी सरकारने घाई का केली हे मला सांगितले पाहिजे. तीन दिवसात या प्रकल्पाला पाणी वाटप करण्याचा निर्णय घेण्यात आला. धरणामध्ये पाणी साठल्यानंतर कालवे आणि पाटचाऱ्याची कामे अपूर्ण होती. धरणाचे काम पूर्ण होण्यास 46 वर्षे लागली. ज्याप्रमाणे एखाद्या बैलाला गोचीड लागते त्या प्रमाणे सोफिया प्रकल्प शेतकऱ्यांना लागलेली एक गोचीड आहे. शेतकरी बैलाच्या अंगावरील गोचीड काढू शकतो, परंतु सोफिया प्रकल्पाला पाणी देणे बंद होणार नाही. या विधेयकामध्ये असे अंतर्भूत आहे की, कोणत्याही शेतकऱ्याला हायकोर्टात दाद मागता येणार नाही.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी सांगितले की, प्रा.बी.टी.देशमुख साहेब यांच्या जागी मी निवडून आलो ते सोफिया प्रकल्पामुळे निवडून आलो. वास्तविक सोफिया प्रकल्प म्हणजे शेतकऱ्यांना लागलेली गोचीड आहे. ती काढून फेकायची असेल तर सर्व सन्माननीय सदस्यांनी एकत्र येऊन हा प्रकल्प उचलून फेकून दिला पाहिजे. मी सगळ्यात प्रथम प्रयत्न करण्यास तयार आहे. आमरण उपोषण करावयाचे असेल तरी मी सोफिया प्रकल्पाविरुध्द उपोषण करण्यास तयार आहे एवढे बोलून वेळेअभावी मी माझे भाषण पूर्ण करतो.

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवानराव साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन 2011 चे वि.स.वि. क्रमांक-1 महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण विधेयकावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मी प्रामुख्याने कोरडवाहू, अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या वतीने बोलणार आहे. राज्यामध्ये कोरडवाहू व अल्पभूधारक शेतकरी हे खरे पाण्याचे लाभार्थी आहेत. त्यांना प्रथम प्राधान्य देऊन राज्याची जल नीती, वितरण व्यवस्था निश्चित केली पाहिजे. तशा प्रकारची सुधारणा या विधेयकात केली पाहिजे असे माझे मत आहे. त्याचबरोबर पाण्याचे निरनिराळे स्त्रोत शोधले जातात, धरणे बांधली जातात या संदर्भात एक चांगला कृती आराखडा कालबध्द पध्दतीने तयार केला पाहिजे. अन्यथा नेमेचि येतो पावसाळा असे होता कामा नये. कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळाची कामे 15 वर्षापासून रखडली आहेत. तापी खोरे पाटबंधारे महामंडळाची देखील हीच अवस्था आहे. असे न होता युध्द पातळीवर सगळ्या योजना पूर्ण करुन शेतकऱ्यांपर्यंत पाणी पोहोचविण्यासाठी सरकारने धोरण निश्चित केले पाहिजे. पाण्याचे वितरण चांगल्या पध्दतीने व्हावे, हे वितरण करीत असताना पहिले प्राधान्य पिण्याच्या पाण्यासाठी, दुसरे प्राधान्य कोरडवाहू व अल्पभूधारक शेतकऱ्यांना पुरविण्याच्या दृष्टीने किमान एक हंगाम ओलितासाठी पाणी दिले जाईल, दोन हंगामासाठी शक्य झाल्यास नंतर विचार करावा. पशु पालनासाठी तिसऱ्या क्रमांकाचे प्राधान्य असावे आणि चौथा प्राधान्य क्रमांक कृषी, उद्योगधंद्यांसाठी दिला गेला पाहिजे. त्या नंतर इतर व्यवसायाला प्राधान्य दिले गेले पाहिजे. जे अतिरिक्त पाणी उपयोग न करता अन्य ठिकाणी दिले जाते त्यावर मर्यादा आणून गरजेप्रमाणे त्याचा वापर करावा अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

----

नंतर 4आय.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ पूर्वी श्री. भोगले..... 19:05

श्री. राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : महोदय, महाराष्ट्राने सिंचनात केलेली गुंतवणूक ही देशातील कोणत्याही राज्यापेक्षा जास्त असून सर्वात जास्त सिंचन प्रकल्प याच राज्यात आहेत. तरी देखील आपल्या राजयाचे सिंचनाखालील क्षेत्र फक्त 17.50 ते 19 टक्क्यापर्यंतचे आहे. देश पातळीवर हे प्रमाण 42 टक्के आहे, पंजाबमध्ये 67 टक्के, हरियाणा राज्यात 85 टक्के, उत्तर प्रदेशात 40 टक्के, कर्नाटक मध्ये 32 टक्के आणि अगदीच वाळवंट म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राजस्थानमध्ये सुध्दा 35 टक्के व गुजरातमध्ये 45 टक्के आहे. कोकणाचा विचार करता ही आकडेवारी फक्त 5 टक्क्यावरच थांबते. मंत्री महोदय आपण कोकणातील आहात म्हणून मी मुद्दाम बोलत आहे. अशी परिस्थिती कोकणात आहे तरी देखील 25 हजार मेगावॅटचे प्रकल्प रायगड, सिंधुदुर्ग व रत्नागिरी या तीन जिल्ह्यांमध्ये येत आहेत. त्यांची यादी मी वेळेअभावी वाचून दाखविणार नाही, पण या सर्व प्रकल्पांना पाणी कोठून देणार हा महत्वाचा प्रश्न आहे. सिंचनाचे प्रमाण फक्त 5 टक्के आणि विजेचे प्रकल्प मात्र किती तरी मोठ्या प्रमाणात येत आहेत हे प्रमाण व्यस्त दिसते. सांगली, सातारा या जिल्ह्यांपेक्षा कोकणाचे दरडोई उत्पन्न जास्त आहे. हे उत्पन्न 64 ते 65 हजारापर्यंत गेले आहे. या सर्व गोष्टींचा विचार करता कोकणाला आपण अर्थमंत्री असताना थोडा फार न्याय मिळाला पण आता जलसंपदा मंत्री म्हणून न्याय द्यावा अशी मी विनंती करतो.

महोदय, कोकणातील सिंचन प्रकल्प जे 70 ते 90 टक्के पूर्ण झालेले आहेत त्यांच्या किंमतीमध्ये 967 टक्क्यांनी वाढ झालेली आहे. हे प्रकल्प पूर्ण करावयाचे असतील तर त्याची आज 957.44 कोटी रुपये एवढी किंमत आहे. तसेच एकंदरीत प्रकल्पांचा खर्च विचारात घेतला तर 4209.78 कोटी रुपये इतका खर्च आतापर्यंत झालेला आहे व 6012.76 कोटी रुपये इतक्या निधीची गरज आहे. ही आकडेवारी पाहिली आणि आतापर्यंत ज्या प्रमाणात निधी मिळत होता त्याचा विचार केला तर अजून 50 वर्षे तरी हे प्रकल्प पूणr होणार नाहीत. म्हणून माझी या निमित्ताने मागणी आहे की, जे प्रकल्प 90 टक्के पूर्ण झालेले आहेत त्यांचे काम पूर्ण करण्यासाठी आवश्यक तो निधी शासनाने दिला पाहिजे.

त्याचबरोबर कोकणात विजेचे प्रकल्प येऊ घातलेले आहेत, त्यांचा विचार केला तर कोकणातील पाण्याच्या नियोजनाच्या संदर्भात अडचण निर्माण झाली आहे त्याचाही विचार करणे गरजेचे आहे. आज या विधेयकाच्या निमित्ताने माननीय मुख्यमंत्र्यांनी शेतीला प्राधान्य देण्याबाबत

....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली ........

जी घोषणा केली त्याबद्दल त्यांचे व माननीय जलसंपदा मंत्र्यांचे सुध्दा आभार व्यक्त करतो. कारण गेल्या 50 वर्षांपासून बर्वे आयोगाने जे निकष घालून दिलेले आहेत त्यांचा स्वीकार करुन सुवर्ण महोत्सवी वर्षात असा ऐतिहासिक निर्णय घेऊन जनतेला भेट दिली त्याबद्दल मी माननीय मुख्यमंत्री व माननीय जलसंपदा मंत्र्यांना धन्यवाद देतो. शेवटी इतकेच सांगू इच्छितो की, मंत्री महोदयांनी आपल्या उत्तरात कोकणासाठी नवीन काय देणार याची घोषणा करावी. कारण कोकणातील प्रकल्पांच्या किंमती 1000 पटीने वाढलेल्या आहेत, अशा परिस्थितीत हे प्रकल्प कधी पूर्ण होणार याची शंका येते. त्यासाठी ज्यांची 90 ते 95 टक्के कामे पूर्ण झाली त्यांना निधी देऊन हे प्रकल्प पूर्ण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तसेच ज्यांची 90 टक्के कामे पूर्ण झाली त्यांचे भूसंपादन सुध्दा अनेक ठिकाणी पूर्ण झालेले नाही. या सर्व बाबींचा विचार करुन इतर प्रगत जिल्ह्यांच्या तुलनेत कोकणावर झालेला अन्याय दूर करावा. तसेच पुणे, कोल्हापूर, नागपूर, नाशिक यासारख्या प्रगत जिल्ह्यांचा विचार करता कोकणातील दरडोई उत्पन्न जे 65 हजारापर्यंत गेले आहे ते रायगड, सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यात सिंचनाचे क्षेत्र वाढवून दिले तर भविष्यात 2 लाखावर जाईल, या दृष्टीने मंत्री महोदयांनी विचार करावा, अशी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

------

यानंतर श्री. जुन्नरे ...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, आज सकाळी मी जे सुधारणा विधेयक मांडले होते त्यावर सन्माननीय सदस्य सर्वश्री माणिकराव ठाकरे, दिवाकर रावते, विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर, श्री. रामदासजी कदम, माझे आयुष्यभराचे मित्र श्री. जयंत प्र.पाटील, डॉ. नीलम गो-हे, श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री. वसंतराव खोटरे, श्री. संजय केळकर, डॉ.रणजित पाटील, श्री. भगवानराव साळुंखे व श्री. राजन तेली अशा सन्माननीय सदस्यांनी अत्यंत महत्वाच्या विधेयकावर अभ्यासपूर्ण विवेचन केलेले आहे. सकाळी विधेयक मांडतांना विधेयकाची आवश्यकता काय होती यासंदर्भातील विवेचन केले होते.

मी पुन्हा एकदा स्पष्टपणे सांगू इच्छितो की, महाराष्ट्रातील पाणी वाटपाचे मार्गदर्शक तत्वाच्या संदर्भात 1976 मध्ये पाटबंधारे विभागाने अधिनियम केला होता. त्यामध्येच विहित करण्यात आली होती. सदरच्या अधिनियमानुसार राज्यातील प्रकल्पाचे पाण्याचे व बिगर सिंचन उद्देशासाठी नियम करण्यात येत होते व राज्याच्या जलसंपत्तीचा शाश्वत विकास व इष्टतम वापर आणि व्यवस्थापन या एकमेव आणि खाजगी दृष्टीकोनातून राज्याने सन 2003 मध्ये राज्याची जल नीती पुरस्कृत केली होती. ही जल नीती अंमलात आणण्यासाठी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन, प्राधिकरण 4 मे, 2005 रोजी आले व महाराष्ट्र सिंचन पध्दतीचे शेतक-यांकडून व्यवस्थापन अधिनियम 19 मे, 2005 रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या तिनही अधिनियमातील तरतुदी विचारात घेता पाण्याच्या वाटपासंदर्भात राज्य शासन महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण व पाटबंधारे महामंडळाचे नेमके अधिकार काय आहेत याबाबत लोकांच्या मनातील संभ्रम दूर करण्याची आवश्यकता होती. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण 2005 ची परिणामकारक रित्या अंमलबजावणी करण्यासाठी मे 2011 मध्ये काही सुधारणा प्रस्तावित केल्या होत्या. MWRRA हा ज्यावेळेला सन 2005 चा कायदा केला होता. (अडथळा) त्यावेळी 1976 चा कायदा सन 2005 मध्ये निरसीत केला नव्हता. 2003 चा आदेश हा 1976 च्या पाटबंधारे कायद्यान्वये केलेला आदेश आहे. जोपर्यंत 2005 चा पाटबंधारे कायदा निरसीत केलेला नाही तोपर्यंत तो कायदा लागू होतो असे म्हणणे मला सकाळी मांडावयाचे होते.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे.....

या विधेयकाच्या निमित्ताने चर्चा झाली त्यामध्ये दोन चार गोष्टीचा प्रामुख्याने उल्लेख करण्यात आला. माननीय मुख्यमंत्र्यांनी या विधेयकाच्या संदर्भात स्पष्टीकरण केले असून धोरण सुध्दा जाहीर केलेले आहे. मघाशी माननीय मुख्यमंत्री म्हणाले की,सन 2005 मध्ये जो कायदा केला त्यामध्ये चूक झाली होती परंतु आपण त्यांच्या वाक्याचा अर्थ चुकीचा घेतला. यामध्ये जी चूक झाली होती ती दुरुस्त करण्याचे काम आता आपण करीत आहोत. सन 2005 मध्ये कायदा केला त्यावेळेस यासंदर्भातील जी काही स्पष्टता व्हावयास पाहिजे होती ती झाली नव्हती. आपल्या सर्वांनी कबूल केले आहे की, लोकशाही मध्ये लोकांनी निवडून दिलेल्या सरकारकडेच या संदर्भातील अधिकार असावेत याबाबत या सभागृहात किंवा विधानसभागृहातील कोणत्याही सदस्याचे दुमत असणार नाही. सन 2005 च्या अधिनियमाद्वारे 1976 चा कायदा सुध्दा अस्तित्वात होता व त्यामध्ये जी काही विसंगती झाली होती त्याचे स्पष्टीकरण करण्यासाठी आपण या ठिकाणी सुधारणा विधेयक आणलेले आहे. गेल्या 5 वर्षाच्या पाणी वाटपाच्या संदर्भात बरीच माहिती छापून आलेली आहे. एकंदरीत 2005 च्या नंतर 103 परवानग्या देण्यात आल्या होत्या.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे ..

2005 सालानंतर 103 प्रकल्पांना परवानग्या देण्यात आल्या होत्या त्यापैकी 52 परवानग्या केवळ पिण्याच्या पाण्यासाठी देण्यात आल्या होत्या. त्यामध्ये औरंगाबाद जिल्हयातील सिल्लोड येथील पिण्याच्या पाण्याची एक योजना आहे.केज मधील इसू भडगाव नावाची पिण्याच्या पाण्याची एक योजना आहे. नाशिक शहरासाठी जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निमाण कार्यक्रमाअंतर्गत पिण्याच्या पाण्याची एक योजना आहे, नाशिक तालुक्यात पळसे येथे पिण्याच्या पाण्याची एक योजना आहे,लातूर मध्ये सुध्दा एक योजना आहे.सन्माननीय सदस्य सांगत होते की सरसकट योजना रद्द करण्यात याव्यात परंतु त्या योजनांमध्ये पिण्याच्या पाण्याच्या योजनांचा देखील समावेश आहे.तेव्हा या संदर्भातील स्पष्टता होणे आवश्यक आहे म्हणून मी हा खुलासा करीत आहे. मघाशी पेंच प्रकल्पाचा देखील उल्लेख करण्यात आला होता.

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय मंत्री महोदय आमच्या बोलण्यासंबंधी संशय निर्माण करीत आहेत. पिण्याच्या पाण्याच्या योजनेसंबंधी कोणीही सन्माननीय सदस्य बोलणार नाहीत. पिण्यासाठी पाणी दिलेच पाहिजे.

श्री.सुनील तटकरे :सभापती महोदय उच्चाधिकार समितीने घेतलेल्या निणर्याच्या संदर्भात जे बोलले गेले होते त्यासबंधी स्पष्टता होणे आवश्यक आहे. सन्माननीय सदय्यांनी त्यांच्या भाषणात जे काही वक्तव्य केलेले आहे त्याबाबतीत माझा काहीही आक्षेप नाही. पेंच प्रकल्पातील पाणी उद्योगाला न देता नागपूर शहरासाठी देण्यात आले होते.काही ठिकाणी वीज निर्मितीसाठी आणि उद्योगासाठी पाणी देण्यात आलेले आहे हे मी नाकारत नाही. परंतु पिण्याच्या पाण्यासाठी सुध्दा 50 टक्के पाणी देण्याचा निर्णय उच्चाधिकार समितीने घेतलेला होता हेच मला सांगावयाचे आहे.आज या ठिकाणी जो काही निर्णय घेण्यात आला आहे तो निर्णय माननीय मुख्यमंत्र्यांनी घोषित केलेला आहे.मी स्वत: ज्यावेळी सुधारणा विधेयक मांडले होते त्यावेळी विभागाची भूमिका स्पष्ट केली होती. 1960 साली बर्वे कमिशनने ज्या शिफारशी केल्या होत्या त्या शिफारशी शासनाने स्वीकारल्या होत्या.सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस म्हणाल्या ते खरे आहे की या शासनाने बर्वे कमिशनने केलेल्या शिफारशी स्वीकारल्या असून पाण्याचा प्राधान्य क्रम ठरविण्यात आला त्यानुसार पिण्याच्या पाण्यासाठी पहिला प्राधान्य क्रम,उद्योगासाठी दुसरा प्राधान्य क्रम, शेतीसाठी तिसरा प्राधान्य क्रम देण्याचे ठरविण्यात आले होते. अशा प्रकारे जरी प्राधान्य क्रम

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे ..

देण्यात आला असला तरी ढोबळमानाने पाण्याचे वाटप होत असतांना बिगर सिंचनाच्या पाण्याचे वाटप हे 25 टक्के राहिले आणि सिंचनासाठी 75 टक्के पाणी राहिले आहे. यामध्ये दुमत असण्याचे कारण नाही. आज आपण हा क्रम बदलला आहे. सकाळी देखील बोलत असतांना मी सांगितले की, गेल्या चार पाच दिवसापासून या प्रश्नाच्या बाबतीत चर्चा होत आहे. तसेच आदरणीय केन्द्रीय कृषी मंत्री श्री शरद पवार यांनी देखील मला एक सूचना केली होती. मघाशी माननीय मुंख्यमंत्र्यांनी मंत्रिमंडळाने मान्य केलेल्या प्रस्तावासंबंधीचा उल्लेख केला होता. याबाबतीत विधेयकामधील ती सुधारणा नव्हती तर राज्य सरकारने जे धोरण जाहीर केले होते त्या संदर्भातील ही सुधारणा होती आणि सन्माननीय सदस्यानी देखील आग्रह धरला होता की, त्या सुधारणेच्या संदर्भात घोषणा करण्यात यावी व ती आज या माध्यमातून करण्यात आली आहे. मघाशी सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले की, बिगर सिंचनासाठी जे पाणी देण्यात येते ते पाणी पुनर्स्थापित करण्यासाठी प्रती हेक्टरी एक लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. त्या पध्दतीने ज्या ज्या ठिकाणी बिगर सिंचनासाठी पाणी दिले जाईल त्या त्या ठिकाणी पाणी पुनर्स्थापित करण्यासाठी खर्चाची तरतूद करण्यात आलेली असून त्याप्रमाणे करण्यात येणार आहे.सन्माननीय सदस्यांनी कायद्याच्या बाबतीत सांगितले आहे त्याबाबत मी सांगू इच्छितो की, as per the inherent powers under Article 226 हायकोर्टमधील ज्युडिशिअल रिटचा अधिकार सर्वांनाच मोकळा आहे तो अधिकार अमान्य करण्यात आलेला नाही. त्यामुळे कायद्याच्या विरोधात शासनाने कोणती गोष्ट केली आहे अशातला भाग नाही. बिगर सिंचनासाठी पाणी देत असतांना केवळ विदर्भातील पाणी बिगर सिंचनासाठी देण्यात आलेले आहे असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले परंतु प्रत्यक्षात तसे करण्यात आलेले नाही.मी सभागृहाच्या रेकॉर्डवर आणण्यासाठी हे सांगतो की, विदर्भातील औष्णिक विद्युत प्रकल्पासाठी 581 द.ल.ध.मी. पाणी वापरण्यात आले आहे. जलविद्युतासाठी काहीही पाणी वापरण्यात आलेले नाही. कोकणातील औष्णिक विद्युत प्रकल्पासाठी 111.74 द.ल.ध.मी. पाणी वापरण्यात आले आहे आणि जलविद्युतासाठी काहीही पाणी वापरण्यात आलेले नाही.पश्चिम महाराष्ट्रातील औष्णिक विद्युत प्रकल्पासाठी 52.06 द.ल.ध.मी. पाणी वापरण्यात आले आहे आणि जलविद्युत प्रकल्पासाठी 5 हजार 10 द.ल.ध.मी. पाणी वापरण्यात आले आहे.उत्तर महाराष्ट्रातील औष्णिक विद्युत प्रकल्पसाठी 86.65 दर.ल.घ.मी.पाणी वापरण्यात

3..



VTG/ श्री.जुन्नरे 19.15

श्री.सुनील तटकरे ..

आले आहे आणि जलविद्युत प्रकल्पासाठी 118 द.ल.घ.मी. पाणी वापरण्यात आले आहे.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे...

मराठवाडयामधील सुध्दा 34 द.ल.घ.मी. पाणी औष्णिक प्रकल्पासाठी दिले आहे. आज राज्यात आपण कोयनेची वीज तयार केली ती फक्त पश्चिम महाराष्ट्रासाठी वापरलेली नाही. आपण म्हणालात ते खरे आहे की, राज्याच्या ज्या भागामध्ये विद्युत प्रकल्पामधून निर्माण झालेली वीज त्या परिसरामधील सर्वांना मिळाली पाहिजे याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या विधेयकावर बोललेल्या सर्व माननीय सदस्यांच्या भाषणामध्ये या बाबत उल्लेख झाला असल्यामुळे ही गंभीर बाब आहे. या विधेयकाच्या कलम 31 (ख) मध्ये म्हटल्याप्रमाणे "या अधिनियमामध्ये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये अथवा कोणत्याही न्यायालयाचा, न्यायाधिकरणाचा किंवा प्राधिकरणाचा कोणताही आदेश, न्यायनिर्णय किंवा हुकूमनामा यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाच्या तरतुदींना अनुसरुन जलसंपत्ती प्राधिकरण जो निर्णय देईल त्यावर याचा परिणाम होणार नाही". असे असतांना आपण या संदर्भात न्यायालयाचे काहीही निर्बंध नाहीत असे म्हणत आहात. तेव्हा या कलम 31 (ख) संदर्भातील तरतुदीबाबत पूर्ण विश्लेषण होणे आवश्यक आहे. मंत्रिमंडळाने दिलेल्या निर्णयाच्या विरोधात महाराष्ट्रातील शेतकऱ्याला जर न्याय मागावयाचा असेल तर त्यासाठी न्यायालयाचे दरवाजे उघडे आहेत की नाहीत हे आम्हाला समजले पाहिजे.

त्याचप्रमाणे सभापती महोदय, कलम 31 (ग) मध्ये असे म्हटले आहे की, "या अधिनियमामध्ये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अधिनियम, 2011 याच्या कलम 1 च्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी म्हणजेच दिनांक 17 सप्टेंबर, 2010 पूर्वी उच्चाधिकार समितीने किंवा नदी-खोरे अभिकरणाने अथवा राज्य शासनाने दिलेली परवानगी, वाटप, मंजूरी, प्राधिकार किंवा पाण्याची हक्कदारी ही वैध असेल आणि नेहमीकरिता वैध असल्याचे मानण्यात येईल आणि तद्नुसार कोणत्याही न्यायालयासमोर, न्यायाधिकरणासमोर किंवा इतर प्राधिकरणासमोर पाणी घेण्यासाठी अशी परवानगी, वाटप, मंजुरी, प्राधिकार किंवा पाण्याची हक्कदारी यांना आक्षेप घेणारा कोणताही दावा, खटला किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही" . सभापती महोदय, आज सोफियाच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयामध्ये अंतिम सुनावणीकरिता खटला आलेला आहे. त्याबाबत दोन दिवसांनी सुनावणी होणार असतांना

सरफरे/

श्री. दिवाकर रावते....

आपल्याला हे विधेयक घाई-घाईत कां मजूर करावयाचे आहे? याचे कारण म्हणजे महत्तम अनुशेष असलेल्या अमरावती जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे पाणी बेकायदेशीररित्या सोफियाला दिले आहे त्या बाबत या सरकारच्या विरोधात न्यायालयात 100 टक्के निकाल लागणार आहे. या राज्याच्या ॲडव्होकेट जनरल यांचा मुलगा त्या सोफिया कंपनीमध्ये काम करीत आहे म्हणून या सरकारचे ॲडव्होकेट जनरल कोर्टामध्ये सरकारच्या विरोधात भूमिका मांडीत आहेत. म्हणजेच कायद्याच्या बाबतीत शेत कुंपण खात आहे, अशाप्रकारची परिस्थिती निर्माण झाली आहे.

सभापती महोदय, न्यायालयामध्ये खटला सुरु असल्यामुळे आपल्याला हे विधेयक या सभागृहामध्ये आणता येणार नाही असा विधी व न्याय विभागाने सल्ला दिलेला आहे. त्यानंतर ॲडव्होकेट जनरल यांचे ओपिनियन घेण्यात आले आहे. त्याबाबत माहितीच्या अधिकारामध्ये घेतलेली लेखी कागदपत्रे माझ्याकडे आहेत. अशा परिस्थितीत ॲडव्होकेट जनरल यांनी त्याच्या मुलाचे हित समोर ठेवून शासनाला हे विधेयक सभागृहामध्ये आणता येईल अशाप्रकारचे मत नोंदविले आहे. अशाप्रकारे या विधेयकाच्या बाबतीत सर्व ठिकाणी बनवा बनवी करण्यात आलेली आहे. ते म्हणत आहेत की, उध्या न्यायालयाचा जो काही निर्णय लागेल तो आपल्याला बंधनकारक नसेल. मागील सर्व गोष्टी पचविण्याकरिता आपण हे सर्व करीत आहात असा माझा आक्षेप आहे. मंत्री महोदय, आपण 52 प्रकल्प सोडून कोणकोणत्या ठिकाण्ी पाणी वाटप केले आहे याची माहिती सांगा.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, मघाशी माननीय सदस्यांनी 52 प्रकल्पांखेरीज कोणते प्रकल्प मंजूर करण्यात आले याची यादी वाचून दाखविली आहे....

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेबांनी आता असे सांगितले की, या राज्याच्या ॲडव्होकेट जनरल यांचा मुलगा सोफिया कंपनीमध्ये आहे हे लक्षात घेऊन जर ॲडव्होकेट जनरल चुकीचा सल्ला देत असतील तर ती गंभीर बाब आहे. तसे असेल तर त्या ॲडव्होकेट जनरलना ठेवायचे की नाही याचा आपल्याला विचार करावा लागेल. या बाबत विधानसभेमध्ये कबूल केल्याचे मला समजले आहे. ॲडव्होकेट जनरल यांचे हितसंबंध सोफिया कंपनीशी आहेत काय, असतील तर ते चुकीचे आहे याबाबत सभागृहामध्ये खुलासा झाला पाहिजे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेब यांनी जो मुद्दा मांडला, त्या बद्दल मी मघाशी देखील सांगितले की, आर्टीकल 226 अंतर्गत हायकोर्ट मधील ज्युडिशिअल रिटचा अधिकार अबाधित आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेब यांनी घेतलेला आक्षेप गंभीर आहे.शासनाच्या दृष्टीने गंभीर आहे, मान खाली घालावयास लावणारा आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, याठिकाणी जे सुधारणा विधेयक मांडलेले आहे त्याचा सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेब यांनी जो आक्षेप घेतलेला आहे,त्याच्याशी दुरान्वयानेही संबंध नाही. त्यामुळे याबाबत आता माझ्याकडे माहिती नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी अधिकृतरित्या निवेदन करतो. हे विधेयक आणावयाचे की नाही याबाबतीत विधी व न्याय विभागाचा कक्ष "अ" आहे आणि त्यांची जी नस्ती आहे त्यामध्ये स्पष्ट शब्दात निर्णय दिला आहे की, न्यायालयामध्ये यासंदर्भात जो खटला सुरु आहे, त्यामुळे तुम्हाला सध्या हे विधेयक येथे आणता येणार नाही. विधेयक चार-पाच पानी आहे आणि माझ्याकडे माहितीच्या अधिकारा अंतर्गत सर्व आलेले आहे.सभापती महोदय,त्यांनी नकारात्मक सांगितल्यानंतर मग त्यांना परत सांगण्यात आले. सरकार बोलवून त्यांना सांगणार. मग त्यांनी सांगितले की, ठीक आहे.याठिकाणी सर्वोच्च न्यायालयाचे दोन निकाल नमूद केलेले आहेत. यासंबंधातील फाईल अजून आलेली नाही,नाहीतर मी तुम्हाला वाचून दाखविले असते. त्यांनी सर्वोच्च न्यायालयाने दोन निकाल त्यात नमूद केलेले आहेत आणि या निकालानुसार तुम्हाला याबाबतीत विचार करावा लागेल अशा प्रकारे विधी व न्याय विभागाने सर्व सांगितले. आपल्या विधी व न्याय विभागाने हे विधेयक येथे आणावयाचे की नाही हे ठोक शब्दामध्ये सांगण्याऐवजी त्यांनी सांगितले की, ॲडव्होकेट जनरल यांचा सल्ला घ्यावा. ॲडव्होकेट जनरल श्री.रवी कदम आहेत. 371(2) नुसार राज्यपाल महोदयांना निदेश देण्याचा कोणताही अधिकार नाही अशा प्रकारची रिट पिटीशन होती, त्याच्या बाजूने त्यांनी नागपूर खंडपीठापुढे बाजू मांडली. हे अतिशय गंभीर झाले. मग आम्ही माननीय राज्यपालांना भेटलो आणि ॲडव्होकेट जनरल यांचा ताबडतोब राजीनामा घ्यावा अशी विनंती केली. आज श्री.रवी कदम जे आपले महाअधिवक्ता आहेत, त्यांच्यावर अविश्वास दाखवून त्यांच्याजागी आता तेथे दुसरे वकील काम करीत आहेत. तेव्हा संबंधितांवर संशय व्यक्त करुन त्यांना बाजूला काढण्यात आलेले आहे. म्हणून मी असे म्हणालो की, कुंपणच शेत खात आहे. विधानसभेमध्ये सन्माननीय सदस्य श्री.देवेंद्र फडणवीस यांनी उघडरित्या सांगितले की, त्यांचे

श्री.दिवाकर रावते . . . .

चिरंजीव अमुक-अमुक हे सोफिया कंपनीमध्ये अमुक पदावर असल्यामुळे ते सोफियाच्या बाजूने काम करीत आहेत. त्यामुळे सरकार महाअधिवक्ता कडून सरकारची बाजू मांडण्याऐवजी सरकारची बाजू अशा पध्दतीने मांडली जाते की जी सोफिया कंपनीस कशी फेव्हरेबल राहील. तेव्हा हे विधेयक याठिकाणी अधिकृतरित्या त्यांच्या सल्ल्याने आले आहे.

सभापती महोदय, अशा वेळी जर कोणत्याही न्यायालयामध्ये एखाद्या शेतकऱ्याला जाता येणार नसेल,त्याच्यावर होणाऱ्या अन्यायासाठी दाद मागता येणार नसेल तर मग या लोकशाहीमध्ये एकतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या दिवशी सुटी असताना देखील हे विधेयक मंजूर केले आणि आता विधान परिषदेमध्ये आणले आहे. यातून तुम्ही घटनेचा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा अवमान केला आहे आणि याठिकाणी अशा प्रकारे जी मुस्कटदाबी केली जात आहे ते अत्यंत गंभीर आहे. हे विधेयक त्यांच्या सल्ल्याने आणलेले आहे. आम्ही बोलण्यासाठी उभे राहिलो नसतो, शांत होतो. पण त्यांनी स्वत:च सांगितले की, असे काही केलेले नाही. न्यायालयामध्ये जाता येईल, अमुक करता येईल. मग आम्हाला याचा अर्थ समजावून सांगावा ही आमची इच्छा आहे आणि त्यासाठी विधी व न्याय विभागाच्या ॲडव्होकेट जनरल यांना येथे बोलविण्यात यावे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, आपण या सदनामध्ये दोन वेळा ॲडव्होकेट जनरल यांना बोलाविलेले आहे. त्यामुळे ॲडव्होकेट जनरल यांचे मत घेणे हे गैरवाजवी आहे अशातला भाग नाही. यापूर्वी अर्थसंकल्पाच्या अनुषंगाने ग्रीन बुकच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरीसाहेब विरोधी पक्षनेते असताना त्यांनी विषय उपस्थित केला होता, तेव्हा या सदनामध्ये पहिल्यांदा ॲडव्होकेट जनरल यांना पाचारण करण्यात आले होते. याचा अर्थ असा आहे की, आपण काही कायदेशीर बाबतीत राज्याच्या ॲडव्होकेट जनरल यांचे मत घेतो आणि राज्य सरकार ते अंतिमत: स्वीकारत असते. पण त्या व्यक्तीबद्दल त्यांचे जे काही म्हणणे असेल तर ते माननीय मुख्यमंत्री सांगू शकतील. पण त्यांचे मत घेणे गैरलागू आहे असे मला काही वाटत नाही.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय,ॲडव्होकेट जनरल यांचा मुलगा सोफिया कंपनीमध्ये कामाला आहे आणि त्यांनी सोफिया कंपनीच्या बाजूने निकाल दिलेला आहे असा हा विषय आहे.

यानंतर कु.थोरात . . ..

अप्रकाशित प्रत / ग्राह्य धरू नये

श्री. रामदास कदम....

सभापती महोदय, ॲडव्होकेट जनरलकडून मत मागवावे, त्यांचा मुलगा त्या कंपनीमध्ये कामाला आहे.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, या विधेकामध्ये सोफिया कंपनीचा......

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, विधी व न्याय विभागाने शासनाला हे विधेयक मांडता येणार नाही, शासनाने हे विधेयक मांडू नये अशा प्रकारचे मत दिले होते. तसे मत दिले नसेल तर तसे मंत्री महोदयांनी या ठिकाणी सांगावे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे. सन्माननीय सदस्य त्यांची बाजू मांडत असताना मंत्री महोदय शांतपणे ऐकून घेत आहेत. पण मंत्री महोदय उत्तर देण्यासाठी उभे राहिले की, त्यांना त्यांचे वाक्य सुध्दा पूर्ण करु दिले जात नाही. सातत्याने त्यामध्ये अडथळे निर्माण करण्यात येत आहेत. सदस्यांना नेमके उत्तर पाहिजे, या विधेकातील माहिती पाहिजे की, उत्तरामध्ये सातत्याने अडथळा निर्माण करावयाचा आहे? सभापती महोदय, मंत्री महोदयांना आपण संरक्षण दिले पाहिजे.

( अनेक सदस्य एकाच वेळी बोलतात )

**सभापती** : या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या ठिकाणी जो हरकतीचा मुद्दा मांडलेला आहे त्या अनुषंगाने मला असे वाटते की, जसे शासनामध्ये विधी व न्याय विभागाचे सल्लागार असतात तसे ॲडव्होकेट जनरल हे राज्याला सल्ला देण्याच्या दृष्टीने एक अत्यंत महत्वाची व्यक्ती आहे. या संस्थेच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी जे भाष्य केलेले आहे त्या अनुषंगाने विधी व न्याय विभाग किंवा शासन जरुर त्या पध्दतीने बघू शकेल. मला असे वाटते की, विधेयकात काहीही असले तरी न्यायालयाचे ज्युडिशिअल रीट अबाधित राहतात, ज्युडिशल रिव्हयू हा बेसिक स्ट्रक्चर ऑफ कॉन्स्टिटयुशन आहे, त्यामुळे हा हरकतीचा मुद्दा होत नाही,असे माझे रुलिंग आहे.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, या विधेयकाच्या माध्यमातून राज्यातील शेतकऱ्यांच्या हिताची जपणूक करण्याच्या संदर्भात कोणाचे दुमत असण्याचे काही कारण नाही. वेगवेगळया प्रकल्पांच्या संदर्भात या ठिकाणी काही भावना व्यक्त करण्यात आलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी एटवना प्रकल्पाच्या संदर्भात सांगितले. मी त्यांच्या माहिती करिता

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे....

एवढेच सांगेन की, एटवना प्रकल्पातून 1100 हेक्टर इतकी सिंचन क्षमता निर्माण झालेली आहे. त्यापैकी वापर फक्त 300 हेक्टरसाठी होत आहे. उरलेली 800 हेक्टर जमीन सिंचनाखाली आणण्यासाठी शेतकऱ्यांना उद्युक्त करण्याच्या दृष्टिकोनातून आपण बरोबरीने प्रयत्न करु. उरलेले जे काही सिंचनाचे लाभक्षेत्र तयार करावयाचे आहे, त्यासाठी कालव्यासाठी जी जमीन संपादित करावयाची आहे, त्यासाठी जलसंपदा विभागाची तयारी आहे. याबाबतीत शेतकऱ्यांची मदत घेऊ. एटवना मूळ प्रकल्पामध्ये जेवढा कालवा धरला होता तेवढा कालवा निश्चितपणे केला जाईल.

सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी काही मुद्दे मांडलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी काही मुद्दे मांडले आहेत. अर्थसंकल्पातील मागण्यांच्या चर्चेच्यावेळी मी विधानसभेमध्ये संगितले की, या वर्षी 2 लाख हेक्टर सिंचनाची क्षमता निर्माण करण्याचे जलसंपदा विभागाने निश्चित केलेले आहे. महाराष्ट्रातील सिंचनाचे लाभक्षेत्र वाढविण्याच्या दृष्टिकोनातून जाणीवपूर्वक एखादा प्रयत्न केला जात असतो, सभापती महोदय, मी या बाबतीत सुरुवातीलाच विधेयक मांडताना सांगितले की, एकाच वेळेला सिंचनाचे लाभक्षेत्र वाढविणे, शेती आणि शेतीवरील पूरक व्यवसायाला अधिक प्रोत्साहन देणे, त्याचबरोबर राज्यामध्ये वेगवेगळया औद्योगिकीकरणाच्या माध्यमातून रोजंदारीचे प्रश्न सोडविणे, यासाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टी राज्य शासनाच्या निर्णयाच्या माध्यमातून करणे, यालाच लोकशाही आघाडीच्या सरकारने गेल्या दहा-अकरा वर्षात सातत्याने प्राधान्य दिलेले आहे. पुढच्या कालावधीमध्ये सुध्दा हेच धोरण निश्चितपणाने स्वीकारले जाईल आणि राज्यातील शेतीमाल आणि शेतीचे उत्पन्न यावर भर देण्याच्या दृष्टिकोनातून राज्य शासन निश्चितपणे प्रयत्न करीन.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी जी सूचना मांडली होती ती सभागृहाने एक मताने संमत केली आहे. या सुधारणेसह हे विधेयक मंजूर करावे अशी सभापती महोदय, मी आपल्या मार्फत सभागृहाला विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 4 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**सन 2005 चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक 18 यामध्ये कलम 16 क समाविष्ट करणे**

**सभापती** : खंड 5 ला सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते, डॉ. नीलम गोऱ्हे, श्री. परशुराम उपरकर, डॉ. दीपक सावंत यांनी सुधारणा सुचविलेली आहे. त्यांच्यापैकी कोणीही एकाने ती मांडावी.

श्री. दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील सुधारणा मांडतो.

खंड 5, पृष्ठ क्रमांक 4, ओळ क्रमांक 5 नंतर पुढील परंतुक दाखल करण्यात यावे -

"परंतु आणखी असे की, या अधिनियमामध्ये तसेच इतर कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी मुख्य अधिनियमाच्या कलम 20 मधील सूत्रानुसार सादर झालेल्या वार्षिक अहवालात अद्यावत राज्य सरासरीवर जो जिल्हा जलसिंचनाच्या भौतिक अनुशेषात असेल त्या जिल्ह्यातील सिंचनाचे पाणी कोणत्याही परिस्थितीत सिंचना व्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी वळविले जाणार नाही"

सभापती महोदय, या सुधारणेच्या पुष्ठ्यर्थ मी आपल्यासमोर काही माहिती सादर करु इच्छितो. माझ्याकडे केंद्र शासनाचा "Audit Report (Civil) for the year ended 31 March 2002" हा अहवाल आहे. केंद्र सरकारने मराठवाडा, विदर्भाच्या सिंचनाच्या संदर्भात आणि अनुशेषाच्या बाबतीत जे निष्कर्ष काढले ते सर्व मी वाचत नाही. कारण ते फार मोठे आहे. मी एक बाब मुद्दाम सांगेन की, गोदावरी खोऱ्याच्या अंतर्गत मराठवाड्याकरिता 100 द.ल.घ.मी. पाणी देण्याचा निर्णय झाला पण ते पाणी आम्हाला मिळाले का ? ही बाब मी या सभागृहाच्या माध्यमातून अनेकदा मांडली. त्या ठिकाणी 165 द.ल.घ.फुट पाणी उपलब्ध आहे. त्यापैकी 65 द.ल.घ.फुट पाणी वरच्या भागात घ्यावयाचे आणि 100 द.ल.घ.फुट पाणी खालच्या भागात मराठवाड्याला द्यावयाचे असे आहे पण वरच्या भागात मोठ्या प्रमाणावर प्रकल्प राबविले गेले त्यामुळे जायकवाडी

श्री. दिवाकर रावते ....

धरणामध्ये किती पाणी येत असेल, त्याचा अहवाल मी मुद्दाम आपल्या अनुमतीने माननीय मंत्री महोदयांच्या लक्षात आणून देऊ इच्छितो आणि ही उपसूचना का आणली हे मी सांगू इच्छितो. ज्या ठिकाणी अनुशेष आहे त्या भागातील पाणी जोपर्यंत अनुशेष दूर होत नाही तोपर्यंत इतर उद्योगांना देता येणार नाही. अनुशेष दूर झाल्यानंतर ते देता येईल.

सभापती महोदय, Audit Report (Civil) for the year ended 31 March 2002 या अहवालामध्ये "Adverse effect on yield of Jayakwadi Project " या शीर्षकामध्ये असे म्हटले आहे की, "There was a provision of 115.50 Thousand Million Cubic Feet (TMC) of water for upstream extraction for the Jayakwadi major project completed at a cost of Rs. 243.44 crore in 1986. The Government, however, without considering this aspect sanctioned new irrigation projects that would utilise 156.50 TMC of water from the above mentioned catchment area thereby reducing the availability of water to the Jayakwadi project to 41 TMC...."

सभापती महोदय, 115.50 टीएमसी पाणी ज्या ठिकाणी उपलब्ध होते त्या ठिकाणी शासनाने वर मोठ्या प्रमाणात प्रकल्पांना मान्यता दिली असे केंद्रीय ऑडिटचा रिपोर्ट आहे आणि आता त्या ठिकाणी फक्त 41 टीएमसी पाणी येते. हा अहवाल सन 2002 चा आहे. त्यामध्ये पुढे असे म्हटले आहे की, "...Thus, these projects in upstream of Jayakwadi reservoir had adversely affected the irrigation potential in Jayakwadi project. Government (November 2002) accepted the shortage of water in Jayakwadi reservoir..." म्हणजे महाराष्ट्र सरकारने हे मान्य केले. यामध्ये असे म्हटले आहे की, "...and stated that it would be compensated by taking new projects in downstream side of Jayakwadi project...."

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

आता वरच्या भागात तुमचे पाणी घेतले असल्यामुळे खालच्या भागात नवीन प्रकल्प करुन दिले जातील असे या ऑडिट रिपोर्टमध्ये शासनाने मान्य केलेले आहे. या मध्ये पुढे असे म्हंटले आहे की, "Reply was not tenable as construction of projects in down stream side will not solve the problem of shortage of water in Jayakwadi reservoir which cropped up due to sanctioning of irrigation projects in excess of availability of water." त्या भागातील लोकांचे सिंचनाचे पाणी पळवायचे की द्यावयाचे अशी मराठवाडा व विदर्भाबद्दल सरकारची मानसिकता आहे. जायकवाडी धरणाचे 50 टक्के पाणी कमी झाले आहे. या प्रकल्पाच्या खालच्या भागात प्रकल्प उभे करुन दिले जातील असे मान्य करुनही दिले गेले नाहीत.

सभापती महोदय, हाच विषय मी मघाशी पूर्ण आकडेवारीनुसार सांगितलेला आहे. अमरावती जिल्ह्यातील पाणी पळवून त्या सोफिया प्रकल्पाला कसे दिले गेले ते सांगितलेले आहे. मी आता जी उपसूचना मांडली आहे त्या उपसूचनेचा अर्थ एवढाच आहे. मराठवाडा, विदर्भ, खानदेश या भागातील सन्माननीय सदस्यांचे असे म्हणणे आहे की, आमच्या विभागात सिंचनाचा अनुशेष असल्यामुळे आम्हाला आता वैधानिक विकास मंडळ पाहिजे. त्या सर्व सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, हा प्रश्न कोणत्याही पक्षाचा नाही. हा प्रश्न तुमचा व माझा नाही. आपण व आम्ही ज्या भागामध्ये राहतो त्या भागातील शेतक-यांचा आहे. त्यांना पाणी उपलब्ध करुन देण्यासंबंधीचा हा प्रश्न आहे. माननीय राज्यपालांच्या अहवालामध्ये राज्यात 7 जिल्ह्यात अनुशेष असल्याचे नमूद केलेले आहे. ही उपसूचना जर मंजूर झाली तर हे 7 जिल्हे सोडून बाकीच्या कोणत्याही विभागात उद्योगाला किंवा आणखी कोणत्याही कारणासाठी पाणी देता येईल. जोपर्यंत या 7 जिल्ह्यांचा अनुशेष दूर होत नाही, शेतकऱ्यांच्या शेतीला पाणी देत नाही तोपर्यंत इतर ठिकाणी पाणी देता येणार नाही. अशा प्रकारचा या उपसूचनेचा परिणाम होईल. या 7 जिल्ह्यांमध्ये बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ व मराठवाड्यातील जालना या जिल्ह्यांचा समावेश आहे.

सभापती महोदय, मघाशी आपल्या दालनामध्ये जी चर्चा झाली त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी मान्य केले आहे. त्याचे आपणही साक्षीदार आहात. मी मांडलेल्या उपसूचनेला विरोध

2....



श्री.दिवाकर रावते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नाही असे म्हणत असताना विरोध कशासाठी केला जातो ? त्या भागात उद्योग आणावयाचे नाही का असे शासनाच्या वतीने बोलले जाते. या बाबत आमचे असे मत आहे की, या अनुशेषग्रस्त भागांचा अनुशेष दूर होत नाही तोपर्यंत तेथे उद्योग आणले नाही तरी चालेल. बाजूच्या जिल्ह्यात उद्योग आणले जातील त्या भागात आम्ही जाऊ. शासनाची तशी तयारी आहे का ? प्रश्न तो नाही. त्या भागातील सिंचनाचा प्रश्न आहे. त्या भागात शेतकरी आत्महत्या करीत आहेत. सिंचन प्रकल्प होण्यासाठी माननीय पंतप्रधान यांना डिस्ट्रेस असा शब्द वापरावा लागतो. माननीय पंतप्रधानांना शेतकऱ्यांच्या प्रश्नासंबंधी अनुकंपा निर्माण झाली किंवा त्यांच्याबद्दल कणव निर्माण झाली, त्यामुळे तिचा आदर केला पाहिजे. माननीय पंतप्रधान तुमच्या पक्षाचे आहेत. ते या देशाचे पंतप्रधान असले तरी या देशामध्ये तुमचा पक्ष सत्तेवर आहे. म्हणून माननीय पंतप्रधानांचा सन्मान राखण्यासाठी व त्या भागातील शेतकऱ्यांना जगण्यासाठी शासनाने पाणी द्यावे असा टाहो आम्ही फोडत आहोत. "विदर्भ इज ग्रेव्हयार्ड ऑफ दी महाराष्ट्र" अशा प्रकारचे वर्णन झालेले आहे. या भागात जास्तीत जास्त आत्महत्या झालेल्या आहेत. म्हणून आपल्यामार्फत मी सरकारला विनंती करीत आहे की, या अनुशेषग्रस्त भागासंबंधी शासनाने प्रतिष्ठेचा प्रश्न करु नये. माझी उपसूचना शासनाने स्वीकृत करावी. त्यामुळे आकाश कोसळणार नाही.

सभापती महोदय, मघाशी मंत्री महोदयांनी असे सांगितले आहे की, शहरांची दिवसेंदिवस वाढ होत असल्यामुळे शहरांना पाणी द्यावे लागणार आहे. शासनाने शहरांना जरुर पाणी द्यावे. त्या ठिकाणी बेकार झालेले लोक शहरातच येणार आहेत. तेथे फार मोठी शहरे नाहीत. महामहिम राज्यपालांनी जाहीर केल्या प्रमाणे 7 जिल्ह्यांपुरती ही उपसूचना लागू होईल. जायकवाडी धरणातील 50 टक्के पाणी इतर भागासाठी पळविण्यात आले आहे. तसे इतर ठिकाणचे पाणी पळविले तर कोकणामध्ये काही प्रकल्प होऊ शकतील. त्यांना सुध्दा ते लागू होईल. आता तसे करणे आवश्यक आहे. म्हणून मी शासनाला नम्रपणे विनंती करतो की, माझी उपसूचना आहे ती मांडण्यामागची भावना ओळखावी. शेतकऱ्यांच्या हितासाठी ही उपसूचना असल्यामुळे ती शासनाने स्वीकारावी. शासनाने ही उपसूचना स्वीकृत केली नाही व मतदान घेण्यासाठी भाग पाडले तर समोरच्या सन्माननीय सदस्यांनी शेतकऱ्यांशी प्रामाणिक रहावे.

यानंतर श्री.शिगम....

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 19:45

(श्री. दिवाकर रावते...

आता कृपा करुन सरकार बाजूला ठेवा आणि तुमच्या भागातील शेतक-याच्या हिताकरिता एक वेळ तरी नि:पक्षपातीपणे आपण सर्वांनी भूमिका घेऊया अशी कळकळीची विनंती करतो. धन्यवाद.

सुधारणा प्रस्तुत झाली.

श्री. सुनील तटकरे (जलसंपदा(कृष्णखोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री) :सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सुधारणेच्या माध्यमातून या ठिकाणी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. त्यांनी या ठिकाणी अनौपचारिक चर्चेचा देखील उल्लेख केला. या अधिनियमाच्या कलम 20 ख अन्वये जिल्हा घटक धरुन राज्य सरासरीशी तुलना करुन दरवर्षी अद्यावत अनुशेष परिगणित करुन महाराष्ट्र जलसंपत्ती प्राधिकरणाच्या अहवालामध्ये समाविष्ट करावा अशा प्रकारची तरतूद करण्यात आलेली आहे. माननीय राज्यपालांनी 2010-2011 साली दिलेल्या निदेशामध्ये समितीने अवलंबावयाच्या विशिष्ट पध्दतीचा विचार करता अनुशेष परिगणन आणि निर्मूलन ही सतत चालू राहाणारी प्रक्रिया असल्याचे नमूद केले आहे. राज्य सरासरीचा विचार करता काही जिल्हे राज्य सरासरीच्या वर, काही जिल्हे राज्य सरासरीच्या खाली राहाणार आहेत. यामुळे या पध्दतीत सर्व भागाचा विकास सारख्याच पातळीवर करण्याचा विचार आहे. सर्व भागाच्या समतोल विकासासाठी त्या भागाची आवश्यकता आणि गरजा याचा विचार केलेला नाही त्या भागातील उपलब्धीचा साकल्याने विचार होणे आवश्यक आहे असे माननीय राज्यपालांनी दिलेल्या आदेशामध्ये नमूद करण्यात आलेले आहे.त्यासाठी एक नवीन तज्ज्ञ समिती नेमण्याची शिफारस केलेली असून नवीन तज्ज्ञ समिती नियुक्त झालेली आहे. अनुशेष जिल्ह्यामध्ये रत्नागिरी, अकोला, वाशिम, बुलढाणा हे देखील जिल्हे येतात. शेवटी या जिल्ह्यामध्ये शेतीवर प्रक्रिया करणारे उद्योग देखील असू शकतात किंवा मोठमोठे अन्य उद्योग येऊ शकतात. त्या उद्योगासाठी देखील पाण्याची आवश्यकता लागणार आहे. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांनी सांगितल्या प्रमाणे पिण्याच्या पाण्याची आवश्यकता असेल तर त्यासाठी कुणाची हरकत असण्याचे कारण नाही. छोटया मोठ्या कारणासाठी पाण्याची आवश्यकता भासू शकते. या संदर्भात आपण स्पष्ट धोरण स्वीकारलेले आहे. त्याबाबतीत मंत्रिमंडळाला देखील आपण अधिकार दिलेले आहेत. सन्माननीय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे....

सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत त्याचा साकल्याने विचार करुन किमान त्या जिल्ह्यांच्या बाबतीत सुध्दा मंत्रिमंडळ निश्चितपणे विचार करील. म्हणून सदनाच्या माध्यमातून मी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना विनंती करतो की त्यांनी आपली सुधारणा मागे घ्यावी.

श्री. दिवाकर रावते : मूळ विधेयकातील तरतूद नवीन विधेयकातून वगळलेली आहे. मूळ विधेयकामध्ये स्पष्टपणे असे म्हटलेले आहे की, "प्रकरण 6 - राज्यपालांच्या निदेशानुसार अनुशेष निर्मूलनासाठी विशेष तरतूद 21(1) ... राज्यातील पाटबंधारे क्षेत्रातील राज्यपालांच्या निदेशानुसार अनुशेषग्रस्त अशा जिल्ह्याच्या व विभागाच्या बाबतीत प्राधिकरण विशेष जबाबदारी पार पाडील. राज्यपालांच्या निदेशांचे पालन होण्यासाठी राज्यातील जलसंपदा विभागाकडे उपलब्ध आहे त्या मनुष्यबळाकडून..." ही तरतूद या विधेयकामध्ये नसल्यामुळे मी ही सुधारणा सुचविलेली आहे.

सुधारणा मतास टाकून असंमत झाली.

**सभापती** : मघाशी सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी आपल्या भाषणात खंड 5 ला दिलेली सुधारणा सभागृहाने जरी एकमताने संमत केली असली तरी विधेयकाच्या कार्यपध्दती नुसार प्रमाणे सदरहू सुधारणा खंडश: विचाराच्या वेळी मांडून संमत होणे आवश्यक असल्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी आपली सुधारणा मांडावी.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील सुधारणा मांडतो.

खंड 5, पृष्ठ क्रमांक 4, ओळ क्रमांक 5 नंतर पुढील मजकूर दाखल करण्यात येईल.

"परंतु आणखी असे की, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण
(सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अधिनियम 2011, राजपत्रात प्रसिध्द
झाल्याचे दिनांकानंतर राज्य मंत्रिमंडळ क्षेत्रीय वाटप निर्धारित करील"

सुधारणा एकमताने संमत झाली.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

खंड 5, सुधारल्याप्रमाणे, विधेयकाचा भाग झाला.

**सन 2005 चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक 18 यामध्ये कलम 31क,31ख आणि 31ग समाविष्ठ करणे.**

**सभापती** : खंड 6 ला सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी सुधारणा सुचविली आहे, त्यांनी आपली सुधारणा मांडावी.

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्ष नेता ) सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील सुधारणा मांडतो.

"पृष्ठ क्रमांक 4-
ओळ क्रमांक 27 ते 31,
पृष्ठ क्रमांक 5-
ओळ क्रमांक 1 ते 6
वगळण्यात याव्यात."

सभापती महोदय, या विधेयकातील पृष्ठ क्रमांक 4 व 5 वरील "31 ग"- "या अधिनियमामध्ये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतभूर्त असले तरी, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा व पुढे चालू ठेवणे ) अधिनियम,2011 याच्या कलम 1 च्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी म्हणजेच दिनांक 17 सप्टेंबर,2010 पूर्वी उच्चाधिकार समितीने किंवा नदी-खोरे अभिकरणाने अथवा राज्य शासनाने दिलेली परवानगी, वाटप, मंजुरी, प्राधिकार किंवा पाण्याची हक्कदारी ही वेध असेल आणि नेहमीकरिता वैध असल्याचे मांडण्यात येईल आणि तद्नुसार, कोणत्याही न्यायालयासमोर, न्यायाधिकरणासमोर किंवा इतर प्राधिकरणासमोर, पाणी घेण्यासाठी अशी परवानगी, वाटप, मंजुरी, प्राधिकार किंवा पाण्याची हक्कदारी यांना आक्षेप घेणारा कोणताही दावा, खटला किंवा अन्य कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही आणि या अधिनियमान्वये आवश्यक असलेली कोणतीही परवानगी, वाटप, मंजुरी, प्राधिकार किंवा पाण्याची हक्कदारी मिळविण्यात आलेली नाही या कारणावरुन, असा कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही किंवा चालू ठेवता येणार नाही." हा मजकूर वगळण्यात यावा अशी माझी सुधारणा आहे.

2...

श्री. पांडुरंग फुंडकर...

सभापती महोदय, याचे शीर्षक विवक्षित दावा किंवा कार्यवाही इत्यादीस प्रतिबंध असे आहे. हे विधेयक सभागृहात मांडले गेले आहे. माननीय राज्यपालांचे अनुशेषासंबंधीच्या निर्देशाचा देखील उल्लेख झाला. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. रावते यांनी उल्लेख केला की, सोफिया पॉवर कंपनीला आपण पाणी दिले. त्याच्या विरुध्द सर्वोच्च न्यायालयात खटला दाखल झालेला आहे. दोन दिवसांनी त्या खटल्याची तारीख आहे. कोर्टात न जाण्याचा इफेक्ट हा 17 सप्टेंबर, 2010 पासून लागू केला आहे. सोफिया या कंपनीच्या विरुध्द जे प्रकरण कोर्टात गेलेले आहे. ते प्रकरण या इफेक्टमुळे बाद होऊ शकते.

सभापती महोदय, मंत्रिमंडळाच्या समितीच्या माध्यमातून एखाद्या धरणाचे पाणी वाटप करताना शेतकऱ्यावर अन्याय झाला तर त्या शेतकऱ्याला न्यायालयात जाता येणार नाही असा या कलमाचा अर्थ निघतो आहे. म्हणून न्यायालयात जाण्यास बंदी करणे याचा अर्थ लोकशाहीकडून हुकूमशाहीकडे जाणे असा होतो. घटनेनुसार मूलभूत हक्क आणि स्वातंत्र्य यावर ही गदा येते आहे. म्हणून हे कलम पूर्णपणे रद्द करावे अशा प्रकारची माझी सुधारणा आहे. या कलमामुळे स्वातंत्र्याची आणि हक्काची गळचेपी होत आहे. शेतकऱ्यांची गळचेपी होऊ नये म्हणून हे कलम डिलीट करुन शेतकऱ्यास न्यायालयात जाण्याचा अधिकार अबाधित ठेवण्यात यावा म्हणून मी ही सुधारणा मांडलेली आहे. माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, किमान न्यायालयात जाण्याचा अधिकार तसाच ठेवावा. तुम्ही शेतकऱ्यांच्या जमिनी घेऊन धरणे बांधता. त्या धरणात पाणी जमा करतात आणि ते पाणी सोफिया सारख्या कंपनीला देता. पाणी वाटपाच्या बाबतीत शेतकऱ्यावर अन्याय झाला, एखाद्या शेतकऱ्यावर अत्याचार झाला तर त्यांना कोर्टात जाण्याची संधी शासनाने खुली टेवली पाहिजे. परंतु या विधेयकान्वये त्यावर बंदी आणली आहे, ती अन्यायकारक आहे. म्हणून मी माननीय जलसंपदा मंत्र्यांना विनंती करणार आहे की, अशा प्रकारचे अन्यायकारक मजकूर डिलीट करण्यात यावे.

सुधारणा प्रस्तुत झाली

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मघाशी उत्तर देत असताना काही सन्माननीय सदस्यांनी मुद्दे उपस्थित केले होते त्यावर मी स्पष्टीकरण दिले होते. त्यानंतर पुन्हा सन्माननीय सदस्यांनी भावना व्यक्त केल्या आणि आपणच त्या बाबतीत निर्देश दिलेले आहेत. त्यामुळे उच्च न्यायालयाच्या संदर्भात 31 (ग) खाली कोणतीही तरतूद नाही हे मघाशी स्पष्ट केले आहे. आताही पुन्हा स्पष्ट करतो. ती तरतूद दिवाणी न्यायालयाच्या संदर्भात आहे. मी मघाशी सांगितले आणि आपणही रुलिंग दिलेले आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : कोणत्याही न्यायालयात खटला दाखल करता येणार नाही असे म्हटले आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, आपण मघाशी या विषयावर रुलिंग दिलेले आहे.

**सभापती** : ज्युडिशियल रिव्ह्यू हा बेसिक स्ट्रक्चर ऑफ कॉन्स्टिट्यूशन आहे. विधेयकात काहीही असले तरी न्यायालयाचे ज्युडिशियल रिट अबाधित राहतात. माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी मघाशी या अनुषंगाने जी हरकत घेतली होती त्या वेळेला मी रुलिंग दिलेले आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : या ठिकाणी हायकोर्टाचा उल्लेख करणे आवश्यक होते.

श्री.सुनील तटकरे : कलम 226 नुसार तो अधिकार आहे. त्यामुळे उल्लेख करण्याची गरज नाही.

**सभापती** : मी मघाशी माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जी हरकत घेतली होती, त्यावेळी माझे रुलिंग दिलेले आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, 226 आणि 227 कलमाप्रमाणे उच्च न्यायालयात जाता येते याची आम्हाला माहिती आहे. परंतु अमरावती किंवा नागपूर येथील सर्वसामान्य शेतकरी हायकोर्टात जाणार आहे का, त्यांना हायकोर्टात दाद मागणे परवडणार नाही. त्यामुळे न्यायालयाचा मुद्दा वगळण्यात यावा अशी आमची विनंती आहे. हायकोर्ट किंवा जिल्हा न्यायालय असा काहीही उल्लेख केला तरी शासनाला त्यामुळे कोणती अडचण येणार नाही. आपण ही सूचना मान्य करावी आणि शासनाला निर्देश द्यावेत. सर्वसामान्य डोंगर कपारीत राहणारा माणूस हायकोर्टात येऊ शकत नाही. 10 हजार रुपये फी भरावी लागते.

...2..

**सभापती** : मघाशी माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी या अनुषंगाने जी हरकत घेतली होती त्या संदर्भात मी माझे रुलिंग दिलेले आहे. या विषयावर पुन्हा चर्चा करणे योग्य होणार नाही.

आता मी सुधारणा मतास टाकतो.

अनुकूल असतील त्यांनी "होय" म्हणावे ("होय" चे आवाज) प्रतिकूल असतील त्यांनी "नाही" म्हणावे ("नाही" चे आवाज) "नाही" चे बहुमत आहे......

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी विभाजन मागतो.

**सभापती** : ठीक आहे.

नंतर 4 टी.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( विभाजनाची घटा वाजल्यानंतर आणि अनुकूल/प्रतिकूल सदस्यांची मोजणी झाल्यानंतर)

**सभापती** : विभाजनाचा निकाल असा आहे.

अनुकूल : 15

प्रतिकूल : 32

सुधारणा असंमत झाली.

( विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात.)

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

खंड 6 व खंड 7 विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, सन 2011 चे वि.स.वि. क्रमांक 1- सुधारणा केल्याप्रमाणे संमत करण्यात यावे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : सन 2011 चे वि.स.वि. क्रमांक 1, सुधारल्याप्रमाणे संमत झाले आहे.

------------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबई दिवाणी न्यायालय विधेयकाबाबत**

श्री. भास्कर जाधव (विधी व न्याय राज्यमंत्री ): सभापती महोदय,सन 2011 चे वि.स.वि. क्रमांक 22-मुंबई दिवाणी न्यायालये (सुधारणा) विधेयक, 2001 हे फार महत्वाचे विधेयक आहे. हे बिल राज्याच्या हिताचे आहे. आपल्याला कल्पना आहे की, आज न्यायालयात 40 लाख केसेस पेन्डींग आहे त्यासंदर्भातील एका ओळीचे हे बिल असल्यामुळे हे बिल मांडण्याची आपण मला अनुमती द्यावी.

श्री. हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्य मंत्री ) : सभापती महोदय, वि.स.वि.क्रमांक 22 हे विधेयक कोर्ट फी च्या संदर्भातील अतिशय महत्वाचे बिल आहे त्यामुळे हे बिल आता चर्चेला घ्यावे अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**सभापती** : आता रात्रीचे 8 वाजून 9 मिनिटे झालेली आहेत. अधिवेशनाचा उद्याचा शेवटचा दिवस आहे. त्यामुळे हे बिल घेण्याच्या संदर्भात मला सभागृहाचे मनोगत समजून घ्यावयाचे आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य आज बिल न घेता उद्या घ्यावे असे सांगतात.)

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आम्ही सकाळी 10 वाजल्यापासून सभागृहाच्या कामकाजात भाग घेतलेला आहे. विधेयक आता चर्चेला घेतले तर आम्हाला त्यावर आमचे विचार मांडावे लागतील यामुळे हे बिल आता न घेता उद्या घ्यावे अशी विनंती आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

`

**सभापती** : ठीक आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. गुरुवार, दिनांक 21 एप्रिल,2011 रोजी सकाळी 10.00 ते दुपारी 12.00 या वेळेत सभागृहाची विशेष बैठक भरेल. त्यामध्ये अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा घेण्यात येईल.

सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.15 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक रात्री 8 वाजून 10 मिनिटांनी, गुरुवार, दिनांक 21.4.2011 रोजीच्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही